मा/ मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ३५

( जिल्हा वाचनालय )

४०

मासिकाचे नाव — आत्मरंजनावली

संपादक —

मासिक क्रमांक — सन — १९१८

अंक —

( महिने ) १ ते १२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जुनी मासिके ( संदर्भ )

॥ श्रीः ॥

# काव्यरत्नावली

आलीकडील कविमंडळीनें चालविलेलें

**कवितेचें मासिकपुस्तक.**

श्लोक.

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती । त्या त्याच अर्थाप्रति दाविताती
कौशल्य मोठें रचनेंत आहे, । सत्काव्य तेणे नव वाटताहे.

**वर्ष २७ वें )  जानेवारी सन १९१६  ( अंक १ ला.**

हें मासिक पुस्तक **नारायण नरसिंह फडनीस** यांणीं जळगाव जिल्हा पूर्वखानदेश येथें बालाजी पेठ म्युन्सिपल घर नंबर १३५ मध्यें आपल्या बाबजी प्रिंटिंग छापखान्यांत छापून जळगांव येथें प्रसिद्ध केलें.

**वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १। रुपया.**

बाबजी प्रिंटिंग प्रेस जळगांव

अनुक्रमणिका


| पद्यसंख्या | जानेवारी १९१६ | पृष्ठे |
|---|---|---|
| ६१ | अंतर्विद्धकलिका | १ |
| ९ | भग्नप्रलाप | २१ |
| २ | सुभाषित | २४ |
| ७२ | | |


---


# भिषग्विलास.

## आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी

## प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन ११ वर्षे पुरीं झालीं ह्यांत यथावकाश, शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग, त्यांचें निदान व चिकित्सा, औषधी व त्यांचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयांवर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते. या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारासच न होतां इतर सर्व सुशिक्षित व कुटुंबी माणसांना व्हावा, ह्मणून ह्यांतील माहिती सुलभ भाषेंत दिली जाते वार्षिक वर्गणी आगाऊ टपाल हसुल सह अवघी १॥ रुपया.

व्यवस्थापक 'भिषग्विलास' सोलापुर

# काव्यरत्नावली.

## अंक १ ला.

## अंतर्विद्धकालिका.

प्रस्तुत शब्दचित्र सामाजिक आहे. सामाजिक काव्यें महाराष्ट्र भाषेंत फारच विरळ आहेत. विषय अगदींच सामान्य असून नित्यनिरीक्षणातला आहे. पुरुष नीतिभ्रष्ट व्हावयास स्त्री कारणीभूत होते कीं स्त्री नीतिभ्रष्ट व्हावयास पुरुष कारणीभूत होतो. या आपल्यापुढें नित्य येणाऱ्या प्रश्नाचा लेखकानें आपल्या दृष्टीनें विचार केला आहे प्रस्तुतसारखे सामाजिक प्रश्न लेखनद्वारा पुढें आणावेत कीं नाहीं हा एक प्रश्न आहे. पण तो आज जरी चमत्कारिक वाटत असला तरी कालांतरानें शोकपर्यवसायी नाटका-प्रमाणेंच तो नामशेष होईल यांत शंका नाहीं. काव्यविषय जसा नवा आहे तशी रचनापद्धतीही अगदींच नवी आहे दुसऱ्या प्रसंगांतील प्रत्येक पद निरनिराळ्या चालीवरचें आहे. पद्यांच्या चाली महाराष्ट्रांत सर्वप्रिय अतएव सर्वतोमुखी झालेल्या संगीत मानापमान व शारदा नाटकांतील घेतल्या असल्यामुळें 'अमुक पदाची चाल लागत नाहीं' असें ह्मणा-वयाची पाळी येणार नाहीं असें वाटतें.

वृत्तभंगामुळें रसहानि होते असें कित्येक रसिकांचें मत आहे व तें खरेंही आहे. तथापि प्रस्तुत काव्यनायिकेच्या भडकलेल्या मनस्थितीकडे लक्ष दिलें असतां तिच्या तोंडीं एकच एक वृत्त चालणें रसापकर्षक झालें असतें व ह्मणून लेखकानें प्रस्तुत कृतींत जी भिन्न भिन्न चालींची योजना केली आहे तींत निदान अनौचित्य तरी नाहीं असें वाटतें. **संपादक.**

( चालः—भूपती खरें तें वैभव. )

१

का मना ओढिसी मागें मागें मजसी ?
वद भीति कशाची वाटे आतां तुजसी ?
मज कुणाचेंच कीं नाहीं भय बा ! उरलें,
मी लाज जनाची तुझीहि वाटुनि प्यालें;
ही भीड भिकेची बहिण कशाला आता,
चल पुढें स्वैर तूं करुं दे कांहीं जगता;
मी जशी जगा या मेलें आजला,
जग तसेंच हेंही मेलें बा ! मला,
मी नको जगा मग जगत कशाला मजशीं ?
ही मेली मेंढी भीत नसे आगेशीं.

२

जग हसेल ह्मणसी ? हसो बापुडें परतें,
मी हसेन त्यांतें मलाहि हसतां येतें;
जग मला न घाली मिळवुनि खायाप्याया
मी तरी धरूं का मुरवत त्याची वाया;
एकदां मना तूं भ्याड जगा हें कळता,
नें स्वारी अक्षय भरील तुझियावरता;
नि संग तया तूं ऐसें समजता.
वाराहि तुझा ने घे तें तत्त्वता;
तव नाणें खोटें बोल काय दुसऱ्याशीं,
भाडलें पाहिजे आपुल्याच पायाशीं.

३

बा ऐ काय बोलसी ह्मणेल जनता मजशीं,
' ही महा पापिणी नाहीं काळिज इजसी,
' ही कलंकभूता उभय कुलांना झाली,
' ही दुष्ट जारिणी कृत्या जन्मा आली '
मी असेन कुलटा काय जगा पारे त्याचें,—
मज दूर न केलें काय तयें कायमचें ?
जारिणी परी बा ! झालें मी कशी,
ही कधीं कुणीं का केली चवकशी ?
जग सदा सज्ज कीं परांस निंदायासी,
अंधार दिव्याच्या पारे बा ! पाहिं बुडाशीं.

४

बा ! पाप कोणतें पुण्य कोणतें याचें,—
जें गूढ जगाच्या अनादि आरंभींचें;
तें सहज सोडिलें अनुभव-योगी-गुरुनें,
द्व्यक्षरी मंत्र मज ' जग ' हा देउनि त्यानें;
हे शब्द दोन पारे एक अर्थ बा ! त्यांचा,
जो समय परत्वें असतो लावायाचा;
ही जोडी ह्मणजे पोर फसवणी नुसती
ही धूळ फेंकणें लोकलोचनीं पुरती.
नर करी कर्म जें कांहीं पुण्य तें,
स्त्रीकरें होय घडतांची पाप तें,
या अर्थ वदूं कीं अनर्थ वदुं मी याशीं,
कीं पुरुषार्थाचा अर्थ मानुं हा पुरुषीं ?

५

मज ज्यें उठविलें जगांतुनी या आजी
तो फिरे उजागर खुशाल जगतामाजी;
मैत्रिणी जिवाच्या बाळपणीच्या मम त्या,
ज्या प्रिय बहु मजला बहिणींहूनहि होत्या;
त्या अतां न कोणी तोंडहि माझें बघती,
गण गोत आप्त मग कशास मजला पुसती ? १०
तांदुळापरी धुतल्याही शुद्ध तो,
निर्धास्त उजळ माथ्यानें नांदतो,
तो साव, चोर मी कोणी वालि न मजशीं,
ही धरा माउली घेइ न मज पोटाशीं !

६

त्या बहिणी जावा म्हणती खापरखुंटी,
ही कशास आली जन्मा नष्ट करटी;
पाठीस पाठ जे लाउनि आले भाऊ,
मी झालें त्याना जिवत गिळु कीं खाऊं;
मज केलें ज्याहीं सदा जीव कीं प्राण,
ते बाबा माझें नांवहि घेति न चुकुन;
चंडाळ जणू ते मातें मानुनी,
साउलीहि घेति न माझी ते कुणी;
प्रत्यक्ष जिनें मज घातियलें जन्मासी,
ती आईही मम नवसि मरण देवासी !

७

ते आई बाबा मात्र धनी जन्माचे,
नाहींत खरोखर माझ्या या कर्माचे;
जे दिनीं तयानीं दिधलें मज अन्यांशीं,
ते दिनींच तुटलें माझें नातें त्यांशीं,

मज मेली म्हणुनि माझ्या नावें त्यानीं,
सोडिलें जरी बा ! तीन ओंजळी पाणी;
मज नसे तोंड बोलाया त्याप्रती,
ही अशी बिकट मजलागी ये स्थिति;

हा तोंड दाबुनी मार बुक्याचा मजसी,
बा ! निमुटपणानें व्हावा सोसायासी !

८

संबध जयासी जन्माचा या घडला,
त्यानींहि आजि का धिःकारावें मजला;
मी महा पातकी ह्मणे न मी कीं नाहीं.
मीं असत्य राचिल्या राशी दोषान्याही;

जें वर्ज खरोखर कुलास्त्रियेला कर्म,
मीं केलें तेंही अवगणुनी निज शर्म,
स्त्रीधर्म तुडविला पाहीं पदतलीं
मी ध्वजा महा पापाची उभविली;

मीं एक मारिली गाय ह्मणुनि त्यासरसी,
वासरू मारणें शोभे काय तयाशीं ?

९

मी नष्ट ह्मणोनी केला माझा त्याग,
परि काय तयानें केलें अजवरि चाग ?
जें तयें न केले असें न पातक बाकी,
मी काय बापुडी तुळिता त्याच्याशीं कीं !

जागीं असे वस्तु कीं सत्य ह्मणोनी कांहीं,
हें तयांस वाटे मुळींच ठाउक नाहीं,
कोणतें व्यसन त्या नाहीं हें नसें,
चोरींत पटाइत भारी ते तसे

ना पुरे रमाया घरचें बटकुर त्यांशीं
दिनिं दिनीं रचति ते पुण्यांच्या या राशी !

१०

हें असें परी त्या कोणि न लावी बोल,
परि जन्माचा मम मात्र जाहला बोळ;
मज कधीं तयाहुनि अधिक काय मीं केलें ?
पतिपदावरी पद ठउनि चालत आलें;

पति गुरु स्त्रियेचा ऐशी शास्त्राज्ञा ही,
मीं साग पाळिली आळस केला नाहीं;
समय हा योग्य पूजाया गुरुजना,
पातला मला कीं वाटे बा ! मना,

गुरुभक्तिव्रत हें सादर उजवायासी,
चल करू तयारी, पैसे मिळवायासी.

११

पारे सांग कोणतें साधन योजूं आज,
होईल सफल कीं जेणें इच्छित काज;
नच करील कोणी उभीहि दारीं मातें,
चाकरी कशाची नको नांवही परतें;

मागेन भीक तरि तीहि न घालिल कोणी,
ही दिसते ह्मणतिल लाल गाजरावाणी;
मागते भीक दिवसाशीं ही अशी,
चालवी छान धदाही रात्रिशीं;

बघ मौज न घाली आई जेवायासी,
देई न बाप कीं भीकहि मागूं मजसी !

१२

मज उपाय यातें एकचि दिसतो आता,
तो करूं; मोकळ्या दिशाहि दाही चित्ता !
हा देह विकाया राजरोस बाजारीं,
चल मांडूं साडुनि भीति भीडही सारी;

ही नव्हे चहाडी चोरी कोणाची ही,
कीं अधारातिल शिंदळकी ही नाहीं;
मानुनी एक धदा हा बा ! करीं,
चल लाग तयाला आता सत्वरीं,

का उगा लाजशी भीक न ही परदेशीं,
कीं नसे चोरि ही करणें अपुल्या देशीं !

१३

का कळे न घेशी अझून आढे वेढे ,
का कळे न पडलें विकट तुला हें कोडें;
चल झुगार बुरखा, पडदा लाजेचा कीं,
कर दूर झडकरां पाय एकदा टाकीं,
बा ! नकोत पत्रें शिफारशीचीं याला,
कीं नको कुणाचा लावायास वशीला;
या नको भाडवल काहीं फारसें,
कीं नको गुरूचें घ्याया बळ तसें;
चल तेलफणी कर बैस आजि खिडकीशी,
घे करीं आरसा लावी रंग मुखाशी !

× × × ×

१ पद ( चाल.--शारदे दासकामदे. )

१

आरसा आजिं हा कसा, दिसे हा असा, कळे ना बाई !
पोटांत असें का धडधड माझ्या होई ?
हें रूप, दिसे बेरूप, मावळे हूप पूर्वींचा ताठा,
का जाय जिरोनी उठला अंगीं कांटा !
हे काल, गुलाबी गाल, दलासम लाल दिसत जे होते,
सुरकुतुनि आजला म्लान कसे झाले ते !
हीं हडें, पाहता पुढें चित्त तडफडे, किती वर आलीं,
हीं गालफडें कांशं आज खालतीं बसलीं !
हें काय, जाहलें हाय, पडति हृदिं घाय करूं तरि कायी ?
कां असें कळे ना चर्र अतरीं होई ?

२

भेसूर, उतरला नूर, दाट काहूर, उसळलें हृदयीं,
हे विचार आजीं डोके फिरविति बाई !
हे चार, नवे अविचार, नवे अविकार दाटती प्रबल,
सुविचार उपजती काळे न कीं हे विमल !
करुं कसें, होइ का असें, लागतें पिसें, जणूं कीं वाटे,
लागली आग ही हृदय आतुनी पेटे
गतकाल जणू कीं व्याल अग्यावेताळ उभा मजपुढती,
इगळ्या हजारो अंगातें जणु डसती !
वेदना होति ज्या मना, सांगु तरि कुणा कुणीही नाहीं,
तुजवीण कवण या ऐके यादवभाई ?

२ ( चाल:—हरि मजला चालवेना. )

मुळिं मजला सोसवेना ध्रु०
धडगत न दिसत मुखिं वच न फुटत, मन मुळिं न ठरत,
मज पुढती पाहवेना ! १
किति समय कठिण, तुजवीण कवण, मम करिल तरण,
बळि ऐसा सापडेना ! २
तुज म्हणुनि शरण, व्रजवनगवळण, मज हरि समजुन,
उद्धरिं ही दीनदीना. ३

३ ( चाल— धीर समीरे यमुना तीरे. )

साग मुरारे ! काय कठिण रे ! भाई मेरे राधाप्यारे ! ध्रु०
कितिक गौळणी वृंदारण्यीं आलिंगुनि तूं प्रेमविकारें—,
उद्धरिल्यासी कथाहि ऐशी मिथ्या कैशी मानूं बा रे !

तूं जाराग्रणि त्याहि जारिणी, तारिहि न तरल्या का व्यभिचारें ?
मीच तरी कशि, वद मग दोषी सारासारें पाहिं विचारें !

४ ( चाल:--अंकित पदांबुजाची दासी. )

येइ न कशी दया बा ! तुजशी, शरण मी तुझ्या पायाशीं ध्रु०
आठ ठिकाणीं जरिहि वाकडी कुब्जा तिशिं रतलासि ! १
कान्होपात्रा तुज न अपात्रा गमली मुळें हृषिकेशि ! २
काय पिंगला होति भगळा तिजसह तू रमलासि ! ३
अधिकारें या ह्मणत्यें तुजशीं बन्सि ! धरीं हृदयासि ! ४

५ ( चाल —ही कामाची तलवार. )

मी काय कुणा बोलले, कुणा भाकिलें, स्मरण त्याचें--
होई न भोग दैवाचे. ध्रु०
त्या मेल्या काळ्याप्रती, चुकुनि काय कीं शरण गेलें,
मीं खडकिं बीज पेरिलें ! १
तो साऱ्या मुलखाप्रती, असे माहिती, स्त्रैण भारी,
कुलकलंक कीं व्यभिचारी ! २
तो चोरुनि नारी हरी, बळें घर भरी, नीति त्याची,
हें कथि कथा भीमकीची ! ३
मी शिळा गळा बांधुनी, इच्छिलें मनीं, तरुनि जाया,
परि साध्य कोठचें व्हाया ? ४
तो काय कन्हैया हरी मजसि उद्धरी व्यर्थ त्याचे--
मी नादिं लागलें साचें ! ५

६ ( चाल.--कसें मन मोडुनी अमुचें. )

मना ! करुणा कशी येणें मेघवर्णा,
निर्दया त्या बकीहन्त्या शेषनयना ! ध्रु०

कुमुदिनीची दयागंगा, पतगाच्या, अंतरंगा
विभगोनी न धे जनना. १
पद्मिनीची क्षयीन्दूला, तशिच कीं त्या--
लोलुपाला बभराला दया ये ना ! २

७ ( चालः--उद्धवा शांतवन कारिं जा. )

१

' जारिणी अहिल्या ज्यानें । उद्धारिली पदरेणूनें
' तारेस जारिणीदीक्षा । पति वधून दिधली ज्यानें
' जाइं त्या शरण रघुनाथा ' । वदलासि काय तू आता ?
जारिणीविहितहितकर्ता । जो असा दयामय दाता
काय त्या शरण मी जाऊं ?
तत्पदीं भाल का ठेऊं ?
तत्पदीं तनू ही वाहूं ?
विनवुनि त्या प्रेमरवानें. १

२

बा मना ! रामचरिताचा । एक भाग तुजला ठावा,
योग्य कीं ह्मणुनि तो तुजला । भासावा प्राणविसावा,
राघवा परी बा ! तव या । अबलांची नाहीं कणवा,
काय तो तारितो अन्या । स्वजनाची ज्यास न पर्वा,
वध केला शूर्पणखेचा,
चित्तभग अहिरमणीचा,
त्यागही आत्मदयितेचा,--
केला कुणीं जग हें जाणें ! २

८ ( चाल.--प्रिये पहा रात्रीचा. )

नको नको नावहि त्या रामाचें मानसा मला ध्रु०
वदुनि जिला ' प्रेमखनी ' । गौरविलें मधुवचनीं
त्यजिली ती गहनवनीं । सदनमंगला. १
त्यासर्गे रात्रदिन । फिरली जी वण वण वण
अगाचे करुनि रान । वंचिलें तिला ! २
गाणिलें यच्चरणयुगुल । जणु शिरीष कुसुम विमल
नवनीताहूनि मृदुल । वंचिलें तिला ! ३
देवद्विजराविसमक्ष । करुनि वरी सिंहवक्ष
होउनिया वचनदक्ष । पारिणिलें जिला ! ४
' नच कदापि अतिचरामि । तीन वेळ शपथ नामी
करुनि जयें वर्मि मर्मि । विंधिलें जिला ! ५
गर्भभरें अलसवती । असताना सति सुदती
त्यजुनि दया नीतिरीति । टाकिलें तिला ! ६
तरिहि एकवचनि त्यास । मानिति जें कुणि तयांस
धिक्काराचि निर्दयास । गरज ना मला ! ७

९ ( चाल –नृपममता रामावरती. )

१

पुरुष एक म्हटला कीं तो । अनयाचा पुतळा असतो । बा मना !
तू कुठेंहि बघ बा यातें । अपवाद न दिसतिल तूतें । मानसा
जा जगात, सुरलोकात । जा किंवा पाताळात । "
राम कीं कृष्ण कीं शंभू । साक्षात् ते दंभ स्वयंभू "
घनवृंद । होउनी धुंद । करी किति फंद
बघुनि चपला तो । पळता भुइ थोडी करितो । मानसा १

२

हा पहा लफगा इंदू । नीतिचा न ठावा बिंदू । मानसा
कुणि म्हणो सुधेचा सिंधू । परि त्या न नयाचा बिंदू । मानसा
कुणि म्हणो कुमुदवनबंधू । परि त्या न नयाचा बिंदू ''
वाकला । क्षयें खंगला । तरिहि रंगला
रात्रिचा फिरतो । दिवसा मुख काळें करितो । मानसा २

१० ( चाल.—अजि म्यां ब्रह्म पाहिलें. )

ललना केवळ माउली । प्रणयविराजित सुरलतिकेची—
मधु मधु सुंदर सुधारसाची मूर्ति जणू ओतिली ध्रु०
पतिकरितां जी कष्ट निरंतर । करी तिचें तरि गळे न अंतर
संकटिंही जी देइ न अंतर । शीतल दे साउली ! १
जनकनंदिनी रामें त्यजितां । विव्हल एकचि हो भूमाता
दुभंग होउनि तिनें अवचिता । पोटीं ती घातली ! २
शरण मना जा तिलाची आता । एक खरी ती समताभरिता
होइल तुजला दुःखीं त्राता । शंका ना राहिली ! ३

११ [ चालः—प्रेम सेवा शरण. ]

पाव गे भूजननि, शरण कन्या तुला,
धाव झणिं जठरविवरिं ठाव दे तूं मला ध्रु०
हतभागि अघसक्त । केली जनें त्यक्त
लाधलें फल उक्त । देह हा पोळला ! १
जनिं तूंचि समदृष्टि । करिसी दयावृष्टि
पावुं हें मन तुष्टि । पुरवि या हेतुला ! २

### १२ [ मी समजु तरि काय. ]

बा ! झजसि तरी काय दया वद
असे जारिणी जन्मापासुनि जिरे न तरिही अझुनि तिचा मद. ध्रु०
सूर्यवंशिं नृपतींना वरिले । चंद्रकुलीही कमी न केले
अनार्य राक्षस मागुति वरिले । कशि अशि व्हावी साग हितप्रद १

### १३ [ चाल.—निजरूपीं जगदाकृति. ]

जग सारें गमतें आजि मातें. जारजारिणीमय झालें तें ध्रु०
भूतळिं वरतीं पाताळींही, अपवाद न बा ! गवसे तूतें ! १
न्यायनिरतमुनि पराशरासम, याच पथाचे अनुयायी ते ! २
देवाग्रणिही जारशिरोमणि, दोष काय मग तरि इतरातें ? ३
खाण जशी ती तशीच माती, जसा शिंपला मोत्यें होतें ! ४

### १४ [ चालः—धि कार मन साहिना. ]

लज्जा न कशि या जना । व्यभिचारसक्तभू पाहवें ज्या मना
खचित मृत वाटती नर न ते अगना ध्रु०
बघतात माता भगिनी स्वकांता अन्योपभुक्ता झाकूनि नयना ! १
बसताहि लत्ता गालिप्रयुक्ता सहती, न वरती कारितीहि माना ! २

### १५ [ चालः—लग्न नव्हे मरण उद्यां. ]

दोष परी तिजसि कसा । सकल जिथें अधम पापि ध्रु०
लाधे जनु नरकिं ज्यांस । निरयाचि कैलास त्यांस
औषध का स्वभावास । बदल तया नच कदापि ! १
रुधिर रुचे गोचिडास । मुख न लावि तो पयास
कर्दमिं रुचि दर्दुरास । कमलमधू कधिं न तो पि ! २

१६ [ चालः—वसंतीं बघुनि मेनकेला. ]

मना तुज कोण वालि आतां धृ०
अकरुण झाला करुणाघनही सकल जगत्राता ! १
जगीं तुज कोण तरी पुसतो
सहानुभूती शब्दाची तरि कोण दाखवीतो ! २
कळेना काय गती भावी
एक्या माळेंतच सकल मणि कोण तया ओवी ! ३
सुखाची आस जरी धरिसी
अपुल्या पायीं उभे रहाया हवे शिकायासी ४
हिताची ऐक एक गोष्ट
स्वत मेल्याविना न दिसतो स्वर्ग कधीं स्पष्ट ! ५
करीं तुज जेविं रुचे आतां
दोन मार्ग तुज पुढें उभे हे अवलोकीं चित्ता ! ६

१७ [ दिंडी. ]

सकल दु खातुनि मुक्त व्हावयास
आड व्हावा तुज जवळ करायास;
श्रम न करिता सुखभोग जरी व्हावा
बापलेंकाचा होइ हाटमेवा ! १

१८ ( चालः—जय कृष्ण तट वासा. )

तुजलागीं मनराया । अबला ही या समया, करि विनती येउं दया धृ०
मृत्यु आजि पति वरिते । चितारागीं ही चढते
हो सहाय अबलेतें । घाबरवी नच हीतें
भयभारें चळतां ते । ने पुढती तू काया ! १
होवो हा तरि आतां । इजलागीं सुखदाता

दुःखभारसंहर्ता । स्वर्गप्रदपथनेता ।
अनुकंपाकुलभर्ता । देवो तो तारि न्याया. २

१९ [ चाल:—आनंदी आनंद गडे. ]

काय बोलसी मृत्यूचें । नको नावही मति कांचे धृ०
कसेंहि करुनी पोट भरूं । जशी वेळ ये तसें करूं
याची टोपी शिरिं त्याच्या— । त्याची घालूं तिसऱ्याच्या
देह विकाया बाजारीं । माडूं किंवा करु चोरी
थापाथापी । कीं गळचेपी । कापाकापी
भयहि न यातिल कोणाचें । नको नाव परि मृत्यूचें ! १

२० [ चाल:—तुमचें शिव सदा. ]

वदसी वद कसा असें । हें मज बा ! ऐकवे न, कर्णीं जणुं तीव्र जहर आग होतसे धृ०
पासुनि या विरम विरम । पथ हा बा ! घोर अधम
होइल तुज दुःख परम । साहवे कसें ! १
बोलाया सहज सुकर । करु जाता बिकट फार
कृति वाणी पुढति हार । सतत खातसे २

२१ ( चाल:—चंद्रकांत राजाची कन्या. )

१

पवित्र निर्मल परमोज्ज्वल त्या ब्रह्मकुलामाजी
जन्मुनिया मी काय करावें हीन कर्म आजी ! धृ०
नांव केवढें लौकिक किति तो बाबाचा मोठा !
काय आज मी सर्वांवरि त्या फिरवू वरवंटा ?
अंधारातिल कृत्यें माझीं आधिंच आयकुनी,

मेल्याहुनि ते मेले झाले तेज न लव वदनीं !
राजरोस मी वेश्या आता झालें हें कळतां,
जीवत न ते राहतील कीं क्षणही यावरता !
परम सुशीला साध्वी माता तशीच ती माझी,
हाय ! आगच्या जागीं होइल दुःखें मृत आजी !

२

पोटीं येउनि काळ होउनी काय तया खाऊं ?
अभ्रूचा ध्वज असाच त्यांच्या सदनाला लावूं ?
सकलांसाचि ते आज सुखाचें किति झालें असतें ?
गार्भिंच जिरलें असते किंवा बाल्यिंच जरि मरतें
जन्मताच कीं मातेनें गळिं नख दिधलें असतें,
झालें असतें किती बरें परि कुठुनि व्हावया तें !
विधिचें लिहिणें परंतु कैसें हाय टळावें तें ?
' परंतु ' चेंही परि रामायण काय कधीं टळतें ?
त्रिकालदर्शी आदर्शी स्थिति पूर्वभावि माझी,
सद्यस्थितिसन्निकट मांडुनी करिसी स्मृति ताजी !

३

बालपणींचें खऱ्या सुखाचें चित्र मनोरम तें,
डोळ्यापुढती उभें ठाकतें मन तन्मय करतें ;
खावें प्यावें सुखें हसावें यथेच्छ विहरावें,
किंवा होता न मनाजोगें अश्रुजलीं न्हावें !
चिंतेचें मुळिं जातक नाहीं एक मात्र ठावें,
मनास जें प्रिय तेंच करावें उजवें कीं डावें !

जो गुण बाळा असे उपजतां तोचि जन्मकाळा,
चारित्र माझें सुदर साधन ध्याया पडताळा !
लाड भयंकर केले मम जे बालपणामाजी,
त्यांचें फल हें चाखितसें मी मूर्तिमत आजी !

४

दुर्दैवें पति मला मिळाले परम दुराचारी,
' रूढिविघातक ' जे ह्मणवीती अपणा व्यवहारीं !
बुद्धि राक्षसी स्वयप्रकाशी डोकें भलतेंच,
हृदय साहसी परि न ठाउकी व्यवहारी पेंच !
अफाट शिक्षण अचाट कल्पक परि या सगळ्याची
माती झाली कारण नव्हती जोड विचाराची
जे जे जनता म्हणेल त्याच्या विरुद्ध जायाचा
हटातटानें बाणा जणु कीं होता हा त्याचा !
विवाह होता अशी विलक्षण झाली स्थिति माझी,
हासूं किंवा रडूं कळे ना स्मृति चित्ता भाजी !

५

' रुचेल तितुका मधु प्राशितो मधुहर नवकमलीं—
बसुनी निर्भय—निर्भयता ही प्रणयाची खोली !
' तशीच मनुजें प्रणयलोलुपें रुचेल ती वस्तु,
खुशाल घ्यावी मुळीं न धरता मनामधें किंतु
' सोंग कशाला कशास किंवा बंध विवाहाचा ?
काय अजवरी कुणीं मांडिला विवाह पक्ष्याचा ?
' वल्कवासिता विपिनवासिनी विमला वधुवल्ली,
वयोविचक्षण वर्जुनि वरिते विटपी वनमाली !

'मनुजलतांनीं तशी वरावी वस्तु रुचे जी जी,'
विचार त्याचे असे परिसुनी भ्रमली मति माझी !

६

विकलविचारप्रवाहपतिता पतिला मी झालें,
त्याच्या एक्या मित्रें मन्मन हारिलें ! चळवीलें !
परम नीच त्या कैवर्ताच्या रम्यरूपजालीं,
सापडला मम मनोमीन हा मोहुनि त्या कालीं !
नयविनयाचें हृदयावरचें दडपण मग निघुनी,
अनयपथाच्या उतरडीला गेलें घसरोनी !
गेला गेला पाय घसरला ! खोल खोल गेलें
कैचें वरतीं येणें खचलें पकीं मी रुतलें !
सजीवन मम करील तुजविण कोण असा गाजी ?
दयामृताचा करुणासिंधो ! बिंदु एक पाजी.

७

अनुतापें मी तापुनि जरिही उभी जळत आहें,
कोण मानितो दयादृष्टिनें कोण मला पाहे ?
कितिहि वागता पाय फुकुनी नाथा ! मी आतां,
डोळे मोडित बोटे दावित निरखिल मज जनता !
काय पाप कीं केलें न कळे अह्मीं योषितांहीं
सदा सर्वदा पापदृष्टिनें जग आह्मां पाही !
नको जिणें हें प्रभो ! अमगल आला मज वीट—
आला पुरता तार तार ये धावत बा ! नीट !
दीनदयाळा ! करीं तातडी धीर न मज आजी,
आग लागली भडका झाला करुणामृत पाजीं !

२२ ( चाल —प्रेमभवें जीव जगीं या. )

तूंचि जागा एक अससी । सदया । मगल यदुराया ! धृ०
मम या परम शाती जीवासि द्या । नवघनकाया ! १
चरणीं शरण तारीं दीना पापशमना ! अयि जितमाया ! २

२३ [ विनयहीन वदता नाथा. ]

मुळिं न धीर मजला श्यामा ! येइं बा पावननामा ! धृ०
निजजनविश्रामा ! आरामा ! गुणधामा ! कारें न मला--
हतकामा ! श्यामा ! १

२४ [ चाल:--दासी ऐसे मानुनिया. ]

येइ येइं यादवभाई ! वाट तुझी किती पाहुं,
शोधु कुठें कुठें पाहु जाउ कुठें किती साहुं;
बाहु किती बाहु किती कोठवरी अशी राहुं,
घालशील साग कधीं प्रेमरसीं मला नाहु ? १

२५ [ चाल —या हो सज्जनजन हो. ]

आला । कृपासिंधु हा आला दीनबधु हा आला !
पाउल वाजे कर्णीं गाजे भाग्योदय कीं झाला ! धृ०
प्राण । झाले जणु गतभान । आनदात विलीन
करिता प्रेमें विमलमनानें नामसुधारसपान
बाष्प । झरती झरर अपाप । प्राशुनि ते निष्पाप
नाचू लागे प्राणमयूरी विसरुनि चेतस्ताप
घाला । जीव शातिरस प्याला ताप लयाला गेला
वाटे जणु कीं शीतल मगल सुधास्यदनीं न्हाला ! १

× × ×

( मंदाक्रांता. )

आला तेव्हां द्रुतपदिं युवा त्या स्थलीं एक कोणी,
हास्या लास्या करित जवळीं जाय जों त्या बघोनी--
पश्चात्तापें तनु तनु जिची जाहली फार होती,
किंकाळोनी सभय पडली भामिनी भूमिला ती. १

ज्यानें केलें तिज अपथगा तोच तो दुष्ट जार,
आला होता विरचुनि नवे अन्य पापप्रकार;
गेला वेगें परत फिरला पाहता मूर्च्छिता ती,
सौख्याचे कीं सकल असती सोबती लोकरीती ! २

शुद्धी बुद्धी सकल सरली मूर्च्छना तीव्र झाली,
प्राणज्योती त्वरितचि तिची त्याच जागीं निमाली;
नीतीभ्रष्टा चटुलवचनी भृंगवृत्ती नराच्या,
झाली कामानलिं हुत अहा ! भंग त्या काय नीचा ! ३

× × ×

मोहोनीयां मनुजफणिच्या शीतलालिंगनास,
झाली जी का विषकलुपिता आंचवे जीविताम;
केली सत्त्वच्युत नवकळी चुंबुनी दुष्कुमारें,
होई अंतीं मृतिवश अहा ! साधिला डाव मारें ! ४

ऐसे भृंगे विषधर फणी गृध्र ज्या ज्या समाजीं,
नीती भीती पिउनि कुशली हिंडती स्वैर आजी;
साक्षेपें त्या हुडकुनि करा स्पष्ट लोकीं फजीत !
धिःकारोनी निशिदिनिं तसें त्या मृतप्राय चीत ! ५

× × ×

---

१ मदनानें.

[ स्रग्धरा. ]

हा ! हा ! ज्या बंभरानें प्रशमित अपुला कामदावा कराया,
होमीयेली अहा ! ती अभिनव कलिका कीं मृगीचारुकाया;
ऐशा त्या राक्षसा तन्नव कृतिफल हें अर्पितों तें बघोनी,
पश्चातापें जळो तो जळुनि झुरुनी शुद्ध होवो निदानीं ! १

× × ×

[ अभंग. ]

आधिल्या भ्रतारें काम नव्हे । म्हणोनी व्यभिचारा टेंकलीये १
रात्रंदिस मज पाहिजे जवळीं । क्षण त्या निराळी न गमे घडी २
नाम गोष्ट माझी सोय सांड आता । रातलें अनंता तुका म्हणे ३

× × × ×

हाचि नेम आतां न फिरे माघारीं । बैसलें शेजारीं गोविंदाचे १
घरीचीं झालें पट्टराणी बळें । वरलें सावळें परब्रह्म २
बळियाचा अंगसंग झाला आता । नाहीं भयचिंता तुका म्हणे ३

× × × ×

सर्व सुख आम्ही भोगू सर्वकाळ । तोडियलें जाळ मोहपाश
याचसाठीं सांडियलें भरतार । रातलें या परपुरुषाशीं २
तुका म्हणे आतां गर्भ नये धरूं । औषध जें करूं फळ नव्हे ३

अनंततनय.

---

## भग्नप्रलाप.

पद.

प्रखर भानुकरगत तनु व्हावी
दवानळीं वा दग्ध करावी

ज्वलन्नगाच्या मुखत ध्यावी
कातावून उडी १

शांत किती तरि सागरवारी
विश्वासावे जरी तयावरि
न कळे केव्हां घेइल उदरीं
क्षोभित होउनिया २

दुरून मधुलर वाटे गायन
परी भास तो शका यात न
समीप येतां दीर्घ क्रंदन
ये ऐकायाला ३

स्वर्गंगाजलमज्जित तारा
तेजस्वित या परी भयकरा
एकवटोनी करितिल मारा
एकदाच साऱ्या ४

नको करा जा सर्वहि काळें
कज्जलनग हो या या सगळे
पसरा अपुलें कराल जाळें
या ताऱ्यावरुनी ५

शीतल कर हे घेई परते
भडकाविणारे—हृदयाग्नीते
सत्वविहीना चंद्रा मुख तें
भूमाजी लपवी ६

असह्य रविची किरणशलाका
बोचबोचुनी उडवी भडका

पुरे हाल हे एकदाच का--
धाना सूड पुरा ७
तप्तसमीरा जाळपोळ या

कठिण नगानो एकवटुनिया
या हो या हो उडवा ठिक-या
घाला पातालीं ८

पंचमहाभूतानो वाटे--
अपापले घ्या काढुनि हस्तें
घटकाणूनो सत्वर मातें
मुक्त करा आतां ९.

———— महादेव भिमाजी कुळकर्णी.

## सुभाषित.

श्लोक.

गड्या ! गणिशि काज-यासम कडू भवासी परी
अहा ! मजसि तत्कळें रुचति दोन ज्यांची सरी
सुधेहुनि उणी नसे किमपि तींच हीं तत्वता
सुभाषित, सुसगती; सुख मिळेल यां सेविता; १
सुभाषित धनार्जनीं विमुख तो प्रसंगाध्वर
कसा करिल दक्षिणा वितरुनी पुरा सत्वर
मखीं जरि न दक्षिणा वितरिली तरी निष्फळ
सुभाषित न ये तरी वदु न ये प्रसगीं वळ; २

———— विश्वनाथ नारायण रेंड.

## अनुक्रमणिका.

फेब्रुवारी १९१६

| पद्यसंख्या | | पृष्ठें |
|---|---|---|
| १४ | करुणातरंग | २५ |
| १५ | कुलान्तरिता | ३१ |
| १० | विरहदुःख ! | ४० |
| ९ | जिवनकलह व कविता | ४३ |
| १६ | एका विधुराचे उद्गार | ४४ |
| ५ | मानवजीवित | ४६ |
| २ | दैवाचा खेळ ! | ४५ |
| ३ | मातृभक्ती | ४७ |
| २ | ईशवंदन | ४८ |
| १४१ | | |


# भिषग्विलास.

### आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी

### प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन १२ वर्षें पुरी झाली. ह्यांत पदार्थविज्ञान, शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग, त्यांचें निदान व चिकित्सा, औषधी व त्यांचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयावर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते. या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारासच न होता इतर सर्व सुशिक्षित व कुटुंबी माणसांना व्हावा, ह्मणून ह्यांतील माहिती सुलभ भाषेंत दिली जाते. वार्षिक वर्गणी आगाऊ. टपालहसूल सह अवघी १॥ रु.

व्यवस्थापक 'भिषग्विलास'—सोलापूर

नगर वाचन मंदिर ... शाखा

# काव्यरत्नावली.

## अंक २ रा.

## करुणातरंग.*

श्लोक—पृथ्वी—वृत्त.

भवाब्धि नच हा प्रभो ! जणु विषाग्निची पेटली
भयंकरचि होलिका ! सकलदु:खभू वाटली
तिथें जळतसे परी कुणि न तारिता भेटला
पदाविर तुझ्या विभो ! ह्मणुनि देह म्यां लोटला ! १

भवानल धडाडला ! गळुनि धैर्य भांबावलों
त्वदंघ्रिविण आसरा नच ह्मणूनि मी धांवलों
भयें किति थरारलों ! बघुनि दुर्दशा ही हरी
दयामृतनदीश्वरा ! तुज रुचेल तें तूं करीं २

" कलत्रसुतआदि, ह्या मृगजला पिऊनी कमी—
तृषा करिन " हेतु हा धरुनि मारवाडांत मी—
समूळ फसल्यावरी तृषित मन्मनाचा मृग
दयाब्धित तुझ्या बुडों बघतसे प्रभो ! दुर्भग ३

प्रफुल्लित अशा तुझ्या चरणपंकजाआंतला
गळे मधु मरंद जो, अति तयास सोकावला
मदतरमिलिंद हा चपलता पुरी टाकुनी
जडे तव पदांबुजीं तृणचि अन्य तें मानुनी ४

---

* पण्डितराज—जगन्नाथविरचित करुणालहरीचें समश्लोकी भाषांतर.

जगत्त्रयसुरक्षणीं कटि जयें स्वयें बांधली
जया शरण जाति त्यां सकल सिद्धिही लाधली
अशा तव पदांबुजा त्यजुनि जे कुणी शाहणे
दुज्या हुडकितील ते यमगृहातले पाहुणे ५

रमावदनपंकजा फुलविण्यास मागें न घे
जगत्त्रय विबोधनाविषयिं जो सदा ब्रीद घे
असा दृगरुणोदय प्रभुवरा तुझा जागता !
कधीं मम तमोनिशा हरिल ? सांग उत्कंठिता ६

तुझी वदनचांदणी हरि समस्त तापांस ती
चकोर बनुनी जिला असुर देवही चाखिती
जिथें तिमिर सांचलें निबिड मध्यरात्रीपरी
अशा मनिं कधीं ? तुझा उदय आननेंदू करी ७

गुलाब फुलल्यापरी मृदु छबीहि गालावरी
सुयौवनभरें बरी तुकतुकी दिसे त्यावरी
सुरेख किति कुंडलें हलति, बिंब त्याचें खुलें
मुखांबुज असें कधीं उमललें पहाया मिळे ? ८

सुरासुर जिच्यामधें निजललाट कीं घांसती
जिला सुरनदी बरी लहरि सर्वदा वाहती
अशा तव पदांबुजस्खलित धूळि ज्याभीतरीं
दयामृतनिधे ! कधीं वद लुटेन ? मी श्रीहरी ! ९

मदिंद्रियतुरंग हे मदभरांत शेंफारले
विवेकमय तोडिले दृढ लगाम ज्यांहीं बळें
समीरण तसे पहा उधळले न आटोपती
तयां अडवु दे तुझी चरणरूप पागाच ती १०

पुरातन-मुनींसही मुळिं न वर्णनीं आकळे
श्रुतीहि थकल्या तया न महिमा जयाचा कळे
अशा तुज महेश्वरा ! पतिस लाधुनी मन्मती
विलज्ज, दुसरा कसा वरिल ? ती असोनी सती ११

कधीं तव कृपेविणें मुळिं न वाञ्छिलें स्वप्निं तें
कशास मग जागृतीविषयिंची हवी गोष्ट ते
खरे गमति बोल हे जरि तरी जगन्नायका !
मला पदीं घेउनी करिं सनाथ या बालका १२

अगा सदयता घना ! सकल दारपुत्रादिहीं
तसेंच मज चालल्यासमयिं नागवीलें जिहीं
अहा त्यजियलें ! प्रभो कितिक दुर्दशा ही पहा
नये अजुनिया दया ! हृदय काय पाषाण हा ! १३

अनंत भुवनें प्रभो ! धरिसि पुष्पमालेपरी
नसे श्रम तरी तुला तिळहि भासला कीं हरी
असें असुनि मी अणूहुनि अणू; तिथें कायसा ?
मदुद्धरणिं भार ? तू मग परास सर्वां कसा ? १४

विनम्र अति होउनी तुज विचारितों आयकीं
विचार करुनी पुरा मग तदुत्तरा सांग कीं
गिरीहुनि[1] गजेंहुनी[2] जडचि भासलों कीं मना ?
मदुद्धरणिं आजुनी करिसि " होय ना होय ना " ? १५

नको धन, नकोच तें विभव, राज्य तेंही नको
न पंडितपणा जनीं ? मजसि वाग्मिताही नको

---

1 गोवर्धनपर्वत किंवा मंदाचल. २ गजेंद्र.

प्रभो ! तुजसि एवढें मम असेच गा ! मागणें
कृपातरलदृष्टिनें मजसि एकदां पाहणें १६

महा अधम मी जरी विगुण–खाण आहे जरी
दयेस तव योग्य कीं बघ दयानिधे अंतरीं
फणी धगधगीत ते गरळ–इगळे ओकिती
न चंदन परी तयां हुसकुनी कधीं लाविती १७

कशास मज लाज ? मी क्षुधित रे ! भिकारी ! जनीं–
कणा टिपुनिया सदा भटकतोंच मार्गांतुनी
प्रकार तव वेगळा ! पसरिला त्वदन्याकडे
जरी कर तुझ्या जनें; तव सुकीर्तिला वांकडें १८

असें वतनदार मी नरकगांविंचा श्रीपते !
विलज्ज, कुजणार कीं, परि न कांहिही वेंचतें
परी तुजसि लोक हे पुढति बोलती काय ! हें
विचार करुनी बरा बघ जरा, वदें आग्रहें १९

स्वकर्मविहितव्यथा नरकिं भोगितां फारसें !
असह्य नच वाटतें, परि मनात हें खातसें
" अहा कटकटा ! कुणी नच जनीं उरे नाथ या "
मला बघुनि बोलती ! रुतति काळजा ह्या सुया २०

भवाटविंत सारखे अडकलों तिघे वागुरीं
केरी, मकर आणि मी, दुरित तुल्य तेंही तरी
करी मकर दोन हे झडकरी तुवा तारिले
मला बरिकें टाकिलें ! हृदय कां न तें फाटलें ? २१

१ ख्यात. २ गजेंद्र. ३ गजेंद्र वैरी मगर. ४ भक्त. ५ मार्ग.

" उपाधि धुडकावि जो कमललोचना[1] मानव
तदीय झट संकटें हरिसि, तूं असें मंत्र "
स्वभाव तव जाणुनी सकल पाश मीं तोडिले
न पुण्य गणिलें मुळीं ! मग न का मला रक्षिलें ? २२

तुझें " पतित तारणें व्रत असे " असें मीं हरी
अगा वरद ! ऐकिलें श्रुतियुगीं कितीदा तरी
खरें गणुनि मी करीं करवतील तीं पातकें !
त्रिशंकुसम ' हें न तें ' गत घडे पहा हें निकें[2] २३

कधींमधि चुकूनही सुकृत तें न संपादिलें
सुपीक जमिनींत मीं दुरित बीज कीं पेरिलें
कसा अति निलाजरा बनुनि तोंड दावूं तुला
न तोंड वदण्या मला न नशिबास माझ्या तुला २४

सुदर्शनगदादि तूं धरुनियां जपोनी करीं
स्वभक्तरिपुशासना सतत जागसी कीं हरी !
असें असुनि आज हे तुजसमोर या ओढिती
मदादिक रिपू; कशी तुज न वाटली लाज ती २५

हळूं हळुंच बाळ ये विहिरिच्या कडेला जरी
धरी पथिक मागुनी हळुच धावुनी त्या करीं

---

१ पापाप्रमाणें पुण्यही बंधास कारण होतें अर्थात तो पुण्याचाही उपाधी ईश्वराच्या व आपल्यामधें पडदाच असल्यामुळे तो काढून टाकावा ह्मणून मी पुण्यही आचरण केलें नाहीं हा भाव. २ तू पतितांचा उद्धार करितोस हा तुझा लौकिक खरा मानून पतितपणा येण्याकरितां पापें करीत गेलों पण रुपशेल फसलों हा भाव.

प्रभो ! मग भवार्णवीं पतन पावता पोरगा
बघूनि पितया कसा नच निवारिसी ? सांग गा ! २६
" बरी कृति रुचे " भले सुयश गाति लोकांतरीं
प्रसंग न तया घडो उलट बोलण्याचा हरी !
तुवां न मज पोशिलें तरि तुला न विश्वंभर
ह्मणेल कुणि; लाजही तुज, भला न, मी पामर २७
कठोर मम भाषणें हृदयिं झोंवलीं फार कीं
ह्मणोनि रुससी प्रभो ! मजवरी तरी आयकीं
जगांत नव्हताचसा करिं दयार्णवा ! माधवा !
कशास अति पातकी अधम बोलका हा हवा ? २८
कृती मम बघूनियां मजसि द्यावयाचें जरी
असेल तुझिया मनीं मज नकोच तें गा ! तरी
मदाशय बघूनियां प्रभुवरा तुवां अल्प ही
दिलें तरिच तें शिरीं धरिन, होय संतोषही २९
असे मुलखिंचा जरी पतित आणि लाचार हा
अघोर पुतळा जरी सकल पातकांचा महा
कृतघ्नहि जरी असे, समज आपुला अंतरीं
दया करिं तयावरी तुजसि लाज वाटे जरी ३०
जयें सुकृत साचलें कृपण मानवाचे परी
कृपा करुनि त्यावरी सुफळ कायसें ? श्रीहरी !
दया करिसि तू जरी मजसमान पाप्यावरी
किती मग तुझी जगीं दुमदुमेल कीर्ती तरी ३१
पिता शिशुपणीं मुला करुनि लाड गोंजारितो
शहाणपण आलिया अनय पाहुनी ताडितो

तुवां पुरविले न कीं कधिंच लाड माझे हरी !
कसा मजसि ताडिसी ? बघुनि कर्म खोटें, करी ३२
अहा ! उगिच रे ! प्रभो ! तुजसि पामरें निंदिलें
महा अधम मीच कीं, कृत कुकर्म ना जाणिलें
वियोगदहनज्वरें रमणिच्या जसा भासला
सुधांशुप्रति निंदितो कुमति, तेविं मीही खुळा ३३
कशी विकल, दुर्दशा मज दयाकरा ! ही करी
असे दुरितपाजरा, पतितनाथ तू कीं हरी
“ महाज्वरचि हा असे, मजासि ताप देईल ! ” हा
न हो भ्रम, न सोडिं गा मज, सुधाबुधी तूं महा ३४
प्रभो ! कटुकटू असें बरळलों ! न रागें भरीं
न भान मज राहिलें ! बहकलों तमोऽभ्यतरीं
अजाण शिशु आणखी बहुत गाजले जे रुजें
तसे कुपित, तद्वचा धरिति ना मनीं, थोर जे ३५
तुझ्या पदरिंचा प्रभो ! गरुड; मी तरी पोरका
कसे मग कुवासना भुजग वेढिती बालका ?
भयंकर महश्वर—ज्वरकरीस तूं अंकुश
न सोडिं मज, संसृतिज्वरसुतप्त मी पाडस ३६
प्रभो नच वदेन मी “ मुळिं न पाप केलें ” असें
करून “ न करीं ” असे वितथ तें वदावें कसें ?
तुझें, पतितपावना ! विमळ नाम मीती हरी
म्हणोनि वदण्या मला तुजसि धाष्टर्य झालें हरी ! ३७
शिवादिक सुरांसही भजनयोग्य जो आदरें
तयास अधमाधमें अहह ! निंदिलें पामरें

‘ धिगस्तु मम ’ ‘ धीसही मम धिगस्तु ’ जी ना वरे
कशी न जिभली गळे ! चरचरा न कां ही चिरे ! ३८

नकोच घरदार हें, झट मरोच ती बायको
नको धन, सुमूर्त हें मरण, नावही नायको
न पोर, धनचोर हे; इतुकि एकची वासना
सुगूढ तव रूप हें कमलनेत्र ! लाभो मना ३९

निळे बसविले खडे जमिनीला जिथें पावन
विलासरस वाहती ह्मणति ज्यास वृंदावन
तिथें सुमणिमंडपीं सुरतरूतळीं बावरे
स्वरूप तव तें मनीं अचल बा वसो गोजिरें ४०

हिरे झळकती, पिसें चमकती, शिखीचीं बरीं
असा मुकुट तो शिरीं, कुरळ केश जो आवरी
अली उडति त्यापरी रुळति बालभाळीं त्वरें
स्वरूप तव तें मनीं अचल बा वसो गोजिरें ४१

न हे नयन, पाकळ्या उमलल्या सरोजांतिल !
न हें वदन, चंद्रमा ! शरदिंचा, गमे केवळ !
न हा अधर, तोंडलें ! नव्हत दांत, हे कीं हिरे !
स्वरूप तव तें मनीं अचल बा वसो गोजिरें ४२

किती मधुर बाळसें मृदुल लाल गालावरी
तिथें सुमणिकुंडलें करिति नृत्य तालावरी
हिरे गरुडपाचुचे चमकतात कानीं तुरे
स्वरूप तव तें मनीं अचल बा वसो गोजिरें ४३

अदावत सदा धरी जणु सुनीलरत्नावलीं
रमा निजगृहीं तशी सतत ज्यावरी रंगली

असें हृदय शोभलें ठळक मौक्तिकाच्या सरें
स्वरूप तव तें मनीं अचल बा वसो गोजिरें ४४

भुजगसम दों भुजामधिं सुरेख जी लोंबते
प्रफुल्लवनमाळ, जी पदनखावरी लोळते
ढगांत चपला गमे ! किति वदू ? न वाणी पुरे
स्वरूप तव तें मनीं अचल बा वसो गोजिरें ४५

हिरे जडितकंकणीं चमक ही किती फाकते
जयें उमळतें जणों कमलसेंच कीं भासतें
करद्वय असें धरी, पतितरक्षणीं जें झुरे
स्वरूप तप तें मनीं अचल बा वसो गोजिरें ४६

अमूल्यमणिमुद्रिकायुत करांगुलींनीं नवी
मनोज्ञ मुरली धरी मधुर गोड कीं वाजवी
मनें श्रवण धावती सकल जंतुचे त्या स्वरें
स्वरूप तव तें मनीं अचल बा वसो गोजिरें ४७

जणो उदरकांतिच्या नदिंत रोम–लाटाच ह्या,
जणों तरल गोपिका–नयन आंत ओढावया
धरी अति गभीर कीं गमत नाभि; ऐसें हरे !
स्वरूप तव तें मनीं अचल बा वसो गोजिरें ४८

सुवर्ण रससा कटीं लखलखीत पीतांबर
प्रभांकुरहि फाकले, ठरत दृष्टि ना त्यावर
यदीय छवि जानुला फुलविते अशीं नूपुरें
स्वरूप तव तें मनीं अचल बा वसो गोजिरें ४९

गिळी मगर जेधवा करिस, सोडवाया तया
अपूर्व गमनत्वरा प्रकटि ती ! न जोडा जयां

अशे विलसती जिथें भुवनपूज्य ऊरू बरे
स्वरूप तव तें मनीं अचल बा वसो गोजिरें ५०

ध्वजादिक सुलक्षणें किति जयावरी शोभती
अशीं पदतलें ! किती मृदु ! ! किती किती लाल तीं ! ! !
छवी बघुनि जेथली मदन का न लाजे ? झुरे ?
स्वरूप तव तें मनीं अचल बा वसो गोजिरें ५१

विधि प्रमुखदेवता--मुकुट कांतिचा स्रोत रे
जया विकसवी, अशीं धरि पदांबुजें सुंदरें
नखेंदुकिरणामधें विविध ताप सारा जिरे
स्वरूप तव तें मनीं अचल बा वसो गोजिरें ५२

पथावरुनि चालता स्वसदनांत खाता पितां
कुठेंहि वदतां, हरे ! सतत झोंपतां जागतां
जगातहि रहाटतां,--हृदय तें जरी पाझरे
स्वरूप तरि तें मनीं अचल बा वसो गोजिरें ५३

[illegible] जो पदयुगीं श्रुती लोळती
निरंतर जयाचिया, भुवननाथ तो श्रीपती
असह्य नरकामधें बुचकळे अशा पामरा
मला झट बघेल कीं ? चटक लागली अंतरा ५४

गरीब दुबळा असा करपुटास कीं जोडुनी
नमूनि तुज एक मी विनत मागतों मागणी
सुखें कुळमटांत दे जनन, मात्र ऐसें करीं
त्वदीयपदपंकजीं अढळ [illegible] रहे हरी ५५

तुवां शिकविलें सुधामधुर वेदनाचें मला
परी बनुनि भीपणें अति निलाजरा आंधळा

स्मरें न; असल्या शठा निजजनात कीं पाहसी
दयाब्धि न तुझ्याहुनी, मजहुनी नसे साहसी ५६

समुद्र तर जा नरा ! चल वसा महीखालतीं
सुमेरुशिखरावरी चढ, तथापि आशा न ती
निवेल; विविध व्यथा तुजसि गांजिती वा जरी
नको भटकु, "कृष्ण" हें अमृत पी, धरीं खातरी ५७

पवी दुरितपर्वता, भवगतास सिद्धौषधी
वृथा तुभव तामसीनिशित सूर्य. तेजोनिधी
असंख्यविविध व्यथावनतरूंस जो दाव रे !
कवाडहि विमुक्तिचें खचित "कृष्ण" हीं अक्षरें ५८

प्रदीप्त वणव्यात मी विषयकाननीं सांपडें
अहा ! मन भयें भ्रमे ! हारील कोण ? तें साकडें
जिथें विलसते छवी. अमृत पाझरे ज्यावरी
अशा हरिमुखेंदुशीं मन जडे. चकोरापरी ५९

कधीं ? मी गंगेच्या विमलपुलिनामाजि बसुनी
बरी अंतर्दृष्टी करिन, विषयाला पळवुनी
मन शुद्धी होतां मधुर शरदभ्रासम निळें
अतर्क्य ज्योतीतें रमविल कधीं ? हेंच न कळे ६०

शार्दूलविक्रीडित—वृत्त.

कोठें ? पंडितमत्तकुंजरहरी ऐसा जगन्नाथ तो
कोठें मीं ? कविपादधूलिकणिकासूक्ष्माणुसा भासतो

---

१ वज्र. २ पापरूप पर्वताला. ३ भवरूपरोग्यास. ४ रसायन. ५ खोट्या ज्ञानाच्या काळोख्या रात्रींत. ६ दुःखरूप वृक्षांस.

केलें साहस भालचंद्रकविच्या सत्प्रेरणेनें जरी
" थोरांची कृति यामिषें तरि कवी पाहोत " आशा धरीं १

यथामति मुळातुनी सुरसबिंदु मीं गाळिले
मराठिकवितामिषें कविपदांवरी ओपिले
कटू मधुर पाहुनी रसिक दोष ते झाकिती
उमेद मज यावया गुणलवास वाखाणिती २

संसारसंकटसुकटकिं पादघात
जैं फाटलें हृदय, घोर अशा स्थितींत
आरंभ होय करुणालहरीस; आजी—
आपत्ति संपवुनि पूर्णचि जाहली जी ३

अश्वर्तुत्रिमिताकपज कारिता बाणघ्न, जी होय, ती
संख्या, हा शक; आद्यवार, दुसरा कीं पक्ष, गौरीतिथी
होता पंचम याम, मास चवथा, तैं पूर्णता पावली
दत्तात्रेयकृती मुकुंदचरणीं माळेपरी वाहिली ४

—————— — दत्तात्रेय तुकाराम पणशीकर.

## कलहान्तरिता.

श्लोक.

मना वेड्या आतां हळहळ वृथा काय करुनी
घडी त्या प्रेमाची विघडिलि तुवा रोष धरुनी
कशाला गे मान प्रियजनमनस्तापकर हा
कशी सोसू ऐशा निशिदिनिं महाघोर विरहा १
" प्रिये, भार्ये. आर्ये भयचकित सारंगनयने
क्षमाशीले बाले उचित तुज का रोष धरणें

वळो स्नेहस्निग्धा सतत लहरी सद्गुणखने "
मना पाषाणा तू विसर असलीं गोड वचनें २

महत्वस्त्रीगोत्र स्खलनविषया देउनि अहा !
वृथा रोषावेगें हटुनि वरिलें आजि विरहा
प्रसन्न प्रेमा मी मुकुनि, भरले अश्रु नयनीं
अहा ! गेली गेली झुरुनि झुरनी घोर रजनी ३

जशी स्नेहाभावें हळु हळु विझे दीपकलिका
तशी स्नेहाभावें अहह ! मुकलें प्रेमळसुखा
वृथा उत्कंठेनें तळमळुनिया शून्यहृदया
कशाला चिंतीशी प्रियपतिस तू त्यागुनि दया ४

सुखें निंदा, आम्हीं सकल अबला कोपचपला
दयामेघामाजी सकल अमुचा दोष खपला
कलंकी हा दोषी, अरसिक वदो, काय परवा
प्रभायोगें मानी, प्रियजन, शरच्चंद्र बरवा ५

गुणस्थानीं दोष प्रणयसमयीं प्रेमळ पति–
गणी, झाल्या नाना प्रणयकलहीं धन्य युवति
रुसावें, जिंकावें अनुनय–परा प्राणदयिता
सुहास्यें घालावी प्रणयिजनकंठीं भुजलता ६

अशा उल्हासें जो प्रणयकलहीं दोष वारिला
कसा माझा फासा मजवरिच दैवें उलटला
कधीं आनंदाचे दिवस मज येतील न कळे
अहा ! उत्कंठेनें स्मरुनि अदया व्यर्थ शिणलें ७

कुठें पाहू ऐशा, अदय परि त्या प्रेमळ शठा ?
कुलस्त्रीच्या जीवा, समयचतुरा कीर्तिशकटा

" प्रसाद प्रेमाचा मजवरि करीं मञ्जु वचनें "
वदे तो, मी मौना धरुनि बसलें धिक् मम जिणें ८

विनंति प्रेमार्द्रा, सुमधुर गिरा, जी मज तदा
गमे रोषावेगें, परुष परि ती आजि सुखदा
अहा ! पश्चात्तापें मन तळमळे निर्दय खरें
उलों पाहे आतां हृदय मम हें अश्रुनिकरें ९

दिशा प्राची झाली अरुण, कळलें सत्य मजला
पतीच्या प्रेमानें सकल ककुभप्रांत सजला
पहा आतां होतें विमल पतिचें दर्शन मला
ह्मणे मी तो भासे त्रिभुवन पुन्हां शून्य मजला १०

झरे हे दुःखाचे सतत पळती हो निशिदिनीं
प्रिया तारुण्याचे दिवस पळती त्यांसह ह्मणी
गुलाबाचीं पुष्पें उमलुनि पुढें हाय गळती
तयासंगें होई अहह ! तुमची क्षीण युवति ११

वसंताचे गेले स्मित कुसुम रम्यें प्रिय दिन
स्मरे संध्यारागासमचि अनुराग प्रियजन
हृदीं जो स्नेहाचा अहह ! उठला प्रेमळ ठसा
धुतें मी अश्रूंनीं परि नच हले होय सरसा १२

अहो ! आशा वेडी, सतत पतिचें चिंतन करीं
पुन्हा भेटूं प्रेमें, करुनि गुजगोष्टी वरिवरी
वरूं आनंदानें, अहह परि तें व्यर्थ गमतें
जधीं गेले मातें त्यजुनि पति तें स्वप्न नव्हतें १३

धडाडा या खालीं गिरि वरुनि ओलांडुनि कडे
नद्यांनों, आनंदें, क्षितितलवटे फेन धवले

करा; या सिंधूशीं सुखकर सदा संगम जडो
मिळी, सिंधु स्वांगीं विरह न तुह्मातें कधिं घडो १४

लतानों पुष्पांचे निकर गळती अश्रुपरि जे
स्वजाति प्रेमाचे उगमचि खरे धन्य समजे
अधन्याही राहो, पारि निज जना कल्पतरुला
तुह्मी आलिंगा ह्या सुखकर गमे संगम मला १५

पहा संध्या झाली अरुण, अनुराग प्रियजनीं
करी प्रेमें साऱ्या, पतिस गणिती प्राण, रमणी
क्षणामध्यें जेव्हां अथम रवि जाईल निघुनी
कळे ना! होईल प्रिय भगिनि अधारचि जनीं १६

अहो, माया कैंची? अरसिक जना प्राण रमणां
कळे ना ज्यां स्त्रीचा गुणगण, तसा सुंदरपणा
विकार प्रेमाचे अदय हृदयीं यावरि अहा!
कशाचे? भार्येतें त्यजिति, ह्मणुनी हे शठ महा १७

अहा! वेडी गे मी अरसिक, घडे दोष मजला
वृथा रोषावेगें प्रियतम अहा! म्या दवडिला
अधन्या हे माझ्या विमळ हृदया शल्य सलतें
अहो! या दैवाचे अनुपम खरे खेळ नसते १८

निरंदोनी बोले ह्मणुनि मुकले नाथचरणा
रणामध्यें माना वजन, नच हो प्राणहरणा
प्रियप्राणा माना परिस पुरुषा प्राणरमणी
उपेक्षा कां ऐशी मग करितसां हे नरमणि १९

विठ्ठल भगवंत लेंभे.

## विरहदु ख !

श्लोक.

अमृत वर्षि न कां तव कोकिले !
वरुत ये श्रयणायनिं न कळे
सुरभि तो अजुनी नच पातला
द्रुम--रसाळ--विकस्वर जाहला १

मुदित चक्रवधू बहु जाहल्या
कमलिनी सकलाहि विकासल्या
अयि चकोरि तरी रटसी वृथा
छळि मला शशिची विरहव्यथा २

कमलिनी फुलल्या वनिं दीसती
निजविलास तरी किति दाविती
दिसशि दु खित कां धवलाब्जिनी
विरह जाळि मला शशिचा मनीं ३

श्रुतिमनोहर बाइ मरालिके
करिशि गीत न कां तुमजे निकें
मुदिर भूवरि या जल वर्षती
अजुनि झालि नसे शरदागति ४

विपिनलक्ष्मिलताभुज सूकले
तव दिसे न सुमस्मित फाकलें
अधरपल्लव निष्प्रभ कां दिसे
सुधव माधव तो दुरि कीं दिसे ५

घनतमोसितचैलसमावृता
सकल तारक भूषणवर्जिता

अशि उदास बहू गगनाश्रि ये
दिसशि का न शशी उदयास ये ६

करिशि नर्तन का न कलापिनी
गमसि गे! निजभर्तृविलापिनी
प्रिय असे वधिला वर धीवरें
करुं कसें वद लास्य सखी बरें ७

हरिपुरीहुनि वैभवशालिनी
बहु भयाण दिसे पुरि काचनीं
अहह सोडुनि मायिक विग्रहा
हरि असे पवला अपुल्या गृहा ८

रसरिते सरिते तव गात्र हें
कृश दिसे बहु जीव तृषार्त हे
रस घनप्रिय वर्षिल जेधवां
रसवती तनु होइल तेधवा ९

तिलकहीन तुझे नव सुंदरी
अलिक--आनन पांडुर का तरी
असमये समये हरिला जन
प्रिय असे विरहार्ति सभाजन १०

निखिल पांडवसीरधरानुजा
मलिन--वक्र सरोरुज कां अजा
करुनि संगरिं या अरिसक्षया
मदनुजा--जनु जाय सुरक्षया ११

दिससि तप्त बहूत चकोर कां
विपदपन्हुति बा करिसोस कां

अजि विधुतुदवक्त्रिं पडे शशी
स्थिति न तापद होइल ही कशी १२

करिशि केकि विलापन हा ! कसें
रसिकहृत् श्रवतांच उलेल्सें
त्यजुनि कोक दया मजला त्वरें
कुणिकडे तरि जाय कळे न रे १३

अहह ! नीतिसती--मुखमेचक
दिसतसे मज फार अहेतुक
समजलें प्रिय इचा वरधर्म रे
कुतलिं सतत या नच तो स्थिरे १४

मति मलीमस होउ नको उगी
भ्रमसि का विषयांतरिं वाउगी
निज विवेकसखा त्यजुनी मला
अहह ! खास लयाप्रति पावला १५

वितत ही असुनी वनवीथिका
अशिव शद्ब शिवा करितात कां
असल निद्रित तो गिरिगव्हरीं
मदकटी कटपाटपटू हरी १६

सुकविते सुकुमारि कुमारिके !
भटकसी वनिं कां नच ठाउकें
हुडकिते पितया [२] रसिकावरा
जशि विदर्भसुता नळयावरा १७

वाग्देवते ! भटकसी कशि रानिरानीं
आश्चर्य हे तुजकडेस बघे न कोणी

मी शोधितें कविवरान्वयभूषणाते
आहे परंतु नियति प्रतिकूल मातें १८

राज्याभिषेकसमयींहि पुरी उदास
कांहीं दिसे न कळेचि निदान यास
श्रीरामचंद्रविरहानलतापतप्ता
केली असे नियतिनें सकला अनंता १९

का दीसती जन सुदीन सुदुर्बलांग
तेजोविहीन मतिमंद अनीतिमग्न
स्वातंत्र्यदेवि ! तुझिया विरहप्रभावें
झालेत दुःखित असें मजलागिं भावें २०

धूर्जटी

---

## जीवनकलह व कविता.

### आर्या.

मित्रा ! क्षमस्व झाल्या अजुनि न कविता लिहूनि मम सकला
जीवनकलहगता मज दुर्लभ अजि होय सरस कवनकला १
संस्कार तयां द्याया जातों, येतो तयास जो रंग
तों जीवनकलहकळीं येति करिति मम समाधिचा भंग २
प्रतिभा प्रियाहि रुसली, करितों बहु जरि तदीय मन--धरणी
कीं दुर्लक्ष करीं मी कविता--तनयांचिया सुसंस्करणीं ३
तारा, उषा, तशाच प्रतिभाजन्या मदीय ह्या कन्या
सर्वांची सम चिंता वाटे, निपजोत ह्या जगीं धन्या ४
टोंचिति मज याविषयीं प्रेमें अन्यहि सुमित्र मम सारे
कांहीं परिस्थितीचा दोष असे कांहिं आळसाचा रे ५

प्रतिभे ! देवि ! जवें ये कवितांच्या आजि संस्करणकार्या
तारा उषा--सुतांच्या सस्कारीं मम झटे जशी भार्या ६
संस्कारहीन जगीं ह्या राहोत न लेश आपुल्या दोषें
ना तरि गुणदोषाचे ज्ञाते देतील दूषणें रोषें ७
श्रमुनि दिवसभर होतों जीवनकलहातुनी जरा मुक्त
स्मरतों तुज तैं येशी, कधीं न येशी, न हें तुला युक्त ८
कविता--सुता दिल्या ह्या तूंच विभो ! ही कृपा असामान्या
तूंच अतां मम हस्तें उजवुनि यांतें करीं रसिक--मान्या ९

केशव विश्वास फणसे.

## एका विधुराचे उद्गार.

[ मृत भार्येच्या दहनप्रसंगीं तिला उद्देशून ( इंग्रजीवरून ):— ]

साक्या.

मृत्यू येइल तुजला कांते ! कळलें आधीं असतें
मज तू टाकुनि जातां इतुकें दु खचि झालें नसतें १
तुझ्या सदोदित समागमानें विस्मृति मजला झाली
मर्त्य अससि कीं, मनांत कधिंही शंका नच ती आली २
क्षणिक असे हें जीवित, जाते क्षणांत निघुनी वेळा
विचार ऐसा मनांत माझे कधिंही नच तो शिवला ३
शेवटचें तुज पाहिन येइल वेळ अशी नच गमलें
न कधीं हें तव सुहास्य पुनरपि दिसेल, नच मनिं आलें ४
अजूनि कांते ! मुखाकडे तव आशेनें अवलोकीं
वाटे तेथें दिसेल पुनरपि मधुर हास्य तव तें कीं ५
परि हा ये जों विचार चित्तीं तोंचि निराशा गाठी

कीं हें सारें व्यर्थ असे; ही लागे आशा खोटी ६
वदतों परि तूं प्रत्युत्तर त्या देसी नच हें कैसें
पूर्वी कांहीं वदलिस नाहीं, झालें कधिंहि न ऐसें ७

मूकस्थिति ही बघोनि ऐसें गमतें माझ्या चित्ता
कीं, प्रिय कांते ! खरोखरीं तूं स्वर्गी गेलिस आतां ८

हिमतनु निश्चल अशिच वसशि तरि कवटाळिन हृदयाला
पूर्वी जेथें हास्य खेळलें चुंबिन त्या सुमुखाला ९

माझ्यासन्निध जों तव आहे प्राणरहित जरि काया
तोंवरि वाटे मजजवळी ही आहे माझी जाया १०

परंतु आतां तव तनु टाकीं स्वकरें अग्निमुखांत
एकाकी मी झालों आता ह्या विस्तीर्ण जगांत ११

जासी येथुनि परि तूं मजला विसरशील नच वाटे
तुझ्या चिंतनीं मन रमतें परि दु:खें कंठचि दाटे १२

प्राण नसे जरि, मुखावरि परि विलसे अनुपम कांती
शुद्ध शरीरीं शुद्धचि आत्मा ऐसें दावी जणु ती १३

मलीनता तव तनुची जाई तनुसंगें आजि जळुनी
विशुद्ध आत्मा स्वर्गी राहिल दिव्यरूप तें धरुनी १४

चिरसुखशांती भोगित राहीं आनंदानें तेथें
येतों झडकरि यात्रा क्रमुनी उरली जी मम येथें १५

भेटूं पुनरपि, ईशा प्रार्थूं जेणें विरह घडो न !
समागमें गे ! राहूं होउनि चरणीं प्रभुच्या लीन १६

——मनोहर कृष्ण गोळवलकर बी. ए. एल. एल. बी.

## मानवजीवित

पद.

तिमिरांतुनि ये तेज हें,
दृश्या दृश्यांतून,
अज्ञेयांतुनि ज्ञेय ये
मानवजीवित जाण
निद्रेंतुनि ये जागृती,
सगुण निर्गुणांतून
मूकत्वांतुनि गान ये
मानवजीवित जाण !
निष्कर्मांतुनि कर्म ये,
व्यक्ता व्यक्तांतून
निष्प्रेमांतुनि प्रेम हें
मानवजीवित जाण !
अवघे जीवन साच ये
त्या कैवल्यांतून
केवलता कैवल्याची
सार्थ करी तो जाण !
ज्ञान जागृति गुणगान
कर्म प्रेम मिळून,
सार्थ करी केवलता ती
मानव साचा जाण !

भालचंद्र.

## दैवाचा खेळ !

पद.

पहुंडतां निशेराकाठीं— पुष्पांच्या शय्येवरती ॥ ध्रु० ॥

खग कोमल किरणीं रमती—बागडती—क्रीडा करिती;
गुंजारव मधुकर गाती; मधुर स्वर कोकिल घेती;

एकाकी क्रंदति वारे
कृष्णवर्ण नभ हो सारें
तें सकल शांति सौख्य सरे
भूतें मज खाया उठती १

मज्जीवन प्रभातीं जीं सौख्यें मज शाश्वत गमलीं
माध्यान्हीं दिनमणि येतां—सारी ती भ्रांती ठरली
दुर्दैव समीरण सुटला ! सुखपुष्पें विलया गेलीं !

मूक हो गीत आशेचे
कृष्ण तसें नभ संसृतिचें
मावळती क्षण सौख्याचे
भूतें मज खाया येती !

भालचंद्र.

## मातृमहती.

श्लोक.

माते ऐसी जगतितलिं या कोण हो ! प्रेम—मूर्ती ?
माता आहे शिशुतनयसंरक्षका सर्व पूर्ति;
माताचिंता तनय—सुहितीं मग्न हो जीव चित्त,
आहे मातेप्रति जगिं शिशू सार, सर्वस्व, वित्त. १

दुःखी प्रेमी–शिशु निरखुनी दुःख मातेस फार,
नेत्रीं अश्रू थिर न धरिती पाहुनी दु ख–भार;
मोदी आहे शिशु तरि तिला खूप आनंद होतो,
मातेलागीं प्रिय न शिशुसें अन्य, संताप जातो. २

ऐशा माते अनृण जगतीं कोण होतो सुपुत्र ?
मातेहूनी गुरुतर कुणी श्रेष्ठ ना प्रेमपात्र !
माता साक्षात् प्रिय भगवती जन्मदात्री भवानी,
मातेची न स्तुति करुं शके पुत्र अत्यल्प–वाणी ! ३

विष्णु बाळकृष्ण जोशी.

## ईशवंदन.

पद.

त्रिविट ( चाल.— नजर तुझी गहिरी. )

मनुजा ! शरण जाइ प्रभुला ॥ धृ० ॥
विषय--दुःख हरुनी सुख दे जो
तारक जगताला १

सत्ता पूर्ण जयाची जगतीं
रवि इंदु--ग्रह ज्या आराधिती
पंच तत्व त्रिगुणाच्या अधिपति
सकल ध्याति ज्याला २

सोडुनि चिंता सकल बापुडी
त्या भगवत्पदीं त्वरें घे उडी
सफल करुनि घे अमोल ही घडी
तरीच जन्म भला ॥ मनुजा० ॥ ३

कालिंकिंकर.

## श्वासरिपु.

यापासून दमा, खोकला, कफ व त्यापासून ज्वर, अरुचि, निद्रानाश, मलावरोध, अपचनें वगैरे विकार होतात त्यावर तत्काळ गुण येतो. १ बा ०।१२ आ. ट. ४ आ.

एजंट—गोगटे आणि कंपनी मुंबई.

पत्ता—जी. डी. भावे वैद्य, पुणें.

अनुक्रमणिका.

पद्यसंख्या मार्च १९१६


५० वीर--दुहिता

५० शतश्लोकी

१२ ऋतुचक्र

१० फुलें

४ मृत्यूचा इशारा

१३ क्षणिकता व कर्तव्य

८ ईशस्तव

४ वसंतकाळ

९ ताराप्तन

३ प्रेमप्रतिज्ञा

१ सुभाषित

---
१६९

# काव्यरत्नावली.

## अंक ३ रा.

## वीर--दुहिता.

### कथासूत्र.

सुमारें पांचशें वर्षांपूर्वी हाक--ठोडा नामक नगरामध्यें शिवरतन नांवाचा राजा राज्य करीत असे. एकदा शिला नामक बलाढ्य अफगाण सरदारानें शिवरतनावर स्वारी करून त्याचा पूर्ण पराजय केला व त्याला सिंहासन भ्रष्ट करून नगरांतून हुसकावून लाविलें. बिचारा पराजित शिवरतन आपल्या परिवारासह अबू पर्वतावर येऊन राहिला. या वेळीं त्याची पत्नी गरोदर होती. अबूपर्वतावर येतांना त्याचे अत्यंत हाल झाले! योग्य वेळीं राजाची पत्नी प्रसूत होऊन तिला कन्या झाली. तिचें नांव तारा असें ठेविलें. राजानें तारेविषयीं पूर्ण काळजी घेतली. तारा अलौकिक रूपसंपन्न होती तशीच असामान्य शूर असून चतुर असल्यामुळें ती अल्प काळांत वीरकन्येस उचित असणाऱ्या सर्व विद्येंत प्रवीण झाली. तारा नेहमी शिकारीस जात असे शिकारीस जाते वेळीं ती मर्दानी वेषधारण करीत असल्यामुळें ती स्त्री आहे असें कोणासही कळून येत नसे. अशा या वीर--दुहितेनें आपल्या सामर्थ्यावर शिवरतनाला त्याचें राज्य पुन्हा कसें मिळवून दिलें हें पुढील काव्यात निवेदन केलें आहे.

### सर्ग १ ला.

स्तवन--नृपगुणवर्णन--राज्यस्थिति--नृपद्वेष--नृपशत्रु अफगाण शिला त्याचा हेतु--शिलाची शिवरतनावर स्वारी--शिवरतनाची तयारी--त्याचा पराक्रम--शत्रु विजय--नगरवियोग.

आर्या.

राधाधरपदपंकजलोलुप मी सस्मरोनि वाग्देवी,
रचितों तिच्या प्रसादें नूतन काव्या, जरी विमूढ कवि ! १
फुलता सरसीं कमलें, मधुकर ते प्राशितात मकरंद,
काव्यांतर्गतरस या बुधजन सेवोत नित्य सानंद ! २
काव्योद्यानीं या नव विविध फुलें गंध, हीन असतील,
आशा करी परी तीं विद्वज्जन गोड करुनि घेतील. ३

जो होय हाक–थोदानगराधिप, ज्यास नाम शिवरतन,
धार्मिक, प्रजानुरंजक, तैसा नीतिज्ञ सद्गुण–निधान, ४
दुःखग्रस्त न दिसती कोणी नगरात सत्य त्या कालीं,
नांदाया चिर भवनीं कमल–भवा मूर्तिमंत जणुं आली. ५
अधिपति शिवरत्नहृदीं स्वजनप्रीती सदैव फार वसे,
निजजनसुखतत्परनृप होतिल कैसे प्रजेस अप्रियसे ? ६
नरपालें या सौख्यें अनुभविलीं सर्व अल्प काळात,
सहन न झालीं काला, सहसा त्या ओढिलें कुचक्रांत ! ७
अनुकूल काल असतां, बैसे नर विभवपर्वतीं जगतीं,
तद्दृष्टि वक्र होता, सुस्थिति होते क्षणामधें उलटी ! ८
स्वातंत्र्यसौख्यसागरगत--भूपाचे सुदीन मावळले !
आवेशें नक्रोपम रिपुबल त्यावरि तुटोनिया पडलें ! ९

अफगाण वीर कडवे राजाचे शत्रु होत बहुत दिन,
प्रतिपक्षाचें स्वप्नीं उभयाहीं अल्प चिंतिलें हित न ! १०
सुहृदासम व्यवहारीं वर्तन ते ठेविती सदा नृपती,
रक्षाच्छादित पावकसदृश हृदिं अपार परि जळती ११

नयनांत लोह--कण लघु सलतो जैसा प्रवेशतां फार,
तद्वत् अफगाणाला तापद झाला नृपाल तो वीर. १२

' शिवरत्नाचा समरीं कदा लढूनी करीन मी घात, '
अफगाण वीर चिंती ऐसें रात्रंदिनीं स्वचित्तात. १३
अफगाण वीर आला अनेक वेळां ससैन्य चालून,
परि नृप शिवरत्नानें परतविलें त्या करून बहु दीन ! १४
रिपुराज्य घ्यावयाचा संकल्प न सोडिला मुळीं त्यांनीं;
सुटला धैर्यनगाश्रय अगतिक कार्यसिद्धि ये कुठुनी ? १५
निज रिपु वश होई ना, हस्तीं लव राज्यभाग येई ना,
अवलोकुनी असें हें चटका लागूनि राहिला त्याना. १६
' जिंकीन मी नृपाला, किंवा मीही मरेन समरात, '
पण शीलानें ऐसा केला एके दिनीं स्वसैन्यात. १७
करुनी पण ऐसा तो मिळवी निजबल समस्त बाहोनी,
गेला शिवरतनावरि वेगानें वीरपुत्र धावोनी. १८
बसुनी अश्वरथावरि, हत्तीवरि बैसुनी किती जाती,
पादाति चालती किति, सैन्या नव्हती खरोखरी गणती. १९
वेगानें किति पळती वहनें सैन्यामधील तीं सर्व,
निस्तुल वायु गती, परि हारेला त्याहीं समूळ तद्गर्व २०

झाली सकंप धरणी, झाला नच सहन भार तो तीस,
पाहुनि कृतांत--बल तें वरिलें बलयुत मनेंहि भीतीस २१
भीषणबलकोलाहल परिसुनि भयभीत सर्व पशु पक्षी,
पळती सैरावैरा, ओरडती ' ईश ! तू अम्हा रक्षीं ! ' २२

---

१ अफगाण सरदाराचें नांव

आकाश--मध्य--भागीं आला रवि चंड तेज पाडीत,
यद्बिंबदर्शनाहीं दृष्टि दिपे. गमत सर्व ध्वांतयुत, २३
दिवसेश्वर- प्रकाशें लखलखती आयुधें सुवीरांचीं,
तत्प्रतिबिंबें द्विगुणित झालीं श्री वीरपुरुषवदनांची; २४

अफगाणसैन्य येता नृपगृहशिखरावरून देखियलें,
परिचारिकें, नृपाला सभय ह्रदें वृत्त पूर्ण तें कथिलें. २५
राजा शिवरतनाला वच दासाचें खरेंहि वाटे ना,
अवलोकिलें स्वनयनें दुरुनी रिपुबल सवेग येताना २६
स्थिरधीरवृत्ति ज्याची तो होई धीरभग्न त्या स्थानीं,
तन्मति विवेकशून्या होई तें प्रबल सैन्य पाहूनी २७
येउनि भानावरती नंतर त्यानें विचार लव केला,
निश्चल बसणें होतें कारण अपुल्या समूळ नाशाला ! २८
क्षण लागतां न भूपें राजद्वारांत मिळविली सेना,
‘ मस्तक हातीं घेउनि शत्रूंसह रण करा ’ वदे त्यांनां. २९
नरपतिची ती आज्ञा परिसुनि ह्मणती समग्र ते वीर,
‘ आह्मी रिपूस जिंकू ’ देती ते वदुनि नृपवरा धीर; ३०
भूपालाश्रित नर जे, त्याहीं आज्ञा तदीय मानावी,
निजजनहिताभिलाषी नृपठायीं प्रीति का न ठेवावी ? ३१
परिसुनि निज वीरांचें धीरद वच, मुदित भूपमन झालें,
भीरुत्व नष्ट करुनी वीरश्रीनें तयास फुगवीलें. ३२

एकाएकीं आली ती रिपुसेना समीप नगराच्या
देउनि पुरास वेढा, द्वारीं, बसली सशस्त्र, वेशीच्या. ३३

रणवाद्यघोष झाला नाद न मावे तदीय गगनांत,
स्फुरले वीरश्री बहु परिसुनि रव हाच पूर्ण देहात. ३४
मदमस्त फार रिपुबल, बोकड कीं माजले जणूं वाटे,
व्यवहारशून्य सारे, सन्मार्ग न ठाउका मुळीं त्यातें; ३५

हृदयविदारक शब्दां करुनी सरसावले पुढें नगरीं;
शिवरत्नवीर त्यानां बद्ध करूं लागले पुरद्वारीं; ३६
प्राणावरती झाले उदार ते सर्व वीर रजपूत,
द्वारीं आडविलें त्या नच करुं देती प्रवेश नगरींत, ३७

खवळें यावनिबल तें, गेलें निज देहभान विसरोनी,
'मारू वा सर्व मरूं' इत्येतर हेतु नाणिती स्वमनीं; ३८
झुंझति अरि निकरानें, जैसे मदमस्त महिष समरांत,
करकौशल्या दावुनि, सुटती रिपुमस्तकास कांपीत. ३९
शत्रूंनीं शत्रूंच्या रुधिरें संमर्जिला रणप्रात,
रणयज्ञ पेटवीला, वीराहुति टाकिल्या किती त्यात ४०
शस्त्रांच्या संघातें झाले हतवीर कितिकसे वीर,
धरणीवर पडलेले उठुनी शत्रूस मारिती तीर; ४१
कित्येक वीर पळती दावुनिया पाठही स्ववैऱ्याला,
लपुनी किति बसती ते, फसविति कपटें अनेक शत्रूंला, ४२
अफगाणवीर गेले सरसावुनि शत्रु—सैन्य हांकीत,
रजपूत वीर गेले हर ! हर ! ! ते यमपुरीं असंख्यात. ४३
भूमीवर रुधिराचे अगणित निर्बंध चालले पाट,
नरछिन्नभिन्नकाया शीर्षेंही वाहु लागलीं दाट. ४४

शिवरतना शत्रूंनीं जिंकियलें सर्व सैन्य मारून,
वाळविलें नगरांतुनि तद्राज्या घेतलें हिरावून; ४५
अफगाण राज्यकर्ते त्या समर्थी होति त्या प्रदेशांत,
सिद्धीस हेतु गेले, पाहुनियां तोषले स्वचित्तांत; ४६
अगणित धन धान्यातें स्वच्छंदें भोगण्यास सांपडलें
गर्वानें बहु फुगले, स्वधर्मबीजास तेथ पेरियलें ४७

शिवरत्न भूप झाला हत दैवी राहिला पहाडात,
गर्भवती पत्नीसह बसला तेथें स्वचिंतना करित. ४८
दुर्दैवाच्या फेऱ्यामध्यें काढी कुदीन तो नृपती,
कन्याबलप्रतापें फळलें तद्दैव कथिन तें पुढती; ४९

कथिलें हें मीं थोडें सरस्वतीच्या प्रसाद वचनानें,
तीच ‘ जगन्नाथा ’ च्या करवीं वदवील शेष लीलेनें. ५०

‘ आनदी--रमण. ’

---

## शतश्लोकी.*

आर्या.

घेई अनंतरूपें इंद्र श्रुति सागते, तरी जाण--
मतिरूप उपाधींत ब्रह्म प्रतिबिंबतां घडे प्राण १०१
सबला मायामोहित जीवातें मानितात मतिमंत
आत्मकिरण झालेले प्रतिबिंबित बुद्धिरूप जलधींत १०२
वदनीं भेद न परि तें प्रतिबिंबे आरसा जसा तैसें
जितकी उपाधि तितकें ब्रह्म--प्रतिबिंब तेथ पडत असे १०३

---

* डिसेंबर सन १९१५ अंक १२ ज्या वरून पुढें चालू.

एक रवि प्रतिबिंबुनि बहु जल–पात्रीं अनेक रवि दिसती
पावे उपाधि–धर्में स्थिति–गति, नीचेच तेविं या भूतीं १०४

परमात्मा प्रतिबिंबित झालासा भासतो अविच्छिन्न
जेवीं उपाधि तेवीं स्वभाव त्याचा असे जरी जाण १०५

चंद्रीं प्रतिबिंबुनि रवि–किरण तमोनाश जेविं करतात
गृहगत तम वा नाशिति प्रतिबिंबुनि किरण कास्य पात्रांत १०६

मतिंत प्रतिबिंबित जी प्रसृत इंद्रिय-मुखीं असे सत्य
परमात्मद्युतिनें त्या रूपादिक विषय भासती नित्य १०७

पूर्णात्मानात्मासें त्रिविध असे ब्रह्म पूर्ण मतियुक्त
बुद्धिप्रतिबिंबित, नभ जेविं दिसें त्रिप्रकार उदकात १०८

उदकांस वेढणारें, तत्प्रतिबिंबित जलप्रवेष्टित तें
तेथें अभेद कळता क्षणीं अविद्या स्वकार्यरहित जाते १०९

जेविं कलसूत्रानें काष्ठाच्या बाहुल्या फिरत दिसती
लोक–व्यवहृति करुनी सगीतातेंहि त्या जशा गाती ११०

अतर्क्य सर्वव्यापक, जो निजकर्मानुसार देइ फल
भू–स्वर्लोकीं प्राणी सूत्रात्म्यानें विहारती सकल १११

दिग्व्योमप्राणादिक सत्य जया नाश न त्रिकालांत
तें ज्या ब्रह्माधारें सत्याचें सत्य त्यास म्हणतात ११२

ब्रह्मासमान अथवा ब्रह्माधिकसें मुळीं नसें काहीं
सतुल्यतभूतीं शबलब्रह्म तयाचेंहि सत्य तें होई ११३

अहिमृगजलसर्पादिक मिथ्या व्यवहारिं भासती विषय
सत्याश्रय परि त्यातें प्रसिद्ध लोकीं असा नियम होय ११४

हें सत्याच्या सत्य ब्रह्माधारें असें जग व्यक्त
मिथ्या-विषय-प्रत्यय जेणें तें सत्य लोक वदतात ११५

जेथें गगन समावे काल कलेपरि असे गमे जेथें
दाही दिशाहि वसती वैराज ब्रह्महि नवें दिसतें ११६
पूर्ण विराडात्म्याहुनि सूत्रात्मा अधिक पूर्ण तें जाण
एका जलधि-जलाहुनि बहुनिधिचें जल जसें अधिक पूर्ण ११७
सर्वौषधींत जेवीं नानारसगंधवीर्यपाकांहीं
युक्त जसें मेघोदक आत्मा तेवीं, जयामुळें पाही ११८
नानास्वभावयुत हीं भूतें पृथ्वीवरी विहरतात
तो परमात्मा जेणें जल वर्षे जलद अग्नि तो दहत ११९
आत्मा अनेक भूतीं एक तयीं भूतजात भरलें हें
उदकामाजी जेवीं तरंग, आत्मा असे सकल पाहे १२०
श्रुतिनें कथिलें एक ब्रह्म तरी पाहि जो जगीं द्वैत-
मृत्यूंत सांपडे तो, अनेक ऐसें मुळीं न जगतात १२१
नभ, घट होण्यापूर्वीं तदनंतरही प्रतीति जरि येई
घट होतां नभ होई, घटनाशें नभ लयाप्रती जाई १२२
नेतां घट अन्य स्थळीं होय तदाकार गगन हें तेथें
मिथ्या प्रतीति तेवीं विश्वीं आत्मप्रतीति मनुजातें १२३
जितका पिंड गुडाचा तितका माधुर्ययुक्त तो असतो
कर्पूर—खंड जितका तितका गंधें सदैव दरवळतो १२४
द्रुमनगनगरारामीं सुंदर जें प्रत्ययास जग येई
चैतन्य स्फुरतें तें आत्म्याचे अंश सर्वही पाही १२५
नाद निघे वाद्यातुनि परि आघातेंच तो समुत्पन्न
प्रत्यय त्याचा तत्क्षणिं वाद्याघात ध्वनी जरी भिन्न १२६
मायाद्रव्यविनिर्मित जग हें ब्रह्मासवें असें भासें
हा मम आत्मा ब्रह्मप्रत्यय येतां न अन्य विषय दिसे १२७

सर्वात्मा जगदीश्वर विज्ञानस्तंभ एक या देहीं
ज्ञानस्वरूप नभसम सर्वव्यापक समक्ष मी पाहीं १२८
ब्रह्मावाचुन हें जग केवल आभास शून्य मजासि दिसे
मी शुद्ध ब्रह्म, रमे निष्क्रिय येथें सदा वसावेसें १२९
सुषुप्ति, हरि-हरि-दयिता-रतिसौख्याच्या समाप्तिचा समय
आनंद सांद्र गहन स्थल तींतिल मंद--कोश तो होय १३०
सौख्यीं लीन प्राणी निद्रेमाजी न जाणतो कांहीं
दु:खी होतो ह्मणुनी उठवु नये निद्रितासि सूज्ञांहीं १३१
सर्वोपकार-कारी-व्यापी नेत्रादिकांस जें आंत
संप्राप्त ब्रह्मानें आनंदति जीव जेविं निद्रेंत १३२
उदरभरणास्तव जे होति बहिर्वृत्ति त्यांसि दु:ख जडे
त्वक्चक्षु-कर्ण-नासा-रसनाधीनांस शोक-मोह पडे १३३
जागृतीमाजी प्राणी विषयसुखास्तव अनेक यत्न करी
होतां श्रांत सुखातें विसरे श्रम वारण्या सुषुप्ति वरी. १३४
लीन स्वरूपिं होई, ह्मणुनि अतींद्रिय सुख--प्रवह सुकर
उत्तम इंद्रिय-सौख्याहुनि जें परिणामिं फार दु:खकर १३५
उत्पन्न करुनि मारुत पंखांनीं खग उडे वरी गगनीं
मोठा वायू मिळतां श्रम घालवि तो स्वपक्ष पसरोनी १३६
दु:संकल्प विकल्पीं विषयानीं दीन खिन्नसें चित्त
विश्रांत्यर्थ पसरुनी करपद तें गाढ होय निद्रिस्त १३७
ग्रामाहुनि सदनागत कामी आलिंगि जेविं कांतेतें
अंतर्बाह्य न जाणुनि आलिंगि जीव तेविं आत्म्यातें १३८
तेव्हां लोकव्यवहृति नष्ट तसें बंध पापपुण्याचे
भय-शोक-मोह याचे सम-विषमाचें न भान त्या साचें १३९

इंद्रियशांति सुखासी सूक्ष्मस्थूल प्रपचलय तीन
मुक्तिसुषुप्तिमाजी सम, काहीं भेद त्यांत परि जाण १४०
जागृतिसस्कारानें जागृति येई पुन प्रसुप्तातें
सस्कारनष्ट मुक्त ज्ञानी परि ये न देहभानातें १४१
सकल सुखें भोगी नृप धनाढ्य, आनद एक तो त्याचा
त्याच्या शतगुण जो तो होई आनद एक पितराचा १४२
आदेव ब्रह्म असे वाढति आनद शतगुणें अधिक
अंतर्भूत सकल हे ब्रह्मानदीं यदंश विषयसुख १४३
मोद प्रमुद मुद असे जेथें आनंद सर्व हे वसती
कैवल्य कार्य-विलयीं जेथें परिपूर्ण कामना होती १४४
त्या आनद-स्थलिं हे सोम करी मृत्युरहित मजसि चिर
भूस्थित जीवात्म्यातें, श्रुतिहि कथी, देइ अमृत धार १४५
आनदरूप आत्मा अचल असे प्रकृति त्याहुनी भिन्न
तत् स्थिरता चंचलता परिणत होती मनातरीं जाण १४६
लाभार्थयत्नखेदित मानस—चांचल्य दु:खमूल असे
चित्त-स्थिरता तोंवरि इष्टार्थ प्राप्त सौख्य होत असे १४७
संभोगातीं जेवीं क्षण सुख एकाग्र चित्त तें होतां
किंवा निद्रेमाजी सुख हो जितकी मनातली स्थिरता १४८
सौख्यस्थिरता सहचर, मुक्तित तेवीं मिळे चिरानद
नित्यानदांश असे विषयोद्भव सौख्य वचन हें युक्त १४९
बाह्य व्यवहृति—योगें श्रांत परावृत्त होतसे चित्त
व्यवहृति सोडुनि, होई तत् तत् सस्कार युक्त तें शांत १५०

अपूर्ण.

अनंत विठ्ठल चित्रे.

## ऋतुचक्र.

पद.

जडलें कसलें मज वेड--ठावें नच तें परि गोड
खराखुरा मी पुरापुरा--वेडा नच परि असे जरा
वर्णन किंचित् वेडाचें--करितों ऐका वेड्याचें
वृत्ती माझी आनंदी--जसें पाखरू स्वच्छंदी
उच्च मनोरीं--रम्यनिर्झरीं--गिरीकंदरीं
नादलहरिवरि बसुनीया--स्वैर रमावें जीवें या १
चित्त कोकिळा आनंद--वसंत त्याचा हो छंद
अनुभवही ना त्या कैचे--दुःखशोक नव्हते साचे
ठावें मधुर फळें खाणें--स्वच्छंदें गावें गाणें
काळ लोटला--वसंत गेला--ग्रीष्म पातला
हाय परी दुर्दैन्याचे--दिवस पातले दुःखाचे २
होतें पूर्वी जें गोड--स्मृति लावी त्याचें वेड
भेसुर रूपा सृष्टि धरी--रखरख धगधग सर्व करी
ग्रीष्मभुजंगमफूत्कारें--उष्ण वाहती ते वारे
चित्त करपलें--व्याकुळ झालें--अर्धें मेलें
भयाण भेसुर ओरड--झाले निर्झरही रोड ३
काकांचेंही ओरडणें--ब्रह्मरंध्र फुटलें तेणें
"त्यांची[1] पोकळ ओरड ती--एकपणाची करि माती"
गरिब बिचारा कोकिळ तो--आर्त होउनी तळमळतो
काय हरपलें--काय लोपलें--कुणी दडपिलें
समजे ना उमजेनाही--रडवेला झाला तोही ४

---

१ अवतरण चिन्हांतील ओळ गोविंदाग्रजाच्या कवितेतील आहे.

संधि साधुनीही गगनीं--डाव साधिला मेघांनीं
काळे काळे डोंगर ते--पाहुनिया चित्त भ्रमतें
रातकिड्याचें किरकिरणें--भेकाचेंही आरटणें
सुरू जाहले--कानहि किटले--डोकें उठलें
नको स्थिती ही कवणातें--याहुन मरण बरें गमतें ५

इंद्रधनुष्यहि इतुक्यात--वर्षाकाळ करीं घेत
धाराशरवर्षावानें--जर्जर केला पिक तेणें
घेउन चपला तर्वार--भोसकिलें त्याचें ऊर
सुटले वारे--डोंगर सारे--विरले; तारे
दिसू लागले गगनात--जिकडे तिकडे सृष्टींत ६

तारे दिसले वाऱ्यांत--तेंवि पिकाच्या चित्तांत
शरत्काल आनंदाचा--काल वसतहि तो साचा
काकदर्दुरांच्या संगें--गाई पिकरंगीं रंगे
बालवसंता--गाता गाता--हर्षोन्मत्ता
चित्तकोकिळा नच दिसले--हर्ष खेद याचे चाळे ७

पुढें पातला हेमंत--आनंदा लागे शीत
पावक घाबरला शीतें--शीतार्चीं फिरतीं भूतें
शीत लागलें सृष्टीला--झपाटिलेंही सूर्याला
सूर्य बिचारा--क्षीण जाहला--चुकवी वेळा
उदयाची; उशिरा येई--येई परि लवकरि जाई ८

वृक्षाचीं पर्णें मेलीं--सृष्टी पांडुरही झाली
प्रेत जाहलें वृक्षाचें--प्रेत जाहलें चित्ताचें
शिशिरहि पचाक्षरि आला--ताडे तोडे मंत्राला

तेणें केले—कांहीं न झालें--उलटें दिसलें
अनल जसा तो अनिलानें--वाढें तैसें हो तेणें ९
वसंत आणि संजीविनी--शीत भूत गेलें पळुनी
सृष्टी आनदें हसली--नवी छवी तिजवारि आली
सजीविनी जों मत्र ह्मणे--चोहिंकडे गाणें गाणें
प्रेतें उठलीं--नाचु लागलीं--गाउ लागलीं
आला गाण्याचा पूर--वृक्षवेलिमधुनी थोर १०
वृक्षाचें गाणें झालें--चित्तपिकाचेंही झालें
श्रोते जमले जे भवती--स्वयेंच गाणें ते ह्मणती
आनदाचा जो कद--वसत नादें स्वच्छद
कर्णीं पडले--सूर निराळे--जे नच कळले
पूर्वीं चित्तपिका; गाई--तेच, त्यामधें रत होई ११
चित्तकोकिळा आनंद--नसे ठावुका त्या वध
वसत नित्याचा फुलला--बहर सदाचा त्या आला
सर्व जगातिल दुर्गंध--झाले त्यातें सद्गंध
तीं काटेरीं--झुडुपें सारीं--आम्रमजरी
सम भासे त्या आनंदा--वसंत त्याचा हो बदा १२

के. ल. टेंभुर्णीकर.

## फुलें.

पद.

फुलें उधळावीं--जनमनें सकल हर्षावीं
वाग्देवीच्या उद्यानांतिल
मधुर शब्द तीं फुलें मनोहर
चोहोंकडे फेका जगतावर

फुलांची वृष्टी--देईल मना विश्रांती १

भूतकालचे कटक विसरा
भविष्याकडे फेका नजरा
वर्तमान हा जागृत झाला
नव जगताला--आरंभ आज जणु झाला २

प्रेमाच्या वातावरणांत
संसाराच्या चित्रपटांत
आनंदाच्या कलिका हंसत
फुलतिल वातें--कारितील रम्य लीलांतें ३

मनोवृत्तिच्या लतिकेवरतीं
आनंदाच्या कलिका येती
क्षणीं उमलती सुगंध देती
हा संसार--नव सुमनाचा बाजार ४

परागकण त्या नव्या फुलांचे
दया रसाचे निर्मलतेचे
कोमलतेचे दिव्य गुणाचे
या विश्वांत--वर्षाव अखंड करोत ५

फुललीं पुष्पें कधीं न सुकातिल
मधुर सुगंधा कधीं न मुकातिल
सकल जनमनें तयां बिलगातिल
दिव्यानंद-- भोगितील सर्व अखंड ६

मी तू किंवा अमुचें तुमचें
कटक गळतिल संसाराचे

कारण सरलें मग दुःखाचें
राज्य फुलांचें-पसरले पहा सौख्याचें ७

फुलेत कलिका हसोत तारा
करो सुगंधित गंधें वारा
दाहि दिशा या भरो भरारा
स्वर्ग सुखाला-आणु दे मर्त्य लोकाला ८

त्या पुष्पाचे अंतर्यामीं
शांति रसाचे निर्झर नामी
हृदयें रमतिल मधुरसपानीं
लाभते अतीं-सकलांस अमोलिक शांती ९

त्या शांतीच्या दिव्यत्वानें
शुद्धत्वानें नव तेजानें
विश्व निर्मिलें परमेशानें
त्यांत मिळेल परमेशरूप होईल. १०

ग. म. वैद्य.

---

## मृत्यूचा इशारा.

पद.

मृत्यु जगीं बलवान् । एक मी ॥ कुणा न माझी
सरी येइ, परि देती सकलहि मान
मी व्यात जगीं या स्वैरवर्तनी मुळीं
आनंदें विहरें विशाल या भूतळीं
कोणी न शक्त मज अवरोधाया बली
मोठा मज अभिमान । असा हा ॥ कुणा न० १

तिळ मात्र न मजला काल-स्थल-मर्यादा
वेळिं वा अवेळीं हिंडतसें मी सदा
वारितसें कधीं गिरि गव्हर, कधिं प्रासादा
भीति न मज त्वमान ॥ कुणाची ॥ कुणा न० २

मी कधीं न जाणें वृद्धचि हा, हा तरुण
हा शूरवीर, हा अबल, सुजाण अजाण
भूप हा प्रजाजन, कुबेर हा धनहीन
लेखितसेंचि समान ॥ सकला ॥ कुणा न० ३

ह्मणुनि मी मृत्यु देतसें इशारा सर्वां
वाटे न मला किमपीहि कुणाची पर्वा
मम स्मृती असू द्या, सोडुनिया निज गर्वा
भीति सदा मम मान ॥ नरा रे ॥ बनवील तुला मी
सुमार्ग गामी सत्य सत्य हें जाण ४

रमाकांत.

## " क्षणिकता व कर्तव्य.

पद.

अंधाराच्या घोर पटान्तीं
विश्व खेळतें करिते केली
गुगुनि मायापाशें भूतें
शिताकरीतां कलह करूनी, वावरती या जगतांत १
" मी केलें तें, म्याचि जाणिलें-"
तत्व न त्या जरि त्याचें, कळलें

अहंभावयुत वदती भूतें
अज्ञानतमीं चिरदु:खाच्या लहरि सेवुनि रडतात २
निजकर्मानें स्वर्गा त्यजुनी
कृष्णकर्मरत जगतां मोहुनि
अंध:कारीं उडि घेवोनि
स्वैरगतीनें " दिव्य " विसरुनी तनुप्रेमि ते बनतात ३
चिर स्वर्गाला क्षणिक मानुनी
विश्वाला चिर सौख्यद गणुनी
" तमोपटान्तीं न बघे कोणी— "
जाणुनि, षड्रिपुपाशीं गुतुनि कृत्यें भलती करतात ४
" ईश स्थिरचर व्यापुनि उरला "
साधुबोल हा काय तयाला
नेणति भूतें विमल प्रेमा
सत्य सुखाचा मार्ग सोडुनी, स्वार्थसाधु ते रडतात ५
देह—क्षणता नेणति अंतरीं
विरत होउनी क्षण—ससारीं
मुकती स्वार्थी कर्तव्यापारे
" चिर आयुक्रमिं करू " वदुनि ती मोहुनि जगतीं फसतात ६
" परम मानिती निज—चित्ताला—
पामर ते " नच कळतें त्याला
अहंकार ने पार लयाला
असारभव—रत होउनि सत्सुखशांती नच ती वरितात ७
" हा गेला ! ! तो मेला परवां "
वदाति मुखें, परि करिति न परवा

विलंब कारिती निजकर्तव्या
अंध:कारीं अज्ञानतमें खचित अंध ते होतात ८

सौख्य वसें तें निजहृदयान्तीं
तमोयुत जगीं पाहति भोवतिं
हीच असे का सत्पथ—रीती
भास नेणुनी धडपडति तमीं; काय सुखी ते होतात ? ९

मंगल मंगल पवित्र पावन - ! !
सत्प्रेमाचा निर्झर छान—
चिरशान्तीचें उगमस्थान -
दिव्य अशा तारका, पाहुनी जगत्केलिला, हंसतात १०

तमोयुतावनिवरि वावरुनी
साधुवचानें " दिव्य " होउनी
रम्य तारका नभीं विहरुनी
चिरसुख सेवुनि मधु मदस्मित—लहरीनें सुचवितात ११

" दिव्यवियुत नच स्थिरचर " वदती
" विहार करिशी जरि भूवरती "
" दिव्यामध्यें विलिन होउनी, "
" प्रेमरसानें स्नात होउनी, मन्निकटीं ये स्वगातें " १२

" सत्प्रेमानें " दिव्य " भू करीं "
" अज्ञान तमा दूरचि सारीं "
" ऊठ ! ऊठ, निजकर्तव्य करीं "
" प्रेम मूर्त हो. " ऐसें मधुवच निनादती कवि चित्तांत १३

गिरीश.

## ईशस्तव

### पद.

भवनिधिंतुनि मजसि तार तार शंकरा ! ध्रु०

मंदमती विषय छंद-
धरुनि मनीं, होय धुंद !
त्या योगें सौख्यगंध.
नच मिळे जरा ! भव० १

धनदारा यात फार-
जीव भुले; करुनि वार--
षड्रिपु हे छळिति; तार--
मजसि पामरा. भव० २

परनारी बघुनि नयनिं,--
मदनानल पेटुनि मनिं,--
तव चरणा मी विसरुनि,
जाइ ईश्वरा. भव० ३

दुरितजाल करिति हाल !
विषयिं सरे सकल काल !
भवरूपी अहि जलाल--
गिळि जडा नरा. भव० ४

भजन तुझें कधिं न करीं;
संत समागम न धरीं;
द्रव्याशा सतत परी--
छळि मदंतरा. भव० ५

असुखजनक कनक नको,
गृह, युवती, तनय नको,
ध्रुवपद तें अढळ नको;
मज कृपाकरा! भव० ६

भक्ति जडो तव चरणीं,
याविण नच आस मनीं,
त्र्यबकसुत तव भजनीं--
रत असो वरा! भव० ७

रत्नावलि धरुनि कास,--
सेवी तव पदयुगास;
अखिल जगतिं दे यशास
तिस उमावरा! भव० ८

त्र्यंबकसुत.

## वसंतकाल.

पद.

[ चाल:- तरुण कुलिन० ]

आनंदें खुलली, सृष्टि ही, आनंदें खुलली;
या वसंतकाळीं खालीं वरतीं मनीं फुलें फुललीं. ध्रु०

करमणूक असली, खरोखर करमणूक असली,
जी वर्षारंभीं, मध्यें अंतीं मिळते ती कसली!
नच रंगवल्लिका, सुमवल्ली ह्या द्वारीं,
ध्वज तोरणें न, हीं विचित्र पुष्पें सारीं;
ग्रह तारा भूवरि चमकती, न नरनारी;

बाळें हीं सगळीं, जनांचीं, बाळें हीं सगळीं,
प्रिय भूषणेंच तीं मूर्त बोलकीं दिसती त्याजवळी. १

तरुवल्ली भरली, वनोवनिं, तरुवल्ली भरली !
फलपुष्पदलीं; ती वेळ जयाची, दैन्याची सरली
खग वातरथातुनि गातचि फिरती गगनीं;
रसपीयूषसम मधुर कोकिला कवनीं;
नच मयूर, नाचुनि भूषविती सुर अवनी !
पवनें तनु शमली, सुगंधित, पवनें तनु शमली
तीं अन्य सुखें या सौख्यापुढतीं तुच्छ मुळीं गमलीं !! २

निशावधू नटली, मनोहर, निशावधू नटली !
विधुरमणागमनीं प्रणयगीत नव वदनीं पुटपुटली.
नच शुक्र, कोहिनुर रत्न विराजे भाळीं
उडुजडित शिरींचा टोप स्वकिरण ढाळी !
पट धवल चंद्रिका वपू शोभवी काळी !
विलसांत रमली, प्रियासह, विलसांत रमली !
मृदु हास्य प्रणयि प्रणयिनिच्या त्या उमटे मुख कमली !! ३

कविमति विश्रमली, वसतीं, कवि मति विश्रमली;
जी भ्रमवी रसिका अरसिकासि परि गमे स्वयें भ्रमली.
ती स्फूर्ति तयाची मूर्तिमत ये उदरीं;
धनवंत पुरा तो. धन नाहीं जरि पदरीं;
त्या वसत सतत, सोडिल गायनलहरी;
ईशकृपा घडली, जयावरि, ईशकृपा घडली,
बहु कष्ट जाहले तरी तयाचीं कवण गोष्ट नडली ? ४

सुमंत.

## तारापतन.

श्लोक.

होत्या खेळत तारका विधुसवें प्रेमें नभ प्रांगणीं
वाटे चंद्र न नंदनंदन रमे सानंद गोपांगनीं
कांहीं त्या जलकेलि फार करिती आकाशगंगांतरीं
तज्जोत्स्नापट घेउनी विधु परी राहे उभा तो दुरी १

कांहीं पोहति हांसती चमकती लज्जान्वती लाजती
दे ? दे ? दे ? निजवस्त्र हस्तकिरणें सप्रार्थुनी मागती
म्यां तो पाहु नये विहार परि ही मत्कल्पना दूतिका
गेली घेउनि मीहि दृष्टि वळवी अन्यस्थलीं सर्वथा २

संख्यातीत कितीक त्या विलसती तेजन्विता मानिनी
स्वर्गीच्या रमणीय का विहरती देवांगना काननीं
हांसे एक पळे दुजी अडखळे हा खेळ चाले क्षणीं
तों ताराच्युत एक त्यातुनि अहा ! झाली पहा ? त्या क्षणीं ३

झाला एक गभीर आर्तरव जो दिग्मंडळीं व्यापला
हा ! हा ! तत्पति मुक्तकंठ करि का शोकामुळें आपला
कीं गेली सखि हाय ! काय रडल्या तन्मैत्रिणी सर्वही
मृत्यूचा समय प्रकंपित करी सर्वांसही या महीं ४

गेली हाय ! धरा धरा ह्मणुनि का ती दीनवाणी वदे
सांगावें कुणि कोण काय सहसा बोलील दुःखें मदें
व्हावी कांहिं तरी परोपकृति ती मी याच अर्थामुळें
जाऊं जों ह्मणतों मधें बघितली नष्टाचि म्या व्याकुळें ५

जी येथें रमली तिथें विहरली नानास्थलीं खेळली
लज्जेनें लपली निशीं स्वपतिच्या माडीवरी लोळली
नेत्रें झाकुनि पाहतां मजसि ये थोडी तरी कल्पना
नाहीं स्पष्ट परी अहा ! दिसतसे तन्मूर्ति मच्चक्षुंना ६

सारे वाञ्छिति यावयास वरती हे मर्त्य स्वर्गांतरीं
तू खालीं वद? दिव्यता त्यजुनिया आली बये! कां तरी
कीं तो स्वर्ग नको मुळीं महि नको आली प्रतीती बरी
मुक्तीचा पथ नव्य शोधुनि असा तू काय त्यातें वरी ७

पाहे जी क्षणिं मदमद सुपदन्यासा मनोमोहिनी
वाटे राहुनि राहुनी नवल कीं गेली कुठें मानिनी
आयुष्यांत असाचि सुज्ञ जन हो ! येईल एक क्षण
कालव्याघ्रमुखीं पडूनि तनु ही होईल तद्भक्षण ८

कांहीं खेद करू नका जग असें सारेंच हें नश्वर
उत्पत्तिस्थितिनाश हा क्रम असा तो चालवी ईश्वर
तेजानें चमका? जगात विलसा? सोडूनिया आळसा
गातील स्मृति होउनी कवि असे त्या दिव्यतेजोरसा ९

द. आ. तिवारी.

## प्रेमप्रतिज्ञा.

श्लोक.

उडुगण सखे ! हा होओ गे ! प्रभोज्झित निश्चयें
सकल भुवना जाळो तापें सुधांशुकला प्रिये !
मृदु कुसुम तें काठिन्यानें करो मणिभेदन
तरिहि अचल प्रीती माझी ! विशक्त करीं मन ! १

गगन न पुरें मोजायातें मम प्रणया खरें !
खचित लिहिता माझी प्रीती महीतलही भरे !
अचल चल ते सारे ! प्रीती प्रिये अचला असे !
विफल मनिंचे सोडीं सोडीं कुतर्क गडे कसे ! २

चपल चपला नाचे व्योमीं परी स्थिर राहिली !
पवनलहरी गंधोद्दामा उभी बघ राहिली !
सुमुखि ! तुझिया प्रेमोत्कर्षें प्रभाव घडे असा
कमलिं अलिसा झालों बद्ध त्वजीन तुला कसा ? ३

रेंदाळकर.

---

## सुभाषित.

### आर्या.

चित्तीं झुरे दरिद्री, परमुद्रा नाद ऐकुनी कानीं
गृहपति रति मिलितेच्या कंकणनादेंचि जेविं जार मनीं १
दान प्रियवाक्सहित; ज्ञान विगतगर्व, शौर्य, ही सदय;
वित्त, त्यागनियुक्तचि; दुर्लभ हे चार योग भद्रमय. २
दु:साहचर्ययोगें स्त्रीच्या चित्तीं शिरेचि दुश्चरित
विषवृक्षाश्रययोगें मधुरा वल्ली जशी करी घात ३
जोंवरि दाता देतो कल भाषाघोष तोंचि सकलांचा
विरता घनपटल जसा शमतो ध्वनि हो मयूर केकांचा ४
व्यसनीं मित्रपरीक्षा, शूरपरीक्षा रणांगणीं होई
विनयें भृत्यपरीक्षा, दानपरीक्षा दुकाळच्या समयीं ५
आलस्य, स्त्रीसेवा, सरोगता, जन्मभूमिवत्सलता.
संतोष, भीरुता, पड्न्याघातहि महत्वकार्यरता ६

विठ्ठल भगवंत लेंभे.

---

# भिषग्विलास.

## आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी
## प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन ११ वर्षे पुरीं झालीं ह्यात यथावकाश, शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग, त्याचें निदान व चिकित्सा, औषधी व त्यांचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयावर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते. या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारासच न होता इतर सर्व सुशिक्षित व कुटुंबी माणसाना व्हावा, म्हणून ह्यांतील माहिती सुलभ भाषेत दिली जाते वार्षिक वर्गणी आगाऊ. टपालहशील सह अवघी १॥ रु.

व्यवस्थापक ' भिषग्विलास ' — सोलापुर.

---

# श्वासरिपु.

यापासून दमा, खोकला, कफ व त्यापासून ज्वर, अरुचि, निद्रानाश, मलावरोध, अपचनें वगैरे विकार होतात त्यावर तत्काळ गुण येतो. १ वा ०॥१२ आ. ट. ४ आ

एजंट—गोगटे आणि कंपनी मुंबई.

पत्ता — जी. डी. भावे वैद्य, पुणें.

## अनुक्रमणिका.


| पद्यसंख्या | एप्रिल १९१६ | पृष्ठें |
|---|---|---|
| ५६ | वीर-दुहिता ( सर्ग २ रा ) | ७१ |
| २१ | गोपींची भक्ति | ८२ |
| ४९ | वात आणि तेलबिंदु | ८६ |
| ८ | उमललेल्या फुलास पाहून | ९० |
| ४ | आईचें चित्र | ९२ |
| २ | दिव्य स्थान | ९३ |
| २ | माझा सवंगडी | ९३ |
| ९ | सिंह, गाढव आणि कोंबडा | ९४ |
| ४ | आहे आणि नाहीं | ९५ |


---

१५५

# काव्यरत्नावली.

## अंक ४ था.

## वीर–दुहिता.

### सर्ग २ रा.

अबूपर्वतावरील वसंतवर्णन--शिवरतनाचे पर्वतावर आगमन–याची पराजयाबद्दल तळमळ--शांतवन.

श्लोक.

होता करीत शिशिराधिप राज्य शौर्ये,—
पृथ्वी--तल--स्थ--विविधाकृति–सौख्य–कार्यें–
केली दया न लवही जगती नृपानें !
सारेच जीवगण दु:खित तत्कृतीनें ! १

नाना लता--मृदुल--पल्लव ते गळाले,
सौंदर्य सर्व तरुचें विलयास गेलें,
प्रत्येक वस्तुहृदिं रुक्षपणा भरून--
राहे, मिळेल सुख या समयीं कुठून ? २

प्राणी समस्त मधु--मासयशास गाती,
सारे तदा–गमन सोत्सुक ते पहाती
जावो निघोनि शिशिराधिप दूर देशीं,
ते याचिती सतत यापरि ईश्वरासी. ३

भूपासनीं बसुनि राज्य सदा करीती--
जे स्वप्रजेस सुख अल्प न नित्य देती।

त्यांची प्रजा कधिं न तुष्ट मनीं रहाते,
भूपालनाश करण्यास्तव सिद्ध होते. ४

वृक्षीं ध्वजा फडकती मधुच्या सतेज,
मागोनि चालतहि येत वसंतराज,
पाहोनि त्या शिशिर होय अशक्त भारी,
आला जिथें समय कष्टद कोण वारी ? ५

केलें तयें तुमुल युद्ध, हताश शीत--
झाला, पळे त्यजुनि दूर वनें समस्त,
झाला वसंत नृप तोषद सर्व ठायीं,
आदित्यफुल्लकमलापरि विश्व होई. ६

आला अर्बूगिरिवरी मधुराज जेव्हां,
साराच नूतन दिसे गिरिराज तेव्हां;
वृक्षावरी नव सुकोमल वर्ण आले
आदित्यतप्तकरमुक्त जनांस केलें. ७

होत्या अनेक तरुपंक्ति गिरिप्रदेशीं,
अत्युच्च तोलुनि जणू धरिती नभासी;
झाले समस्त तरु पुष्पित योग्य कालीं,
सारी सुसौरभयुता गिरिभूमि झाली. ८

पुष्पान्विता नव लता मृदु बाहुपाशीं--
वेटाळिती, करुनि विभ्रम, भूरुहासीं;
शृंगारयुक्त बनुनी जणु कामिनी या--
आलिंगिती प्रणयपूरित नाथकाया. ९

पुष्पें अनंत गळतीं तरुचीं प्रभातीं,
पुष्पांजळी जणु तरू जननीस देती

पाहोनि तो कुसुमसंचय गाढ, वाटे,
पुष्पायुधार्थ करिते रति आसनातें १०

वारिप्रवाह--जलसंग--सशीत वात--
नाना लता विटपपल्लव हालवीत;
आमोदयुक्त सुमगंध हरूनि घेई
वारूनि ताप पथिकाप्रति सौख्य देई. ११

गुंङ्गुङ् करीत फिरती किति भृंगवृंद,
पीती फुलावरि बसून किती मरंद,
आकंठ सेवुनि तयातिल सद्रसा, ते--
गुंजारवें ध्वनित त्या करिती स्थलातें. १२

बैसूनि वृक्षविटपीं द्विजवृंद गाती--
गाती मनोहररवें जणु ते स्तवीती,
" ईशा ! अह्मां सतत हाच वसंत देई.
रात्रदिनीं करितसो नत शीर्ष पायीं १३

आमत्त कोकिल करी तरु--पर्ण--लीन
होवोनि गान सुमनोहर; तृप्त कर्ण--
होती किती श्रवण ते करितां जनांचे,
वाटे, " न " हे पिकचि भाट वसत याचे १४

हे आम्रवृक्षनवपल्लवयुक्त झाले,
मोहोर ये मृदु मनोज्ञ वसंत कालें;
शाखाकरा पसरुनी सकलांस देती,
छाया सुसौख्य, समता सुधि दर्शवीती. १५

गोपाल गोकुलसवें तृण चारण्यातें
येती करीं धरुनि सुंदर पाडसातें

पावें मुखीं धरुनि मंजुल वाजवीती,
वृक्षीं बसूनि किति सुंदर गोप गाती. १६

गोपाल ते न नृपवादक सत्य सर्व,
वर्णीत ते नृपयशा फिरती सगर्व,
ऐकूनि तो मुरलिनाद सहर्ष मोर
नृत्यास होति नटुनी नट ते तयार; १७

सर्वत्र ती हरितवर्ण धरा विराजे,
वामस्थलीं विमलनिर्झरसंघ साजे,
सव्यस्थलीं धवलपर्वतपंक्ति राही,
सर्वांप्रती धनि बने मधु जीवदायी. १८

कित्येक भिल्ल फिरती मृगयेस रानीं;
शस्त्रें सतेज अति तीक्ष्ण करीं धरूनी,
पाहोनि ती जलदकृष्ण तदांगकांति,
वाटे जनां बनविल्या जणुं लोहमूर्ति. १९

होवोनियां द्विरद सर्व मदांध जाती,
गंडस्थलीं मद गळे, अलि लुब्ध होती;
गंडस्थलां मृगपती किति फोडिताती,
जेरीस त्या हरिभयें बहु येति दंती. २०

येती अनेक तरुमूलिं कुरंगपंक्ती,
रानीं कितीक दडती मृग पाडसें तीं;
कांहीं जलार्थ फिरती, चरती वनांत
निद्रा सुखार्थ रमती पडुनी गुहांत. २१

पाहूनि ते हरिण मारिति भिल्ल बाण,
त्यांचा कठोर हृदयें हरितात प्राण!

सानंद भाजुनि तदीय शरीर--भाग,
खाती सहर्ष मृदुमांसल सानुराग. २२

किल्येक मारिति करी, हरि, व्याघ्र, पक्षी,
बैसोनियां लपुनि साद्रतृणात, वृक्षीं--
किल्येक ओरडुनि, धावति सावजातें--
मारावया पडति व्याघ्रमुखीं किती ते. २३

ऐशा वसंतसमयीं गिरिराज यातें--
चैतन्य येइ जणु जीवरवेंच वाटे;
सौंदर्यदेवि जणु येउनि तेथ बैसे,
राहे तमीं कृपणवित्त लपून जैसें २४

चित्तीं शिलों--जित करी नृप तो विचार
जावें कुठें तरि अतां वसतीस दूर ?
येणार ना लवहि शांतपणा पुरात,
जावें निघोनि बरवें अबुपर्वतात, २५

ऐसा विचार करुनी नृप तो निघाला,
येई स्वसैन्यसह घेउनि या स्थलाला;
जेव्हां त्यजूनि नगरास निघे नृपाल,
झाले तदीय तनुचे किति हालहाल ! २६

होती गरोदर तदा शिवरत्नकांता,
झाला तिच्या बहुत दुःसह ताप चित्ता;
'ऐश्वर्य सर्व विलयाप्रत आज गेलें !'
येतां विचार हृदयीं मुख होय काळें ! २७

---

१ अफगाण सरदार शिला यानें जिंकिलेला.

होतां समस्त गिरि हा शिवरत्नहस्तीं,
केली तयें ह्मणुनि येथ तदा स्ववस्ती;
होता मनोहर गिरी मधुमासकालें;
भूपास सौख्य तिळमात्र परी न झाले ! २८

युद्धीं पराजित यदा शिवरत्न होई,
त्याचा सुसौख्यनिधि नष्ट समूळ होई !
चिंताग्नि तो बसुनि नित्य तदंतरांत,
आत्मा विदग्ध करण्या सजला प्रमत्त. २९

" जिंकीन मी अरि कधीं रण माजवून ?
केव्हां स्वराज्य हरुनी प्रभु मी बनेन ?
शत्रूस ठार समरांत करीन जेव्हां
शांती मिळेल मजला मग खास तेव्हां. " ३०

सिन्धूजलीं लहरि नित्य अनेक जैशा—
येती, विचारलहरी नृपचित्तिं तैशा;
रात्रंदिनीं तळमळे, न मनास शांती !
दुःखाग्नि तो भडकला अनिवार चित्तीं. ३१

एकाकि एकदिनिं तो नृप बैसलाहे
येती विचार वरचेवरि तन्मनीं हे;
'दुर्दैव--योग--बळ--कु--स्थिति आज आली,
माती सुखांत मम मिश्रित खास केली, ३२

निःश्वास टाकुनि सुदीर्घ नृपाळ बोले:--
" हे पार्वतीरमण ! मी अघ काय केलें--
आह्मी ? असें ह्मणुनि योग्य दशा अह्मांला,
होई प्रसन्न मजला कधिं हें दयाळा ! ३३

होते जरी मज जगांत रिपू अनेक,
माझ्यापुढें न टिकला समरांत एक;
जे येत राज्य मदमस्त हरावयाला,
गेलों न हार लवही गिरिजेश! त्याला २४

होती शिरीं तव कृपा अनुरागयुक्त,
झालें न आजवरि हें मम राज्य नष्ट!
चिंता कशी न लव उद्भवली मनांत
सेवीतसें सतत राज्य- सुखा नितात २५

माझे न पूर्वज कुणी पदनष्ट झाले,
त्यांहीं बलें समर जर्जर शत्रु केले;
चालून त्यावरि अरी कुणिही न येती,
नामा तदीय परिसून सकंप होती! २६

गाती सदा विमल कीर्ति कवी पदांत,
ऐकूनि ती स्फुरण खास चढे तनूंत;
त्यांच्या कुलीं अधम हा निपजून खास—
झाला कसा न अजुनीहि तदीय नाश? २७

झालों रणीं न विजयी, पळुनीहि येई,
वस्ती करूनि मग येथ गिरींत राही!
नीचा कृती करुनि पूर्वज भूमिपालां,
लावी कलंक! मज नष्ट कसा न केला? २८

झाले सदा विजयि ते रणधीर वीर,
शत्रूंस मारुनि रणांत असख्य तीर;
त्यानीं कधीं रिपुस दाखविली न पाठ,
गेले निघोनि यश मेळवुनी जगांत. २९

देतील दोष मज ते मृत भूमिपाल!
मी भीरु हाय! समरीं, फुटलें कपाळ!
केला असे तरि तुझा अपराध काय?
ऐशी दशा ह्मणुनि लब्ध मलाच होय? ४०

घेई विशंक हृदयें सुखलाभ लोकीं,
दुःखानलानुभव मात्र मिळे न तो कीं;
तन्मूल्यबोध लव मात्र तरी असावा,
ऐशी दशा ह्मणुनि का मज देशि देवा? ४१

किंवा सदा नृपसुसौख्यविलासमग्न--
झालों जनांत, ह्मणुनी मज सौख्यभग्न--
केलें तुवां? लव तुझी नच भक्ति केली
योग्या ह्मणून मजही स्थिति आज आली? ४२

रात्रंदिनीं करितसें सुविचार चित्तीं,
झाला प्रमाद तरि काय असेल भक्ति--
माझी परी मजसि काहिंच आठवे ना,
कोपू नकोस, करि मुक्त उमेश! दीना. ४३

द्यावा तुला फुकट काय ह्मणून दोष,
दुर्दैवि मीच, मज दैव बघे सरोष;
भाळीं मदीय विधिनें लिहिलें असेल,
होणार लभ्य मज तें, न कधीं चुकेल! ४४

आहे तरी नियम हा भुवनांत सत्य,
दुःखोदधीलहरि येति असह्य नित्य;
हा स्वप्रजा—विरह--पावक देह जाळी!
कोणी नसे तुजविणें व्यसनांत वाली!" ४५

ऐसा विलाप नृप तो असतां करीत,
आले सुहृद्-सचिव वृंद तदीय तेथ;
तेव्हां नृपाळ निजशोकजलौघ सोडी,
दु:खार्णवांत सकळाप्रति पूर्ण ओढी ! ४६

ते बोलले. ' नृपति ! आवरिं शोक आतां
गेला असे समय तो नच येत हाता
त्याचा वृथा करुनि शोक न कष्ट वाहीं,
स्रोत प्रवाह न कधीं परतोनि येई. ४७

वज्रें अनेक पडता गिरिमस्तकात,
केव्हा न ते गळित धैर्य हृदीं न होत.
ज्यातें विवेक लव, त्या जरि दु:ख झालें,
तो पर्वतासम सुनिश्चल नित्य चाले. ४८

संसारमंडळ खरोखरि मोहजाल,
त्यांतील दु:खसुखखंड सदैव फोल !
भाळीं असे नच टळें लव तें धरेश !
आनंद दु:ख घडता न ढळे कवीश. ४९

भूपें कधींहि हतधैर्य मनीं न व्हावें,
वज्रापरी हृदिं कठोर सदा असावे;
होती पराजित कधीं, जयप्राप्ति होते,
येतें सुवैभव कधीं, विलयास जातें. ५०

चक्रापरी फिरतसे स्थिति मानवाची,
जी आज दे सुख, उद्यां बहु त्यास जाची;
सारेच सतत तगीं जन सौख्यपूर्ण
ऐसें घडेल न कधीं हृदिं जाण खूण. ५१

तेव्हां तुला विनवितों कर जोडुनीया,
रे ! आवरीं सकल हा तव शोक राया !
सध्या जरी विभवनष्ट समस्त झालें,
येईल राज्य सगळें स्वकरीं सुकालें ५२

धीमान् नृपें विगतवैभवशोक केला
बैसूनि नित्य जर, त्या अबला जनाला -
होईल दु:ख किति ? हें कथिं लोकपाला !
देईल कोण वद धीर तरी स्त्रियांला ५३

आहेत येथ किति भिल्ल गिरिप्रदेशीं,
योजूनि युक्ति वश रे ! करु या तयांसीं;
येता करीं सकल चालुनि सर्व जाऊं,
शत्रूंसि जिंकुनि पुन्हां निजराज्य घेऊं. " ५४

ऐकूनि नित्य उपदेश नृपालवृत्ति--
भिन्ना बने, उगवले सुविचार चित्तीं;
शोकप्रवाह सुकला, मन हो प्रसन्न,
झालें तदीय मन भावि-विचारमग्न. ५५

आर्या.

राज्य पुन्हां मिळवावें कैसें भिल्लास वश करूनीयां,
रात्रंदिन मंत्रीसह नृप ऐसा गुतला विचारीं या
वाग्देवी तर मजला समयीं या सुप्रसन्न होईल
' वामनसुत ' कृतकाव्या अल्पहि गोडी न काय येईल ! ५६

आनंदी - रमण.

## गोपीची भक्ति.

### श्लोक.

माझ्यावरी किति तुझी ममता असे तें
बोलो कुठें तरि अतां वद कृष्ण ! मातें
दुःखांत का कळवळा मम ये न तूतें
कां बोलशीं न मजशीं किति आळवीतें १

पोटांत घाल अपराध मदीय सारे
प्रत्यक्ष तूं असुनिया लपशी कसा रे !
तूझीच मी असुनि तूच मदीय देवा
कां दुःखि लोटिशि धरूनि मनांत हेवा २

सन्मार्ग तूं निजजनाप्रति दावणारा
संसारनिम्नजलधींतुनि तारणारा
जे कां असत्-पथिक दापिशि दुर्मतीतें
प्रेमातुरा वितारिशीं हरि ! सद्गतीतें ३

तूं माउली मम सख्या ! पितयापरीस
संगोपिसीं, असशि मद्गति रे परीस
साक्षीध्वनी असशि तूंच मदीय भर्ता
आराममंदिर समस्त विपत्तिहर्ता ४

कैवारि तू असुनि वारिशि ना कशीही
आपत्ति सांग यदुपा, न मदंत पाहीं
कारुण्यसागर तुला ह्मणतात विंदू
तें व्यर्थ, कारण दिसे न दयाल्पबिंदू ५

आधार तूच मम शेवटिचा विसावा
जाणूनि किंतु तुझिया न मनीं वसावा

हे प्रेमगम्य तुझियाविण लेंकरा या
सामर्थ्य नाहिं असु–धारण हें कराया ६

हे भक्तवत्सलदयोदधि ! सर्व पूज्या
सर्वांग सुंदर वरा ! सगुणा ! वदान्या
तूं श्रेष्ठ कारुणिक सद्गुण रम्यधामा
आहेस गा परम पूत पवित्रनामा ७

अव्यक्त निर्गुण अचिंत्य असें स्वरूप
आम्नाय वर्णिति तुझें चिर विश्वरूप
तूं एकला असुनिया विभु धाकुला कीं
झालासि भक्तिसुलभ प्रभुराय लोकीं ८

आर्तासि रक्षिन अशी तव जी प्रतिज्ञा
कां भंगिशी तिस मुधा श्रुतिशास्त्रविज्ञा
दीना तदाकलनिं मी न समर्थ योषा
का गा उपेक्षिसिं धरूनि मनांत रोषा ९

नेत्राश्रुनीं स्तिमित सर्व पटात झाला
माझा रडोनि बहु जीव दमोनि गेला
ऐसा कसा कठिणचित्त महानुभावा
झालासि ! औषध नसे ह्मणती स्वभावा १०

तूं नीतिधर्मज्ञ असूनि देवा
कां हो वृथा हा छल वासुदेवा
अन्याय माझा तरि काय झाला
काना धरोनी पदरात घाला ११

पतिसुतधनगेहत्याग सर्वस्वि केला
भजन तव कराया लागलें; काम गेला

तुजविण मज देवा ! चैन कांहीं पडेना
तळमळ करितें मी लाभ तूझा घडेना १२

तूं वीतिहोत्र तव दाहकताशिखा मी
तूं भोगिवर्य तव जिम्हगती असे मी
तूं कामधेनु कमलाक्ष ! तवानुगामी
मी वत्स तू पय तुझी सितता खरी मी १३

तू माधवा माधव माधवी मी
राकेंदु तूं मी शशिकांत नामी
मी होय कासायस लोहकान्त
तू स्पर्श किंवा भुवनैकनाथ ! १४
स्वर्गद्रु तू निजपदाश्रिततापहारी
मी होय कल्पलतिका, घन तूं मयूरी
तू सूत्रधार पुतळीच अलंकृती मी
तूं स्वर्ण उत्तम तुझी कमनीयता मी १५
तूं भानु मी सुंदर चक्रवाकी
कासार तू मी तरि अब्जिनी कीं
तूं होस कृष्णा मृगकस्तुरी मी
तू हंस तूझी सितताच नामी १६

तेजोराशि दिनेश तू प्रियकरा ! मी तूझि दिव्यप्रभा
तू पीयूषनिधान तारकपती मी चंद्रिका तारका
पारावार गभीर तूच सरिता मी वर्षनीलाद्भुभा
भृंगी मी असिताब्जचारु मज तूं दे भेट सत्तारका १७
श्रीनाथा तनु कान्तिरूपिं तुझिया सूर्यात्मजेच्या ऱ्हदीं
मी न्हाईनचि, धेनु वा बनुनिया धारूनि मोदा हृदीं

मी पीईनचि कान्तिरूप सलिला तापिच्छ तूं, मी तुझा
तोडोनी सुमगुच्छ लेइन शिरीं स्वीयीं हलभ्रानुजा १८

त्वद्विप्रयोग मजला नच साहवे हा
म्या त्यागिलें सकल ही निजजीवितेहा
निर्धार हा तुज जरी नच ये पटोनी
फोडीन हें शिर शिळेवरि आपटोनी १९

देशीं न दर्शन जरी शुभधाम राया
मी सज्ज आसडुनि ही रसना मराया
देऊनि टक्कर महीजविशालबुंधा
प्राणां तुला स्मरत सोडिन रे अधन्ना २०

डोहांत टाकिन उडी दृढ पाश कठीं
लावूनि सोडिन असू जगदेकजेठी
कठीन एक पलही न अतां प्रिया मी
हा भस्मसात् करिन देह असे निकामी २१

धूर्जटी.

## वात आणि तैलबिंदु.

साकी.

तेल–वात ह्या दोघांचें जें भाषण कांहीं झालें
एक कवीला सर्व शद्बशा कानीं ऐकू आलें. १
कोळी जमला, स्पष्टपणानें जळतां कांहीं वेळ
तेव्हा बोले वात, जाहला प्रतिहत जीचा खेळ ! २
" कष्टी होतो जीव मीच कीं, द्याया तुमचे प्राण
कारण होते, खरें सागतें; वाहें तुमची आण. ३

त्यांतुनि तुझी भाव ठेवुनी मम साहाय्यें चढता,
त्याच लोटता काळमुखीं, का दु:ख न होइल चित्ता? ४
पाहा! पाहा! वायु पहा! हा काय सांगतो मजला
"नळी दुज्यांचे घेण्या तव गे! हात कसा तरि सजला?' ५
असो, जाहलें आजवरी तें चुकूनि घडलें हातीं;
पुढें न तैसें होवो; सोडुनि संगत माझी द्या ती." ६
असें बोलतां त्या वातीचा कंठ दाटुनी आला;
अश्रु वाहिलें नयनातूनी. शोक असा तिस झाला ७
तें पाहोनी तैलें तिजला काय उत्तरा देतीं:—
"काय असें हें भलतें आलें आज तुझ्या गे! चित्तीं? ८
कधीं न केला अव्हेर, परी आज कोठुनी आलें
किल्बिष मनिं? का विपरीत तरी हांतुन चुकुनी घडलें ९
त्वत्साहाय्यें जीवित अमुचें असार झालें सार,
तींच तू अशा सोडुन जाता होइल जग नि:सार १०
काय आमुचे देह? आमुची बुद्धी तैसी सान
तुझ्या कृपेचें फळ, मान मिळे जगिं सुरलोकसमान ११
तीं जातीचीं होति वानरें ज्यांना हातीं धरिता--
श्रीरामानें, देवकार्यही आलें त्यांना करितां १२
ह्मणशी जाती प्राण आमुचे, त्याचें ऐसें जाण;
प्राण आमुचें प्राण कशाचें? किंतु मनीं हा नाण १३
तूच घातला, सत्य सांगतों, अमुच्या प्राणीं प्राण
तुझ्याहूनि त्या अन्य कशाला शोचू आह्मी जाण? १४
परोपकारा मरतों आह्मी, ह्मणोनीच त्या पाही
'प्राण जाति' जें असें बोलसी, किंमत येई कांहीं १५

तुला सोडुनी खरें खरें हें जगती दोन दिसाला--
अधिक; राहुनी साक्षी होतें काळाच्या ठिपक्याला १६
लाभ तयाना काय जगोनी अधीक वर्षें थोडीं
परोपकारव्रतिं ज्या लागे अशी एकदा गोडी १७
विनाश हा तो ह्या कायाला जन्मापासुनि लागे,
व्यर्थ कशाला दो दिवसाच्या लागू फरकामागें १८
आजहि आहे वानरसेना, होतिल, कितिकहि झाले;
पडोनि मरतीं, रोगें मरतिल, असेंच कांहीं मेले. १९
श्रीरामाच्या वेळीं झाले धन्य धन्य ते धन्य
कीर्ति पुराणीं त्याची. काळें विस्मृत केलीं अन्य २०
ज्यानें प्रेमें इतुकी जगतीं कीर्ति पसरली ज्यांची
त्या श्रीरामा विसरतील कां, सान मनें तरि त्यांचीं ? २१
कधींच नव्हतें असें बोल तें आज अशानें आलें ?
प्रमाद घडला किंवा काहीं अन्य तसें का झालें ? २२
जरी न कळतां अपराध असे घडला काहीं हातीं
अल्पबुद्ध हीं सर्व लेकरें चुकलीं पाया पडतीं २३
वात त्यावरी बोले " येणें अधिकचि माझें चित्त
होइ लाजलें, स्मरतां इतुकें वाहुनि जीवित--वित्त " २४
स्मरतों इतुकें ! ह्यात काय तें ? जरि तुजला विस्मरतों
कृतघ्न आह्मी खरेंच होतों, पातक मोठें करतों २५
ज्या श्रीरामें दिव्य अमृतता थोर आणिली कामीं
हनुमतानें वर मागितला वास तयाच्या पायीं २६
होउनि ज्याच्या स्पर्शेंचि केवळ सोनें होतें काय
त्या परिसाला चुकुनी तरि ही आयस विसरिल काय ? २७
मतिचें तम यत्प्रसाद घडता सर्व मावळुनि गेलें,

त्या गुरुतें कुणि शिष्य विसरला ? कोण असे तो बोले २८
स्वयें जड परी संबंध जिव्हासह पडुनीया सूर--
मंजुळ निघती, त्या तारेला काष्ठ न ठेविल दूर २९
ज्याच्या यत्नें जड कायाला देवकळाही येई,
मूर्तिकार तो पाषाणाच्या मनिं का विस्मृत होई ? ३०
ज्याच्या योगें खुलुन दिसे ती मूर्त वनश्री, त्याच
काय वसता विसरिल वन तें, साग अह्माला तूच ३१
स्मरतों आह्मी ह्मणुनि लाजणें थोरपणा तव उचित
अमुच्या मनिंचा पूज्यभाव अति वाढे येणें खचित " ३२
" बाबानो जें ! रुचेल तें तें बोला; माहित तुमची--
प्रीती माझ्यावरची, तेणें वच हें येतें साची. ३३
लोकोपकृतीस्तव जरि माझा यत्न सर्वही आहे,
नित्य आहुती देणें तुमची दुःखद मजला हो हें ३४
त्यातुनि भारी खेद असा कीं, मना सर्वदा जाळी
कधीं न देतां येऊ मजवर तुह्मि मरणाची पाळी. ३५
' उपकाराचें व्रत हें हीचें अन्या मारुनि ठार!
ही न आपुल्या काया देई लागू धक्का फार ३६
स्वयें मराया प्रसंग येतां होते हाका हाक '
असें लोक मज ह्मणतिल याचा वाटे चित्तीं धाक " ३७
" लोक बोलतिल ! करणें नाहीं स्वयें, ठेवणें नांवें
परि अन्यांना सत्कार्यीं ही ! काय तयांना भ्यावें ? ३८
कारिता स्वार्थाच्या कार्याला जसे निंदिती लोक
तसें परार्थाच्या कार्यीं ही करास त्याचा शोक ? ३९
थोर शिवाजी राजा; त्याचा यत्न कशास्तव होता ?
त्यास निंदिती लोक किती तरि त्याच्यास्तवही झटता ४०

पुढें लागतिल जनांसि ह्मणुनी आधीं भरुनी ठेवी
कुंभ जलाचे आकाशीं जो थोर थोर जन--सेवी ४१
त्याच उन्हाळ्या तापद ह्मणुनी निंदिति लोक कितीक
जाणुनि हें तूं जननिंदेचें भय सोडाया शीक ४२
'अन्य जिवावर उपाकाराचें व्रत' हें त्याचें ह्मणणें
त्यासच शोभें; चित्तीं तें तू कदापिही नच गणणें ४३
खर्चे आमुचे प्राण कार्यि ह्या होतात खरे जरि तें
ताप अखंडित सहन करावा लागे तरि कोणातें? ४४
एका क्षणिं तो अत आमुचा! किती वेदना त्यात?
बाइ! चतुर तू एक सारखी तरि पीडा सहनात ४५
तुझ्या व्रताचें दुःख आणखी थोरपण, असें दोन्ही
ठाउक आह्मा निंदितील तुज लोक एक अज्ञानी ४६
अखंड दुःखा सहन करोनी लोकां कार्यां लाव;
व्रत हें केवळ तुलाच साधे आह्मा त्याचि न हाव ४७
लोक निंदितिल, निंदोत परी काय तयाचें तुजला
जी तूं येतां वेळ, सर्वदा अनुसरतेस अह्मालां ४८
ऐसें बोलुन तैलें उगलीं; वाहुनि वायू, त्यात
कोळी झडला; फिरोनि झाली तेजें मोठी ज्योत. ४९

ग. स. जोशी.

## उमललेल्या फुलास पाहून.

श्लोक.

उमलल्या कुसुमा! तव दर्शन
बहुत मोदवितें जन—सन्मन

तुजसि दैविक सौख्य जणूं मिळे
क्षणिक जीवन हें सुख चांगलें १

बघुनि गोंडस रूप तुझें असें
मुदित हें मम मानस होतसे
सुहृद तूजसमान जरी मिळे
तरि सुसगतिनें कुमती झडे २

तरुण, बालक, रंकहि, राव ते
युवति, दुर्बल, दीनहि तूज ते
बहुत वाञ्छिति; सगतिलाभ तो
परमनासिहि सद्गुण दावितो ३

तरुण हर्षति गंधभरें तुझ्या
तुज किशोर गडी करिती सख्या
प्रिय तुला स्वसुखा-परि मानिती
परमनास सदा सुखवी गती ४

तव समागमिं मानिति रंक ते--
सुख, तुला किति इच्छिति प्रेमि ते ?
धनभरें जरि नांदति राव ते
तुजविणें नच वैभव शोभतें ५

युवति गुंफुनि गुच्छ सुरम्य रे!
मधुर हार तसा धरुनी करें
स्वपतिकंठ सुशोभित ती करी
उमटतें तव चित्र तदंतरीं ६

जगिं अलौकिक वस्तु अशी असे
जरि पुनीत गमे कुणि स्थान तें

तुजमधेंच तयाहुनि श्रेष्ठता
तुजसि निस्तुळची जगिं दिव्यता ७
मधुर गा कुसुमा ! तरि थांब रे
त्वरित हा सविता वरि जात रे
असुख व्याप्त करी सगळ्या भवा
तुजसवें अति उत्सुक यावया ८

र. बा. जामनेरकर.

## आईचें चित्र.

श्लोक.

पवित्र करुणारसा जननिचें असें चित्र तें,
सहर्ष कुतुकें असें मजकडे अहा ! पाहतें
प्रसन्न वदनीं दिसे रुचिर हास्य वात्सल्य तें,
तिचीं चरणसारसें नमितसें प्रमोदें अतां १
तदा चरणिं लागलें सकल क्षुद्र माझें मन,
स्मरूनि सगळें क्षणीं भरुनि येतसे लोचन;
निरंतर मला घडो परम आस हें दर्शन,
गुणास तव गातसा गमतसे सुखाचा क्षण २
" चुकूनि न घडो कदा व्यसनिं वाकडें पाउल.
तुला यश मिळूनियां प्रगति सत्वरीं होइल;
सदा मधुर बोलणें जनहितास संपादणें. "
तिचें सतत सांगणें जगतिं वाग साधेपणें. " ३
जया जननिचें मिळे सुख, सुखी असे मात्र ते,
अभागि पुरता खरा मज न अल्पही लाभतें;

न कार्य घडलें असें अजुनि गे ! तुझीयास्तव,
सदैव झुरतों मनीं कवनिं गातसें यास्तव. ४

मंजुबाळ.

## दिव्य स्थान.

पद.

दावा दावा जन हो ! कोणी वेडा जीव असे झाला !
कोठें आहे स्थान दिव्य तें ? शोधित फिरतों मी ज्याला !
प्रेम निरंतर जेथ फिरे !
शांतीचें साम्राज्य खरें !
सुधा मधुर सर्वत्र भरे !
चिरसौख्याचें स्थान रम्य तें अझून नच गवसे मजला !
दावा दावा जन हो ! कोणी वेडा जीव असे झाला ! १

उच्चनीच हा भेद सपला समानता नांदे जेथें !
अभिमानाचें पिशाच्च नाहीं ! द्वेष भूत ना त्रासवितें !
औदास्य न पळ जेथ ठरे !
दुःखाचें नच नांव उरे !
उत्साहाचें स्थान खरें !
आनंदोर्मी देती जेथें स्वर्गसौख्य भोगायाला !
दावा दावा जन हो ! कोणी वेडा जीव असे झाला ! २

पारुजी नारायण मिसाळ.

## माझा सवंगडी.

पद.

सद्सद्विवेक वाणी दैवी--बदी जो आवडीं,
साच हो तो माझा सवंगडी

सत्यप्रीती नीति ह्या वरुनि--कुरवडी सुखवडी,
तोडि जो दुष्टरूढि तातडीं
दु:खपीडितां मुक्त कराया--घेत सकटीं उडी,
नडि न ज्या भीति कोणत्या घडी
जो उक्तिकृतीचा मेळ ठेवितो पुरा
जो उन्नतिपथ दावितो बांधवा खरा
जो परार्थ झडकारि स्वार्थाचा करि चुरा
व्रत हें धरि जो आणि उद्धरी—भारति ही बापडी,
साच हो त्याची माझी गडी

भालचंद्र

## सिंह, गाढव आणि कोंबडा.

गीति.

मित्रत्व गाढवाचें होतें बहु दिवस कोंबड्यासगें;
सहवासें सलपें त्या दोघांचें सदैव मन रंगे. १
एके दिवशीं दोघे गेले असतां चरावया रानीं,--
भक्ष्यार्थ सिंह आला क्षितिचा तल हालवीत चरणांनीं. २
सिंहास कोंबड्यानें बघतां क्षणिं, शद्व परुषतर केला !
तो ऐकताच तेथुन भीतीनें सिंह तो पळुन गेला ! ३
सिंहास कोंबड्याचा घाबरवी शद्ब; हें न जाणून,--
गाढव फुशारला कीं गेला मज बघुनि तो पशु पळून ! ४
मग मुर्ख तो जवानें सिंहाच्या मागुती पळत सुटला;
तन्मनिं विचार कीं मी जिंकुनि सिंहास, दाखवीन बला. ५
सिंह पुढें हा मागें गेला धावत सुदूर तेथून;
सिंहास कोंबड्याचा शकला भय शद्ब तेथ देऊ न. ६

मग मागें सिंह वळुन, तुटुन तया गाढवावरी पडला !
त्याच्या शक्तिपुढें तो गाढव एकहि पळार्ध नचि टिकला ! ! ७
बल सर्व गाढवाचें, अवसानहि त्या क्षणीं विरुनि गेलें !
एकाच तडाक्यानें सिंहानें ठार गाढवा केलें ! ! ८
चित्तीं धरा मुलांनों, ह्या गोष्टींतून बोध जो निघतो;
स्वपरबलाबल नेणुनि, सजतो युद्धास मूर्ख तो फसतो ! ९

सौ. स. भि.

---

## आहे आणि नाहीं !

पद.

( चाल अंबरगत परि० )

आहे ऐसें काल बोललों तुजला मी प्रियकरे !
ह्मणतों नाहीं अजि तें बरें ॥ ध्रु० ॥
राग तयाचा तरी मजवरी धरीं न गे ! अंतरीं;
चित्तीं विचार कांहीं करीं
सत्य समजता, तुझी खिन्नता जाइल बघ सत्वरीं;
ह्मणशिल तूही माझ्यापरी
ये ऊठ, नको मुळिं रुसूं; गे !
मज दूर सोडुना बसूं.
फसवायाला नाहीं तुजला सांगत; तव हा बरें--
मन हें व्यर्थ जाण बावरें. १

चंद्राचा जो प्रकाश रात्रीं पडे नभीं भूवरी;--
दिवसां पुरे रवी तो हरी !
काळोखीं जी धूमकेतुची दिसे भव्य साजिरी--
लोपे चंद्रिकेंत मंजिरी.

जो रंग दीप दाखवी; गे !--
तो छटा उन्हीं घे नवी.

गोरें गोरें भासे जें तें; काळें आहे खरें !
मृगजळ पिउनि तृप्त कां सरे ? २

मोल जयाचें नाहीं, ह्मणती; हिरा न तो कोळसा
मातिस गणिती सोनें मृषा ! !
बाप असे हा, पुत्र बंधु ही माता, कन्या स्वसा;
कांता कीं पति हा प्राणसा.

वदु फार काय बापुडी, गे !
ही नोहे आपुली कुडी !

जोंवरि करितो वृष्टि जलाची समयीं जलधर धरे;
तोंवरि धान्यकोश ती भरे. ३

नाहीं जें, परि वेडें करितें, हरितें मन मोहुनी;
राहे त्रिभुवन हें व्यापुनी.
त्यापासूनिच सृष्टि सर्वही झाली; तिज पासुनी;
घेई आत्मतृप्ति पावुनी.

सुप्रेम आमुचें जडे, गे
तें कारण त्याला वडे;

तेंच शेवटीं उरे एकटें निश्चय माझा ठरे;
भव हा भास सुखाचा, सरे. ४

सुमंत.

# भिषग्विलास.

## आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी

## प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन २१ वर्षें पुरीं झालीं. ह्यांत यथावकाश, शरीररचना, इंद्रियांचे धर्म निरनिराळे रोग, त्यांचें निदान व चिकित्सा, औषधी व त्यांचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयावर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारांसच न होतां इतर सर्व सुशिक्षित व कुटुंबी माणसांना व्हावा, ह्मणून ह्यांतील माहिती सुलभ भाषेंत दिली जाते. वार्षिक वर्गणी आगाऊ. टपालहं सह अवघी १॥ रु.

व्यवस्थापक 'भिषग्विलास'—सोलापुर.

---

# श्वासरिपु.

यापासून दमा, खोकला, कफ व त्यापासून ज्वर, अरुचि, निद्रानाश, मलावरोध, अपचनें वगैरे विकार होतात त्यावर तत्काळ गुण येतो. १ बा ॥१२ आ. ट. ४ आ.

एजंट—गोगटे आणि कंपनी मुंबई.

पत्ता—जी. डी. भावे वैद्य, पुणें.

# काव्यरत्नावलीची किंमत किती कमी आहे ?

एकाच नावावर एका प्रतीस टपाल व्हीपीसह किंमत १। रु. दोन प्रतीस १॥ रु. तीन प्रतीस १॥। रु. चार प्रतीस २ रु.

रत्नावलीचीं मागील बाईंड केलेलीं पुस्तकें रद्दीच्या भावानें विकण्याचा प्रसंग आला आहे. हीं सर्व अनुक्रमानें घेतल्यास प्रत्येक पुस्तकास आठ आणे फुटकळ पुस्तकास दहा आणे. टपाल व्हीपी खर्च मुळींच नाहीं ज्यास हीं पुस्तकें एकदम घेण्यास सवड नसेल, त्यास प्रत्येक महिन्यास एक एक पुस्तक पाठविण्यात येईल

संपादक **काव्यरत्नावली** जळगाव.

# संकल्प.

## ( WLL POWER. )

**हें एकच** अशा धर्तीचें मराठींत नवीन मासिक आहे. ज्यानीं ज्यानीं हें एकदा वाचलें त्याना तर पसंत पडेलच व इतरांनीं पाहून अभिवदन पत्रें पाठविलीं ज्या स्त्री पुरुषांना मराठी वाचता येते त्या सर्वांनीं आपल्या सौख्य व अभ्युदयासाठीं हें अवश्य वाचावें

कारण

ह्याच्या वाचनानें, परिशीलनानें, व ध्यासानें अगणित लाभ होतात. जसें मानस शक्तीचा विकास होणें, व्यवहारात उच्च सुख व कार्य करितांना शांति अनुभव, शास्त्रीय बाबतीचें खरें रहस्य समजणें, आत्मीयगुप्त शक्तीचा अंदाज कळणें, आहार विहाराचें ज्ञान, ज्ञानेश्वरी सारख्या सर्वमान्य ग्रंथांतील उज्वलतेंं समजणें वगैरे. इतक्या प्रकारचें उपयुक्त ज्ञान. पैका टैप पृष्ठें ४८ वर मिळते. आकार क्राऊन कव्हर सचित्र वर्गणी वर्षाची रु. १॥ ट. ख त्यातच आम्ही रु १॥= चें व्ही पी. नें प्रकाशित झालेले अंक पाठवूं नमुनाच हवा असल्यास ८= ची टिकिटे पाठवावी.

पत्ता—मंत्री संकल्प कार्यालय ( K. ) मुंबई नंबर २

॥ श्रीः ॥

# काव्यरत्नावली

आलीकडील कविमंडळीनें चालविलेलें

**कवितेचें मासिकपुस्तक.**

श्लोक

तीं तीं पदे नित्य फिरूनि येती। त्या त्याच अर्थाप्रति दाविताती
कौशल्य मोठें रचनेंत आहे, । सत्काव्य तेणें नव वाटताहे.

---

वर्ष २७ वें ) मे ज्यून १९१६ ( अंक ५ वा.

---

हें मासिक पुस्तक **नारायण नरसिंह फडनीस** यांनी जळगाव जिल्हा पूर्वखानदेश येथें बालाजी पेठ म्युन्सिपल घर नंबर १३५ मध्यें आपल्या बाबजी प्रिंटिंग छापखान्यात छापून जळगांव येथें प्रसिद्ध केलें

**वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १। रुपया.**

बाबजी प्रिंटिंग प्रेस जळगांव

## अनुक्रमणिका.


| पद्यसंख्या | मे १९१६ | पृष्ठे |
|---|---|---|
| ३१ | तापी नदी | ९७ |
| १११ | श्रीहनुमच्चरित ( नवम शतक ) | १०१ |
| १७ | माधुकरी | ११४ |
| ३ | सुंदर प्रतिध्वनि | ११८ |
| ५ | सुखाचा शोध | १२० |
| १६७ | | |

# काव्यरत्नावली.

## अंक ५ वा.

## तापी नदी.

### प्रसंग पहिला.

ह्या कवितेस संस्कृत किंवा इंग्रजी लेखाचा मुळींच आधार नाहीं. ह्या नदीचा जो बराच भाग पाहण्यांत आला त्याजवर ही कविता रचली आहे. हिचे पांच प्रसंग ह्मणजे भाग करून त्यांत निरनिराळ्या स्थळाचें साद्यंत व सविस्तर वर्णन केलें आहे. ह्यांतील पहिलीं पांच पद्यें नमस्कृतिपर आहेत; त्यांत पहिल्यांत शिवाची, दुसऱ्यांत गंगेची, तिसऱ्यांत सर्व नद्यांची, आणि चौथ्यांत व पांचव्यांत वर्णिलेल्या "तापी नदीची" स्तुति करून नमस्कार केला आहे.

श्लोक.

जयानें वामांगीं सकलगुणसौंदर्यभरिता¹—
अपर्णा² प्रेमानें धरिलि, तरिही देवसरिता³
गुणें रूपें मान्या ह्मणुनि निज शीर्षीं⁴ धरियली
शिवाच्या त्या पावो नमन मम हें पादकमलीं १
कपर्दी⁵ शंभूच्या तव भगवती ! वा हरिपदीं⁶
नभीं पातालीं तें⁷ मनुजभुवनीं⁸ वा सुरनदी⁹ !

---

१ सर्व गुण आणि सौंदर्य ह्यांनीं युक्त अशी. संबंध अपर्णा शब्दाकडे. २ पार्वती. ३ गंगा. ४ जटेंत. ५ गंगेचें विशेषण. ६ विष्णुपदाच्या ठायीं. ७ ह्याचा संबंध पुण्यस्रोत शब्दाकडे. ८ मृत्युलोकीं. ९ हे गंगे !

असो पुण्यस्रोत त्रिदिशमनुजां वंद्य असुरां
तयाला सद्भावें नमन करितों जोडुनि करा २
नंदीन स्वीकारें जलधिस जयांच्याचि वदती
पवित्रा तीर्थांची सतत असते जेथ वसती।
सुधातुल्यें तोयें सकल जगता ज्या जिववितो
सरित्पादीं पावो स्तवनपर अल्पा मम कृती ३
तुझ्या स्नानें होई–मलिन तनु ही निर्मळ, मन–
प्रसन्नत्वा पावे; सहज घडतें पापशमन.
तृषा वारी वारी, सकल भवदु.खेंहि हरितें;
ह्मणोनी सद्भावें तुजसि नमितों पुण्यसरिते ! ४
नगाची तूं कन्या असुनि चपला कौतुक असे
तशी क्षाराब्धीची प्रियसखि तरी तद्गुण नसे--
जलीं, सर्गे घेसी गुणचि, न कदा दोष लव ते;
ह्मणोनी सद्भावें तुजसि नमितों पुण्यसरिते ! ५
जशी शालिग्रामीं कनकतनुरेषा विलसते,
गजेंद्राच्या गण्डीं सुबक मदलेखा चमकते,
तशी विंध्याद्रीच्या वरि तव शरी रम्य तटिनी !
कशी शोभे, होई बघुनि किति आनंद नयनीं, ६
अहा ! तिथें विंध्यनगेंद्रबाले ! । किती तरी वारि तुझें मळाळे
विशुद्ध वैडुर्यमण्यांसमान । बघोनि होतें मन सुप्रसन्न ७
दोहों तिरीं सुंदर वृक्षराजी । वेष्टीयली पुष्पलतादिकीं जी
नानापरीच्या रमणीय वर्णीं । ती शोभते कोमल पुष्पपर्णीं ८

---

१ पुण्याचा स्रोत--झरा. २ समुद्र. ३ पाणी. ४ न हलणाऱ्या अचलाची (पर्वताची.) ५ क्षारत्व. ६ गंडस्थलावर. ७ स्वच्छ. ८ रत्नविशेष.

जाई जशी सरल वक्र तुझी झरी ती
तीरद्वयीं तरुहि तेविं उभे रहाती
प्रेमें जणू निज मनोगत मूकभावें—
ते दाविती "न अमुतें सरिते! त्यजावें" ९

तूं मानिसी नच असें बघुनी निदानीं
ते वेष्टिती तरुलताहि तुला मिळोनी
बैसूनि गे! क्षणभरीं मग कुंज--कोशीं
मंजु स्वनें गमनहेतु तया कथीसी १०

प्रेमें जरी कथियला निज हेतु कानीं
मानीयलें किमपि त्या न वचा लतांनीं
त्या सोडुनी निज तरुप्रियवल्लभातें[1]
प्रेमें करीं कवळिती तुझिया झरीतें ११

ही लोभवी सकल ह्या ममता जगाला
मोहांत मुख्य बघ कारण लोटण्याला
प्रीती असे बहु हिला प्रिय--संगमाची
होई वियोग अति दुःसह फार जाची १२

जे धीर वीर डगती न नगेंद्र--भारें[2]
भंगे न यद्हृदय तें कुलिशप्रहारें[3]
स्नेहें द्रवे सहज चित्त परी तयांचें
व्हावें न कां? मग असें मृदुला लतांचें १३

स्नेहोचिता ह्या बघुनी लताच्या। कृत्यास, पंक्ती जलवेतसांच्या
प्रार्थावयातें तुजला, स्वभावें। ज्या नम्र त्या पावति नम्र भावें १४

---

१ वृक्षावरून उतरून प्रवाहांत पसरतात. २ पर्वताच्या भारानें. ३ वज्रप्रहारानें.

तूं तार कीं सहर वा द्याळे! । लोटू नको दूर परी कृपाळे!
मानू तुझ्या शर्म सुसगतींत । राहू सदा त्वद्विमला जलांत १५

पाहोनि त्याचा- शुचि नम्र भाव । तैसा अति प्रेमलही स्वभाव.
देसी तयां ठाव निजोदरात । तू दाविसी सज्जनलोकरीत १६

नगोच प्रांतींही मधुनि दारिच्या खेळुनि जरा
लतावृक्षाऐशी विपुल जलदाली[1] सुखकरा
नदी! होसी, तेथें प्रवहतटिचीं कोमल तृणें
सुखें भक्षोनीया क्विति विहरती स्वैर हरिणें १७

सलील क्षामांगी[2] भुजगगतिवक्रा[3] गिरिवरी
तरूनूनी वाहे पवनचपला ते तव झरी
बघोनीया बाळे! तुज कुतुहलें तात नग हा
गमे सोडोनीया निज परिसरीं[4] खेळवि पहा १८

तुझा ज्यापासोनी अति विमलपूतोद्गम[5] असे
प्रभातीं त्या भास्वान्[6] तव जनकशीर्षी[7] सुविलसे
तयाची दिव्या भा[8] वसन जणु तू तेंच कसुनी[9]
मुहूर्तानें या या निघसि गमतें नाथसदनीं १९

बघोनी पौरस्त्याऽनिळ[10] निज गती मद करुनी
तुझ्या सगें येई तव जनक—सन्मित्र म्हणुनी

---

१ पुष्कळ उदक देणारी. २ लीलेनें युक्त असून कृशांगी. ३ सर्पाच्या गतीप्रमाणें वांकडी तिकडी. ४ असमत मार्गी. ५ स्वच्छ आणि पवित्र असा उगम. ६ सूर्य. ७ मस्तकावर. ( शिखरावर ) ८ प्रभा--प्रकाश. ९ नेसून. १० पूर्वेकडील वायु—ह्याला पर्वताचा मित्र कल्पून तो आपल्या मित्र कन्येस पतीच्या घरीं पोंचविण्यास जात आहे अशी कल्पना केली आहे.

करीती पुष्पाची तट-तरुलता वृष्टि जननी!
प्रयाणीं व्हावें तें तव शुभ असा हेतु धरुनी. २०
निघालीसी तू हें वचुनि दुसऱ्या शैलतनया
तुझ्या सगें या या निघति नगराथा त्यजुनिया
परी वाटे त्याना तव पथ बहू दुर्गम असा
दुजा मार्गी जाती ह्मणुनि मग घेवोन वळसा २१

अशा रीती तेथें सुखवुनि नगस्था स्थिरचरा
क्रमें वाढोनीया हळुच पुढतीं निर्झर ज़रा
प्रपातीं येताना प्रबलतर तत्छब्द निघतो
दरींतूनी तैसा गिरिकुहरिं जाळुनि रिघतो २२
अत्युत्कठा जरि तुज गमे नाथसद्मास जावें
पाहोनीया स्वजनममता चित्त तें मोह पावे
धैर्यें त्यांतें दृढ करुनि तू-पर्वतांकावरोनी
मोठ्या कष्टें निकसि सकला दीर्घ शद्वें पुसोनी २३
दे आमंद्रें तुज अनुरवें शैल आशिर्वचाते
गाती पक्षी वसुनि विटपीं कूजितें त्वद्गुणाते
प्रेमें नृत्या करिति सवधू मेघनादानुलासी
शाखाहस्तीं अनुमत तरू देति ते जावयासी २४
अशी शैलोत्सगांवरुनि अति वेगें अटुपवी
गमे मातें जाई प्रवह तव पाताल भुवनीं

---

१ पर्वताला. २ पर्वतावरील वृक्षलता पशू आदिकरून ह्यांस. ३ जेथून तिचे पाणी खाली पडतें तें स्थान. (धबधबा) ४ चिरालें. ५ गंभीर. ६ प्रतिध्वनीनें. ७ मधुर शद्वानीं. ८ मयूर ज्याना मेघाच्या शद्वाची प्रीति आहे असे. ९ पर्वताच्या अकावरून (कड्यावरून.)

सुशीता सुस्वादा विमल रुचिरा पाप शमना
अशा ये घेऊनी पुनरपि वरी सुंदर गुणा २५

" मी पावना गोड विशुद्ध वारी, । माझें असे शील परोपकारी
'तापी' मला कां वदतात लोक, । माते! जरी तू ह्मणशील, ऐक "- २६

निदाघीं मध्यान्हीं प्रखर किरणीं वासरमणी--
तपे, तूही माते! तपसि बहु तेव्हा स्वपुलिनीं
अनायासें तेव्हां नच तव जल प्राप्त पथिकां
अशा हेतूनीं ते वदति तुज 'तापी' न अणिका २७

दयालुत्वें चित्तीं सुजन खल कांहीं न ववतां
दिला सर्वा ठावो धरुनि उदरीं थोर मनता
स्वदुष्कृत्यीं लावी परि खल तुझ्या दूषण मुग्धा
अशा ह्या हेतूनीं वदति तुज 'तापी' न अणिका २८

बहू वर्षाकालीं प्रवह तव वाढोनि तटिनी!
तटस्था ग्रामांच्या अवचित शिरे रम्य सदनीं
तयां विध्वंसोनी जलमय करी तो सकलिका
अशा ह्या हेतूनीं वदति तुज 'तापी' न अणिका २९

तिरीच्या क्षेत्रींचें सुपिकपण तू निर्दयपणें
लया नेवोनीया सकल करिसी तेथ पुलिनें
करीसी क्षोभानें सहज निमिषीं रंक धनिका
अशा ह्या हेतूनीं वदति तुज 'तापी' न अणिका ३०

प्रचंडा लाटांचा भयकर असा जो ध्वनि निघे
निशीथीं येवोनी पुरयुवतिकर्णीं झाणिं रिघे

१ वाळवटात. २ ठाव. ३ मगरादिक. ४ वाळवंटें.

भिवोनी त्या नाथा कवळिती तदा, जेविं लतिका—
द्रुमा, ह्या हेतूनीं वदति तुज 'तापी' न अणिका ३१

होती जनास अपकार तुझ्या मुळें जे
बोलावयास जननी ! मम चित्त लाजे
मी जाणतों लव न ह्यात तव प्रमाद
वाटे परी बघुनि थोर अनर्थ खेद ३२

मी बोललों तुजसि निष्ठुर निंद्य फार
माते ! क्षमा करिं परी अपराध थोर
दे बुद्धि निर्मळ तुझे गुण गावयाला
दावावया सदुपयोग तुझा जनाला ३३

केशव नारायण वैद्य.

---

## श्रीहनुमच्चरित.*

### नवम शतक.

आर्या.

जयजय सुर-नर--वानर--सवेषा ! मिश्ररूप गुणवाना !
उपजत निजावलंबन महाव्रतें स्वपितरांस शिणवा ना. १
सद्गुरुरघुपतिचरणीं निःसीमप्रेमभावना दावा,
संकल्प भूतमात्रीं न धरावा दुष्टभाव ना दावा. २
धर्मोच्छेदक सतद्वेषक खल दुर्जनां प्रसंगानें-
निर्दयपणें वधिसि, परि सदय मनें मुक्ति देसि सगानें. ३
संतोषार्थ गुरूच्या निज़ देहाचीहि सोडिली ममता,
उरला स्वार्थ कशाचा; सर्वांभूतीं स्थिरावली समता. ४

---

* ह्या काव्याचा आठवा सर्ग गेल्या वर्षाच्या ५ व्या अंकांत आला आहे.

नि सीमंता कसातें भक्तीची लाउनी गुरु पहाती,
ठरतां बावन्न कशीं देती प्रेमें स्वरूपता हातीं. ५
कर्तुमकर्तुं रघुपति शेषास्त्र औषधी तुझ्याकरवीं—
आणवुनी निजभक्तीं गौरव सद्भक्तिचा तुझ्या करवी. ६
अविवेक दशानन हें पाहुनि झाला हताश खिन्न--मन,
ती पुढिल कथा वदवीं करितों साष्टांग तव पदीं नमन ७

भरवून सभा सांगे मंत्रि जना सिद्धता करायास,
उठवावयास यत्नें निद्रावश कुंभकर्ण रायास. ८
दशशत घट मदिरेचे गाडे तितुकेच अन्न मांसाचे,
नित्य फलाहारास्तव इतुकें साहित्य मिळविती साचें. ९
उकटुनि शिळा उघडिलें द्वार गुहेचें महत्प्रयत्नानें,
दोलन पावति शिरतां श्वसनाच्या तीव्र वेगपवनानें. १०
उभयहि कर्णद्वारीं वाजविती कर्कश--ध्वनि कराया--
दुंदुभिपटहादिक बहु वाद्यें, परि दे न दाद निकरा या. ११
घण ठोकिती शिरावरि नेती अंगावरूनि मत्त--करी,
पद टोंचिती त्रिशूळें तरिहि न निद्रा तयास मुक्त करी. १२

वाद्यध्वनि परिसुनि तो कपि वदति जयोत्सवीं असुर रमला,
उठला लक्ष्मण नेणे झुंजाया यास हा सुदिन गमला. १३
जागृत दैत्य पुसे बहु कोपें जाऊन संभ्रमा चारा,
कळतां वृत्त सविस्तर शीघ्र निघे बंधुच्या समाचारा. १४
हितवचन रावणातें सांगे अवमानितां तसाच रणीं,
स्कंधीं मुद्गर घेउनि येत, वधस्थानिं शूळसा चरणीं. १५

तो समरपथगामी उच्चपणें स्वशिर घनपथीं घुसवी
निज दर्शनें कपींच्या समुदायीं भीतिची कदर बसवी १६
शिरुनि कपिदळीं स्वकरें कित्येकां उचलुनी वदनीं घाली
ह्मणती संहारास्तव रणदेवी मूर्तिमतच्च निघाली १७

उभयकरें सहज मुखीं उचलुनि कपिंचा थवाहि तो सारी
रडत वदति दाशरथे! कपिसेना असुर मारितो सारी १८
आक्रोश वानराचा रणभूमीवर भयानक पसरला
तें पाहुनि कपिनायकगण असुरावरि करून हुप सरला १९
स्वेछेनें शिरुन मुखीं उदरगत कपींस सांगती युक्ती
नासिक-कर्ण-गवाक्षें बाहेर पडून मेळवा मुक्ती २०
तेहि असुर हृदयाचे लचके घेऊन येति बाहेर
रिपु नगरीं शिरुनि जसे गुप्तपणें वर्म आणिती हेर २१
नासाग्र कर्ण ओष्ठद्वय कपिनीं छेदिलें स्वदंतांहीं
परि निद्रावशमूढा कुंभश्रवणा न दाद वार्ताही २२
मग हनुमतें पुच्छें बांधुन फिरवून कुंभकर्ण नभीं
दैत्यचमूवरती तो आपटिला परि तयाहि दैत्य न भी २३

उठला सकोप घुसला विध्वस करावया कपिदलाचा
राम वदे रे! दुष्टा! गर्व वृथा वाहिसी निजबलाचा २४
यमसदनीं सत्वर जा करिल बहु तुझ्या कृतात सत्कारा
मत्सायकचि यमें तुज पाठविलें मूळ पर्वताकारा २५
विद्युत्पाताघातें गिरिचे जैसे तुटून पडति कडे
रामशरें असुराचे धरणीवरि पाडिले करुन तुकडे २६

भ्रातृवधकथा मूर्छित दशकंठा मेघनाद समजावी
कारितों प्रयत्न जेणें चिंता रिपुसह यमालया जावी २७
रक्तस्नात निशाचर अग्निरथास्तव करी अनुष्ठान
जाउन निकुंबळेला बैसे पाहून निर्जन--स्थान २८
अग्निरथप्राप्तीनें बोले होईन वीर दुर्जय मी
विघ्नेश्वरास विनवी विघ्न न बाधो कदापि या नियमीं २९

कपिसेनापति वदती अजुन न कां ये दशास्यसुत अथवा
त्यातें जाउनि कोणी कळ काढुनि समरिं यावया चिथवा ३०
गेला नगरीं सत्वर वार्ता घेउन बिभीषण परतला
रामास वदे देवा ! रिपुसुत रथसिद्धिसाधनीं रतला ३१
रामाज्ञेनें घेउनि गेला कपिसैन्य लक्ष्मणासह तें
बोले तयास वीरा ! रिपुचें कैसें कुकर्म तुज सहतें ३२
मलमूत्रोत्सर्जनविधि विझवाया अग्निकुंडि कपि करिती
हवनीयद्रव्यांचीं पात्रें करिती कपींद्र कितिक रिती ३३
लक्ष्मण निजशत्रूच्या क्रतुरक्षक दैत्यसैन्यपरिघातें
रावणिला हुडकाया भेदी कालाग्नितुल्य शरघातें ३४

अग्नि सरथ मावळला उठला भग्नाश रावणात्मज तो
घुसला सौमित्रावरि दीपावरि जेविं तो शलभ धजतो ३५
संग्राम घोर करुनी उन्मळला वृक्षसा, पतन पावे;
दुष्कीर्तिला भिउनि यमसदनिं तया वाटलें जणुं लपावें ३६

विजयश्रीसह लक्ष्मण गेला हें वृत्त रावणाचारीं
कथितां सूड तयाचा घ्याया तो अहिमहींस पाचारी ३७

कोट करुनि पुच्छाचा पवनात्मज राघवांस सांभाळी
रिपु करिल घात यास्तव ठेवितसे दृष्टि तीक्ष्ण आभाळीं ३८

पळवुनि तयां वधाया पाताळीं न्यावयास अहिमहिला
मार्ग न दिसतां राक्षसमायेनें विवर पाडिती महिला ३९

होतां प्रभात कपिवर गेले रघुराजचरण वदाया
प्रभुस न बघतां वदती नेलें कोणीं सुसौख्यकंदा या ४०
जीव विरहित कलेवर निश्चेष्ट पडे दिसे न तेज वरी
तैसें कपिदल सारें शून्यमनें स्तब्धताचि सहज वरी ४१
पाहुन विवर भयकर हृदय जहालें विदीर्ण सकलांचें
श्रीरामाविण व्हावें संरक्षण केविं वानरदलाचें ४२
कोणी किमर्थ कोठें विवरांतुनि राघवात्मजां हरिलें
सहज जिहीं रणयज्ञीं दुर्जयहि निशाचरांस संहरिलें ४३
नानाविध कपिगण ते निज मनिं ऐशी विचारणा कारितां
रिपुबंधुदूत सांगे पाताळीं रघुवरांस महि हरितां ४४
नलनील वृद्ध अंगद घेउनि सर्गे त्रिलोकपतिदास
विवरिं शिरे आणाया शोधुनि सुग्रीवरायसुहृदास ४५
अंत न लागे न कळे खोल किती मार्ग चालतां थकले
कासावीस जहाले दम धरवे ना जलार्थ जिव सुकले ४६
हनुमंतें पुच्छानें बांधुनि विवराचिया परद्वारीं
स्वच्छ हवेंत उतरिले सत्वर सावध करून ते चारी ४७
गेला सागरतीरीं राक्षससेनेसवें अहिमहीच्या
झगडुनि तिला दवडिलें पाहुणचारार्थ राजभट गृहिंच्या ४८

सेनानी मकरध्वज निजदलपतनें चढून कोपातें
समरांगणीं कपिवरा घायाळ करीत तीव्रशरघातें ४९
तो एकलाचि पाचहि कपिंना जर्जर करी स्ववीर्यानें
त्रिजगींचा तम जैसा हटवावा स्वकिरणेंचि सूर्यानें ५०

वृद्ध वदे पवनसुता ! वीर्य तुझें आज मांद्य का पावें
ज्या तव नामश्रवणें इंद्रयमादिक रणात कांपावे ५१
युद्ध करुनि तुजसगें मिळवीन ह्मणेल कोण गा जय मी
वळवाया रोम तुझा शक्ति लव नसेचि धर्मराज यमी ५२
हा कोमल दैत्यशिशू आह्मांसम तुजहि जिंकितो यानें
वाटे आश्चर्य नभा बुडवावें बिंदुमात्र तोयानें ५३

या भाषणें खवळला अतुल जसा प्रलयकालिचा जलधी
नक्रध्वजास पाडुनि बसुनि उरीं वदे तयास कर जलदी ५४
त्राता कोण जगीं तुझा त्यातें स्मर रक्षणार्थ धांवाया
सद्गति साधायाची सधी दवडू नये कदा वाया ५५

एकीकृतस्थिरचर-सृष्टि--बल न यद्बलीं कदा सम ये
मत्तात पवनसुत मज वाचविता खचित भेटता समयें ५६

हनुमत वदे अनृता ! आमरण ब्रह्मचर्य पाळावें
ऐसें दुर्धर ज्याचें व्रत तेणें स्त्रीस केविं भाळावें ५७
मिथ्यावचनें दूषण लाविसि त्या धूत कल्मषा, नीचा
जो मानितो सकलही स्वजननिसम त्या स्त्रिया त्रिभुवनींच्या ५८

मातृवच मला स्मरतें नक्र वदे तूंच मत्पिता प्लवगा !
पाचारितों जननिला सोड मला न कारें पुत्रघात उगा ! ५९
पुत्रस्नेहें मकरी आली हाकेसवेंचि धाऊन
पाहुन हनुमतातें नमुनि वदे घ्या स्वपुत्र पाहून ६०
हनुमंत वदे दुष्टे ! मिथ्या भापण नको करूं मकरी !
शपथ तुला रामाची सत्य वदें चद्ध चावटी न करीं ६१

मकरी बोले नाथा ! जेव्हां लंकापुरी--दहन--केली
झाली सपूर्ण तदा सिंधुजळीं अग्निशातता केली ६२
निक्षेपिला निढळिंचा निजहस्तें स्वेद सिंधुजाळिं पुसुनी
तो म्या सेवन केला वाढे गर्भाशयात तो घुसुनी ६३
तो हा मकरध्वज तव पुत्र तशी मीहि धर्मिणी भार्या
प्रिय तुज तेंच कराया तनुमनधन वाहिलें तुला आर्या ! ६४

वृद्धादिक कपि हासति वदती हें ब्रह्मचर्य उत्कट कीं
गौरव कारितील तुझा वार्ता ही पसरतां प्लवगकटकीं ६५
वृत्तात राघवाचा पुसता मकरी वदे सुखी असती
परि उदयिक बलि देतिल पूजुनिया भद्रकालिका असती ६६
शत योजन शतकाहुनि दूर समुद्राचिया पर तटाकीं
जातां रघुरायारिपु भुक्तन्ना श्वान जैं परत टाकी ६७
सन्मुख नौकेंत बसा महिकावतिला क्षणांत नेईन
श्रीरामकार्यसुयशीं तनु शिणवुनि अल्पभाग घेईन ६८
आशाभग मकरिचा करिती तनुरक्षणींच सावध जे
नक्रमिठीस्तव इतर न हनुमत परावलबनार्थ धजे ६९

असमर्थ अब्धितरणीं धरुनि अविश्वास तारिणीवारि ते
चौघे हनुमतावरि सपवुनी वसति कार्यभाग रिते ७०
अहिमहिला वधुनि तया- स्थानीं स्थापिन तुझ्या कुमारा
ऐसें सांगुनि सतिला सजत उडी परतटास माराया ७१

अतिसूक्ष्म मक्षिकेहुनि रूप धरुनि रघुपति स्मरण करुनी
महिकावर्तीत शिरला जलनिधिरिपुदुर्गरक्षकावरुनी ७२
देवाल्यांत शिरुनी घालुन न्हाणींत भद्रकालीस
स्थानिं तिच्या बसुन वदे खलसगें फार दुष्ट झालीस ७३
लावी राऊळाचीं द्वारें कपि भद्रकालि होऊनी
सतप्त क्रोधभरें भासे तो प्रलय कालचा वन्ही ७४

बलियुग रघुवीरद्वय अर्चनसाहित्य घेउनी संगें
देवीस तोषवाया आनदें येति अहिमही स्वांगें ७५
छिद्रांतुनि कीश वदे पूजासंभार भीतरीं सारा
बलिही सजीव तैसे ढकलुनि मिळवा स्वकर्म--फल--सारा ७६
मी रुद्ररूपिणी रणयज्ञीं घेउनि असख्य बलि धावें
क्षुधित परि बलियुगा मी ह्मणुनी प्रत्यक्ष या स्थलीं धावें ७७

आनंदले असुर ते ह्मणति भली पावली कुल--भवानी
अर्पूं बली सजीवचि सतुष्ट न होय ही नर--शवांनीं ७८
पाडुनि गवाक्ष पूजासाहित्य समर्पिती तयामधुनी
वदती सतुष्टाभव घृत--पायस--खाद्य--शर्करा--मधुनीं ७९
षड्रस अन्नाचे बहु ढीग समर्पिति किती तया न मिती
शुद्धोदक तदनतर ओतिति तांबूल अर्पुनी नमिती ८०

पूजा स्वीकारुनि कपि सेवी नैवेद्य जेविं अनल चरू
झाला संतोष वदे द्याया बलि सर्वथा नको कचरू ८१
कुंकुमवसनाभरणें लेववुनी रामलक्ष्मणा उभया
देवीपुढें ढकलिता वदति सकळही त्यजा कृतांतभया ८२
त्यांतें सन्मुख पाहुन हनुमत वदे स्मरा निज त्राता
मृतिसमयीं ईशस्मृति मुक्तिप्रद करु नका उशिर आता ८३
जडली प्रीति तुह्मांवरि मन हें धांवें तुह्मास सेवाया
पळ लाभता त्रिभुवन श्रेष्ठ पुरुष घालवू कसें वाया ८४

राम वदे गे ! माते ! चुकवावा उदरवास नरजन्मीं
ऐसें असता पुनरपि तोचि घडे चुकवु केंवि प्राक्तन मी ८५
उदरवसति चुकवाया सुरनर मुनिगण सदा स्मरति मजला
परि एक अंजनीसुत तारिल जरि येथ यावया धजला ८६
निजनामोच्चारक्षणिं आलिंगन पूर्वक रघुवीरमणी
न्हाणी नयनजलें कपि विरहान्तीं निजपती जशी रमणी ८७
गुप्तपणें आणुनि दे तूणीर शरासनें उभयतांचीं
महिस तुह्मी मी अहिला वधितों घ्याया प्रसाद येतांची ८८

पाठीशीं बसवि तया अहिमहिस वदे प्रसाद मागा या
मिळवा, अनुक्रमें या, शुभवर यश कविकुलोत्तमां गाया ८९
चरणावरि वाकविता शिर ठेवाया तयावरी चरण
देउनिया कपि रगडी अहि तत्क्षणि तडफडून वरि मरण ९०
चित्तीं मही समजला बोले रे ! मर्कटा ! दगेखोरा !
समरीं ठाक लपु नको रामासह मारितों तुला चोरा ! ९१

फोडुन कपाट आला गर्जत सिंहासमान बाहेरीं
पुच्छें देवालय तें उडवुनि गगनीं सुरद्विष हेरी ९२
रण माजलें महीशीं रघुपतिचें चापमुक्त--शर--मालीं
सेना असख्य वधिली रुतलें शरदशक असुरवर--भालीं ९३
शोणित बिंदु टपाटप पडता धरणीवरी शिववरानें
उठती महीच होउन रिपु न मरे पाहिलें कपिवरानें ९४

गेला मंकरीपाशीं मरण कशानें विचारिलें महिला
नेउन पुन्हा त्वरेनें एकातीं गाठिली असुर--महिला ९५
रामध्यानसमाधी विघडुन तीची वदे असुरभार्ये !
करिसी ध्यान जयाचें तो रघुवर सकटीं असे आर्ये ! ९६
ती वदत एकपत्नीव्रत मोडुनि अगिकार मम करिता
सांगेन मर्म पतिच्या मरणाचें व्हावया प्रणयसरिता ९७
प्रथम--समागम--समयीं विघ्न न येतां पुरेल तव काम
देऊन वचन ऐसें प्रभुजीचें साधिलें स्वयें काम ९८
भ्रमरगणास शिवाच्या अमृत पातालिचें स्ववदनानें
आणुन न टाकु देता ब्रह्मास्त्रें घडल रिपुवध सुखानें ९९

हें ऐकताचि तत्क्षणिं पातालीं धाव घेन कामारी
कार्यविलंबभयें भुजदंडें पीयूष--रक्षकां मारी १००
अमृतवाहक येती भ्रमर तया मुष्टिनें वधी सर्वां
भ्रमराचा नायकही आला चित्तीं धरून बलगर्वा १०१
मिळता येक चपेटा आपटला जाहला विकल गात्र
द्या प्राणदान बोले आज्ञा पाळिन करा कृपापात्र १०२

निज परिगणां परतवीं आटोप करीं सुधाविनिर्ग तिचा
महिभार्येच्या सदनीं सत्वर जा पोखरीं पलग तिचा १०३

जाउन रामासन्निध विध्यस्त्रे कपि वदे रिपु वधावा
शशिसेनेची इच्छा--पूर्ति कराया करोनि किंव धावा १०४
श्रीराम वदे कीशा ! वद देऊं काय चन्द्रसेनेला
जीच्या कृपेस्तव तुवां महिराक्षस--घात सिद्धितें नेला १०५
हनुमंत वदे देवा ! त्वत्सगमसौख्यलाभ मिळवाया
वचनें बद्ध करी मज अन्य नुरे मार्ग तीस वळवाया १०६
माझी घडो प्रतिज्ञा एकस्त्रीव्रत न आपुलें बिघडो
इच्छा तिची न मोडो भ्रमरकरें उचित विघ्नकार्य घडो १०७

भक्तिप्रिय रघुपति तो जातां सदनास चंद्रसेना ती
स्वागतपूर्वक पूजी निजमचकिं बैसवी धरुन हातीं १०८
होतां स्पर्श तयाला मोडुनि पडला अभद्र शकुन घडे
वर देत तिला रघुपति भार्या होशील कृष्ण जन्मि गडे ! १०९.

महिकावती नगरिचा मकरध्वज बनविला महाराजा
स्वामीसह परत फिरे उरकुनि पाताळ--लोकिंच्या काजा ११०
सर्वोपाधि विसर्जुनि भक्ति परपदास पाववी नवमी
रामचरण दाखविले हनुमतें कपिंस या शतकिं नवमीं १११

नवम शतक संपूर्ण.

यशोधन.

## माधुकरी.

[ एक चित्र. ]

पद.

गरिब बिचारा माधुकरी
दु:ख तयाला जन्मभरीं !

× × ×

कडक उन्हानें जीव घाबरे
रक्तमुखावरि घाम थळथळे
पायीं चटके
तापे डोकें
धांपा टाकित पळे जरी
दुःख तयाला जन्मभरीं ! १

बुरबुर लागे पाऊस धारा
पिच्पिच् उडतो रेंदा सारा
घट्ट तपेली
झोळी धरली
धांवत जातो घरोघरीं
गरिब बिचारा माधुकरी ! २

भणभण झोंबे वारा अंगा
बधीर बोटें पायीं भेगा
हात कापती
दात वाजती
कुडकुडतो हा घडी घडी
गरिब बिचारा माधुकरी ! ३

विटक्या अपुल्या मुकट्यावांचुनि
वस्त्र दुपारीं अंगीं कोठुनि
ही धार्मिकता
लोकांकरितां;
नित्य सोसतो कष्ट जरी
दु:ख तयाला जन्मभरीं !

सण आनंदी घरोघरीं जरी
नित्य कपाळीं सुटे न वारी
शिळी बुरसली
खवट आंबली
भोक्ता वस्तुस मिळे घरीं
गरिब बिचारा माधुकरी ! ५

उशीर कोठें कुठें सपले
मिळे कालवण भाग्य उदेलें !
नावा धरली
करीं तपेली
अश्रू तोंडीं, घांस गिळी
गरिब बिचारा माधुकरी ! ६

झोळी अजुनी थोडी न भरली
शाळेची तर घंटा झाली ! !
मुख हिरमुसलें
घास कोंबले
दप्तर घेऊनि पळे जरी
दु:ख तयाला जन्मभरीं ! ७

झांकुनि ठेवी रात्रीसाठीं
माजर पळवी निजे उपाशी
कुणा कळवळा
येईल बोला !
दुःख तयाचें त्यापाशीं
गरिब बिचारा माधुकरी ! ८

नंबर गेला एक खालती
जाईल नादारी ही भीती
सांज सकाळीं
अभ्यासा करि
फुरसत खेळा नसे तरी
दुःख तयाला जन्मभरी ! ९

तापानें जरि बाळ फणफणे
कोण पहातो औषध खाणें
तसा उपाशी
औषधाविशीं
त्यातुनि उठतो कसा तरी
गरिब बिचारा माधुकरी ! १०

गोसावी, भट, धन्य भिकारी
तेलग्याचे भाग्य कितीतरी
पैसा दूरच
पुस्तक धोतर
जुनें द्यावया नसे घरीं
गरिब बिचारा माधुकरी ! ११

नसे दिवाही दो दमडीचा
उभा कदिलाजवळ रात्रीचा
पान न पुरतें एक उलटले
गस्त शिपाई कुतरें आलें
तो गुरकावुनि, देई हाकलुनि
जरि रात्रीचा दिवस करी
दुःख तयाला जन्मभरीं ! १२

निजे कुणाच्या ओटीवरती
अर्धें धोतर खालीं वरती
एकच सदरा
तोच उशाला
दया न येते जगा परी
गरिब बिचारा माधुकरी ! १३

यजमानाला पलंग गिरदी
आंत उकडतें, खुपते गादी !!
पोटीं आणिले
पाय जुळवले
कुडकुडतो हा रात्रभरीं
गरिब बिचारा माधुकरी ! १४

रात्रीं परि त्या झोंप येइ ना
गर्दी करिती मनीं कल्पना
भावडाचा
वृद्ध आईचा
नित्य जिवाला घोर परी
गरिब बिचारा माधुकरी ! १५

पुण्यात आला अभ्यासाला
पदोपदीं जग अडवी त्याला
कसावसा तरी
जीव तग धरी
शूर नव्हे का खरोखरी
गरिब विचारा माधुकरी ! १६

भिऊनि ईश्वरा सन्मार्गानें
वागे परि हे असह्य हो जिणे
विद्या करितो,
हाल सोसतो,
नसे भल्याचें विश्व परी
विचार करतो माधुकरी १७

श्रीधर.

## सुंदर प्रतिध्वनी.

पद.

[ चाल — भूपती खरे ते० ]

हें विश्व शांतलें, शांत आपुली अवनी
साम्राज्य पसरलें शांतीचें ह्या भुवनीं
हा मित्र शांतला, ह्मणुनी झोंपी गेला
रात्रीच्या समयीं जडगण सारा निजला
परि वाद्य वाजतां प्रशांत सुंदर समयीं
हलविली तार ही पृथ्वीच्या ह्या हृदयीं !

प्रेमभरें सरिता गाती । सुंदर
नाचती सूर मिळवीती । सुंदर
आनंदें पुलकित होती । तरुवर
सौंदर्य सृष्टिचें रम्य निशा समयाला
भासतें अलौकिक ऐकुनि मधुवाद्याला ! १
परि प्रतिध्वनी त्या नैसर्गिक वाद्याचा
उमटवी धरित्री दर्शक तो प्रेमाचा !
प्रेमें प्रतिध्वनी प्रेमळ हृदयीं उठती
अपवाद कशी मग राही अपुली जगती !
वर्षाव सुधेचा करी सुधाकर नित्य
आनंदित तेणें, सृष्टीचें हो चित्त !
प्रेमानें भरती येई । सागरा
रोमांचित प्रेमें होई । ही धरा
आनंदें मग ती पाही । सागरा
प्रेमाची प्रेमें फेड करी ही जगती !
या निसर्ग नियमा जन प्रतिध्वनी ह्मणती ! २
सौंदर्य—पूर्ण परि प्रतिध्वनी प्रेमाचें
त्यापुढें तुच्छ ते नाद सकल वाद्याचे !
चंद्रमा अंबरीं, प्रकाश भूवर विलसे
कीं धवल हिमाचा पाउस भूवर वर्षे !
शुभ शुभ्र प्रकाशीं रमणीसह फिरतांना
मधुनाद प्रीतिचे श्रवणीं पडले नाना !
त्या वेळीं भरती आली । प्रीतिला !
रमणीच्या चुंबा गालीं । अर्पिला !

उलटुन मज चुंबी आलीं । प्रेमला !
वाटला प्रीतिचा प्रतिध्वनी तो मजला !
मधुनाद तयाचा मोही या जगताला ! ३

नारायण केशव बेहेरे.

## सुखाचा शोध.

### श्लोक.

गेलीं सर्व सुखें लयास ह्मणुनी का कष्टसी मानसीं
मृत्यूमागुनि जन्म त्या जगिं सदा हें वागवी मानसीं
दैवें सर्व सुखें जगीं मिळविणें आहे सदा दुर्लभ
आलेलीं उपभोगणें निशिदिनीं हें त्याहुनी दुर्लभ. १

आकाशीं कधिं पाहतों क्षणभरी त्या इन्द्र चापाप्रती
उद्यानीं हिमबिंदु शुभ्र कधिं ते पुष्पावरी शोभती
नेत्रांना दिसती, परी न पुसतों जातात कोणीकडे
जाती का ? मिळतील का पुनरपी ? ऐसें न कोडें पडे २

चिंताक्रांत मनें कधीं न करितों त्या शोधण्या यत्न मी
का कीं जाइल यत्न तो मम वृथा हें जाणतों पूर्ण मी
वस्तू रम्य जगात या क्षणभरी झाल्या अदृश्या जरी
येथें वा इतरत्र भेटति पुन्हा हें जाण तू अंतरीं. ३

लक्ष्मण जगन्नाथ अकूत.

# भिषग्विलास.

## आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी

## प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन १२ वर्षें पुरीं झालीं. ह्यात यथावकाश, शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग, त्यांचें निदान व चिकित्सा, औषधी व त्यांचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयावर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते. या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारासच न होता इतर सर्व सुशिक्षित व कुटुंबी माणसांना व्हावा, ह्मणून ह्यातील माहिती सुलभ भाषेंत दिली जाते. वार्षिक वर्गणी आगाऊ टपालह सह अवघी १॥ रु.

व्यवस्थापक 'भिषग्विलास'—सोलापुर.

---

# श्वासरिपु.

यापासून दमा, खोकला, कफ व त्यापासून ज्वर, अरुचि, निद्रानाश, मलावरोध, अपचनें वगैरे विकार होतात त्यावर तत्काळ गुण येतो. १ बा. ८।१२ आ. ट. ४ आ.

एजंट—गोगटे आणि कंपनी मुंबई.

पत्ता—जी. डी. भावे वैद्य, पुणें.

रजिष्टर्ड नं. बी. ५२७

# काव्यरत्नावलीची किंमत किती कमी आहे ?

एकाच नांवावर एका प्रतीस टपाल व्हॅपीसह किंमत १। रु. दोन प्रतीस १॥ रु. तीन प्रतीस १॥। रु. चार प्रतीस २ रु.

रत्नावलीची मागील बाईंड केलेलीं पुस्तकें स्वस्त्या भावानें विकण्याचा प्रसंग आला आहे. हीं सर्व अनुक्रमानें घेतल्यास प्रत्येक पुस्तकास आठ आणे फुटकळ पुस्तकास दहा आणे. टपाल व्हीपी खर्च मुळींच नाहीं ज्यास हीं पुस्तकें एकदम घेण्यास सवड नसेल, त्यास प्रत्येक महिन्यास एक एक पुस्तक पाठविण्यांत येईल

संपादक काव्यरत्नावली जळगाव

# संकल्प

( WLL POWER. )

हें एकच अशा धर्तीचें मराठींत नवीन मासिक आहे. ज्यांनीं ज्यांनीं हें एकदा वाचलें त्यांना तर पसंत पडेलच व इतरांनीं पाहून अभिवदन पत्रें पाठविलीं ज्या स्त्री पुरुषांना मराठी वाचता येते त्या सर्वांनीं आपल्या सौख्य व अभ्युदयासाठीं हें अवश्य वाचावें

कारण

ह्याच्या वाचनानें, परिशीलनानें, व ध्यासानें अगणित लाभ होतात. जसें मानस शक्तीचा विकास होणें, व्यवहारांत उच्च सुख व कार्य करितांना शांति अनुभव, शास्त्रीय बाबतींचें खरें रहस्य समजणें, आत्मीयगुप्त शक्तीचा अंदाज कळणें, आहार विहाराचें ज्ञान, ज्ञानेश्वरी सारख्या सर्वमान्य ग्रंथांतील उच्चतत्वें समजणें वगैरे इतक्या प्रकारचें उपयुक्त ज्ञान. पैका टैप पृष्ठें ४८ वर मिळते. आकार क्राऊन कव्हर सचित्र वर्गणी वर्षा वी रु. १॥ ट. ख त्यातच आम्ही रु १॥= चें व्ही पी. नें प्रकाशित झालेले अंक पाठवूं नमुनाच हवा असल्यास ८= ची तिकिटें पाठवावी.

पत्ता–मंत्री संकल्प कार्यालय ( K. ) मुंबई नंबर २

॥ श्रीः ॥

# काव्यरत्नावली

आलीकडील कविमंडळीनें चालविलेलें

**कवितेचें मासिकपुस्तक.**

श्लोक.

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती । त्या त्याच अर्थांप्रति दाविताती
कौशल्य मोठें रचनेत आहे, । सत्काव्य तेणें नव वाटताहे.

वर्ष २७ वें ) जून सन १९१६ ( अंक ६ वा.

हें मासिक पुस्तक नारायण नरसिंह फडनीस यांनी जळगांव जिल्हा पूर्वखानदेश येथें बालाजी पेठ म्युन्सिपल घर नंबर १३५ मध्यें आपल्या बाबजी प्रिंटिंग छापखान्यात छापून जळगांव येथें प्रसिद्ध केलें

वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १. रुपया.

बाबजी प्रिंटिंग प्रेस जळगांव

## अनुक्रमणिका.

| पद्यसंख्या | जून १९१६ | पृष्ठे |
|---|---|---|
| ३३ | तापी नदी (प्रसंग दुसरा) | १२१ |
| ६६ | " " (प्रसंग तिसरा) | १२७ |
| ३ | रजनी | १३७ |
| ४ | प्रभुघटना. | १३८ |
| ८ | प्रतिज्ञा. | १३९ |
| ८ | कारज्या प्रत. | १४० |
| ४ | वेदादेश. | १४२ |
| ९ | चिता. | १४२ |
| २ | प्रेमावाचुनि सर्व वटे. | १४३ |
| १ | सुभाषित | १४४ |

१३८

जन्माची भाकर मिळवा ! जन्माचे कल्याण करून घ्या !!

# धंदे शिक्षक.

ह्मणजेच इंडस्ट्रियल इंस्ट्रक्टर यांत श्रीमंतापासून गरिबापर्यंत नित्य व्यवहारांत लागणारे अनेक सर्वोपयोगी जिन्नस वरच्या घरीं तयार करून अल्प श्रमांत व थोड्या भांडवलांत ५-१० रुपये रोज प्राप्ति करून घेतां येण्याजोगी मराठींत आजपर्यंत प्रसिद्ध न झालेली कला--हुन्नराची गुप्त व खरी माहिती देणारा धंदे-शिक्षक आजच मागवून पैसा मिळवा ! उद्योगी व्हा !! किंमत ८८ व्ही. पी. ८१० खास यादी फुकट.

ज्ञानमित्रकर्ते, शनवार पेठ; पुणें--सिटी.

# भिषग्विलास.

## आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी
## प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन १२ वर्षें पुरीं झालीं. ह्यांत यथावकाश, शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग, त्यांचें निदान व चिकित्सा, औषधी व त्यांचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयावर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारासच न होतां इतर सर्व सुशिक्षित व कुटुंबी माणसांना व्हावा, ह्मणून ह्यांतील माहिती सुलभ भाषेंत दिली जाते वार्षिक वर्गणी आगाऊ. टपालह सह अवघी १॥ रु.

व्यवस्थापक 'भिषग्विलास'—सोलापुर.

---

# श्वासरिपु.

यापासून दमा, खोकला, कफ व त्यापासून ज्वर, अरुचि, निद्रानाश, मलावरोध, अपचनें वगैरे विकार होतात त्यावर तत्काळ गुण येतो. १ वा ॥ १२ आ. ट. ४ आ.

एजंट—गोगटे आणि कंपनी मुंबई.

पत्ता—जी. डी. भावे वैद्य, पुणें.

रजिस्टर्ड् न. बी. ५२७

# काव्यरत्नावलीची किंमत किती कमी आहे ?

एकाच नांवावर एका प्रतीस टपाल व्हापीसह किंमत १। रु. दोन प्रतीस १॥ रु. तीन प्रतीस १॥। रु. चार प्रतीस २ रु.

रत्नावलीचीं मागील बाईंड केलेलीं पुस्तकें रद्दीच्या भावानें विकण्याचा प्रसंग आला आहे. हीं सर्व अनुक्रमानें घेतल्यास प्रत्येक पुस्तकास आठ आणे. फुटकळ पुस्तकास दहा आणे. टपाल व्हीपी खर्च मुळींच नाहीं ज्यास हीं पुस्तकें एकदम घेण्यास सवड नसेल, त्यास प्रत्येक महिन्यास एक एक पुस्तक पाठविण्यांत येईल

संपादक काव्यरत्नावली जळगाव.

## संकल्प.

( WLL POWER. )

हें एकच अशा धर्तीचें मराठींत नवीन मासिक आहे. ज्यानीं ज्यानीं हें एकदा वाचलें त्याना तर पसंत पडलेंच व इतरानीं पाहून अभिवंदन पत्रें पाठविलीं ज्या स्त्री पुरुषाना मराठी वाचता येते त्या सर्वांनीं आपल्या सौख्य व अभ्युदयासाठीं हें अवश्य वाचावें

कारण

ह्याच्या वाचनानें, परिशीलनानें, व अभ्यासानें अगणित लाभ होतात. जसें मानस शक्तीचा विकास होणें, व्यवहारात उच्च सुख व कार्य करितांना शांति अनुभव, शास्त्रीय बाबतीचें खरें रहस्य समजणें, आत्मीयगुप्त शक्तीचा अंदाज कळणें, आहार विहाराचें ज्ञान, ज्ञानेश्वरी सारख्या सर्वमान्य ग्रंथांतील उच्चतत्वें समजणें वगैरे. इतक्या प्रकारचें उपयुक्त ज्ञान. पैका टैप पृष्ठे ४८ वर मिळते. आकार क्राऊन कव्हर सचित्र वर्गणी वर्षाची रु. १॥ ट. ख त्यातच आली रु १॥= चें व्ही पी. नें प्रकाशित झालेले अंक पाठवू. नमुनाच हवा असल्यास ✓= ची टिकिटे पाठवावी.

पत्ता–मंत्री संकल्प कार्यालय ( K. ) मुंबई नंबर ९

# काव्यरत्नावली.

## अंक ६ वा.

## तापी नदी.

### प्रसंग दुसरा.

#### प्रस्रवण-वर्णन.

श्लोक.

जेथूनीया तव उतरला ओघ वेगें वरून
होतें स्तब्ध क्षण मन तिथें भोंवतालीं बघून
हर्ष क्रोध प्रणय ममता खेद संकोच भीती
ऐशा नानाविध उठति त्या अंतरंगांत वृत्ती। १

कोठें उग्र क्षितिधरशिरें उच्च वैराण थोर
कोठें भीतिप्रद पसरलें रुक्ष कांतार घोर
कोठें मोठ्या भयंकर दर्‍या, कीर झाडी जयांत;
होतें ज्यांच्या जनमन सकृद्दर्शनें भीतियुक्त २

कोठें सों सों प्रलयसमयातुल्य वारा वहातो
धो धो धो धो प्रवहरव त्यामाजि संमिश्र होतो
कोठें क्रूर प्रबळ करिती श्वापदें घोर शब्द
सर्वांचा तो गिरिकुहरिं ह्या, होतसे थोर नाद ३

---

१ अद्रिरूपा असा दुसरा पाठ. २ प्रलयकालाप्रमाणें.

कोठें शूळाकृति[1] दिसति त्या पाहुनी दतकांला[2]
औदासिन्यें हृदय भरुनी खिन्नता ये मनाला
कोठें काळे कटक[3] उघडे दाविती क्रूर वृत्ती
शैवालानें पिहितेंहि[4] कुठें सौम्य ते भासताती ४

गेलें जेथें सुकुन जल, तो पांडुरें[5] प्रांत झाला
भासे आला जणु धवलिमा त्वद्वियोगें नगाला
कोठें[6] ओला दिसत उदकें भाग पाहून त्यातें
स्नेहार्द्रा तो नग निज मनोवृत्ति दावी जनातें ५

पाही येथें कठिण खडकाच्यामधूनी जळाचे--
बिंदू मंदाश्रुचि गळति हे त्वद्वियोगें नगाचे
अज्ञ, ज्ञाता, सदय अथवा क्रूर हो का विवेकी
ज्या वात्सल्यें द्रव न सुटतो कोणि ऐसा न लोकीं ६

हा! हा! माझी सुगुण सरिता चालली एकटी ही
बाळे! मागें मुरडुनि तरी एकदा ह्यांस[7] पाहीं
घो घो ऐशा नगवर तुझ्या निर्झरानुध्वनीनें[8] -
बोले भासे, अधिकचि गमे तेथ औदास्य तेणें. ७

आल्या प्रेमें मिळुनि तव ह्या दर्शनेच्छा धरून
झाल्या--भावि[9] स्मरुनि विरहा डेंकड्या फार खिन्न
कोणी तीरा पसरुनि तुझ्या स्वांग लबायमान
येती, कोणी बघति धरण्या त्वत्पथा आडवून ८

---

१ शूळाकार. २ पर्वताच्या तिर्यक् प्रदेशातून निघालेले सुळके. ३ कडे. ४ आच्छादित. ५ पांढऱ्या वर्णाचा. ६ "वाटे" असें पाठांतर. ७ पर्वत स्वतःस उद्देशून ह्मणतो. ह्यांस ह्मणजे मला मजकडे असा अर्थ. ८ प्रतिध्वनि. ९ पुढें होणारा.

त्यांचा होई विफल बघुनी यत्न ते हासतात.
वाटे चित्तीं कुटज अपुल्या--फुल्ल जे दीसतात
वृक्षीं शब्दा करुनि खग तत्खेद ते दावितातीं
अन्योन्या ह्या विसदृश[1] अशा नीचसद्वृत्तरीति[2] ९

येथें लीला विविध तुझिया निर्झराच्या[3] बघून,
कोंदे नादें स्थल सकल तच्छद्व तो आयकून,
भासे मातें ! वदसि अपुल्या हेंचें कीं तू मनाशीं
बालत्वाच्या सकलहि सुखा आठवोनी गिरीशीं. १०

" अहा इथुनिया सुटे जनकसत्पदाब्जाश्रय
तसा सक्रुप अतरे सुखद तो मला तच्छ्यें
घडेल न कधीं असा प्रियजनीं पुन्हा वास हा
जरी सहज शैशवीं मजसि लाभला तो पहा ११

करून बहु लालना मज नगें अहा ! पाळिलें
करून ममता किती शिशुपणांत संरक्षिलें
शिरीं भुंजशिरीं[6] कटीवारि कुतूहलें घेतलें
अहा ! सकल सौख्य तें मजसि आज दूरावलें १२

सुपुत्र तरु[7] धन्य ते त्वदुदरात घेवोनिया--
पित्या ! जनन राहती, क्षण न जाति सोडोनिया--
तुला, तुजसवें सुखा--सुख सदा पहा भोगिती
नगत्व तव धर्म तो ह्मणुनि त्या न उल्लघिती १३

---

१ उलट. २ नीच आणि सज्जन ह्यांच्या रीति. ३ प्रवाहाच्या. ४ पुढें सांगितलें आहे तेंच. ५ त्याचा कर (हात) ६ खांद्यावर. ७ तरु हेच तुझे [पर्वताचे] चांगले पुत्र. ८ हे बाबा पर्वता. ९ अचलत्व.

बरें पुरुष--जन्म तें सुचिर[1] तातसत्संगती
घडे, नच घडे तशी प्रिय असोन कन्येप्रती
वसेल जनकालयीं सतत कन्यका ती जरी
अकारणहि त्या जन प्रकट निंदिती ने तरी १४

अनत उपकार बा ! मम[2]--गिरीं तुझे जाहले
परी न लव मात्रही सुख पित्या ! तुला मी दिलें
अतीव अनुताप हा मम मनास संताप दे
बघेन कधिं हीं पुन्हा तव सुगात दिव्यें पदें १५

वनीं परिसरीं[3] तुझ्या पशु--विहगमीं ह्या द्रुमीं
यथेच्छ बहु खेळलें सतत आजपर्यंत मी
कशी ? जनपदस्थिती मज न रीतिही ठावकी
रुचोन सकलांस जी उचितमान्य हो लौकिकीं १६

तुझें परिसुनी असें वचन शैल तो बोलतो--
" न भी[4] धरिं सुते ! तुला परिस एक जें सांगतों
" जन त्रिविध हे असे, बहुविधा तशी तत्कृती[5]
" सुबुद्धि वरिं सत्पथा धरिं परोपकारीं मती " १७

पडे वरुनिया उडे जळ पुन्हा तुझें तें वरी
पुन्हा हळुच खालतीं पडुनि अद्रिपादांवरी
गमे-करुनि भक्तिनें पुनित तत्पदक्षालना
स्वकीय विमलें जलें, करिसि तू तया वदना १८

तिथून निघसी जरी नच परी तया सोडिसी
पुनः प्रणयनिर्भरें कवळुनी तया भेटसी

---

१ नेहमी. २ माझ्यावर-हे नदीचे उद्गार आहेत. ३ समीपभागीं. ४ भीति. ५ जनांची कृति.

अतीव ममता अशी स्वजनकीं तुझी पाहुन
गमे मज, तुला वृथा वदति शैलजा[1] जे जन १९

येथें तुझें सपुनि बाल्य माते ! । प्रारंभ होतो जणु यौवनातें
त्यो शैशवाची[3] उबगोन[4] वृत्ती । मुग्धा-स्थितीते[5] वरिते झरी ती २०
बाल्यासवें मूढपणा लयातें । संशुद्धता त्याजसवेंचि जाते
ज्ञानासवें कृत्रिमता शिरून । टाकी मना दूषित तें करून २१
औत्सुक्य लोलोत्सुक मानसातें तें प्रेमवृद्धीप्रतिही करीते
प्रीति. त्रपा, कल्प, विचार चित्तीं उद्वेग तैशी शिरतेहि भीती २२
बाल्येतरा[7] वृत्ति गमे धरावी । होई परी निश्चित तीं[8] न ठावी
मुग्धा तयें हो स्थिति जी मनाची । छायाच कीं ती मकरध्वजाची[10] २३
फेसाळुनीया[9] जल सर्व गेलें । प्रेमोद्गमें नैक तरंग आले
कल्लोल,[11] आवर्तेहि[12] त्यात होती । मुग्धा स्थिती ते तव दाविताती २४

ऐशी तुझी क्षुभित वृत्ति सुहृद्वियोगें,[13]
जी होय चंचलहि संशयिता[14]ऽनुरागें[15]

---

१ शैलजा हें पद श्लिष्ट आहे. शैल ह्मणजे पर्वत तो कठोर हृदयाचा (ज्याचें हृदय पाषाणानीं भरलेलें) अर्थात् त्याची कन्या ह्मणजे कठोर मनाची—दुसरा—शैलजा [ पार्वती ] ही आपल्या दक्षप्रजापति पित्याविषयीं प्रीतिपराङ्मुख होती, तोणे २ ... शैलजा ह्मणतात तें व्यर्थ--तूं ममताळू आहेस, हा भा[illegible]ताचें व वसतक[illegible]ल्या. ३ बाळपणाच्या. ४ टाकून. ५ बाल्य आणि तारुण्य [illegible] अवस्था. ६ सरल निःशंक स्वभाव. ७ बालवृत्तीहून निराळी. ८ वृत्त[illegible] सबब. ९ फेडावून—गोंधळून गेलेली. १० मदनाची. ११ लाटा. १२ भोंवरे. १३ प्रियजनांच्या वियोगानें. १४ साशक. १५ प्रीतीनें.

तीर्तें विवेक करुनी मनिं शांतवोनी
तूं चालसी निज गती पुढतीं धरोनी २५

तें धावणें दडदडा सुटलें इथून
ते खेळ बाळपणचेहि तसेच जाण
अंकावरी जननिच्या अथवा पित्याच्या,
स्वच्छंद तें विहरणें मधिं पादपांच्या. २६

आतां तुझा करुनि शोध अनेक धारा
चाले पुन. मिळवुनी सगळा पसारा
ते गण्डशैल[1] तुज तेविं शिला विशाला
येती पथांत सरिते ! जणु भेटण्याला २७

" स्वस्थान सोडुनि तुझी गमना[2] समर्थ[3]--
आलांत कां नसुन हो तरि दूर येथ ?
सौख्यें रहा नगवराजवळी पित्या त्या
द्या शर्म शांत सदया निज जन्मदात्या " २८

प्रेमें असें वदुनिया, परिरंभ द्याया
धाराकरा[5] पसरुनी. मग शांतवाया
त्या न्हाणिसी निज जलें, जननी ! मनातें
आनन्द ही कृति तुझी नयनास देते २९

जाता पढें क्रमून मार्ग बहुत्या ठेती--
पाषाण सान अडवे [4]
... तया सोडिसी

---

१ पर्वतावरून गडबडुनी त्यांच्या तळवटीं पडलेले मोठे दगड. २ जाण्याला. ३ समर्थ ह्या शब्दाशीं संबंध--समर्थ नसून असा अर्थ. ४ सख. ५ प्रवाह रूप धारा हेच हात.

आश्चर्य खेदहि तसा तुज हर्ष झाला
त्या पाहुनी चिमकुल्या नगबालकाला ३०

आलांत का? त्यजुनि येथवर स्वताता,
नेऊन कोण परतोन तुह्मास आला
घालील त्याजवळ, 'काय बरें असें हें'
जा मागुते जनक जों नच दूर आहे ३१

तीं अर्भकें न तव मान्य वचा करीती
मार्गीं तुझ्या सकल येउन बैसताती
झांकून तोय--वसनी धरिसी तयातें
तू स्वोदरांत, पुढतीं क्रमिसी पथातें ३२

तरु लता गिरिराज दरी शिला
मृग शिखी निजवत्सहि टाकिला
त्यजुन दूर वनाद्रुत निम्नगे!
जनपदस्थलिं ह्या शिरलीस गे! ३३

---

## प्रसंग तिसरा.

निर्जन अरण्य सोडून लोकवस्तीच्या प्रदेशात आल्यावर, तिचें स्वरूप; गती, स्थिति आणि शोभा ह्यांचें आणि तेथून सहज दृष्टीस पडणाऱ्या सातपुडा पर्वताचें व वसंतकालापूर्वी समीप भागीं असणाऱ्या तेथील वनस्थितीचें ह्यात थोडें बहुत दिग्दर्शन करून, अशा कालांतही केवळ नदीच्या पाण्यावरच होणाऱ्या नदीच्या पात्रांतील खरबूजवाड्या तरबूजवाड्या ह्यांचें ह्यांत थोडेसें वर्णन दिलें आहे.

श्लोक.

चला सुजन हो ! नमू सकल--मंगला--दायिनी
भरूनि नयनें बघू प्रथम [1]दृक्पथाऽल्हादिनी
त्यजून [2]जनकादिका [3]जनपदात ह्या पातली
[4]पुरीं [5]उपवनीं जिचीं उभयही तटें शोभलीं १

नमो [6]भवविमोचिनी ! तुज सुधा - [7]जल--स्यंदिनी !
नमो वन--[8]विहारिणी ! जनपदा--भि[9]संचारिणी !
[10]जनोपकृतिकारिणी ! [11]सकल--जीव--संजीवनी !
नमो--मति रमो तुझ्या सुगुण--वर्णनीं--[12]ह्लादिनी ! २

[13]भगीरथ--तपें जनीं प्रकट होय [14]मंदाकिनी
जनोद्धरण - कारणा परि तुझी झरी [15]पावनी
स्वयें प्रकटुनी जना सुखद लाभ दे आपुला
ह्मणोन जन हा सदा तव सुवर्णनीं [16]रतला ३

दिनें बहुत जाहलीं तुज न मी नदी ! भेटलों
प्रपंचअटवींत ह्या भटकता श्रमी जाहलों

---

१ दृष्टीला संतोष देणारी. २ पर्वत जो नदीचा जनक त्याला व तेथील स्थिरचराना. ३ लोकवस्तीच्या ठिकाणीं--देशांत. ४ नगरांनीं. ५ बागांनीं. ६ संसारबंधापासून सोडविणारी. ७ अमृताप्र० उदक वाहणारी. ८ वनांत क्रीडा करणारी. ९ जनपदांत संचार करणारी. १० लोकांवर उपकार करणारी. ११ सर्व जीवांचें संजीवन करणारी. १२ हे नदी ! ह्या दोन पद्यांत हीं सर्व तिचीं विशेषणें असून संबोधनें आहेत. १३ भगीरथाच्या तपःप्रभावानें १४ भागीरथी पृथ्वीवर आली अशी कथा आहे तिला उद्देशून हें ह्मटलें आहे. १५ पवित्र. १६ रमला.

क्षमा करिं, करीं धरीं, शरण दीन आलों तुला—
पवित्रतवदर्शनें सुकृत शांति लाभो मला ४

खचीत नच मीं नदी ! प्रथम ओळखीलें तुला
किती त्वरित गे ! तुझा प्रवह थोर हा जाहला
शरीरचि न त्यासवें गुणहि रम्यता वाढली
सुभव्य तनु यौवनें तव पहा कशी ? शोभली ५

पुरा विकट दुर्गमें[2] गिरिशिरें नभश्चुंबितें[3]
विशाल बहु खोल त्या भयदही दऱ्या गे ! जिथें—
पडे पवन चालतां सहज तोहि घोटाळुनी
भयंकर अशा स्थळीं निपट निर्जनीं काननीं ६

धडाधड उड्या कड्यावरुनि टाकुनी धावत
झरी तव तरंगिणी ! गिरि--गुहोदरीं गर्जत
कमी पथ जवें परी त्यजुनि रीति ते संप्रती
धरी दिसतसे इथें सरळ शांत मंदा गती ७

अशक्त तव शैशवीं तनु कृशा बहू धाकली
परी अंतर्टि ही न ती द्रुतगती तुवा टाकली
शरीर कृश अल्पही बल असून उल्लंघिला
गिरी, प्रवह येथ का? मज कळे न मंदावला ८

वनीं भटकतां श्रमें मज गमे बहू भागली
झरी क्षणभरी इथें ह्मणुनि ही तुझी थांबली
अशीच उचिता असे गति सतीस वा यौवनीं
गजेंद्रगति काय ही ह्मणुनि घेसि तू ह्लादिनी ! ९

१ मार्ग पूर्वी. २ जाण्यास कठीण. ३ आकाशात गेलेलीं. ४ केवळ. ५ नदी. ६ धाकटी. ७ धबधब्याचे ठिकाणीं. ८ चपल गती. ९ साध्वीला. १० गजगती.

पुढें पसरला दिसे ऋषिपुटाद्रि[1] हा उत्तरें[2]
नभीं दिसति उच्च तीं किति उभारलीं तैल्छिरें[3]
अनेक नग हे गमे मिळवुनी तव स्वागता
गिरींद्र[4] जणु पातला दिसतसे जसा त्वत्पिता[5] १०

किती सरळ वांकडे नग असे उभे राहती
किती मधुनि काढुनी शिर हळूच डोकाविती
किती धवल नील ते हरित वर्णही ते किती
अहा! तरुलतादिकीं पिहित रम्य जे भासती ११

कुठें दिसति उच्च ते भयद उग्र काळे कडे
कुठें मधुनि त्यावरी बिकट दुर्ग[6] दृष्टीं पडे
उभे कितिक खेटुनी बघति एकमेकांकडे
कुठें तुटुनि हो दरीमधुनि दोन दोहीकडे १२

यदा त्यजुनि चालले बहुत खेद ज्या वाटला
पिताच मम विंध्य तो म्हणुनि येथ कीं पातला
असें क्षणभरी तुला बघुनि वाटलें अंतरीं
तुझी स्थिर म्हणून ही चकित शांत कीं हो झरी १३

स्वतातसख[7] हा असें समजलें जरी गे! तुला
बघून जनकप्रिया[8] तुजसि हर्षही जाहला
तरी स्वपथ रोधुनी धरिल हाच शंका तुला
गमे, म्हणुनि येथ हा प्रवह काय मंदावला १४

---

१ सातपुडा पर्वत. २ उत्तरेस. ३ पर्वताचीं शिखरें. ४ पर्वत श्रेष्ठ. ५ तुझा जनक विंध्याचल. ६ किल्ले. ७ आपल्या बापाचा मित्र. ८ बापाच्या मित्राला.

पवेल जनता सुखा पथ धरीयल्या कोणता
घडेल जनिं ह्या कशा अचरणें दया मान्यता
गभीरहृदये[2]! हृदीं[3] वसुनि निश्चलें मानसें
विचार करिसी तुझ्या स्थितिवरून ऐसें दिसे १५

तुझ्या विहरती जली चपल मीन नाना गती
विलोल--नयना--वधू-नयन--विभ्रमा[4] दाविती
सुमद पवनें जलीं मृदुल वीचि[5] ज्या ऊठती
सरम्य युवतींचिया भ्रुकुटिच्यांचे[6] त्या आकृती १६

क्षण स्थिर दिसे, दिसे तव झरी क्षणें कांपिता
कधीं विमल शांतशी, कधिं तरगरोमांचितां[7]
कुठें सरळ चालली, करुनिया कुठें भोंवरा
फिरे गरगरा गमे शिरुनि भेदिते कीं धरा १७

कुठें विनयशालिनी प्रकुपिता कुठें जाहली
झरी अचल खिन्नशी रुसुनिया तुझी बैसली
दिसे, स्तिमितशी[8] कुठें चकित ती कुठें भासते
प्रसन्नवदना कुठें रमवि रम्य--मंद--स्मितें[9] १८

जरी तव झरी अशा विविध मुग्धलीला करी
असे विमल पूत ती तरि सबाह्य अभ्यंतरीं
कृतींत युवती सती मधुर[11] भाव त्या दाविती
परी दुरितवासना कधिं तया शिवेही न ती १९

---

१ लोक २ गभीर आहे हृदय जीचें [ हें संबोधन आहे. ] ३ डोहाचे जागीं. ४ चचल नेत्रांच्या स्त्रियांचें दृष्टि चाचल्य. ५ लाटा. ६ रागानें चढलेल्या भवयाच्या. ७ तरग हेंच रोमांच त्यानीं युक्त. ८ स्तब्ध. ९ मनोहर अशा मद हास्यानें. १० सुदर ११ मनोहरण करणारे.

सुशील, रुचिरत्व ही मधुरता, दया, सद्गुण
असून रमणीय तें विलसतें जिथें यौवन
धनप्रबलता सदा असुनि शांत राहे मन
पहा सकल हे कसे ? मिळति तेथ लोभें जन २०

विलोल नयना कृषीवलवधू[१] मृगाकानना
प्रभातसमयीं तुझ्या विमल न्यावया जीवना
मिळोनि निघती करीं[२] धरुनिया शिरीं घागरी
परस्पर कथोनिया सुखविती गुंजा[३] सुंदरी २१

असा स्वपथ बोलता हळु हळू तिहीं सारिला
परी न निज गोष्टिचा कथनभाग[४] तो संपला
तटानिकट त्या तुझ्या बसुनि बोलती अंतरीं
गमे समजुनी तुला कथिति दु ख मातेपरी २२

मुली चिमकुल्या करीं धरुनिया शिरीं ताबल्यो[५]
कशा दुडदुडा तुझ्या धरुनिया पथा धावल्या
जलांत शिरतां तुझें जळ हळूच हेलावतें
हसेंचि तुज ये असें बघुनिया मनीं वाटतें २३

सुरम्य तट तें तुझें सलिल—वैभवें शोभलें
इथेंच जन हे तुझ्या प्रयत[६]—दर्शनें जाहले
परोपकृतिहेतु गे! सुफल जाहले ह्या स्थलीं
तुझे, सकल पूर्ण तीं जनमनोगतें जाहलीं २४

अहा ! तुजशीं बोलतां पथहि काल हा लोटला
बराच, मज वाटतें शिशिर हा ऋतू पातला

---

१ शेतकऱ्यांच्या स्त्रिया. २ हातानीं. ३ गुज गोष्टी. ४ सांगण्या जोगा भाग ( कथानक ) ५ लहान लहान तपेल्या बटुकुली. ६ पवित्र.

दिसे नभ कसें पहा दिसतसे वनश्री तशी
सुरम्य गिरिचीं शिरें दिसति तीहि आता कशीं २५

पर्णे गळोनी सगळीं द्रुमाचीं । गेलीं तशी कोमलता लतांचीं
आता पहा शैशिर-वात वाहे । तो दु ख त्यातें बहु देत आहे २६
गाठोनि रानीं जणु तस्करानीं । कीं घेतलीं तद्वसनें हिरोनी
या कारणें दिग्वसना त्रपेनें । ते राहती नेसुनि खिन्न मौनें २७
किंवा गतश्री मिळण्या पुन्हा ते । उष्णीं उभे राहुनिया तपातें
एकाग्र चित्तीं धरुनी करीती । कोणी विनम्रा सरलाहि रीति २८
सौंदर्य जें कीं अवघ्या तनूचें । कीं एक तें साधन रम्यतेचें
जें मुख्य वा लक्षण वैभवाचें । गेलें गळोनी ह्मणुनी शिखींचें २९
ते वृंदें जाऊन नगोदरात । चिंता तयाची बसती करीत
पुन:पुन्हा ती गतवैभवाची । हो दुःखदा त्या स्मृति तापदाची ३०
जेथें पुरा वैसुनि दृक्पथाला । संतोषदा वाहिलि मेघमाला
केकारवें उत्सुक मानसानें । ये ये अशा ती परमादरानें ३१
छायाद्रुमीं बैसुनि ज्या प्रमोदें । केलें वना नादित आत्मशब्दें
जेथें प्रिया--मानस--रंजनाला । केलें पुरा सुंदर--नर्तनाला ३२
ती शैलशृंगें तरु तेच आता । देती तया खेद अहा ! पहातां
तारुण्य गेल्यावरि रूप जैसें । किंवा गत--श्री नृपतेज तैसें ३३
जेथोनिया स्वच्छ जलौघ होते । धो धो सदा वाहत हो! कडे ते
टाकोनिया पूर्व दयार्द्र भाव । तो दाविती उग्र निज स्वभाव ३४

---

१ शिशिर ऋतूतील वारा. २ त्याचीं झाडाचीं वस्त्रें. ३ दिशा हेंच वस्त्र. ४ लज्जेनें. ५ समुदाय. ६ ताप देणारी. ७ मोराचा शब्द. ८ छायेचे वृक्ष. ९ आपल्या शब्दानीं. १० प्रिया जी लाडोर तीचें मन रमविण्या करिता. ११ पूर्वी.

क्रोधानलें निर्झर शोषुनी ते । कीं जाळिती स्वांगरुहा[1] लतातें
कैशा पहा नीरस शुष्क झाल्या । खालीं कड्यानीं जणु लोटियेल्या २५
जेव्हां विपत्काल समीप येतो । प्रारंभ त्याचा कलहांत होतो
अन्योन्यवैरा जन जे करीती । ते आत्मनाशाप्रति हेतु होती २६
जेव्हां विपत्काल वनास आला । प्रारंभ तेथें कलहास झाला
तेणें कसे घोर अनर्थ झाले । प्रत्यक्ष वंशीं[2] बघ दावियेले २७
एकाच वंशांतुनि[3] जन्म घेती । एकाच भूमीवरि वाढताती
ज्यांची कृती एकचि एक रीती । एक स्वभावा सगळे धरीती २८
ज्यांच्या असे तें सरलत्व अंगीं । जे दीसती सर्व समानरंगी[4]
शोभा वना सुंदर फार देती । मंजूळ शद्बाप्रति ते करीती २९
जे एकमेकास सहाय होती । एकत्र सारे मिळुनी रहाती
त्यानींच आतां कलहा करोनी । उत्पन्न केला बघ हा वनाग्नि ४०
वसंत ज्या मित्र समीरणाला[5] । मानी अहा ! तोच सहाय झाला
दावानला[6] सर्व वनांत न्याया । वसंतवैरा[7] सजला कराया ४१
वाहोनि जो मंद सुगंध नेई । जनीं वना सौख्यद फार होई
घेऊन पृष्ठीं सजला[8] घनातें । जो सिंचिण्या नेइ अशा वनातें ४२
लताद्रुमाचा सुमभारभोक्ता । तो गंधलोभी करणार आतां
होळी अहा ! सुंदर काननाची । इच्छाच ही कीं ? जगदीश्वराची ४३
जेव्हां तुला तो अनुकूल होता । रे ! काल तेव्हां सखया ! वसंता !
वायू तुझा मित्र ह्मणून राही[9] । स्वंवीं[10] तुझ्या स्वागतलाभ घेई ४४

---

१ आपल्या अंगावर चढलेल्या. २ कळक वेळू ह्यांनीं. ३ कुळांत अथवा एकाच कळकापासून. ४ रंगानीं सारखे. ५ वायूला. ६ रानांतील वणवा. ७ वसंताचें शत्रुत्व. ८ जलानें भरलेल्या मेघाला. ९ रहात असे. १० तुझें घर जें वन तेथें.

कुंजांत गुंजारव भृंगराजी । पुष्पावरी बैसुनिया करी जी
वारून ती दूर निज प्रवाहें । रंगोनि हा तेथ खुशाल राहे ४५
उत्फुल्ल[1] त्या सुंदर पारिजातों[2] । वायो [2] कसा रे [2] स्मरसी न आतां
प्रेमें जयानें बहु पूर्व काळीं । त्वत्स्वागतीं ती सुमवृष्टि केली ४५
नेता करा सन्निध मानवा जे । संकोच पावे मनिं फार लाजे
मानी परी स्पर्श तुझा सुखाचा । केलास हा शेवट कां तियेचा[3] ४७
ज्या सुंदरा कोमल चारु गात्रा । रम्यालता पुष्पित–हास्य[4]–वक्त्रा
घेऊन त्याच्या भर सौरभाचा । केलास कां शेवट हा तयाचा ४८
उद्दामगंधा[5] रुचिरा सुवर्णा । वर्णें पहा लाजविते सुवर्णा[6]
जी त्या रसज्ञा रसिकाहि भृंगा । नेदी करूं स्पर्श कधीं निजांगा ४९
ऐशी अहा ! गंधफली[7] सती ते । स्पर्शें तुझ्या फुल्ल सदैव होते
वायो ! तिचा तेंवि तिच्या पित्याचा[8] । केलास का शेवट ह्यापरीचा ५०
वातें हरोनी द्रुमपल्लवातें । त्या दीधलें फेंकुनिया लतांतें
खालीं नगापासुनि सिद्ध झाला । दावानलें तो वन जाळण्याला ५१
पुरा शिवाच्या नयनानलानें[9] । होमीयला मित्र[10] अनंग ज्यानें
धरून दावानलरूप तोची[11] । रक्षा कराया सजला वनाची ५२
पाहून ऐसें अपुल्या मनांत । हा भीत[12] झाला बहु कीं वसंत
सोडोनि तेणें दिधलें वनाला । आला नदी ! तो तुझिया तटाला ५३

---

१ फुललेला. २ पारिजातक वृक्षाला. ३ लाजाळू वेलीचा. ४ फुलांनीं फुलणें हेंच ज्यांचें हास्य वदन अशा. ५ उद्दाम आहे गंध जीचा. ६ सोन्याला. ७ सोनचाप्याची कळी. ८ सोनचाप्याच्या झाडाचा. भ्रमर सोनचाप्याच्या फुलावर बसत नाहीं अशी प्रसिद्धि आहे. ९ शंकराच्या ललाटावरील नेत्रांतील अग्नीनें. १० मदन हा वसंताचा मित्र मानला आहे. ११ तोच नेत्राग्नी. १२ भ्याला.

भीतास धीरा- भय नित्य द्यावें । निराश्रिता आश्रय ह्याच भावें
प्रेमें तुवां त्या जननी वसता । वाटे दिला कीं मज ठाव आतां ५४
प्रचंडे–चडांशु--कर--प्रतापें । कसें तुझें सैकतं थोर तापे
न मृत्तिकेचा कणही मुळाशीं । न बिंदु वर्षे घन तो जलाशीं ५५
असा बहू दुस्तर काळ आला । लताद्रुमाच्या जरि जीवनाला
तरीं तुझें पीयुषतुल्य वारी । करी कृपा दु ख समग्र वारी ५६
अन्नाविना मातृपयेंचि बाळें । तीं वाढतीं बाळपणीं कृपाळे !
मेघोदकावीण तुझ्या जलानें । लताद्रुमीं हीं भरलीं पुलीनें ५७
तो थोर वारि--प्रवहा--भिमान । जो चालली नीट गति त्यजून
अत्युत्कटेच्छा प्रिय सगमाची । सोडूनिया आवडही मनाची ५८
प्रेमें त्रपा सोडुनि मान सारा । माता शिशूच्या स्तन–दुग्ध--धारा
घाली मुखीं, तू निज वारि तैशी । ते सोडिशी नेउनि तन्मुळाशी ५९
अहा ! किती कोमल रम्य पर्णीं । तीं शोभतीं चित्र अशा सुमांनीं
किती तरी सुंदर तीं फळें या । गे ! लागलीं सत्वर शोभवाया ६०
वसत देतो नव पल्लवातें । कोणास पुष्पेंहि फळें कुणांतें
फळें फुलें पल्लव एक काळीं । ऋतूत एका परि ह्यांस आलीं ६१
कैशी पहा आणियली तयांनीं वसतशोभा तुझिया पुलीनीं
दिसे तुझें पात्र विचित्र वर्णीं । आच्छादिलें सुदर गालिचांनीं ६२
तुझ्या जलें नैक करून धारा । व्यापीयला सैकतभाग सारा

---

१ धैर्य आणि अभय. २ प्रखरतर सूर्याच्या तीव्र किरणाच्या तापानें. ३ वळवट. ४ निवारण करी. ५ आईच्या अंगच्या दुधावरच. ६ प्रवाहाचा अभिमान. ७ लज्जा. ८ मुखात ह्या शब्दाचा संबंध शिशूच्या ह्या शब्दाकडे. ९ वृक्षलता ह्याच्या मुळाशीं. १० सुदर पानानीं. ११ विचित्र फुलांनीं. १२ लतादिकास, लतादिकानीं. १३ वाळवट.

वेलीस त्या मानुनिया स्वबाळें । मध्यें तयांच्या तव तोय खेळे ६३
पाहून ह्या त्वत्कृतिवैभवाला । आनंद झाला सकला जनाला
नाना पशू नैकविहगजाती । प्रेमें तटीं त्या तव सर्व येती ६४
गंगा सहस्त्रां वदनीं प्रियातें । रत्नाकरातें मिळण्यास जाते
जेथें तिथें सुंदर जी वनाची । शोभा दिसे कीं मज येथ तेची ६५
माते! सारित्संगमें—सुंदरातें । तुझ्या तटीच्या सुभंग स्थळांतें
तैसें दिसे जें पुर अग्रभागीं । दावी अह्मातें पुढल्या प्रसंगी ६६

केशव नारायण वैद्य.

---

## रजनी.

श्लोक.

व्योमीं हीरकखडसे झळकती सर्वत्र ताराग्रह,
शोभे मौक्तिकमालिकेपरि अहा ! नक्षत्रमाला कशी !
दुग्धाचा सुटला प्रवाह विलसे आकाशगंगा तशी,
ही रौप्यप्रभ चंद्रकोरहि जणों शुभ्रत्व देते नभा ! १

शांती, शीतलता, तशी मधुरता, सौंदर्य, शोभा खुले,
शालू नेसुनि पांढरा सुमधुर ज्योत्स्नाहि मोदें डुले;
हर्षें निर्भर होउनी हळुहळू गाइ चकोरीकुल,
उन्मत्तासम तान उच्च गगनीं फेकून दे बुल्बुल ! २

धावोनी अति शांतकालिं सरिता ओढेहि सर्व स्थलीं -
संगीतध्वनि विस्तरे, अनिलही त्यामाजि घाली भर.

---

१ जेथें भागीरथी सहस्त्र मुखानीं आपला प्रियकर जो सागर त्यास मिळते, त्या वनाची शोभा. २ नद्यांच्या संगमानें शोभणाऱ्या ह्याचा संबंध स्थलाकडे. ३ भाग्यवंत येथें प्रयत असा दुसरा पाठ घेऊन त्याचा अर्थ पवित्र असा केल्यासही होईल.

तारामंडल साथ देइ गगनीं, तेजस्तरंगोज्ज्वला
या आदर्शसमान सागरजलीं नाचे शशीची कला ! ३

रेंदाळकर.

## प्रभुघटना.

[ पद चाल --' जाऊ कामाला. ' ]

अद्भुत ही रचना । प्रभो ! बहु विचित्र तव घटना ॥
चराचराला चकित करितसे विश्वाची रचना ॥ करितसे० ॥
स्तब्ध होउनी सृष्टी करिते निशिदिनिं तव भजना ॥ करिते० ॥
वातप्रेरित वृक्षलतादिक डोलविती माना ॥ लता० ॥
उपजे भक्ती सर्वांना ॥ १ ॥

सुवंश सारे पवनपूर्ण ते घेति मधुर ताना ॥ पूर्ण ते० ॥
सरसावे हा पक्षिगणहि तव धन्यवाद--गाना ॥ गणहि० ॥
स्रोतनदादिक मजुळ नादें भरती दिग्सदना ॥ नादें० ॥
उपजे भक्ती सकलांना ॥ २ ॥

वर्णन करितां महाकवींची होते जड रसना ॥ खरोखर होते० ॥
आकाशींचा ज्योतिर्गण हा नित्य करी ध्याना ॥ गण हा० ॥
सुखकर वारे देति हुशारी करावया स्तवना ॥ हुशारी० ॥
करितों मीहि पदीं नमना ॥ ३ ॥

हिरवा शालू नेसुनि सृष्टी दिपवी मनुजांना ॥ सृष्टी० ॥
किरणें त्यावर पडुनि भासती अलंकार नाना ॥ भासती० ॥
भक्तिमहोत्सव काल रम्य हा वाटे सर्वांना ॥ रम्य० ॥
या हो ! सर्व करूं भजना ॥ ४ ॥

केशव विश्वनाथ फणसे.

## प्रतिज्ञा !

### श्लोक.

आणोनी भरती सुमंगल महाप्रेमार्णवातें अहा !
वर्षाया जणुं लाविते सुखघना केव्हा तशी जी पहा
वृत्ता सांगुनि दुष्ट हाय ! रडवी ! संग्रामगोष्टी करी !
शौर्यानें जणु नाचवी रगडवी दुष्टांहि दुःखा हरी ! १

हांसोनी रमणींहुनीहि करिते जी रंजवातें मुदें !
केव्हां जी उपदेशही करितसे कीं थक्क होणें बुधें !
स्थैर्या देउनि चित्त संस्कृत करी ! तेवीं मला घालवी !
पावित्र्योदक सिंचुनी विमलशा प्रेमांकुरा वाढवी ! २

पुष्पें युक्त लताच जी जगतिं या मांगल्य गंधा भरी !
केव्हां क्रीडतसे जशी द्युतियुता ती चंचला अंबरीं !
भेदोनी रविमंडलावरि वरी उड्डाण केव्हां करी !
एकांतीं जनसंगमींहि विहरे कांतेपरी सुंदरी ! ३

सौख्याच्या घटिका पहा फिरुनिया केव्हांहि दावीतसे
भावी चित्र तसेंचि चित्तफलकीं ही जाण रेखीतसे !
ऐसी ही '**कविता**' मदीय दयिता सोडूनि तीतें अतां
राहावें ह्मणुनी मला कथिसि तू हें शक्य ना तत्त्वतां ! ४

सर्वां जीवनदा प्रभा त्यजुनिया हा सूर्य राहे जरी
नक्षत्रेश सुरम्य तो प्रियतमा ज्योत्स्नावियोगा वरी !
अग्नी सोडुनियां शिखा बसतसे होऊनि तो शीतळ
वायूही फिरणें त्यजूनि बसतो केव्हां तरी निश्चळ ! ५

ऐशा गोष्टि सुदुर्घटा घडुनिही येतील कीं एकदा
माझें या **कवितेविना** निमिषही वास्तव्य नोहे कदां !

विद्युत्पातहि होउं दे ! मम शिरीं आकाश हें कोसळो !
होऊ दे वसुधा दुभग ! अथवा हा शैल कीं आदळो ! ६
झंजावात सुटो ! शरीर जड हें जावो उडोनी तुटो !
किंवा अंबुधिमाजि या विहरतां तारू तसें तें फुटो !
नाहीं कीं लवमात्र तें जल जिथें नेत्रांसि लावावया
ऐशा घोर वनात दैव ह्मणुनी लागेल राहावया ! ७
होवो हें परि चारुगात्रिकविताविश्लेषदु:खाप्रती
साहाया न समर्थ मी क्षणभरीं ! होवो कशी ही गती !
काळें आयु सरेल देह जड हा तत्वा मिळाला जरी
आत्मा हा अविनाशि गात तिजला ही मत्प्रतिज्ञा खरी ! ८

रामचंद्र विष्णू किणीकर.

## कारंज्या प्रत.

अंजनीगीत.

[ " जेथें हिरवळ फार बिलसते " केशवसुत. ]

रवि प्रकाशीं सुंदर दिससी;
आनंदानें बहु बागडसी;
प्रभात संध्या या समयासी;
चमकत तू असती. १

चंद्रकिरण तुज़ बहु शोभविती;
नानापरि ते तुजसह रमती;
उल्हासानें पानहि करिती;
मधुतर सलिलाचें. २

तुषार तव त्या ताराकिरणीं—
शुभ्र भासती दुग्धाहूनी;

मंजुळ पवनाच्या लहरींनीं,
डोलसि मौजेनें. ३

सदा सुखानें विहार करिसी;
नसे काळजी कांहीं तुजसी;
निर्भय चित्तें भूवरि वससी;
दैव थोर ह्मणुनी. ४

विश्रांती तुज लवही नाहीं;
उद्योगीं रत सतत पाहीं;
आनंदानें अखिलां पाहीं--
उत्सुकता धरुनी. ५

तुषार तव ते, खालुनि वरती--
जणुं भेटाया गगना जाती;
पुनरपि खालीं परतुनि येती
मायावश ह्मणुनी. ६

जलबिंदूची मौक्तिकमाला--
करुनी, प्रेमें अर्पिसि भूला;
प्रसन्न होउनि देते तुजला--
जीवन तव जल तें. ७

प्रतिक्षणीं तू जरि पालटसी,
सदा सारिखा प्रशांत दिससी
सौंदर्याचा निधीच गमसी;
विलोकितां तुजला. ८

नारायण केशव बेहेरे.

## वेदादेश.

श्लोक.

मातेसि आणि जनकाप्रति देव मान
त्या सद्गुरूसि अतिथीसहि जीव मान
आहेस तोंवरि नको करु गर्ह्य कर्म
निष्काम कर्मिं रम; सोडु नको स्वधर्म १

स्वाध्यायिं तत्प्रवचनीं रत हो निकाम
सोडूं नकोस कधिंही सुखसत्यवर्त्म
केव्हांहि देव–पितृकार्यिं चुकू नकोस
भूत्यर्थिं यत्न कर होउ नको दुराश २

श्रद्धालु भीलुक सुलज्जित होउनीया
दे दान पात्रिं गुरुतें धन आणुनीया
होईं सदार नच संतिततंतु तोडीं
सद्विप्र–गौरव करूनि यशास जोडीं ३

संदिग्ध होशिल जधीं निजकर्मवृत्तीं
जे धर्म, काम, गतलोभ, विमर्शवृत्ती
अक्रूर वर्तन जसे द्विज वागतील
तू त्याप्रती प्रगुण वाग धरूनि धीर ४

धूर्जटी.

---

## चिता.

पद.

गातात तारे, डुलतात वारे, चिता एकली नाचते फुरफुरे !
घनें लुप्त तारा, श्रमे स्तब्ध वारा परी शवकपालीं कढे रक्तधारा ! १

चढे तार चित्तीं, स्फुरे प्रेमतंत्री, तारासुराला स्वर लावियेला
तृप्ती परी ना, नभीं उच्च राहे, चिरसगमाला कवि हो! भुकेला ! २
इंदुकररज्जुला, उंच जाण्या धरी, चिता खेंचिते या मना भूतला
तुटे तार चित्तीं, बने मूक तंत्री, जगाला विटे तारका प्रेमला ! ३
तारकानर्तना, प्रेमसम्मेलना, मुग्धसुखसेवना निपजली वासना
विफळ पारि कामना, ठरुनि वच जल्पना, चिता बांधिते वन्हिपाशीं मना !
कल्पनासृष्टिची मूर्त प्रतिमा दिसे जीव परि हा फसे, दूर नेली
मूर्तता नष्टली, स्मृति हृदिं ठेविली, काव्यसुम प्रसवली, अमर जनिं जाहली
जी हृदीं कवळली कल्पनेची कळी, रूढि घेई बळी मातली स्वैरिणी
धूम्रचक्रावरी, जीव स्वारी करी, शाप टाकी चिता क्रूर ती वाघिणी ६
प्रेमवस्तूविना, जन्म झाला सुना, आग भडके मनीं, बाह्य वाटे फिकी
दुःखि जीवामुळें विश्व शोकीं बुडे मुर्दे नाचते राक्षसी नर्तकी ! ७
स्फुदतो, किंचळे, गिरिदऱ्या भटकतो, प्रियवियोगें पिसा वायु झाला
पुसुनि दव आसवें, तारकाक्रंदनीं, पदर नव धरणिचा चिंब झाला ८

गाबोत तारे, भद था क्षुब्ध वारे, दे हुंदके, बा! मृत विश्व सारें
क्षिती कोठुनी, निष्ठुरा नाचरी ही, चिता आपली सारखी फुरफुरे ! ९

श्रीधर.

---

## प्रेमावाचुनि सर्व घटे.

पद.

प्रेमावाचुनि सर्व घटे
संसाराची तार तुटे
आशेचें मधुगान सरे
गानांतिल तो हर्ष नुरे

चुंबन--कालीं
शीघ्र कपोलीं
लाली आली
चित्र न ऐसें जरी बठे
ससाराची तार तुटे. १

विरहाचा सपे काल
प्रेमाचा ये दुष्काळ
फेनाला ये पूर वहू
' दगडापेक्षा वीट मऊ '
हें विलोकिता
तेंही बघतां
नसेचि समता
संसाराचा कलश फुटे
प्रेमाबाचुनी सर्व घटे २

———— कृष्णानुज, कालेकर.

## सुभाषित.

### श्लोक.

स्वार्थाला त्यजुनी परार्थ झटती ते सर्व सर्वोत्तम;
स्वार्था साधुनिया परार्थ झटती ते सर्वही मध्यम;
स्वार्थासाठिं झुगारिती परहिता ते नीच रात्रिंचर;
जे वांया परसौख्यनाश करिती ते कोण मानूं नर ? १

———— विश्वनाथ नारायण रेडे.

# भिषग्विलास.

### आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी

### प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन ११ वर्षें पुरीं झालीं. ह्यांत यथावकाश, शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग, त्यांचें निदान व चिकित्सा, औषधी व त्यांचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयावर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते. या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारासच न होतां इतर सर्व सुशिक्षित व कुटुंबी माणसांना व्हावा, ह्मणून ह्यांतील माहिती सुलभ भाषेंत दिली जाते वार्षिक वर्गणी आगाऊ टपालह सह अवघी १॥ रु.

व्यवस्थापक 'भिषग्विलास' सोलापुर

---

# श्वासरिपु.

धापासून दमा, खोकला, कफ व त्यापासून ज्वर, अरुचि, निद्रानाश, मलावरोध, अपचनें वगैरे विकार होतात त्यावर तत्काळ गुण येतो. १ बा. ४१२ आ. ट. ४ आ.

एजंट—गोगटे आणि कंपनी मुंबई.

पत्ता—जी. डी. भावे वैद्य, पुणें.

## अनुक्रमणिका.


| पद्यसंख्या | जुलै १९१६ | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १०१ | तापी नदी. ( प्रसंग चवथा ) | १४५ |
| ११ | वेदांतील काव्य. | १६१ |
| ७ | कल्पनेच्या चुका ! | १६५ |
| २ | निशिगंधाचीं फुलें. | १६७ |
| ७ | वीर राम | १६८ |
| १२० | | |



**जन्माची भाकर मिळवा !** **जन्माचे कल्याण करून घ्या !!**

# धंदे शिक्षक.

ह्मणजेच इंडस्ट्रियल इंस्ट्रक्टर यांत श्रीमंतापासून गरिबापर्यंत नित्य व्यवहारांत लागणारे अनेक सर्वोपयोगी जिन्नस घरच्या घरीं तयार करून अल्प श्रमांत व थोड्या भांडवलांत ५-१० रुपये रोज प्राप्त करून घेतां येण्याजोगी मराठींत आजपर्यंत प्रसिद्ध न झालेली कला-हुन्नरांची गुप्त व खरी माहिती देणारा धंदे-शिक्षक आजच मागवून पैसा मिळवा ! उद्योगी व्हा !! किंमत ०८ व्ही० पी० ०१० खास यादी फुकट.

ज्ञानमित्रकर्ते, शनवार पेठ; पुणें-सिटी

# काव्यरत्नावली.

## अंक ७ वा.

## तापी नदी.

प्रसंग चवथा.

वसंतराकारजनी.

ह्याचा प्रारंभ वसंत ऋतूंतील चांदण्या रात्रीच्या वर्णनापासून केला असून ह्यांत ब्ऱ्हाणपूर शहराचें, तापी, पयोष्णी ( पूर्णा ) ह्या नद्यांच्या संगमांचें, आणि श्रीक्षेत्र चांगदेव ह्याचें वर्णन दिलें आहे.

श्लोक.

आनंद दे विमल पूर्ण शशिप्रकाश—
चित्तास, तेंवि तव रम्य तटप्रदेश
ती स्वच्छ शांत रजनी रजनीकराच्या[१]—
योगें[२] गमे प्रमुदिता प्रमदा[३] पतीच्या    १

तो हालवी उदक मंदसरत्प्रवाह[४]
दे मोद मोदकर शीतल गंधवाह[५]
तीं सैकतें[६] जलहि घाट तुझ्या तटाचे
वाटे अहा! निलयें[७] तें सुख कौतुकाचें    २

१ चंद्राच्या. २ संयोगानें. ३ स्त्री. ४ मंद वाऱ्याची झुळुक. ५ आनंद देणारा व सुगंध वाहून नेणारा शीतल वायु. ६ वाळवंटें. ७ स्थान. [ घर ]

घेऊन संघ निजसंगति तारकांचा
हा पातला पति तुझ्या सदनीं निशेचा[1]
हें स्वर्णदीसहित[2] रम्य तुझ्या जलांत
शोभे पहा गगन भव्य विशाल शांत ३

आकाश, तेज, पवनोदक, भूतधात्री
एकत्र येथ अपुल्या मिळवून पात्रीं[3]
वाटे प्रदर्शन तुवा मज मांडलें कीं
अन्यत्र दुर्लभ जयासम भूमिलोकीं[4] ४

तें बिंब चंचल जळीं शशिचें बघून
येतीं किती जलचरें जवळी, पळून—
जातीं त्वरें भिउनि दूर तया प्रभेनें
साल्हाद तीं विहरतीं किति कौतुकानें ५

उद्यान रम्य, तरु सुंदर, सुंदरा त्या—
झाल्या लता कुसुमिता[5] बहु तोष देत्या
तैसें दिसे नगर दुर्गहि जो समोर
पाहून मोद सुख विस्मय होय थोर ६

हा थोर दुर्ग तरि कोठुनि येथ आला
हीं मंदिरें सुखद सुंदर चंद्रशाला
वाडे प्रचंड नग[6]भव्यधनाढ्यहर्म्यें
तैशीं सुरम्य सदनें नृपराजकाम्यें[7] ७

---

१ रात्रीचा पति (चंद्र) २ आकाश गंगेसुद्धां. (संबंध गगनाकडे) ३ पात्रांत. ४ मृत्युलोकांत. ५ पुष्पिता. (फुललेल्या) ६ पर्वताकार दिसणारे वाडे व धनानीं भरलेलीं व्यापाराचीं घरें. ७ राजे लोकांनीं ही त्यांची इच्छा धरावी असे.

चिंती मनीं नगर सुंदर कोणतें हें
जें दृक्पथा दुरुनि तोषद होत आहे
कोणी ? कधीं ? वसविलें नृप येथ कोण ?
सांगून कोण ? मम कांम करील पूर्ण. ८

सोत्कंठ चित्त मम त्यात गढून गेलें
शोभावलोकनसुखीं[2] रममाण झालें
कानीं ध्वनी मधुर एक तशांत आला
ओढोनि नेइ तिकडे मम दृङ्मनाला[3] ९

तों पाहिली भरजरी दुकूला[4] कसून
जी उत्तरीय[5] पट घेइ शिरावरून
ये मंद मंद पद टाकित कामिनी ते
दे तोष दर्शन जिचें बहु मन्मनातें १०

ती हंसचारुगमना[6] तुझिया तटाला
येवोनिया करि[7], करीं अभिवंदनाला
सारी मुखाऽवरण[8]—सुंदर—उत्तरीया
प्रेमें तुझा प्रयंत--दर्शन--लाभ घ्याया[9] ११

चंद्रानना सुदंति[10] नूतन कंजनेत्रा[11]
बिंबाधरा[12] भगवती मृदु चारुगात्रा

१ इच्छा. २ ती शोभा पहाण्याच्या सुखात. ३ माझी दृष्टि आणि मन ह्यांना. ४ भरजरी रेशमी वस्त्र ( पितांबर नेसून ) ५ जिनें मस्तकावरून उत्तरीय वसन घेतलें आहे. ( मुख झाकून घेतलें आहे ) ६ हंसगामिनी. ७ हातानीं. ८ बुरखा. ९ तुझ्या पवित्र दर्शनाचा लाभ. १० सुंदर आहे दंतपंक्ति जिची. ११ नव्या कमलाप्रमाणें जिचे डोळे आहेत ती. १२ पिकलेल्या तोंडवळ्याप्रमाणें जिचे ओठ आहेत ती.

जी भव्य सुंदर सुधाकरकांतिमूर्ति
दे मोद कौतुक मना सुमनोहरा ती १२

ही कोण ? रम्यवनिता वनदेवता कीं ?
दिव्यांगना त्यजुनि ये दिवें मर्त्यलोकीं
किंवा जलामधुनि ही फणिराजबाळा—
आली, कळे न मजला तव दर्शनाला १३

किंवा करीं धरुनि ह्या वैरवर्णिनीतें
हा इंदु सुंदर--पयोनिधि--कन्यकेतें
त्वद्वृत्त सर्व कथिता, मुदिता जहाली
ती, दर्शनास तव काय ह्मणून आली १४

तों गर्जतात गगनीं जणु काय अब्द
होई जलामधुनि तेवि गभीर नाद
त्यांतून शब्द पुढचे श्रवणात आले
तेणें अतीव मम सद्गद चित्त झालें १५

ये ! ये ! अशी जवळ ये ! लडिवाळ—बाळे !
ये ! भेटलीस तनये ! मज दीर्घ काळें
आहेस कीं कुशल ? वृत्तहि सांग सर्व
संकोच लाज भय सोडुनि अन्यभाव १६

ऐकून ती मधुर मंगल मंजु वाणी
जें बोलली विमलसद्गुणरूपखाणी

---

१ चंद्राच्या तेजाची मूर्तिच अशी. २ स्वर्ग लोक. ३ नागकन्या. ४ सुंदरीला. ५ आपली बहीण लक्ष्मी तिला. ६ तुझी ( तापी नदीविषयीं ) ७ मेघ. ८ कानांत. ९ फारच. १० फारा दिवसांनीं. ११ संकोच भीति लाज, परकेपणा टाकून.

तें श्राव्यकाव्यरससाधन मन्मनाला--
वाटे, गमो प्रियमनोहर सज्जनाला १७

## बऱ्हाणपूर.

ख्रिस्ती शकाचीं शतकें जहालीं--
चौदा, तदा गोष्ट घडून आली
ईशप्रसादें नृपराजहस्तीं
' सस्थापना--येथ मदीय होती ' १८

ह्या खानदेशीं पहिला जहाला
नाशीरखानाभिध भूप त्याला
हें श्रेय मत्पालन--वर्धनाचें--
आहे, असो भद्र तया नृपाचें १९

त्या दीधलें जन्म मला पवित्र !
त्या पाळिलें तुर्कनृपें--सुपात्रें
माया, दया, प्रेम, कृपा नृपाल
लावी करी दे सुख तो सुशील २०

देऊन तूं जीवनें जीवनातें
कन्येस ह्या रक्षियलेस माते !

---

१ ऐकण्यास योग्य. २ रस हा जो काव्याचा मुख्य गुण त्याचें साधन. ३ मला वाटतें तसेंच सज्जनांस प्रिय वाटो. ४ इसवी सनाचीं १४०० वर्षे झाली तेव्हां. ५ राजश्रेष्ठाच्या हातानें माझी ( ह्या नगरीची ) येथें स्थापना झाली. ६ नाशीरखान नावाचा बादशाह. ७ माझ्या रक्षणाचें व वृद्धीचें. ८ त्याचें, बादशहाचें कल्याण असो. ९ फारच योग्य अशा त्या तुर्क बादशहानें. १० माया लावी, दया प्रेम कृपा करी. ११ सुस्वभाव. १२ पाणी हेंच मुख्य जीवन तें.

तैसेंच त्या वाढविलें पित्यानें
विद्या--कला--सद्गुण--पूर्ण--दानें २१
रम्या कला गायनवादनादि
आली मला सत्वर त्यांत सिद्धि
माझें करी सुस्वर मंजुगान
मोहून चित्ता सकलां प्रसन्न २२
निर्मूनिया सुंदर मीं दुकूलें
ह्या आर्यभूमीस विभूषवीलें
तैसेंच पोलंद इराण देशीं
देशांतरीं नैक दुज्या प्रदेशीं-- २३
भूपाल संपन्न धनाढ्य थोर
विद्वान् महापंडित शूर वीर
ज्या कामिनी सुंदर चारुशीला
सर्वांस त्या तुष्ट करावयाला २४
मीं पाठवी ह्या सदुपायनातें
निर्मूनिया सुंदर अंबरातें
सन्मानिती ते मज सान थोर
झाली अशी कीर्ति जगीं अपार २५
सद्बुद्धि कल्याणपथास लावी
नीती सदाचार सुखास देई

---

१ विद्या कला आणि सद्गुण यांचें दान करून. [शिकवून] २ रेशमी वस्त्रें ३ ह्या वस्त्राचे उत्तम नजराणे. ४ वस्त्रांते. ५ चांगली बुद्धि कल्याणाच्या मार्गाला लावते. नीति आणि सदाचार ह्यांपासून सुख, सतत प्रयत्नानें धन, ज्ञान आणि उद्योग ह्यापासून वैभव आणि कीर्ति वाढते.

नित्य प्रयत्नें धनसिद्धि जोडे
ज्ञानोधमें वैभव कीर्ति वाढे २६

पुण्यप्रतापी नृपवीर वीर
तो वाढवी मन्महिमा अपार
हा दुर्ग त्या सद्गुणराजराजें--
बांधीयला, जो अझुनी विराजे २७

ते राजवाडे धनपूर्ण हर्म्यें
दिव्यें तशीं तीं सदनें सुरम्यें
प्रासाद ईशस्तवनालयें तीं
कित्येक तेव्हां तरि येथ होतीं २८

आनंद--शांती--सुख--वैभवांत
धर्मार्थ कामार्जन--साधनांत
होती तदा काळ सुखें क्रमोनी
ही सर्व मान्या नृप राजधानी २९

वर्षें अशीं दोन शतें सुखांत
गेलीं सुहृत्सज्जन--संगतींत
नांदे महानंद सदा पुरांत
ख्याती जहाली सगळ्या जगांत ३०

ऐकून दिल्लीपति--भूपतीनें
प्रेमें वरीलें गुण सागरानें--

---

१ हा पुढें दिसत आहे तो किल्ला—त्या पुण्य प्रतापी नाशिरखानानें बांधला. २ धर्म, अर्थ, काम हे पुरुषार्थ संपादन करण्याच्या साधनांत. ३ राजनगरी. ४ दोनशें वर्षें. ५ दिल्लीपती अकबर बादशहानें.

मार्गें, असा सत्पति[1]लाभ झाला
तत्संगती काळ सुखांत गेला २१

संग्रामशूरें--नृपराजयानें
त्या राजकार्यी कुशल[2]--प्रवीणें
दिल्लीपतीनें[3] निज वैभवानें
प्रेमें मला वागविलें नयानें २२

झाला पुरा[4] ह्या न पुरा[5] नृपाल
तत्तुल्य सद्धर्म--विवेक--शील
तो आर्यभूचा नृप सार्वभौम
सतोषवी दे सकलांस शर्म[6] २३

सर्वांवरी प्रेम समान माया
ज्ञातीस[7] साऱ्या सम सौख्य द्याया
यत्ना करी तोच पिता प्रजेला
वाटे महाकाळ अहा! खळाला[8] २४

सन्मान, सत्ता, पुरुषार्थ, कीर्ति
संपादुनी दिव्य सुखात्मशांती
तो पावला भूपति[9] दिव्य लोक
झाले पुढें भूपति येथ नैक[10] २५

जलधिवलययुक्ता[11] एक[12] भू, भूपती ते
अगणित, निजपुण्यें भोगिती ह्या महीते

१ उत्तम पतीचा लाभ २ राजकारणांत चतुर व निष्णांत त्यानें. ३ दिल्लीपती अकबर बादशहानें. ४ पूर्वी ह्याच्या मागें. ५ ह्या नगराला. ६ सुख ७ सर्व जातीच्या लोकाना. ८ दुष्ट लोकाना. ९ अकबर बादशाह. १० अनेक. ११ समुद्रवलयांकित. १२ एक पृथ्वी.

नृपति बहुल तैसे जाहले आजवेरी[१]
सुखविति मज आता अग्लभौमाधिकारी ३६

अनुपम सुख मी ह्या मानुनी स्वस्थितींत
स्मरुनि मनिं परेशा काल होते क्रमीत
विपरित परि झालें दैव तें घाव घेई
वदवत मज नाहीं काय सांगू अगाई ! ३७

धड धड करि भारी जीवें—जीवीं[२] न राही
अवयव जड होती भ्रश बुद्धीस होई
थर थर तनु कांपे नेत्रवारी[३] वहातें
हृदय भरुनि येतें चित्त शोकीं बुडे तें ३८

स्मृतिहि मज तयाची[४] भीषणा मूर्ति दावी
बघुनि मिटति डोळे, अधता थोर येई
स्तिमित निमिष होतें, लोलही[५] बावरे[६] तें
स्थिर नच लव राही चित्त, उद्विग्न होतें ३९

सुविमल--धवलारें[७] मंदिरें इंदिरेचीं[८]
चमकति शिखरें तीं अंबरीं तुंग[९] ज्याचीं
जणु मणिकनकाचे कोश[१०] यक्षेश्वरांचे[११]
सकल मम अहा रे ! प्राण दैवा ! पुरीचे ४०

होतीं महार्ह[१२]—वसनें भरलीं जिच्यांत[१३]
भूषा[१४] अनर्घ्य मणिमंडित मुक्तयुक्त

---

१ आजपर्यंत. २ जीवांत जीव रहात नाहीं. ३ अश्रुजल. ४ त्या प्रसंगाची. ५ चंचल. ६ बावरल्यासारखें होतें ह्याचा संबंध चित्ताकडे. ७ चुनेगची घरें ८ लक्ष्मीची मंदिरेंच काय अशी. ९ उंच. १० खजिनें. ११ कुबेराचे. १२ बहुमोल वस्त्रें. १३ ज्या बाजार पेठेंत १४ अलंकार.

ती रौप्य[1]–हेम--मणिच्या क्रय विक्रयाची
' बाजारपेठ ' सुधनाढ्य जवाहिराची ४१
कोठून तेथ पडला न कळे हुताश
तो पेटला न कळला तरिही जनास
झाला समीरण तशात तया सहाय
सांगू अनर्थ मग तेथिल काय ! काय ! ४२
ज्वालामुखातुनि[2] अकस्मिक दाववन्ही[3]
येढी निघून मृगपक्षिकुलास रानीं
जाळी लता कुसुमिता तरु सान थोर
झाला भयंकर तसाच अनर्थ घोर ४३
ज्वाला प्रचंड निघती सदनामधून
गेलें तसें नगर सर्व धुरें भरून
ते थोर लोळ तुटुनी ज्वलितानलाचे[4]
जाळून भस्म करिती दुसऱ्या घरांचें ४४
विद्युल्लता कडकडे ध्वनि तेवि होती
ज्वाला अनेक गगनात धडाडताती
वाहे जवें पवनही जन भीत झाले
आर्तस्वरें पुर समग्र भरून गेलें ४५
धांवा अहो ! अनल हा शमवा, अझाला,--
काढा, पहा जवळ ही इकडून आला
हा काळ हाय ! करु काय उपाय देवा !
या वांचवा सदय हो ! तरि जीवें[5] धांवा ! ४६

---

१ रूपे सोनें रत्नें ह्याच्या देव घेवीची. २ ज्वालामुखी पर्वतांतून. ३ दावाग्नी. ४ पेटलेल्या अग्नीचे. ५ प्राण.

हा अंबे[1] ! हा जनक ! हा प्रिय बांधवांनो !
सन्मित्र हो ! सुहृद हो ! मम लाडक्यांनो वा
दैवा ! कसा प्रबल साधियलास दावा
बा ! धाव ! धाव ! करुणाघन देवदेवा ! ४७

तू धाव ! धांव ! जननी[2] ! पुरदेवते ! गे !
गे ! धांव पुण्यसरिते ! जल देइ वेगें
क्षोभू नको सकल[3] पावक पावका रे !
बा ! दीनवत्सल दयाघन संकटाऽरे ! ४८

सर्वस्व दग्ध बघुनी पडतात कोणी
आक्रोश थोर करिती हृदया पिटोनी
होती हताश, पडण्या ज्वलितानलांत[4]—
जाती, तया धरुनि तज्जन वारितात, ४९

गेलीं जळून बहु तीं धनपूर्ण हर्म्यें
वाडे कितीक सदनें मम देवकाम्यें[5]
चिन्हेंच जीं स्थिर पुरातन वैभवाचीं
होती मनोहर रमा सुषमा पुराची ५०

व्हावा नभातुनि भयंकर वज्रपात
केला तसाच अनलें जनवित्तघात
माझ्या पडून नगरीं अवचीत घाला
झाला क्षणांत जननी ! सगळा उन्हाळा ५१

---

१ आई, बाबा इत्यादि. २ हे माते ! नगरदेवते ३ सर्वांना पवित्र करणाऱ्या ! हे अग्नी. ४ पेटलेल्या अग्नींत. ५ देवांनीही ज्याची इच्छा करावी असीं.

सांगे बऱ्हाणपुरदेवि[1] अशा कथेते
दु:खाग्निदग्धहृदया नमुनी नदीतें
स्तंब्धाचला[2] सुनयना नयनांबु ढाळी
दु:खी नदीहि गमली क्षणमात्र झाली ५२

## तापीपयोष्णीसंगम.

### श्रीक्षेत्र चांगदेव.

श्लोक.

परिसुनी इतिहास असा मला । तुजहि खेद नदी! बहु वाटला
परि विवेकचि त्या सदुपाय हा । करुनि शांत मनीं दृढ तो रहा ५३
कवण? सांग असा जगतात या । अदय काळ जया नच ने लया!
सुचिर[3] सुस्थिति वैभव भोगितो । असुख दैन्य कदा नच पावतो ५४
स्वजन हे धन भूतिहि[4] वैभव । क्षणिक, नश्वर जीवित हा भव
सकल दुःखद जाण असे जनीं । सुख खरें जगदीश्वरकीर्तनीं ५५
वितथ[5] ह्या सुखसाधन कल्पना । फुकट आत्ममनोरथ कामना
विफलें युक्ति अहंकृति वल्गना । स्वबलबुद्धिपराक्रमगर्जना ५६
'बलवती[6] जगतीं भवितव्यता' । करिल कोण विभूविण अन्यथा
सतत चिंतिलिया करुणाघन । करिल तो निज दु:ख निवारण ५७
त्यज विषाद, हिला प्रिय भाषणीं । निववि शांतपणें हित बोधुनी
फिरुनि वाट तुझी बहु पाहुनी- । थकलि, **उष्णजला**[7] चल त्या वनीं ५८
गिरि दरींतुनि जाउन काननीं । भटकली, भ्रमली नगनंदिनी
जनपदीं फिरली बहु, लागला । नच तुझा परि शोध कुठें तिला ५९

---

१ बऱ्हाणपूर नगराची देवता. २ दु:खानें स्तब्ध व अचल. ३ चिरकाल. ४ संपत्ति ऐश्वर्य आणि वैभव. ५ खोट्या. ६ प्रबल. ७ पयोष्णी (पूर्णा) ही दोन्ही एकाच नदीचीं नांवें आहेत.

क्रमुनि थोर विदर्भहि देश ती । तुजसि ये मिळण्या सरिता सती
किति तुझ्या विरहें कृश जाहली । विकल खिन्नमना अति शीणली ६०
वसुनि कालिय तो यमुनान्हदीं । जल तिचें विषवत्स्वविषें कुधी--
कारि, तसेंच हिचें बघ जाहलें । मलिन नागविषें पथिं दूषिलें ६१
घडतसे सहवास जडा जसा । गुणहि तत्प्रकृतींत शिरे तसा
गुण तशी घडते सदसत्कृती । सुकृति तोषद, तापद दुष्कृती. ६२
विषतरंगसमूह जलावरी । उठति तापद ते बहुतापरी
कुजनसगतिचा परिणाम हा । असुख--कष्टद हो सुजना महा ६३
चिर वियोगयुता तनया जशी । बघुनिया जननी, हरिखे तशी
दुरुनि '**पूर्णजला**' बघुनी तुला । गहिवरे, नच धीर निघे तिला ६४
प्रमुदिता त्यजुनी निज गौरवा । करुनि हर्षभरें मधुरा रवा
पवनलोलगती जरि धांवली । द्रुतं, विलंबितें ती तुज भासली ६५
ह्मणुनि होउनि किंचित तू पुढें । वळसि काय नदी भगिनीकडे
बघुनि ती तव उत्सुकता दया । सरसरे उपगूहन द्यावया ६६
कर तिचा प्रणयें करिं घेतला । मृदुल वीचिकरें कुरवाळिला
पवन शीत सुगंधित घालुनी । सुखविलेस तिला स्वसुधेक्षणीं ६७
धरुनि हस्त असा पथ चालतां । परिसतां मुदिता गुज बोलता

---

१ वऱ्हाड प्रांत. २ कालिय नामा सर्प ३ यमुनेच्या डोहांत. ४ दुष्ट बुद्धीचा तो कालिया आपल्या विषानें यमुनेचें पाणी विषाप्रमाणें करून टाकी. ५ पयोष्णीचें. ६ कोठें कोठें तिच्यांत होत असलेल्या बचनागानें तीचें पाणी दूषित असतें. ७ ज्या जड शरीराला [ जलाला, पाण्याला ] डलयोः सावर्ण्यात्. ८ पाण्यावर बचनागाचे तरंग उठतात. ९ पूर्णानदी. १० त्वरेनें. ११ सावकाश मंद. १२ आलिंगन. १३ लाटारूप हातानें. १४ प्रेमामृत दृष्टीनें.

बिसरली शिरली न तुझ्या जळीं । झरि तिची[1] विलसे तेंव वेगळी ६८
मलिन पाडुर वर्ण तिचें[2] जळ । रुचिर नील दिसे तेंव निर्मळ
प्रवह तो युगपत्सुमनोहर[3] । नयनचित्त--सुधाकर सुदर[4] ६९
धरुनि किंचित मद नदी ! गती । पथ जरा क्रमुनी तिज संगती
सुखविलेस तिला कवटाळुनी । प्रवह घेउनिया निज जीवनीं ७०
विपुल सोज्ज्वल--निर्मल जीवन । तरुमृगद्विजशोभित तें वन
बघुनि पूत--मनोहर-सैकतें । मज तपोवन सुदर भासतें ७१
उपवनाहुनि[5] हें वन दक्पथा । सुखवि, अद्भुत त्याहुनि तत्कथा[6]
निववि जी भवताप निजें गुणें । अघभय श्रवणेंचि लयास ने ७२
विमल सगम हा हृदयंगम । बघुनि जन्हुसुता--यमुनेसम[7]
वसुनि येथ पवित्र तटावरी । सुचिर चांग[8] सुरार्य तपा करी ७३
सुतप सिद्ध जितेंद्रिय शोभला । षडरि सघ जयें निज जिंकिला
निगम शास्त्रकला सकला जया । असति सिद्धि वशा[9] हठयोगिया[10] ७४
चुकवुनी मरणाऽसुखभीतितें[11] । तनु चतुर्दशमर्त्यशरत्छतें[12]
निजबलें धरिलीस तपोधना ! । करुनि आश्रितदीन--जनाऽवना[13] ७५
धनिक, पडित, साधु, बली, गुणी । न करि जो उपकार दया जनीं
स्वहित ही नुमजे, मज तो नको । कृपण दांभिकशीर्षमणी[14] नको ७६
कृपण भूमिगतास्वधनावरी । मरुनि होउनि सर्प फणा करी

१ पूर्णा नदीची २ तुझी ( तापी नदीची ) ३ सयुक्त प्रवाह. ४ डोळे, मन याना आनंद देणारा चद्रच [ प्रवाह ] ५ बागेपेक्षां. ६ प्राचीन इतिहास. ७ गंगा आणि यमुना ह्यांच्या संगमासारखा. ८ चांगदेव श्रेष्ठ. ९ स्वाधीन. १० हटयोगी. ११ मरणदु खाचें भय. १२ मृत्यु लोकचीं चौदाशे वर्षें एकाच शरिरानें जीवत राहणें. १३ आश्रितांचें व दीनाचें रक्षण. १४ दाभिक शिरोमणी.

अधम रक्षक तक्षक जाहला । करुनि दुष्कृति दुर्गति पावला ७७
कु--गति शास्त्रकलाविदपाडिता । वदति, छात्रगणा नच बोधिता
द्विजसमधपुढें वध होउनी । अधम ते फिरती विजनीं वनीं ७८
जरि तुवा स्वसुखातचि मानिलें । सुख अपार तरी जनते दिलें
मति तुझी त्रिजगद्धितकारिणी । कृति तशी सुजनाचिरहर्षिणी ७९
सुभग मान्य दुजा मुनि **चांगया** ! । सम तुझा जगती नृपयोगिया !
न दिसला श्रवणींहि न ऐकिला । कलियुगीं नच भूवरि जाहला ८०
पदयुगें तव पावन हें स्थल । प्रयत संगम--पुण्यनदीजल
सकल वद्य, तयास महाशया ! । मम नमस्कृति ही तुज योगिया ! ८१
करुनि मन्द्र--रवें प्रणवध्वनी । वदुनि नाम मुखें तव, जीवनीं--
कारिति सज्जन मज्जन, शुद्धता । पवति चित्तशरीरपवित्रता ८२
श्रवण--मंगल--मंजुल--गायनीं । रमति हे जन ईश्वरकीर्तनीं
कारिति होम जपाध्ययना, कुणी । रत मुनीश्वरदर्शनपूजनीं ८३
सुरभिपंकज गंधवहाऽनिलें । भ्रमर पद्मसरावरि आणिले
जन पहा मुनिराज--महायशें । मुदित चित्त इथें मिळती तसे ८४
शुभद सत्पदा अभिवंदन । कारिति पूजन घेउनि दर्शन
सकल हर्षभरें गुण वर्णिती । जन मुखें मुनिनामचि गर्जती ८५
जय महाशय ! **चांगसुरा** ! वरा ! । निजजनार्तिहरा ! अभयंकरा !
सकरुणा ! शरणागतरक्षणा ! । तुज नमो सगुणा ! गुणपावना ! ८६

---

१ एक जातीचा सर्प. २ शिष्य वर्गाला न शिकविता गुप्त ठेवणाराला. ३ ब्रह्मसमध. ४ आत्मसुखात स्वत. सुख मानिलें तरी पुष्कळांना सुख दिलें. ५. राजयोग्या - चांगदेवा. ६ उच्च स्वरानें ओंकारोच्चार करून. ७ तझें तुझें [ तापी नदीचें नाव घेऊन. ] ८ चांगदेवाच्या दर्शन पूजनीं मग्न. ९ ज्यात पुष्कळ कमळें आहेत, तें सरोवर. १० चांगदेवाच्या यश कीर्ति श्रवणानें,

मन निमग्न सुखीं मम होउनी । नच निघे तवही जल तेथुनी
त्यजुनि हें स्थल मंगल जावया । मुदित चित्त तपोधन[1] योगिया ८७
अनिल[2] चित्तहि तें अवरोधुनी । जणु मुनिव्रत घेउनि योगिनी[3] ।
अचल शांतपणे तव बैसली । झरि, समाधिसुखीं मज भासली ८८
उदक दूरवर स्थिर राहिलें । जणु महासर[4] सुंदर शोभलें
सुखविसी जननेत्र मनोरमे! । परि महाभय खेद मला गमे ८९
जनपदा तुजपासुनि ह्या सदा । सकल धान्यधनादिक संपदा
सुखसमृद्धि नदी! बहु जोडती । जन--पशु--द्विजें[5] उन्नति पावती ९०
कवण? अन्य दयाघन ह्या जना । सुखद होइल? देउनि जीवनीं[6]
करिल? कोण कृपानिधि पावन । घडवुनी निज सस्तुत[7] दर्शन ९१
निजसुखा निजधर्मचि साधन । शुभद मंगल हो हितभाजन
समज--तो परधर्म भयप्रद । जरि तुला गमला वर सौख्यद ९२
निजशिरीं सुकपर्दि[8] महेश्वरें । सुरनदी धरिली गिरिजावरें
विहरली वसली सुख पावली । परि न तेथ चिरस्थिर राहिली ९३
निघुनि तेथुनि ती द्रुत धावली । हिमनगेंद्रशिरावरि[9] पातली
क्रमुनि तो गिरिदेश--महावनें । सुखवि तत्सजना निज जीवनें ९४
करि असा सुविचार मनीं नदी! । जनहितव्रत घे सदये! सुखी
धरुनि हा पथ ये! जननी! पुढें । जनपदासहि दे मज एवढें ९५
पवन-हालवि मंदगती जला । प्रवह सुस्मितसा[10] मज भासला
मधुर वीचिरवें जल चाललें । फल कृतस्तुतिचें[11] मज वाटलें ९६

---

१ श्रीचांगदेव योगी त्यांस. २ वायु (प्राण) ३ जिला योग साध्य झाला आहे ती. ४ मोठें सरोवर. ५ पक्षी. ६ पाणी. ७ पवित्र दर्शन. ८ उत्तम जटाजूटांत (बसविलें) ९ हिमालयाच्या शिखरावर. १० हसत मुख प्रसन्न असा. ११ आपण केलेल्या स्तुतीचे.

प्रथम वेग मग ध्वनि वाढला । तव महौघ[1] पुढें सरसावला
खडक[2] थोर अभंगहि फोडिले । उपल दूर जवें भिरकाविले ९७
पथ तयांतुनि काढुनि आपुला । प्रवह धावत गर्जत चालला
[3]अनिलवेगतरें विमलें जलें । किति तरी द्रुत हें स्थल दाविलें ९८
सरल [4]वृत्तदृढोन्नत खांब ते । ध्वज कमान किती बघ शोभते
दुरुनि भव्य तुझा गमला मला । जणु महोत्सव मंडप घातला ९९
चकविलें नयनीं परि ह्या मला । अहह! सेतु[5]चें मंडप भासला
बघ जिथें बहु बा[6]ष्परथावळी । जवळ ती दिसतेहि **भुसावळी** १००

धरून जन हा करीं गिरिशिरीं वनीं कंदरीं
प्रपात कटकीं नदी ! प्रयतसंगमीं ह्या पुरीं
प्रसाद ममता कृपा करुनि फार सांभाळिला
'प्रसंग चवथा' तुला नमुनि सज्जना अर्पिला १०१

केशव नारायण वैद्य.

## वेदांतील काव्य.

(ऋक्संहिता–अष्टक १ अध्याय ४ सूक्त ५० वें.)

ऋचा १ ली.

**उदु त्यं जातवेदसं देवं वहंति केतवः**
**दृशे विश्वाय सूर्यम्** १

श्लोक.

अहा ! उदय पावुनी तळपतो कसा सूर्य हा [१]
समस्तसदसत्क्रियांविषयिं एक साक्षी पहा !

१ मोठा प्रवाह. २ दगड. ३ वाऱ्याप्रमाणें जलद वाहणाऱ्या [पाण्यानें] ४ वाटोळे (गोल) भर भक्कम उंच असे खांब. ५ पूल. ६ पुष्कळ आगगाड्यांची ओळ. (पंक्ति)

जगा सहज लाभ [1]हो, अति पवित्र यद्दर्शनीं
ह्मणोनि इकडे तया किरण आणिती वाहुनी ! १

ऋचा २ री.

**अपत्ये तायवो यथा नक्षत्रायंत्यक्तुभिः**
**सूराय विश्वचक्षसे** २

श्लोक.

जो सर्वसाक्षी सविता उदेला । प्रकाश लोकांप्रति द्यावयाला !
तारे जणों त्यास भिऊनि गेले । निशेसवें चोर तसे पळाले ! २

ऋचा ३ री.

**अदृश्रमस्य केतवो विरश्मयो जनाँ अनु**
**भ्राजंतो अग्नयो यथा** ३

आर्या.

लोकीं प्रकाश पाडित येता ह्याचे पहा कसे किरण--
लखलखती ! का न ह्मणू " अग्निकणाचें करीति अनुकरण ! " ३

ऋचा ४ थी.

**तरणिर्विश्वदर्शतो ज्योतिष्कृदसि सूर्य**
**विश्वमाभासि रोचनम्** ४

आर्या.

तूं सुदरांत सुंदर ! अप्रतिहतगमन तूंच गा ! जगतीं
लोकीं प्रकाश पाडुनि उज्ज्वलता देसि ! त्यांस तूंच गती ४

ऋचा ५ वी.

**प्रत्यङ्देवानां विशः प्रत्यङ्ङुदेषि मानुषान्**
**प्रत्यङ्विश्वं स्वर्दृशे** ५

---

१ होवो.

आर्या.

तेजस्विताप्रतीती यावी यास्तव सुरांनरांपुढती,
किंबहुना सर्वांच्या पुढती तू चमकसी ! नयन दिपती ५

ऋचा ६ वी.

**येना पावकचक्षसा भुरण्यन्तं जनाँ अनु**
**त्वं वरुण पश्यसि** ६

श्लोक.

ज्यांच्या नांवीं विराजे अति विमल असा अर्थ कीं, ' दीप्तिमान ! '
ते सारे देव, खालीं करिति चमकत्या त्वत्प्रकाशात मान !
ह्यायोगें सूर्यदेवा ! जगदघहरणा ! लोकभारास वाही--
त्या विश्वा तू पहासी ! शरणहि वरुणा ! तूं अह्मां; अन्य नाहीं ६

ऋचा ७ वी.

**वि द्यामेषि रजस्पृथ्वहा मिमानो अक्तुभिः**
**पश्यञ्जन्मानि सूर्य** ७

श्लोक.

रात्रीची करुनि सुरेख मानयष्टी । मोजीसी दिवस सदा, परी न कष्टी
जीवांला बघत महारजःप्रदेश । वा सूर्या ! फिरसि तसा द्युलोकदेश ७

ऋचा ८ वी.

**सप्त त्वा हरितो रथे वहन्ति देव सूर्य**
**शोचिष्केशं विचक्षण** ८

सोनें तानुनि कीं बरे बनविले हे केश, सूर्या असें--
वाटे; त्वन्मुखमंडलीं चमकता शोभा अतर्क्या दिसे !

१ वाहते. २ मोजण्याची काठी.

देवा ! तू जगतीतला निरखिसी, हे कीरवर्णी[1] हरी[2]
वेगें सात, रथास वाहुनि तुला नेती त्रिलोकीवरी ! ८

ऋचा ९ वी.

**अयुक्त सप्त शुन्ध्युवः सूरो रथस्य नप्त्यः**
**ताभिर्याति स्वयुक्तिभिः ९**

जणू चिकटल्या अशा दिसलि सात घोड्या रथीं
सुखें धरिति जू शिरीं सरळ चालती ज्या पथीं
तयांस विनियोजुनी बसुनिया रथीं सूर्य हा
प्रयाण करितो जगद्धित करावयाला पहा ! ९

ऋचा १० वी.

**उद्वयं तमसस्परि ज्योतिष्पश्यंत उत्तरम्**
**देवं देवत्रा सूर्यमगन्मज्योतिरुत्तमम् १०**

जें अंधकारावरि गाजवील-। प्रभुत्व; सर्वोत्तम जें ठरेल
ज्योती असें शोधित शोधिता हा। कीं सूर्य उत्कृष्ट गमे अहाहा ! १०

ऋचा ११ वी.

**उद्यन्नद्य मित्रमह आरोहन्नुत्तरां दिवम्**
**हृद्रोगं मम सूर्य हरिमाणंच नाशय ११**

आर्या.

मित्रांस तोषदात्या ! उगवुनि चढ त्वरित अतरिक्षांत
कावीळ हृदयरोगहि सूर्या ! मम पळविं आज निमिषांत ११

---

१ पोपटी रंगाचे २ घोडे.

ऋचा १२ वी.

**शुकेषु मे हरिमाणं रोपणाकासु दध्मसि**
**अथो हारिद्रवेषु मे हरिमाणं निदध्मसि** १२

श्लोक.

देवा ! आज दया वळे मजवरी हृद्रोग माझा तरी
कीरांच्यांवरि घाल काविळहि ती त्या रोपणाकांवरी[२]
किंवा ती लखलाभ हो मम कशी कावीळ हारिद्रवा
मा कारुण्यघना ! त्वदाय करुणा आरोग्य दे मानवा १२

ऋचा १३ वी

**उदगादयमादित्यो विश्वेन सहसा सह**
**द्विषन्तं मह्यं रंधयन्मो अहं द्विषते रधम्** १३

सकल निजबलानें सज्ज आदित्य झाला
मजपुढति--रिपूला खेंचिताना उदेला
विमल तरल तेजें हा चकाके नभांत
खचित नच पडें मीं शत्रुच्या तावडींत ! १३

———— दत्तात्रेय तुकाराम पणशीकर.

## कल्पनेच्या चुका !

पद.

चालः— वधू ही वल्ली.

कल्पना केली । मनिं; परि ती लटकी ठरली ! धृ०

सुबक चांदवा नभ तें गमलें
शशिसूर्यहि ज्या दीप लटकले !

---

१ पोपटावर. २ एक जातीचे पक्षी.

दिक्प्रातीं या किरण फाकले—
निराशा झाली । हाय! ती पोकळी कळली ! १

दुरुनी पर्वत सुदर दिसला
सन्निध जावें वाटे मजला
महत्संकटें तो मज मिळला
अनुभवा आली । कल्पना खरी चुकलेली ! २

कमलासम जन पाहुनि सुमनें
कल्पित; हीं सत्सौगधानें
ाकित असतिल विश्वोद्यानें
भरूनी,--कसली? । येथेंहि निराशा झाली ! ३

बघुनि मनोहर भव्य मंदिरें
शिल्पकलेचीं तशीं गोपुरें
केलि कल्पना भूपागारें--
पिशाचें दिसलीं । त्यात सुखें नाचत असलीं ! ४

वयोमर्यादा शत वत्सर
भविष्यवादी सागे सत्वर
मृत्यू दावि तें क्षणभगुर
पाश तो घाली । प्राण्याला नेत अकालीं ! ५

जगांत ज्या ज्या वस्तू दिसल्या
प्रथम त्या चिर--स्थीरचि गमल्या
तत्क्षणिं कांहीं नाश पावल्या
प्रत्यया आली । जी खूण मनीं मी धरली ! ६

सर्व जगाची हीच स्थिती का?
सम तें अतर्बाह्य नसे का?

विषमता तरि दैविकही का ?
अशांला दिधली । मज कळेल कवण्या काळीं ! ७

गोविंदानुज मुरली.

## निशिगंधाचीं फुलें.

पद. [ चाल - अधेतनू वारुळीं० ]

विसरेन कसा तुवा दिलीं तीं निशिगंधाचीं फुलें,
लोभलें ज्यावर मन आपुलें ? ॥ ध्रु० ॥
जणुं शिंगें तीं शुद्र रुप्याचीं इवलालीं प्रीतिचीं,
ज्यामधीं अजब मोहनी तिची,
सूर मूक गीताचे त्यातुन निघती सौरभमिषें,
वायुलाहि ते लाविती पिसें;
हृदयी न कळत शिरुनी त्यांनीं केलीं दारें खुलीं,
आंत ये मूर्ति तुझी सोनुली;
प्रतिकार करिन तर होई तें शक्य न
जेधवां मूर्ति तव केली अवलोकन,
म्हणु कसा 'नको' घरिं चालुन येता धन !
चित्ततुच्या झोल्यावरती मूर्ति तुझी ही झुले
आशा--भीति--निराशामुळें. १
निशीथसमयीं विचारशयनीं पडलों मी एकला,
डोळा डोळयास न लागला,
अभ्रांचा पडदा पडला हेमंतनभावरी,
लपल्या सर्व अमरसुंदरी;
विकारतरुचीं नुसतीं खोडें उभीं, तयातुन कुठें
काढिती सूर घुबड धाकुटे;

तों सुगंध सुटला, आली मधुदेवता !
नवयौवनरस चहुंकडे वाहु लागतां
स्मित कारिती पक्षी, फुलें, झरे, तरु, लता !
चित्तगिरीच्या तख्तावर तव मूर्ति खुले निस्तुले,
उषेच्या सतेज किरणामुळें !

एम्. जुलिअन्.

## वीर राम.

पद [ चाल — सीते ! यासी चाल कि माळ. ]

वीर धनुर्धर क्षत्रिय कुलवान
मानिति मानचि प्राण १
वीरा सह्य न हो अपमान ॥ ध्रु० ॥
हरुनी नेतां रावण सीता
राम धरी धनु, बाण ॥ वीरा० ॥ २
पुच्छें जाळी लंका नगरी
वीर गडी हनुमान ॥ वीरा० ॥ ३
रावण मर्दुनि सोडवि जानकि
सीता पंचप्राण ॥ वीरा० ॥ ४
स्थापि बिभीषण राज्यावरती
जो कारि राम—ध्यान ॥ वीरा० ॥ ५
काळ--कृपाणहि भिववि न त्यातें
जो कारि राम--ध्यान ॥ वीरा० ॥ ६
भक्तिवीर जे त्यां न डरे भय
कारिता राम--ध्यान ॥ वीरा० ॥ ७

किरात.

# भिषग्विलास.

## आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी

## प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन ११ वर्षें पुरीं झालीं ह्यांत यथावकाश, शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग, त्याचें निदान व चिकित्सा, औषधी व त्याचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयावर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारासच न होता इतर सर्व सुशिक्षित व कुटुंबी माणसांना व्हावा, ह्मणून ह्यांतील माहिती सुलभ भाषेंत दिली जाते वार्षिक वर्गणी आगाऊ टपालह सह अवघी १॥ रु.

व्यवस्थापक 'भिषग्विलास' सोलापुर.

---

# श्वासरिपु.

ज्यापासून दमा, खोकला, कफ व त्यापासून ज्वर, अरुचि, निद्रानाश, मलावरोध, अपचनें वगैरे विकार होतात त्यावर तत्काळ गुण येतो १ बा. ॥ १२ आ. ट. ४ आ.

एजंट—गोगटे आणि कंपनी मुंबई.

पत्ता—जी. डी. भावे वैद्य, पुणें.

## अनुक्रमणिका.


| पद्यसंख्या | आगष्ट १९१६ | पृष्ठें |
|---|---|---|
| ८८ | तापी नदी. ( प्रसंग पांचवा ) | १६९ |
| ३ | शेवटचें मातृगीत ! | १८८ |
| ८ | संध्या-चित्र | १९० |
| ६ | सुभाषित | १९१ |
| १०५ | | |



'येत्या दीपवाळीपासून या मासिकास तिसरें वर्ष लागणार' !

आकार डेमी अष्टपत्री दरमहा २४ पृष्ठें.

# दैवज्ञ-प्रबोधिनी मासिक.

वार्षिक वर्गणी साधारण प्रत रु. १। व सुबक प्रत रु. २ फक्त.

सदरहु मासिकांत ज्ञातिविषयक व सार्वजनिक चर्चा येत असते तसेंच विद्वानांचे सामाजिक, नैतिक, औद्योगिक वगैरे विषयावर उपयुक्त लेख येत असून गोड कविता, मनोरंजक व बोधप्रद गोष्टी व ज्ञातीचें व इतर उपयुक्त वर्तमान टीकात्मक येत असतें. शिवाय पूर्णानंद हें सामाजिक नाटक क्रमशः दिलें जातें व प्रसंगानुसार चित्रेंहि येतात.

व्यवस्थापक, दै. प्रबोधिनी, ठाकुरद्वार, मुंबई नं० २.

# काव्यरत्नावली.

अंक ८ वा.

ग्रंथ संग्रहा

## तापी नदी.

### प्रसंग पांचवा.

ह्या प्रसंगांत भुसावळस्टेशन, श्री 'रामेश्वर' 'प्रकाशें' वगैरे क्षेत्रें, तापी-कांठचा सुपीक व सपाट प्रदेश, तिला मिळणाऱ्या नद्या, मनाला भीति व उद्वेग उत्पन्न करणारे हरिणखुरीचें रुक्ष व घोर अरण्य, तेथून पुढची नदीची सुंदर शोभा, इ. ह्याचें वर्णन आलें आहे. संगमस्थान जवळ आले असतां नदीच्या वृत्तीची झालेली चलबिचल पाहून तिच्या तत्कालिन पारिस्थितीचें वर्णन करून तिला त्या प्रसंगाला योग्य असें तिचें कर्तव्य सांगितलें आहे. अखेर सरित्सागरसंगमाच्या ह्या मंगल प्रसंगात प्रेमोद्गारांनीं प्रस्तुत काव्याचा उपसंहार केला आहे, व तें ह्या प्रसंगांत समाप्त झालें आहे.

## भुसावळी.

### श्लोक.

जय सुखदयाब्धे[1] ! त्वत्कृपा होय जेथें । धन--सुख-विभव-श्री नांदती पूर्ण तेथें
अघटित घटना हे कल्पनातीत सूत्र- । तव, नर जगदीशा ! कोण? जाणे विचित्र! १

सखल--उखर[2] होतें जेथ ओसाड रान
उटजयुत[3]--गतश्री एक खेडें लहान
उपवन--रमणीया[4] तेथ 'भूसावळी' ते
नृपपुरिसमें[5] आतां पाहतां तोष देते २

---

१ सुख देणाऱ्या दयासागरा. २ उच्च सखल. ३ झोंपड्यांनीं भरलेलें रुक्ष शोभारहित. ४ बागबगीच्यांनीं रमणीय दिसणारी. ५ राजनगरीप्रमाणें.

व्रत--गुण--कृति चित्तीं घेउनी सागराची
सुखद अखिल जीवां रीति जी सज्जनांची
निज पथ, गति, मान, स्वैरलीला नदी ! तूं--
त्यजुनि, धरिसि येथें लोककल्याणहेतू. ३

प्रबलहि परि होते नागिणी मुग्ध मंत्रें
तशि तव जलधारा कोंडिली बाष्पयंत्रें
चढुनि सरसरा ती--होय उत्तुंग धामीं--
स्थिर, चपल असोनी--निम्नगा ऊर्ध्वगामी ४

जलधि जलदरूपें वेधुनीया नभीं तो
विपुल जल जगा ह्या देउनी तोषवीतो
स्थिर चर तरु वेली पूर्ण वापी तडाग
भरुनि करिसि तूंही हा तसा भूमिभाग ५

तव उल्मुदिता ही रंगभू रम्य दावी
सुबक तरुलतांची काय शोभा वदावी ?

---

१ समुद्राचे गुण कृति आणि व्रत लक्षांत घेऊन. २ आपल्या प्रवाहाचा मार्ग, त्याचा वेग इत्यादि यांचा अभिमान आणि स्वच्छंद लीला सोडून ह्या ठिकाणीं केवळ लोककल्याणाचाच हेतु धरतेस. ३ मोहित स्तब्ध गुंग. ४ मंत्रयोगानें. ५ ओढून घेतली. ६ वाफेच्या यंत्रानें. ७ ती जलधारा. ८ उंच ठिकाणीं. ९ चपल असून स्थिर व निम्नगा (खोल प्रदेशाकडे वाहणारी) असून उर्ध्वगामी (वर चढणारी) अशी झाली. १० तशी तूंही भुसावळीची जमीन तेथील विहरी वगैरे पाण्यानें भरितेस. ११ तुझ्या (तापीच्या) पाण्यानें संतुष्ट झालेली. १२ रंगभूमी.

जणु तरुनर--नारी कीं लता ह्या [1]सुपात्रा
धरुनि मनुजवेषा दाविती [2]तच्चरित्रा ६

बघ तरु--रुचिरांगीं वेंघली कौतुकानें
मृदुल तनुलता [3]तत्प्रश्रयालिंगनानें
अभिमत वरलाभें शोभली, तुष्ट झाली
विकसित सुममाला नाथकंठांत घाली ७

घडुनि तरुलतेचा योग्य हा योग आला
सुम--फल--सुखदाता तो [4]ऋतु प्राप्त झाला
अनुपम अनुकंपा ईश्वरें त्यात केली
सुफलित तरुवल्ली ह्या जगीं धन्य झाली ८

किति तरि निज बाळें तान्हुलीं ह्या लतेंनें
लपविलि ममतेनें झांकुनी पल्लवानें
सुखकर तरुशाखीं बैसलीं हीं दडून
अधर किति लतागा लोंबताती धरून ९

तरुवरि चढतांना ही दुजी कोमलांगी
पसरलि तरुमूलीं अर्ध ह्या भूमिभागीं
उचलुनि तरु घेतां कौतुकें हीस अंकीं
सुचपल जणु बाला भूवरी अंग टाकी १०

मृदु रुचिर लतांची पाहुनी अंगकांती
तरुनर भुलला हा, मोहिल्या [6]त्याहि चित्तीं

---

१ येथील वृक्ष पुरुषांचा व ह्या सुंदर लता स्त्रियांचा वेष घेऊन. २ मनुष्यांच्या संसारांतील चरित्रें दाखवितात. ३ त्याच्या प्रेमालिंगनानें. ४ वसंत ऋतु. ५ दुसरी वेल. ६ त्या लता.

प्रणयमदभरानें वेढिती त्या तयाला
परि तरु सुखलोभें शुष्क सबद्ध[1] झाला ११
धनयुवतिसुखाचा लोभ हा लोभवीतो
परि अति परिणामीं हेतु दुःखास होतो
स्वपरबलगुणा जें शक्य तेंची करावें
सुकर सुखविपाकी कार्य हातीं धरावें १२
प्रिय सतत समर्थें आश्रितांचें करावें
स्वतनुधनबलें त्या[2] रक्षुनी तोषवावें
उपकृति चिर, चित्तीं आश्रितीं दातयाची
स्मरुनि सुकृत कीर्ती वाढवावी तयाची १३
गतरसतनुशुष्कें[3] ह्या दिला मंडपानें
सरस मृदु लतांना आसरा प्रेमधीनें[4]
वरुनि सति तयांही[5] शोभती शोभवीती
सुखद पतिस त्याच्या आश्रितां फार होती १४
उपवर जरि झाल्या, हीनदैवें न झाला
अभिमतपतिलाभ प्राप्त तो ह्या लतांला
ह्मणुनि पडति खिन्ना भूवरी चारुगात्री
धरुनि हृदिं बुझावी माय त्या भूतधात्री[6] १५
कटिवरि दुसऱ्यांच्या बालकें हिंडतात
बसुनि, चरणपगू धांवती ते रथांत
कुसुमतरुलताच्या ह्या तशा सान जाती
फिरति बसुनि कुंड्यातून, शोभा पहा ती १६

---

१ तो तरु जखडून शुष्क झाला. २ आश्रिताला. ३ नीरस व शुष्क अशा मांडवानें. ४ प्रेमबुद्धीनें ५ त्या तशा मांडवाला. ६ भूमाता पृथ्वी.

धवल—हरित--पीताऽऽरक्त—नील--प्रसूनीं
फलभरनत कोणी शोभती पल्लवांनीं
सरल कुटिल उंच स्थूल कोणी कृशांगी
गगनगत कुणीं ह्या क्रीडती भूमिभागीं १७

सुखद पवन वाहे, डोलती वृक्षवेली
शुभ रुचिर सुमीं ही भूषिता भूमि झाली
मधु—सुमरसपानें तुष्ट गुंजारवानें
भ्रमर, पिकहि गाती त्वद्गुणा कूजितानें १८

प्रखरतर--निदाघ--श्रांत—तप्तांस वारि[1]
करुनि तव उदारे ! शांत, खेदा निवारी
सघन--विटपछाया--शीत--मंदानिलें तें
सुख बहु पथिकांना ह्या स्थलीं प्राप्त होतें १९

विमल रुचिर हर्म्यें, मंदिरें, नर्मशाळा,
पैद--रथ--पथ, सेतू, धर्मशाळा विशाळा
दिसति मधुनि नाना शिल्पशाळा, दुकानें
सतत चालत यंत्रें थोर ते कारखाने २०

अचल—शुभ—मनोज्ञ—स्तंभ, नाना निशाणें
विलसति मधुनी त्या दीपनैकाक्षयाणे
निशिदिनिं मनुजाच्या थोर कोलाहलांनीं
भरुनि गजबजे, हें स्थान शोभे रथांनीं २१

अरुणरविरथाची दिव्यभा सुप्रभातीं—
बघुनि, उठुनि जीव स्वोद्यमा लागताती

---

१ उदक पाणी [तुझें] २ क्रीडाभुवनें. ३ पाय मार्ग—गाडी रस्ते पूल. ४ यंत्रानें चालणारे कारखानें. ५ ह्याच मंगल आरत्या.

जन अनलरथाच्या[1] दर्शनें तेवि आले
रथपथसदनीं[2] ते सर्व एकत्र झाले २२
घण घण घण घंटा वाजली, शीळ झाली
दड दड दड गाडी तेथ येऊन ठेली
कळविति रथदास[3] स्वाऽऽरवें[4] अध्वगांतें[5]
उतरुनि सुख घ्याया पात्र **भूसावळीतें** २३
तरुण जरठ बाल प्रौढ संपन्न कोणी
प्रमुदितहि दरिद्री दीन उद्विग्न कोणी
मिळति जन इथें हे देश देशांतरींचे
प्रकृति गुण तसेची वर्णही भिन्न ज्यांचे २४
उतरति बहु ऐसे त्या रथांतून कोणी
बसति लगबगीनें अन्य तेथें चढोनी
प्रिय–सुहृद्–जनाचा शोध कोणी करीती
निज जडभर[6] घ्याया भारवाहा[7] वहाती २५
पुसति कथिति देती एकमेकां निरोप
निघति किति तदा तत्प्रेमपूर्ण–प्रलाप
करुनि नमन आशिर्वाद देऊन कोणी
सुखविति ममतेच्या चुंबनाऽलिंगनांनीं २६
धरुनि धन सुखाचा लोभ चित्तीं असूया[8]
पिशुन[9] छळिति कोणी मूढ, दीना जना या
परि सुजन महात्मे जे दयावंत चित्तीं
सरळ सुपथ त्यांते दाउनी रक्षिताती २७

१ आगगाडीच्या. २ स्टेशनावर. ३ आगगाडीवरील नौकर. ४ मोठ्यानें ओरडून. ५ उतारूला. ६ आपलें ओझें. ७ हमाल. ८ मत्सर हेवा. ९ दुर्जन दुष्ट.

फिरति किति मजेनें एकटे येथ लोक
स्वसखशिशु सवे ते घेउनीही अनेक
रथ--पथ--पथिकाची मौज, शोभा स्थलाची
बघुनि मुदित होती भव्य **भूसावळीची** २८

करिं[1] धरुनि सखीचा चालता दिव्यपाणी[2]
युव मृदु वचनीं हा रंजवी तीस कोणी
मधुप[3] नयन त्याचे लुब्ध कांतामुखाब्जीं
फिरुनि, गमतसे ते घालती काय रुंजी[4] २९

कवण तरि सुशीला[5] भीतएणीदशा[6] ही
चकित मनिं अशी कां घाबरे? काय पाही?
लगबग तिस आला तेथ शोधीत कोण?
नरवर[7], बहु हर्षे जीस ती ज्या बघून ३०

स्तिमित निमिष झाली हासली ती कपोलीं
निजनयननिपातें त्या सुधास्नान घाली
हरुनि विरहतापा तोषवीती पतीला
सजल जशि मयूरा दर्शनें मेघमाला ३१

प्रणय--विनय--लज्जानंद--सशुद्ध--मूर्ति
बघुनि पति सतीची होय संतुष्ट चित्तीं
शुचि सुखद असें तें प्रेम सौजन्य पूर्ण
विबुधहि मनिं होती पाहुनी सुप्रसन्न ३२

---

१ हातांत. २ सुंदर हात. ३ त्याचे नेत्र हेच भ्रमर. ४ गुंजारव. ५ साध्वी, सुस्वभावाची. ६ भ्यालेल्या हरिणीप्रमाणें. ७ पुरुष श्रेष्ठ ( जो तिला व जी त्याला पाहून आनंदित झाली. )

अनल--रथ--पथाचे नैक फाटे इथोनी
फुटती, पुरविसी त्या तूचि यंत्रास पाणी
उपवननगरश्री रम्य भूसावळीते--
बहु निज[1]--जल--दानें आणियेलीस माते! २३

## श्रीरामेश्वर प्रकाशें वगैरे क्षेत्रें.

श्लोक. ( पृथ्वीवृत्त. )

तुझें जनहिताकडे जल असें बहू वेंचलें
परी न पडलें उणें, दिसतसे दुणें वाढलें
अ[2]पूर्व तव वाटतो प्रवह ' भारती कोश ' तो
कधीं क्षय न, सद्व्ययें सतत वृद्धि जो पावतो २४
सु[3]सप्तपुटशैलजा तुज पथीं क्रमें भेटल्या
सुहास्यवदना मुदें मिळुनिया तुला चालल्या
तवाऽगमन पाहुनी स्वमनिं सह्य[4] संतोषला
तुझ्या उ[5]दधिसंगमीं अ[6]चलराज तो राहिला २५
तैं[7]या ह्मणति तत्[8]सुता, बघुनिया अह्मा कौतुकें--
सदैव जरि तोषता, अधिक आज का ? हें निकें--
वदा, गिरि वदे भैव[9]प्रियतमोत्तमा शैल[10]जा
सख्यासहित ये दिसे उदधिसंगमा विंध्य[11]जा २६

---

१ आपल्या पाण्यानें भुसावळास रम्य शोभा आणली २ जो भारती कोश ( वाग्देवीचें भांडार ) योग्य प्रकारें त्याचा खर्च केला असता कमी न होता अधिक वाढतो. तसा तुझा प्रवाह मला अपूर्व वाटतो. ३ सातपुडा पर्वतापासून निघणाऱ्या नद्या. ४ सह्याद्रि पर्वत. ५ समुद्रसंगमाजवळ ६ पर्वत श्रेष्ठ. ७ त्या सह्याद्रीला. ८ त्याच्या कन्या नद्या. ९ तुमची अत्यंत प्रिय मैत्रिण. १० नदी. ११ विंध्याद्रि कन्या. [ तापी नदी ]

असें परिसुनी निंवे पुसुनि त्या पित्या नंदिनी[2]
तुझी धरुनि धांवली प्रबल--सगमार्ती[3] मनीं--
सवेग ' **गिरणा** नदी ' मिळवुनी सख्या सुंदरी
कशी तुजसि भेटली द्रुत, पवित्र **रामेश्वरीं** ३७

दिसे निबिड उच्च तें वन लताद्रुमीं दाटलें
तिहींकडुन वेढिलें स्थल नदीजलें शोभलें
' पुरा दशरथात्मजप्रभु करी इथें याग तो '
पुरातन कथा अशी जनमुखातुनी ऐकतों ३८

पवित्रशुभसंगमस्थित दयाघना पावना !--
तुह्मास रघुनंदना ! सहित जानकी लक्ष्मणा !
असो नमन दर्शनें तुमचिया प्रसादें नवा--
प्रमोद गुणगायनीं गमतसे प्रभो ! केशवा ३९

जलप्रवह दांडगे धडधडा पुढें धांवती
त्यजून विनयक्रमा तव जलीं घुसो पाहती
परी फिरविले तुवां परततां पथीं फोडिती
सुपीक नवभू कुठें निजजलेंचि उत्पादिती ४०

---

१ तात सह्याद्रि त्याला. २ मुलगी ( नदी ) ३ तुझ्या भेटीची उत्कट इच्छा धरून. ४ श्रीरामेश्वर क्षेत्राजवळ [ तापी आणि गिरणा ह्यांच्या संगमावर दोन्ही नद्यांच्या मध्यें हें सुंदर पवित्र स्थान आहे; त्याच्या उत्तर बाजूनें तापी नदी वाहते व सह्यकन्या गिरणा नदी येथपर्यंत पूर्वेकडे वहात असून ह्या ठिकाणीं पश्चिमवाहिनी होऊन ह्या स्थलाच्या दक्षिणेकडून पश्चिम बाजूनें पुन उत्तरेस वळून तापी नदीला मिळते. ५ पिकाऊ जमीन आपल्या पाण्यानें कोठें फोडतात व कोठें नव भू ( नवीन जमीन ) उत्पन्न करितात. [ पाण्यानें नवीन गाळ बसून ]

सपाट रमणीय हा सुखद गे ! जना भासतो
प्रदेश, तव पावन प्रवह ज्यातुनी वाहतो.
वसे सगिरिजामहेश्वर[1] जिथें--' प्रकाशें[2] ' असे
स्थल प्रथित मगलप्रद पुढें पहा हें दिसे ४१

नमोस्तु--गिरिजावरा ! शशिकपर्दगंगाधरा !
तुझा[3] सकलमंगले ! नतजनीं प्रसादा करा
वरा[4] सगुणसागरा प्रियकरास रत्नाकरा--
' वरूनि सरितां[5] सुखीं चिर वसो, अशा द्या वरा ४२

पुढें गहन लागतें वन, वनप्रदेशीं तया
निषाद[6] वसती कुठें ह्मणति मावचे ते जया
वनौकस[7] न पीडिती परि कधींहि कोणास ते.
हवा कठिण त्याहुनी उदक तेथचें बाधतें ४३

सुशीत[8] मधुरा परी असति दूषिता जीवनीं.
नद्यास वदतात त्या ह्मणुनि ' सर्पिणी ' ' विंचिणी '
अशाहि, किति सोज्ज्वला मिळुनिया तुला चालला
प्रवाह वनवैभवें द्रुमपशुद्विजीं शोभला-- ४४
परी द्रुतगती पुढें तव दिसे जवें धावलें—
सलीलजल, पात्रही असुनि भव्य सकोचलें,

---

१ पार्वतीसह श्रीशकर. २ प्रकाशें नावाचें क्षेत्र. ३ देवी पार्वती. ४ हीं सर्व वरा ( पतीला ) ह्या पदाचीं विशेषणें. ५ तापी नदी. ६ भिल्ल, ज्याना मावचे ह्मणतात ते. ७ रानटी जगली. ८ थंड व गोड खरें पण ज्याचे पाण्यात विकार करण्याचा दोष आहे ह्मणून त्या नद्यांना सर्पिणी विंचिणी असें ह्मणतात.

निनादं फिरला, तुझी फिरलि पूर्ण शोभा सती!
क्षणांत तरि कां? अशी उलट दाविसी[2] हे स्थिती ४५

## हरिणखुरी.

### श्लोक.

दिसे न तव निम्नगे! जलहि, खोल गेला ध्वनी,
पशुद्विजहि बापुडे पळति ह्या स्थला सोडुनी
कसा पसरला जला पिउनि हा अधाशी तरी
दिसे वरुनि कोरडा खडक उग्र काळापरी ४६

उदास किति टेंकड्या रुक्षखील ह्या भासती
दऱ्याहि विवृताननौ जणु गिळावया धांवती
दिसे नच इथें कुठें झुडुप झाड वेली तृण
नको भयद हें प्रभो! विजन घोर तापीवन ४७

कुठें? जल तुझें कुठें? श्रवणमंजु गेला रव
कसें विबुधकाम्य—तें सकल लोपलें वैभव
प्रभूतजलसंचितप्रवह काय झाला तरी
दिसे जणु निशाचरी--'झरि न हे'--महोग्रा दरी ४८

प्रतप्त वन जाहलें, मृगकुलें जला शोधिती.
जरी मृगजल भ्रमें फसतिही पुन्हा धांवती.
असा तृषित एक तो मृग--तटीं तुझ्या पातला
मिळे न जल, हिंसकध्वनि परी तयें ऐकिला ४९

अगाध तव पात्र हें पशु--नरासही दुस्तर
तयावरुनि एथ हा—मृग जुळून पोटा खुर

---

१ आवाज (शब्द ध्वनी बदलला.) २ खोल गेलेली नदी! ३ पाण्याचा ध्वनी. ४ काळासारखा भयंकर. ५ तोंडें पसरलेल्या दऱ्या. ६ हिंस्र पशूचा शब्द.

उडे, ह्मणुनि ह्या स्थला 'मृगखुरी' असें बोलती
जया बघुनि कौतुका बुधहि विस्मया मानिती ५०

न दूरवर ही अशी स्थिति परी तुझी राहिली
पुन्हा झडकरी वरी निघुनि ती झरी, चालली--
जणू सजुनि नेटकी कुलवधू नवी नोवरी
गुरुप्रियजनास ह्या नमुनि जातसे, सासरीं ५१

तटद्वय तुझें; जलें तृणलताद्रुमीं व्यापिलें,
दिसे जलचरीं तसे पशुविहगमीं शोभलें
धरून तरुच्या करा कुसुमितालता ओढिती
तयासहित पल्लवीं सुमफलीं तुला पूजिती ५२

तुरंग–तुरगी नरा चुकवुनी पराधीनते
यथेच्छ सुख भोगिती, वसुनि येथ एकत्र ते
सवत्स वनधेनु त्या करुनि उच्च पुच्छें तटीं--
तुझ्या, विहरती मृगी मृगहि पाडसें गोमटीं ५३

हुतावहरथीं किती बसवुनी पुढें धाडिले
वृषाश्वरथिं हे तसे पदपथीं किती चालले
सुरम्य तरणीवरी बसुनि वारिमार्गें किती
नदी ! तुजसवें तुझ्या मुदित दर्शनें चालती ५४

---

१ हरिणखुरी ह्मणतात. २--३ फुललेल्या वेली झाडांच्या खांद्यास धरून त्याना पाण्याकडे ओढून त्या झाडासुद्धां पानें फुलें फळें ह्यानीं तुझी पूजा करितात. ४ पाळीव घोडे आणि घोड्या तशाच गाईही धन्याच्या घरांतून सुटून पळून जाऊन तापीतीराला स्वेच्छ कळप करून राहिल्या आहेत. व तेच रानघोडे व रानगाई झाल्या आहेत. ५ अग्नीरथात--आगगाडींत. ६ बैलगाडी व घोडेगाडी यात. ७ पायवाटानीं. ८ सुंदर नावेवर. ९ जलमार्गानें.

शिडें[1] फडकती, जळीं चपलही वल्हीं नाचती
तुषार उडती जणू मधुनि चामरें शुभ्र तीं
सतेज जलबिंदु जे उधळतात मोत्यापरी
प्रमोदलहरी तया उठति पाहुनी अंतरीं ५५

सदश्व हिंसती मुदें, करिति धेनु हंबारवा
विहग शुभकूजितें, भ्रमर मंजु गुंजारवा,
शिरून करि कीचकीं[3] पवन कर्णमंजुध्वनी,
गमे तव मनोरमे ! सकल रंगले वर्णनीं ५६

अखंड सुखदायिनी, जनपदास सद्बोधिनी,
परोपकृतिशालिनी, गुणवती, सती, पावनी.
अशी तव मनोहरा विमल सुंदरा हे झरी,
पथक्रमण कौतुकें मुदित येथवेरी[6] करी. ५७

प्रगल्भघनगर्जितासम परी ध्वनी ऐकुनी
अशी चकित बावरी स्तिमित होसि कां ? वाहिनी !
विवेक करिं, धीर तूं धरिं, न भीति शंका मनीं
असे उचित पथ्य हें तुज पहा महाभागिनी ! ५८

## परिस्थिति व कर्तव्यकथन.

श्लोक ( शिखरिणीवृत्त. )

गंभीरा[10], सुव्यक्ता, समयपठिता, भूषवि गिरा
नरा; नारींना ती विनयसहिता मंजु मधुरा.

---

१ नावाबरील शिडें. २ खिंकाळतात. ३ पोकळ बांबूंत. ४ जनाला सदुपदेश करणारी. ५ अशा प्रकारची. ६ येथपर्यंत. ७ नदी ! ८ हें हितकारक व योग्य आहे. ९ मोठ्या भाग्याची. १० गंभीर वाणी पुरुषांना व तीच मंजुळ वाणी स्त्रियांना भूषणावह होते. तसेंच कृपांगी स्त्री व बुद्धिवान पुरुष सर्वांना प्रिय होतो.

तनुक्षामा वामा सति गजगती मान्य जगती
तसा भव्य श्रीमान्नरवर बली होय सुमती ५९
स्त्रिया लज्जाव्याजें[1] मुखनत करूनीहि वदती
तरी उत्कंठेनें पतिवदन चोरून बघती
अति प्रेमाचा त्यां[2]--वरि नच दिसों देति भर तो
नराचा झाकेना कधिंहि, उघड स्पष्ट दिसतो ६०

तुझा दिव्यश्रीमद्वदनशशि[3] त्यां[4] उत्सुक करी
पहा कैशा त्याच्या उठति हृदयीं प्रेमलहरी
महानंदें गर्जे, त्यजुनि निजवेलीं[5] जलधि हा
तुला ये सामोरा निरखुनि नदी ! तूं पति पहा ६१
जिथें शुद्धप्रेम, प्रणय, ममता, पूर्ण असते
न लज्जा मर्यादा विनय भयही तेथ वसते
अशा प्रेमालापा प्रियकर पतीच्या परिसुनी
नदी ! मागें कां गे ! दडसि ? भय संकोच धरुनी. ६२

अहा रूपैश्वर्ये उचित वर हा सागर, गुणी
वधू हो मान्या तूं अनुगुणवरा[6] धन्य वरुनी
तुझ्या सौभाग्याचा जणु उगवला वासर[7]—मणी
घडे नाथोत्संगीं म्हणुनि तुज हा वास रमणी[8] ! ६३

नदीनाथा[9] कांता बघुनि निजनाथा सुनयने !
मनीं आनंदावें स्मित करुनि तूं चन्द्रवदने !

---

१ लज्जेच्या मिषानें. २ त्या स्त्रिया तो प्रेमभर वर--बाहेर दिसूं देत नाहींत. ३ तुझा सुंदर मुखचंद्र. ४ समुद्राला. ५ मर्यादरेषा. ६ आपल्या गुणाला, योग्य पतीला. ७ सूर्य. ८ हे सुंदरी ! नदी ! ९ आपला पति समुद्र.

तदंकीं बैसावें वदुनि मधुरा नर्म वचना
प्रियां द्यावें, घ्यावें सुख सुखवुनी तू गुरुजना ६४
विवाहीं हा सर्वां अभिमत असे कौतुकविधी
रुढीते सोडीती कुलज, शुभभद्रेच्छु न कधीं
न मर्यादा सोडीं, परि भय मनांतील दवडी
घडी आनंदाची पुनरपि नये ही घडिघडी ६५
'त्रपा भी मर्यादा विनय वनितांचे गुण कसे ?
वधू मी सोडूं हो' ! ह्मणशिल जरी शंकुनि असें
तरी साऱ्या पाणिग्रहणिं कुलजा हेंच करिती
समर्पूनी नाथा तनु-सुमनमालाहि वरिती ६६
पतिप्रेमा रामा नच कधिंहि साध्वी ! विघडिती
सदिच्छा नाथाच्या धरुनि मनिं, भावें पुरविती
सदा सेवा देवासम पतिस मानूनि करिती
सुखा सौभाग्यां त्या भुवनिं गृहिणी नित्य पवती ६७
सुखी व्हावें तेजें मिळुनि वरतेजातचि, जलें–
जलीं, व्हावें तैसें पतिपदिं तुवां लीन विमलें !
विशुद्ध प्रेमाचा विबुध न कदा भंग करिती
त्यजूनी मोहा ते–इहपरसुखा नित्य पवती ६८
नरा सौख्यानंदप्रदपद जगन्नाथचि खरें,
न नारीला तैसें सुख पतिपदावीण दुसरें;

१ पतीला. २ कौतुकार्थ होणारा [ पूर्वोक्त मांडीवर बसणे खेळणें वगैरे. ३ लाज. ४ कुलीन मुली. ५ शरीर मन आणि पुष्पमाला. ६ स्त्रिया. ७ सुख आणि सौभाग्य. ८ कुलस्त्रिया. ९ तेजानें श्रेष्ठ अशा तेजांत व पाण्यानें पाण्यात मिळून सुखानें रहावें. १० जगदीश्वर.

म्हणोनी सद्भावें तन, मन, गिरा अर्पुनि तया--
भजावें त्वां, ज्ञाते वदति--सुख--संतोष--हित या ६९
विषाद प्रेमाचा त्यज, तुजसि ह्या व्यर्थ गमला,
जयानें झाली त्वत्तनु पुलकिता कंप भरला.
विवेकें धैर्यातें धरुनि विनयें होइ पुढती
अशा--सौख्यानंदा त्यजिल सुमती कोण युवती ? ७०

## सरित्सागरसंगम.

श्लोक. ( शार्दूलविक्रीडित )

सौभाग्यप्रद भानु हा उगवला, झाली प्रसन्ना धरा
वाहे मंद सुगंध हा पवन दे आल्हाद नारीनरा
शोभे भव्यवितानतुल्य वरि हें आकाश, दिक्सुंदरी
ह्या रम्या नगराजपंक्ति दिसती, शृंगारिलीही-पुरी ७१

संगें घेउनि वारिधी प्रियजना सोत्कंठ येऊन तो
ह्या कांता तटिनीवधूविधुमुखा पाहून आनंदतो
हर्षे नाचति मोर, हंस, बदकें, मासे जलीं क्रीडती
देती मंगलगायनीं द्विज सुखानंदा जना कूजितीं ७२

जी माता ममता पिता हिजवरी प्राणाहुनी जो करी
त्यांनीं अर्पियलें हिलें निजकरीं ह्या सिंधुनाथाकरीं
आला हा शुभकाल, योगघटिका, हीं प्राप्त सन्मंगलें
झालीं, कीं स्थल शैलजाजलधिच्या हे संगमें शोभलें ७३

१ पतीला. २ ह्यालाच ज्ञाते सुख म्हणतात. ३ रोमांचिता. ४ शहाणी तरुणी. ५ पृथ्वी. ६ छतप्रमाणें. ७ दिशा सुंदरी. ८ पर्वतांच्या ओळी. ९ सुरत शहर. १० पक्षी. ११ नदीवर. १२ लग्न घटिका.

जाता व्योमपथें धरूनि वदनीं धान्यें द्विजांच्या गणीं
केलें मंगल हें, तुह्मावरि फलें मंत्राक्षता टाकुनी.
अर्यी वृद्ध सुवासिनी तुज नदी ! प्रेमें इथें पूजिती,
पीतों, कुंकुम, कंकणें, सुमफलें, सद्वायनें आर्पिती. ७४

त्वत्पाणिग्रहण--प्रसन्नें--जलधी घेऊन संगें तुला
हर्षें गर्जत सह्यपादनमना हा कौतुकें चालला
प्रेमानंदभरांत मग्न नग तो आशिर्वचा देउनी--
बोले सागरगर्जितप्रतिरवें कीं हें--तुला पाहुनी ७५

झाले पूर्ण तुझे मनोरथ नदी ! त्या पूर्ण सत्कामना
झाल्या सर्व जनांचिया सफलही, आनंद वाटे मना
केलें शैलकुलास धन्य, जननी आनंदली मेदिनी
झालीसी कृतकृत्य आज मिळुनी रत्नाकरा ह्या जनीं ७६

चिंता तात मनीं परी तव, सुतावात्सल्यमोहें करी
कीं कैशी ? चपला अजाण अबला नांदेल ही सासरीं
सेवाधर्म, पतिस्वभाव न जिनें तो ऐकिला, पाहिला;
ह्यासाठीं हितबोध पूर्ण धरिं हा ध्यानांत तू चांगला ७७

" वाटे तातगृहासमान, न परी माहेर हें, सासर
ह्या सासूश्वशुरा न येइल जरी मातापित्याची सर
मानावें तरि वद्य त्यास, सवती जैशा स्वसा सोदरी
मानी ह्या प्रिय जीवदेवच असे स्वप्राणनाथा वरा ७८

---

१ पक्षांच्या समुदायानीं. २ नदी व समुद्र ह्यांच्यावर. ३ वैश्य स्त्रिया. ४ हळद. ५ तुझ्या पाणिग्रहणानें आनंदित असा समुद्र. ६ सह्याद्रीच्या पायांना वंदनाला. ७ समुद्र गर्जनेच्या प्रतिध्वनीनें. ८ पुढें दिलेलें भाषण. ९ सख्या बहिणी.

तूं कांता रमणी नदी ! रमण हा त्वत्कांत गे ! वारिधी
तू पत्नी पतिभाव हा चिर वसो अन्योन्य सत्प्रेमधी
झाला क्षुब्ध जरी तरी क्षणभरीं तू स्तब्ध राहोनिया
प्रेमें, मंजुवचें, सुधामधुजलें, संतोषवावें तया ७९

बाले ! कां ? तव कंठही हृदय हें प्रेमांबुनें दाटलें
खेदें सुंदर ही मुखांबुज तुझें कां ? सांग कोमेजलें
नाहीं योग, वियोग, दु ख, सुख तें काहींच जीवाकरीं
त्याचा हर्ष विषाद हें कळुनि कां चित्तीं धरावा तरी ८०

बाला बालपणीं स्वतातजननीप्रेमामृतीं रंगती
होता थोर परी निजाप्तभगिनीबंधूस दूरावती
त्यांना ती गतसौख्यसस्मृति[1] महादु.खास देई जरी
सोशीती तरि दृष्टि देउनि मुली त्या भावि सौख्यावरी[2] ८१

बाले ! तूं न तशी समीप वससी त्या स्वप्रियाच्या सदा
नाहीं होत तुला वियोग तवही त्या प्रेमळांना कदां
तूं धन्या सरिता, अखंड ममता ठेवोनि सर्वांवरी
केलें पालन कौतुकें धरुनि तन्मायादया स्वांतरीं ८२

आहे स्वाधिन हें करून पतिची सेवा, प्रसन्नें मनें-
सन्मार्गीं स्वगुणीं सदा प्रिय तया होवोनिया राहणें
लाभे ह्यातचि धर्मपुण्यसुखही संतोष मोठेपणा
[3]तो वे गे ! स्वकुलास भूषवुनि दे आनंद सर्वां जना ८३

झालीसी रत जेथ तूं भगवती ! प्रेमाकरीं सागरीं
तेथें ही सुरता[4]भिधा, तव तटीं शोभे सुरम्या पुरी

१ सहवाससुखाची आठवण. २ पुढच्या पतीसुखावर. ३ तो संतोष आणि मोठेपणा संपादन कर. ४ सुरत शहर

सश्री--श्रीपति नित्यं यद्हृदिं वसे, त्या मान्य रत्नाकरा
[2]हो, [3]देवी ! गिरजा शिवा ' प्रिय ' जगन्माता जशी शंकरा ८४
जें झालें सुख संगतींत तुझिया, आनंद जो वाटला,
झाला त्वद्गुणवर्णनीं नच तसा संतोप कोठें मला.
प्रेमें पूर्ण ' कृपा करून कृति ही केलीस तूंची नदी !
सद्भावें बिनयें नमून जननी ! ती अर्पितों त्वत्पदीं ८५

## पूर्वांची आठवण व प्रेमोद्गार.

श्लोक.

झाला हेतु कृतीस ह्या प्रिय **महादेव** तया स्वानुजा
स्मार्तोपान्हयें **विष्णु** हे सुरसिका मित्रा असे नाम ज्या
त्याते आठवितां मनीं स्वजननीताता सुतप्रेमला
वाटे जीवित हें वृथा विफलही हा जन्म माझा मला ८६
गेले सोडुनि ह्या जगा न पुरली इच्छा तयांची तरी
' ही व्हावी कृति पूर्ण ' तें नच घडे ह्या मंदधीच्या करीं
प्रेमें साह्य करून पूर्ण करवी सन्मित्र **नारायण**
ज्या शोभे नव काव्य दिव्य रुचिरा **रत्नावली**भूषण ८७

---

१ लक्ष्मीपति लक्ष्मीसहित ज्याच्या हृदयात नित्य रहातो त्या रत्नाकराला. २ प्रिय हो. ३ हे नदी ! ४ ह्या तापी नदीकाव्याला जो माझा प्रिय अनुजबंधू महादेव नांवाचा होता तोच कारण झाला त्याला. ५ तसेंच विष्णुपंत स्मार्त ह्मणून माझें एक रसिक मित्र होते त्याला. ६ आणि आपल्या पुत्रवत्सल जनक जननीला आठवितां [ त्यांची आठवण झाली ह्मणजे. ] ७ ही कविता पूर्ण व्हावी अशी जी त्यांची इच्छा होती. ८ तें ( ती इच्छा ) ह्या मतिमंदाकडून ( माझ्या हातून ) ९ माझे थोर उदार प्रेमळ व रसिक मित्र श्रीयुत रा. रा. नारायण नरसिंह फडनीस काव्यरत्नावलीचे संपादक.

ही—**तापी**सरिता तुझा कविमतां गुफून पद्यावली
प्रेमें अर्पियली रसज्ञ रसिका मान्या जरी जाहली
झालों धन्य, गमेल तोष-मिळता जो रत्नमुक्तावली
कंठीं घालुनि शोभली जरि हिनें ती **काव्यरत्नावली** ८८

केशव नारायण वैद्य.

## शेवटचें मातृगीत !

पद. [ चाल, " चारा सोडुनिया " ]

निद्रा करिं बाळा । चिर येथें । भूषवि या स्थानातें,
नवविकासितकमला । वेल्हाळा । उघडि न पुनरपि डोळा
वाहियलें उदरीं । नव मास । साहुनि बहु सायास
दिधला जन्म तुला । गोपाळा ! । नयनानन्दमराळा
जन्मत तोंच मुला । मातृकरें ! । येणें मृत्यु, कठोरें ! !
विपरित दैवगती । पुष्प फुलें । काय ह्मणुनि तों खुडिलें ?
बहु यत्नें रत्न । ये हातीं । तों तें फोडूनि माती
करणें होईल का ? । शहाणपणा; । कळेल तुज न अजाणा.
चंद्राची कोर । जों उगवे, । तों मेघें झाकावे.
वैन्यावरिहि अशा । श्रीरंगा ! । आणि न, दैन्य प्रसंगा १

रूप तुझें दिव्य । पाहुनिया । मत्सर उपजवुनिया.
दुष्टांच्या हृदयीं । सुखसदना । निपजे शूळ कृपा ना !
मग ठेवूं कोठें । मी तूतें । झाकुनि सांग मला ? तें
दृष्टीच्या आड । सुकुमारा । एकचि तूतें थारा
यास्तव ठेवित मी । ह्या स्थानीं म्हणुनिया अश्रूंनीं

१ कवि जनांला मान्य अशा तुह्माला.

ज्या योगें तव हा । देह सदा । वज्रचि हो सुखकदा
अश्रु न हे साधे । रक्ताचे । वाहति पाट जयाचे
शरीर तव बनलें । सुरम्य हें । नश्य कधीं जें नोहे.
कीं तें नित्य जलीं । मन्नेत्रा । दिसेल कोमलगात्रा !
तू येथें तेथें । वर खालीं । करिशिल सदैव केली
वायूच्या लहरी । तव मूर्ति । घेऊनि नर्तन करिती
दिसतिल फक्त । मला वेल्हाळा ! । उघडि न पुनरपि डोळा २

आता आठवतो । कालचि तो । व्याकुळ जो मज करतो
पद पडलें चुकुनी । मी अबला । कोणि न जगिं परि उरला
दर्शक सन्मार्गी । नेइल जो । ऐकुनियां जग लाजो
जगजेता ऐशा । अनिवारें दुर्दमनीय विकारें
मी बाला पडलें । मोहफशीं । हरहर स्थिति ही कैशी !
हातें मम घडलें । पाप असें । वदती जन हें कैसें ?
का नच दाखविती । विधवांना । सुमार्ग ? देति न ज्ञाना
चित्ता आवराया । माराया । विकार, कथिति नुपाया.
पी बा शेवटचें । मुख लावीं । पान्हा फुटला पाहीं
दुग्ध किती शुद्ध । जणु गंगा । दावित अंतर रंगा
निर्मल हें जैसें । शील तसें । माझें बाळा परिसें
परि हें जग भरलें । दुष्टत्वें । त्यांहीं मलिन ह्मणावें
कलंक लावियला । वदती ने । रहस्य मज नच कळतें
त्यातिल शास्त्राचा । धर्माचा । गंध न मज दोहोंचा.
छळती का मातें । कळत न तें । मन हें मम कळकळतें
जळतें हृदय अती । नीज ह्मणीं । रक्ताचें हो पाणी !

जाऊं चल बाळा ! । तुजसगें । मीही ह्येत निजागें
राहूं वापितलीं । शीतजलीं । शांतवु दुःखें सगळीं.
आतां थांबु नको । चल वेगें । येथिल संपवुं सोंगें
जाऊ स्थलिं ऐशा । पूर्ण मना । शाति लाभे सजणा २

नीलकंठ.

## संध्या-चित्र.

पद.

अस्तगिरीच्या सौधावरतीं,
आकाशावरि लावुनि दृष्टी,
प्रेमाचीं--विरहाचीं गाणीं
गात बैसली सध्याराणी ! १

पायघड्या पसरल्या ढगांच्या
मार्गावरतीं निळ्या नभाच्या,
त्यावरि डोलत रविरायाची
मिरवणूक आली थाटाची ! २

मधुवार्ता ही कळवायाला
विरहार्ता सध्यादेवीला,
कितीतरी सोनेरी सेवक
आले पळतीं धांवत धांवत ! ३

" ऊठ, सखे पश्चिमे--बघ गडे !
आली गाजत स्वारी तिकडे !
चालुनि चालुनि दमली बाई,--
राजस वदनीं लाली येई ! ४

गुलालपाणी फेंक आंगणी !--
सोन्याचीं तोरणें-कमानी--
बांध, तसें ते उधळ चहुकडे
माणिकरत्नाचे लाल सडे !"-- ५

रविरायाची बघता स्वारी
संध्येच्या गालीं ये लाली !
विनयाची--लज्जेची पुतळी
मूर्तिमंत संध्या ती दिसली ! ६

निमिषाचा अवकाश राहिला !
चराचरांना धीर न उरला !
दृष्टील तों दृष्टि मिळाली !--
स्वर्ग--धरा आनंदुनि गेली ! ७

प्रणयसंगमीं दिशा लाजल्या
खुणवुनि संध्येला त्या हंसल्या !
मंगलतेचें दिव्य चित्र तें--
शांतपणें जग पाहत होतें ! ८

केशवकुमार.

---

## सुभाषित.

### श्लोक.

कुंभारासम काम नेमुन दिले ब्रह्मांडिं धात्या जयें;
श्रीकांतास दशावतार धरणें लागे तसें यद्वयें;
भिक्षेसाठिं शिवास जें नरकपाला घेउनी हिंडवी,
सूर्याला गगनीं सदा तळपवी; तें कर्म वंदी कवी; १

परस्त्री नेताना नच दचकला रावण कसा?
नसून 'स्वर्णाचा हरिण' फसला राघव कसा?
'नको अक्षक्रीडा' ह्मणुनि उठला धर्म न कसा?
विपत्ती ये जेव्हां निकट तव बुद्धिक्षय असा! २

होता एक बहूत काल पडुनी पेटीमधें पन्नग
धुंडोनी फट भागला क्षुधित तो, आशा न ठेवी मग;
तों उंदीर करून बीळ घुसला, त्या तो फणी खाउन
गेला त्याच पथें, असें बघ करी बुद्धिक्षय प्राक्तन! ३

वस्त्रें बघोनी अधिकार जाणसी;
नग्नास लक्ष्मी त्यजि, लोक हासती;
पीतांबरा पाहुन लक्ष्मि सागर
दे सादरें; आणि दिगंबरा गर; ४

पृथ्वी भक्षिल धान्य आपणचि वा माता स्वपुत्रा वधी;
मर्यादा न गणी समुद्र; अवनी वन्हीच जाळी जधीं;
किंवा अंबर कोसळे जनशिरीं; पक्वान्न होई विष;
राजा मंतु करी; तरी मग तया कीं कोण हो दंडिल ५

जें निंद्य तें वद्य गणून जो करी.
अप्राप्य तें प्राप्य अशा ग्रहा धरी;
भक्षूं नये तेंच खुशाल सेवितो
'स्त्रीदास' तो, स्त्री वच नित्य झेलितो; ६

विश्वनाथ नारायण रेडे.

# भिषग्विलास.

## आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी

## प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन ११ वर्षें पुरीं झालीं ह्यांत यथा-प्रकाश, शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग, त्यांचें निदान व चिकित्सा, औषधी व त्याचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयांवर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते. या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारासच न होता इतर सर्व सुशिक्षित व कुटुंबी माणसांना व्हावा, ह्मणून ह्यांतील माहिती सुलभ भाषेंत दिली जाते वार्षिक वर्गणी आगाऊ टपालखर्च सह अवघी १॥ रु.

व्यवस्थापक 'भिषग्विलास' सोलापुर.

---

# श्वासरिपु.

यापासून दमा, खोकला, कफ व त्यापासून ज्वर, अरुचि, निद्रानाश, मलावरोध, अपचनें वगैरे विकार होतात त्यावर तत्काळ गुण येतो. १ बा. ८।१२ आ. ट. ४ आ.

एजंट—गोगटे आणि कंपनी मुंबई.

पत्ता—जी. डी. भावे वैद्य, पुणें.

---

# श्रीहरिभजनामृत.

ज्ञानांजनाचे संपादक व महाराष्ट्र कवि चरित्रकर्ते रा. आजगावकर यांनीं निवडलेल्या बहुतेक सर्व जुन्या कवींच्या पृष्ठ १। रुपय अत्यंत प्रेमळ पदांचा हा संग्रह सर्व सगुणोपासकांच्या डोळ्यां प्रेमाश्रुवर्षाव करवील कि. ट. व्ही. पी. सह १० आणे

पत्ता—मॅनेजर ज्ञानांजन, लॅमिंग्टन मुंबई २.

रजिष्टर्ड नं. बी. ५२८


# काव्यरत्नावलीची किंमत किती कमी आहे ?

एकाच नावावर एका प्रतीस टपाल व्हीपीसह किंमत १। रु. दोन प्रतीस १॥ रु. तीन प्रतीस १॥। रु. चार प्रतीस २ रु

रत्नावलीचीं मागील बाईंड केलेलीं पुस्तकें २६च्या भावानें विकण्याचा प्रसंग आला आहे. हीं सर्व अनुक्रमानें घेतल्यास प्रत्येक पुस्तकास आठ आणे फुटकळ पुस्तकास दहा आणे टपाल व्हीपी खर्च मुळींच नाहीं ज्यास हीं पुस्तकें एकदम घेण्यास सवड नसेल, त्यास प्रत्येक महिन्यास एक एक पुस्तक पाठविण्यांत येईल.

संपादक काव्यरत्नावली जळगाव.

## संकल्प.

### ( WLL POWER. )

हें एकच अशा धर्तीचें मराठींत नवीन मासिक आहे ज्यानीं ज्यानीं हें एकदा वाचले त्याना तर पसंत पडेलच व इतरानीं पाहून अभिनंदन पत्रें पाठविलीं ज्या स्त्री पुरुषाना मराठी वाचता येते त्या सर्वांनीं आपल्या सौख्य व अभ्युदयासाठीं हें अवश्य वाचावें

कारण

ह्याच्या वाचनानें, परिशीलनानें, व व्यामानें अगणित लाभ होतात. जसें मानस शक्तीचा विकास होणें, व्यवहारांत उच्च सुख व कार्य करतांना शांति अनुभव, शास्त्रीय बाबतीचें खरें रहस्य समजणें, आत्मीयगुप्त शक्तीचा अदाज कळणें, आहार विहाराचें ज्ञान, ज्ञानेश्वरी सारख्या सर्वमान्य ग्रथांतील उच्चतत्वें समजणें वगैरे. इतक्या प्रकारचें उपयुक्त ज्ञान.

वैका रैप पृ [illegible] मिळते. आकार क्राऊन कव्हर सचित्र [illegible]
[illegible] तच आही रु १॥= चें व्ही पी. नें [illegible]
[illegible] च हवा असल्यास ८= ची टिकिटे पाठवा.

संकल्प कार्यालय ( K. ) मुंबई नंबर ९


कृष्ट

नून खात्रीनें

गांवाडी,

॥ श्रीः ॥

# काव्यरत्नावली

आलीकडील कविमंडळीनें चालविलेलें

**कवितेचें मासिकपुस्तक.**

श्लोक.

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती। त्या त्याच अर्थाप्रति दाविताती।
कौशल्य मोठें रचनेंत आहे, । सत्काव्य तेणें नव वाटताहे.

वर्ष २७ वें )      सप्टेंबर सन १९१६      ( अंक ९ वा.

हें मासिक पुस्तक नारायण नरसिंह फडन[illegible] यांनीं जळगाव जिल्हा पूर्वखानदेश येथें नवीन पेठ म्युन्सिपल २४ मध्यें आपल्या बाबजी प्रिंटिंग छापखान्यात छापून जळगाव येथें प्रसिद्ध केलें

**वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १। रुपया.**

बाबजी प्रिंटिंग प्रेस जळगाव

अनुक्रमणिका

सप्टेंबर १९१६


| पद्यसंख्या | | पृष्ठें |
| --- | --- | --- |
| ४०. | हिरकणी. | १९१ |
| ५२ | शतश्लोकी. | १९७ |
| ११ | बाजार. | २०२ |
| ३ | सरस्वतीस. | २०४ |
| ५ | विहार. | २०५ |
| ३ | द्वादश ज्योतिर्लिंग. | २०६ |
| ४ | खोटी खोटी नरममता ! | २०७ |
| ८ | दिव्य आणि त्याची जाणीव. | २०८ |
| १४ | परमेश्वरप्रार्थना. | २०९ |
| २१ | विलक्षण कैदी | २१२ |
| ४ | प्रभात गीत. | २१४ |
| ६ | छायागीत. | २१५ |
| ५ | सुभाषित. | २१६ |
| १८८ | | |



येत्या दीपवाळीपासून या मासिकास तिसरें वर्ष लागणार !

आकार डेमी अष्टपत्री दरमहा २४ पृष्ठें.

## दैवज्ञ-प्रबोधिनी मासिक.

वार्षिक वर्गणी साधारण प्रत रु १। व सुबक प्रत रु. २ फक्त

सदरहु मासिकांत ज्ञातिविषयक व सार्वजनिक चर्चा येत असते तसेंच विद्वानांचे सामाजिक, नैतिक, औद्योगिक वगैरे विषयावर उपयुक्त लेख येत असून गोड कविता, मनोरंजक व बोधप्रद गोष्टी व ज्ञातीचें व इतर उपयुक्त वर्तमान टीकात्मक येत असतें. शिवाय पूर्णानंद हें सामाजिक नाटक क्रमशः दिलें जातें व प्रसंगानुसार चित्रेंहि येतात.

व्यवस्थापक, दै. प्रबोधिनी, ठाकुरद्वार, मुंबई नं० २.

# काव्यरत्नावली.

अंक ९ वा.

## हिरकणी.

(रायगडावरील हिरकणी टोंकासंबंधाची आख्यायिका प्रस्तुत पोंवाड्यांत गाइली आहे.)

आश्विनमासीं पौर्णिमा दिशीं या कोजागरिसी,
द्वाही ऐशी शिवरायाची फिरली मुलखासी !
खंडोगणती दूध पातलें रायगडावरती,
लाखोगणती गवळि गवळिणी घेउनिया मिळती !

त्यांत चमकती पहा 'हिरकणी' हिरकणीच साची,
नाजुक साजुक केवळ पुतळी पिवळी सोन्याची !
पोरसयाची पोरि आवरती ही संसाराची;
प्यारी येसाबाईंची ! भारी लाडेवाराची !
'कधीं ती नवलाख गडांची पाहियली नाहीं !
पाहुनि येत्यें, हाल्हकलें तें ठरलें पंथ ना ही !'
लाडकोड पुरविला धनी तो 'जा ये पाहुनि ती;
दूध घालवुनि फिर माघारीं गवळ्यांसांगातीं !'

घांई घेई उभी गडावरि पांचाडाकडुनि ती,
दोन विसानीं दोन दुधाच्या चरव्या सांगातीं

गडीं दुधाचे समुद्र भरले ! त्यातचि दोन बिसा
दोन दुधाच्या चरव्या पडतां, पडला दिवस कसा !

रात्र पातली ! नगारखाना--नौबत झडली ती,
ऐकत गुंगत गवळ्यासंगत रमली त्यांतचि ती
रात्र पातली ! पुनवेचा तो चांद उडी घेई !
दूध चांदणे पडे, त्यातची बुंड तिचें मनही !
रात्र पातली ! सनइचौघडे सुटले गडभर ते,
ऐकत नादावत त्यातचि हो वेडें पाडस तें
रात्र पातली ! बत्ति पेटली नवलाख गडीं ती,
पाहत पाहत चमकत चाले चांदणि त्यातचि ती
बत्ति उजळली वर आभाळीं ती दरबाराची,
कांचेची ती, साची जोती तळपे मुलखाची !
बत्ती ती पाजळे मनोऱ्यावरति महालाच्या,
जळीं तळीं भडकलीच दिसली गंगासागरिंच्या !
बत्ती ती जगदीशदेउळीं दीपस्तंभाची,
जिव्हा जी मोजिता होत हो सूरुस्तभाची !
बत्ती वरती ! बत्ती खालति ! बत्ती चौफेरी !
बत्ती ती नवलाख पेटली द्वापारि गडाभरी !
नटली नगरी शिवरायाची इंद्रपुरीच जशी !
बघतां गुंगे गवळ्यांसंगें हिरकणि ती न कशी ?
तोफ उडे तो धडड गडींची पहिल्या प्रहराची
साडेसात घडी रात्रीची, दिंडी बंदीची !

धडड ऐकतां दचके चमके हिरकणि गांगिणिशी

जीव उडे तो, ऊर धडाडे ! आतां गत कैशी
उडे गड्यांतुनि धांवत दिंडीकडेस यायाला,
घडे पाहतां नको तेंच ! तों धीर तिचा तुटला
दिंडी ती मृत्युची उघडणें सोपें हो साच
ब्रम्ह्याचा लेखही लिव्हविणें पुनरपि, तैसेंच
परी गडावरि **शिवरायाच्या** दिंडी उघडविता
इहलोकीं ना ! उद्या तयातें भुवनत्रय मिळतां
पाहुनि दिंडी काळकठोरा बंद अशी ' हाय !
तान्हुकल्याची पान्ह्याविण गति आतां हो काय '
' हाय तान्हुल्या ! ' करीत वेगें धरणीवर पडली
' तान्हुकल्या रे ! करीत तीची शुद्ध बुद्ध गेली

दोन दिसानी दोन धांवते गवळी पाठिवरी
दिंडीशीं येऊनि पाहती धनीण धरणिवरी !
' पाणी ! पाणी ! ' करीत कोणी पाणी तें आणी
डोईवर शिंपडतां होई सावध तोंच क्षणीं
' तान्हुकल्या रे ' ! करीत सुटली तीरासारी ती
' तान्हुकल्या रे ' ! करीत ये पश्चिम टोंकावरती !
काळखाइसें काळकाइचें खोरें त्या खालीं
वरी उभी ती कांठावरती **हिरकणि** हो झाली
' किर्रे ' दरींतुनि रात किड्याची, ' कूहू ' घुबडाची
साद येत त्या ' तान्हुकल्या रे ' ! पडसादचि साची
' तान्हुकल्या रे ' ! करीत फुटला पान्हा तिजलागीं
पान्हा दे बळ **तान्हाजीचें** त्या अबले अगीं !
' तान्हुकल्या रे ! येत्यें आता ! ताडमाड पाहीं

पंढाळ सारी दूर तुका तारि, आतां गति नाहीं-।
अनेनें बघविला साच हा तामुनिया हातीं,
तरी तुका तो माझ्यापासुनि दूर न हो कारतीं ! '
' तान्हुकल्या रे ! ' करीत टेंकी हात कळ्यावरती
दूध चांदणें भरी दरी ती, तीतचि उतरे ती

दोन दिसामी दोन पातळे गमळी तों तेथ,
' अगो ! कडनी बसती मटकन मर्द तिथें बघत
दूध चांदणें भरी दरी ती, तीतचि झळके ती
बघतां बघतां बनीण हिरकणि दर्यासिंह मोती !

+ + + + +

बुकले पोचारी येसाजी होई साच पिसा,
हिरकणि ये मा म्हणून, जैसा जळाविणें मासा !
तोफ उडे ती धडड गडींची पहिल्या प्रहरांचीं,
जीव उडे तो येसाजीचा, झोंपहि तान्ह्याची !
' शंभ्यानें साधिला काय रे दावा ! मुलखाचा
सुलतान उभा—कुळाशिळाचा—आयाबहिणींचा
ठेवी डोळा तिच्यावरी तो, फार दिवस पाही !
केवळ पोळ हा सुटला कारिनो राजा तरि काई ?
बघ गे ! आतां बये, तान्हुलें ! घेउनि मी येतों
तीशीं दिल्ली फोडुनि ! बघतों काय बाप करतो ! '

तडा उचाला आवळुनी जरि फेटा डोईशीं !
फडा ठाकली भेट उपटली ती दिसन्यासरशीं !-

टाकी तो खांद्यावर ! हा कीं भीमसेन दुसरा !
गदा टाकुनी स्कंधीं, धांवे शत्रूसहारा !
चोरटाग त्या आंब्याशीं तो एकदमीं येई
तोंच झळकली तळीं पहाडा हिरकणि ती पाही !
धनी देखतां आंगावर ती उडी तया घेई !
मेढ टाकुनी, हातीं तीशीं झेली तो बाई
खांद्यावरती टाकी, ठोकी धूम, घरा येई !
'तान्हुकल्या रे !' करता हातीं तान्हुकलें देई !

\+ + + + +

दुज्या दिशीं ती वार्ता सरशी जातां रायाशीं,
पाचारी तो झणीं हिरकणीशीं येसाजीशीं
प्रभू प्रजेचा, सिंधू साक्षात् तो वात्सल्याचा !
चोळी पातळ–गाव देउनी गौरव करि तीचा।

'खरी हिरकणी म्हणीं गुणाची धनीण येसाची
नांव तीच ह्या पश्चिम टोंका होई ती साची '
म्हणूनि बांधी टोंकावरती बुरूज तो खद्रा !
तत्कीर्तीचा गाता शाहिर भालचंद्र बंदा !

भालचंद्र

---

## शतश्लोकी.*

### आर्या.

स्वाभिक संस्कारोद्भव स्पर्शी देहानुभून ते विषय–
सोडूनि, आत्मानभुख चित्त परात्म्यांत शांत तें होय १५१

* मार्च सन १९१६ अंक ३ रा यावरून पुढें चालू.

साधन मूर्छित असतां स्वप्नीं सुख—भोग केविं जीवास
व्यवहार योग्य नव्य स्वप्नीं उत्पन्न करुनि देहास १५२
नसतां साधन कैसें शरीर ? संकल्पमय जरी ह्मणसी
केवीं स्वप्निं रतातीं शुक्र दिसे पतित वपुत नयनासी १५३
या देहें भीतीनें रडतो हसतो स्वतास तो स्तवितो
स्वप्निंहि मूर्छित तनुते सहसा आत्मा न सोडुनी जातो १५४
पूर्वीं देहस्त्रीहयदेशव्याघ्रादि विषय अनुभूत
देहाश्रय करुनि पुन तो तत्संस्काररूप तें सृजित १५५
दुसऱ्या स्वप्नस्थितिचा अनुभव जागृति---सुषुप्ति—संधींत
सर्वेंद्रियासि कर्षुनि तेथें आत्मा वसे प्रकाशयुत १५६
शयनीं स्थूल तनूतें ठेवुनि संस्काररूप विषयातें
बघणारा तो आत्मा संस्कारें जातसे हवा तेथें १५७
श्वानादि भक्ष्य किंवा प्रेत न शयनस्थ देह व्हावा तो
संरक्षि त्यास ह्मणुनी प्राणश्वासावशेषिं आत्मा तो १५८
स्वप्नीं निज प्रभावें हय रथ पल्वल नदी विहाराचीं—
स्थानें अनेक निर्मी रूपें स्त्रीपुत्रमित्रबंधूचीं १५९
चांडाल चोर मर्कट सर्प रिपु व्याघ्र तो कधीं सृजितो .
क्रीडे प्रिय युवतीसह कधिं हसतो विहरतो कधीं खातो १६०
मी म्लेंच्छ जाहलोंसें समजुनि दडतो स्वबंधुपासोनी
व्याघ्रादिभयें पळतो रडतो तो ग्रासि आपणा ह्मणुनी १६१
तद्गत आत्मज्ञानें जें दिसतें भासमान तें होतें
रौप्य शुक्तिज्ञानें मृगजळ किरणा न जाणतां दिसते १६२
रज्जूच्या अज्ञानें भुजग ऐसें क्षणैक सुख--भय—द
वस्त्वाभास पहा हे होती उत्पन्न दर्शनीं विशद १६३
माया व्यासाश्रय मी प्रस्तुत केलें असें सकळ जगत

माझ्यांत ते न तयिं मी कारण शुक्तींत भासतें रजत १६४
शुक्तवश न रजतिं वसे भूतें वसती ह्मणून माझ्यांत
हें भगवद्वच; गारुडसम खोटें दृश्य जात हें खचित १६५
सुखदु:खाचें कारण कर्म असें अज्ञ परि न जाणोनी
हा मित्र हा अरि असे करिति वृथा भेद, याज्ञवल्क्यांनीं-- १६६
जनकसभामंदिरिं हें कर्मचि कारण कथोनि त्या स्तविलें
कर्मांवाचुन कोणी व्यवहारिं न हें यदुत्तमें कथिलें १६७
तरु तोडाया क्षम जरि कुठार तरि मूल यत्न मनुजाचे
जरि अन्न--तृप्ति--हेतू, परि लागे साह्य भोक्तृ--यत्नांचें १६८
विषमसमफळें तेवीं मिळतीं कर्मे तथापि नश्वर तें
स्वातंत्र्य न त्या ठायीं परमात्मा प्रेरितो खरा त्यातें १६९
स्मृति कथित काम्य कर्मे वर्णाश्रमविहित लोकिं या होत--
सर्व ब्रह्मार्पण ही वेद--गिरा जाण सत्य अभियुक्त १७०
नासा--जिव्हा--मस्तक--कर--पद--कर्णाक्ष--तृप्तता करुन
संतुष्ट होय आत्मा वृक्ष जसा सकल मूल सिंचून १७१
कर्मठ वेदज्ञ जरी स्वर्गीं आत्मानभिज्ञसें जाती
तत्कर्म अल्प--भोगें सरुनि पुनर्जन्मिं दु:ख त्यांस अती १७२
कर्मफलेच्छू आत्मज्ञान्यासहि सिद्धि--भोग चिर मिळती
आत्मा उपास्य ह्मणुनी कर्मफल त्यागिता सुख--प्राप्ती १७३
आश्चर्य न हें केवल सूर्यादिकिंहीं न वस्तुचें ज्ञान
रवि विधु वन्हीपासुनि रवि विधु वन्ही--प्रतीति हो कधिं न १७४
चैतन्ययुक्त नयनीं रव्यादिक भासमान हे होती
यास्तव पुरुषच आत्मज्योति नसे चित्र देवतादीसी १७५
आत्मा अन्न-जलातें प्राणद्वारें पुन पुन. सेवी
जठराग्नि श्वासानें बलयुत त्यातें हळू हळू पचवी १७६

प्राणां लुप्त कराया सर्व शिरातून ने रस व्यान
मलमूत्रांतें टाकी तनुबाहिर वायु नामक अपान १७७
सर्वेंद्रियाधिपति हा देहस्थ प्राण पंच वृत्तियुत
चिद्घन सत्तेनें प्रति तनुत व्यापार करी सदा स्पष्ट १७८
जो चिद्रूप परात्मा निःसंशय सर्वसाक्षि तो मीच
प्राणांचा प्राण अखिल नेत्राचा नेत्र तो असे हाच १७९
भिन्न स्वरूप भूजलरविशशिपवनांस ज्यामुळें दीप्ती
एक स्वयंप्रकाशित आत्मा ज्यामाजि सर्व वसताती १८०
विद्युत्तारानल हे असती क्षम का प्रकाशवायातें
शांतानंताजामर तेजस्वी शाश्वता परात्म्यातें १८१
सद्गुरुच्या अमृतमयी अतुल्य कारुण्य पूर्ण दृष्टीनें
तें ब्रह्म मी असे हा अनुभव ज्याच्या मनांतरीं बाणे १८२
जीवन्मुक्त हि निर्भ्रम तो, आधि अनादि होउनी नष्ट
फिटुनी संशय शिरतो नित्यानंद स्वरूप आत्म्यांत १८३
मी देह न इंद्रिय नच चपल क्षयि मन न बुद्धिही मी न
मी प्राण न मग मी हें जड वस्तुजात केविं होईन १८४
मी न अहंकार स्त्री धन सुत गृह मित्र वा नसे क्षेत्र
जगदाधार ज्ञानस्वरूप शिवसाक्षि मी असें मात्र १८५
जें दृश्य तें विशद हो नीलापीतादिने न रूपानीं
अनुभव दर्शन--साधन सर्वांचें एक तेंच नेत्र गणी १८६
तोही दृश्य मनातें मन विषयाकार बुद्धितें दृश्य
मति वृत्तिहि त्या दृश्या आत्मा साक्षी प्रभू नसे दृश्य १८७
रज्जू न कळुनि भासे अंधकारीं अहि परी जेवीं
स्वात्माज्ञानें आत्मा दुःखद जीव प्रयुक्तसा तेवीं १८८
आप्तोक्तीनें सर्पभ्रम निरसुनि रज्जु हे कळे जैसें

मी शिवसाक्षी जीव--भ्रम जाता गुरुवचें कळे तैसें १८९
त्वज्ज्योति कोणती वद दिनिं रवि रात्रौ सुधांशुदीपादि
यद्योगें रविदीपादिक जाणासि सांग कोणती ज्योती १९०
लोचन तन्मीळुनि वद कोण ज्योती असे मदीय मती
कवण प्रकाशवी मति ? आत्मा, तूं तोच, मी महीवरी १९१
काहीं काळ महीवरि राहे तरि तो भजे न देहातें
प्रारब्ध--भोग तोंवरि असंगमति करि सुखें विहारातें १९२
निर्द्वंद्व तृप्त विगलित ममताहंकृति विशुद्ध जो स्पष्ट
स्थिरमति अचळ ब्रह्मस्वरूप तन्मोह सर्वही नष्ट १९३
ज्ञानप्रकाशरूपी जीवात्मा--ब्रह्म--भेद ह्मणि निरसी
अनुपम पवित्र समुदित होउनि तें ज्ञान लाधलें ज्यासी १९४
संसृति--कारण माया तत्ज्ञानें नष्ट होउनी जाय
पुनरपि न कार्यकर्त्री विज्ञानें मात्र नष्ट जी होय १९५
सेवुनि जेविं रसातें टाकिति जन गंधयुक्त जरि फळ तें
नाहीं विश्व ह्मणोनी मुळिं जगदाकार--भान ज्या नसते १९६
अविनाशी चित्सुख जो सूक्ष्मपणें सेवुनी स्वयंज्योती
संतुष्ट, शांत मनुजें सोडावी ही असारशी जगती १९७
चैतन्यपूर्ण निर्गुण निर्मल लक्ष्यार्थ तत्वमसि याचा
सर्वांतस्थ अखिल विधि--चित्तागोचर अशा परेशाचा १९८
होता दर्शनलाभ प्रणष्ट जनि मृत्यु फल--द संशय ते
कर्में सकल निरसुनी हृदयग्रंथीहि तेधवा तुटते १९९
आदीं मध्यीं अंतीं कर्मोद्भव जन्ममृत्युफलदायी
संसारवृक्ष, युक्त भ्रममदमोदाद्यनेक पर्णांहीं २००
यत्शाखा कर्मादिक, कांता सुत कन्यका विरूढ जेथें
छेदुनि असंगशस्त्रें सुज्ञें ध्यावें सदा परेशातें २०१

उत्पन्न होउनी स्थिर माझ्यामध्येंच विश्व होत असे
माझ्यांत लीन विलयीं शास्त्र तें ब्रह्म मूर्त मीच असें २०२
यत्स्मरणें यज्ञादिक अखिल विधींतील कर्म हो पूर्ण
साष्टांग प्रणति असे माझी त्या अच्युताप्रती जाण २०३

अनंत विठ्ठल चित्रे

---

## बाजार.

### पद.

गोड गोड बोला बोला--प्रेमाचा हा मोबदला
विश्वच अवघा बाजार--त्यात मांडिला संसार
प्रेमरूप होऊन चला--क्रयविक्रयही करण्याला
प्रेमाचाही--सवदा तोही--करू सर्वही
फुटकें तुटकें नवेंजुनें--विकतें एकच भावानें १

धराल हृदयीं जो भाव--बाजारीं त्या तो भाव
अमृतकुंभ जरि तुह्मि विकला--मिळे तसें परि मोबदला
जसें पेरिलें--तसें उगवलें--तेंच मिळालें
नियम हाच सर्वत्र असे--नवल न मग तो तेंच असें २

पहा थाटला बाजार--पेठा फुलल्या चौफेर
सत्ता संपत्तीच्याही--दुकानात गर्दी होई
तें मोहाचें--तें मदिरेचें तें विषयाचें
दुकान सजलें पहा किती अडल्यासी नच तेथ मिती ३

तेथिल त्या सवद्यासाठीं--झुडीच्या झुडी जाती
कीर्तीचीं अभिमानाचीं--पहा दालनें विभवाचीं
लहान मोठे-डेरी पोटे--जाती थाटे
तेथिल त्या सवादासाठीं--हपापलेले हे असती ४

लिलाव चाले निंदेचा--मर्मच्छेदन पीडेचा
लोलुप झाले किती तरी--मधुकरसम मधुमाशारीं
ही दंभाचीं--निष्ठुरतेचीं--अपहाराचीं
कशी दालने भरलेलीं--जशी मल्लिका फुललेली ५

एकिकडे बघ दूरवरी--गरदी नच ती तेथपरी
जाडा भरडा माल तिथें--नकली नच तो तेथ मिळे
मोल तयाचें--भारी साचें--चिरकालीचें
गोड असें जें तेथ मिळे--विरळा नर तिकडेच वळे ६

अखंड शांती सत्प्रेम--मोक्षाचें सुंदर धाम
भूतदयेचें भांडार--नीतीचेंही माहेर
परमार्थामृत-- निर्व्याजस्मित--सत्कृति परहित
असला माल मिळे जेथें--तींच दुकानें बघ तेथें ७

बाजारीं या घ्यायाचें--तुह्मांस कांहीं घ्यावें.
मोल तसाही माल मिळे--लहान थोरा तत्व कळें
कुजकें सडकें--फुटकें तुटकें--तसें मोडकें
देता मिळतें तसेंचही घ्यावें घ्यावें सुंदरही ८

कुजकें सडकें जें सारें--बनवा त्याचें खत सारें
मनोभूमिमाजी त्यातें--मिळवा मग घाला तेथें
विवेक जीवन--मधुमनमोहन--येइल जीवन
मानसवासी हंसाचें--चिदानंदमय प्रेमाचें ९

घेउनिया मग तो चारा जाऊं आपण बाजारा
निजवस्तुची स्तूती तिथें -करूं नका कुणि तेथ कुठें
शांति न याचा--धर्मनीतिचा--सत्प्रेमाचा
सवदा आपण करूं चला--चारा देऊं मोबदला. १०

कष्ट भिकारी करण्याला--गोड गोड बोला बोला.
मायेचा हा बाजार–क्षणभंगुरही संसार
दो दिवसाचे -कोण कुणाचे–मग कां नाचे
गोड फुकाचें बोलु नये–जेणें देवपणा जगीं ये. ११

——————— के. एल. टेंभुर्णीकर.

## सरस्वतीस.

पद.

देवि सरस्वति ! भेट भेट ये जीव तुला शोधुनि दमला !
खिन्न मानसें सदा भटकतों ! देशी केव्हां भेट मला ?
वनें, उपवनें, नगरेंही
दमलों शोधुनि सकल मही
दर्शन परि झालें नाहीं !
हाय ! हाय ! ही करुनि फिरतों सदैव सोडित अश्रुजला !
देवि सरस्वति ! भेट भेट ये जीव तुला शोधुनि दमला ! १

तेथें फिरशी ? येथें असशी ? असीं फुका ऐशा पडलों !
पूर्ण निराशा झाली माझी व्यर्थ व्यर्थ मी धडपडलों !
निद्रेविण जाती रजनी !
सौख्य न वाटे जनिं विजनीं !
शून्य भासते ही अवनी
दिसे न कांहीं मला त्रिभुवनीं अंधकार सारा भरला !
देवि सरस्वति ! भेट भेट ये जीव तुला शोधुनि दमला ! २

दिव्य तेज तव दिसो पुनरपी; मिळो सुधा प्राशायातें !
‘ असो कृपा तव सदा ’ मागतों इतुकें, देवी ! दे यातें

अशक्य नच तुज, हें करणें !
मज न सुचे त्वद्भक्तिविणें !
व्यर्थ तुजविणें गमे जिणें !
दया करीं तरि इतुकी, नेईं स्थान तुझें तेथें मजला !
देवि सरस्वति ! भेट भेट ये जीव तुला शोधुनि दमला ! ३

पारुजी नारायण मिसाळ.

## विहार.

श्लोक.

सुनील नभ जाहलें हरित मेदिनी शोभली
तशीच सरिता- जलीं विकच पद्म-पुष्पें भलीं;
तिथें करि अहा ! पहा भ्रमर--संघ गुंजारवा
मनोहर विहार हा सकल ताप हारी नवा. १

नितात मधुपालि तन्मधुमरंद सुप्राशिती
सुशात परि पद्मिनी मुकि अहा ! न सत्रासती
प्रमोद मनिं दाटला समय योग्यही वाटला
अहा ! रसिकवृंद हा ह्मणुनि का इथें थाटला ? २

वियोग घडतां जनां विरह ताप देई मना
नसे रचित—कल्पना विदित सर्व कामी जना
सुसेव्य घडता नियोजित तदीय संयोग तो
पुन्हा हृदय-मीलनीं प्रणय--सौख्य संभोगितो ३

गळे सुरस त्यामुळें जल सुरक्त झालें पहा !
वरी हरित हीं बरीं चलित--पद्म-पत्रें अहा
सुरजित जलागणीं कितिक हंस हे पातळे
प्रयोजन कुणीं कशास्तव बरें इथें घातलें ? ४

तडाग सरिता जणों प्रथित मासिकें वाटती
सुवाङ्मयजलें सदा विलसतीं न जीं आटती
तयांत कवि आणि लेखक खरीच पद्मावली
बघूनि विहरे तिथें रसिकहंस भृगावली ५

द. आ. तिवारी.

## द्वादश ज्योतिर्लिंग.

आरती

आरती मन्मथ—दहनाची । शर्वहर गौरि-शंकराची ॥ धृ० ॥

सौम्य जो **सोमनाथ** भक्ता । **मल्लिकार्जुन** प्रेमदाता
दुरितमति **महंकाळ** हर्ता । सुखर -**ओंकार** मुक्तकर्ता

गंगाधरा त्रिपुरहारा !
गौरीवरा मोदकारा !
चर्मांबरा तत्व--सारा !

छेदि भवबंध, नित्य तव छंद, देइ आनंद, बुद्धिही सुपथिं वर्तण्याची १

**बद्रिकेदार** डमरुधारी । **भीमाशंकु** अशुभहारी
**विश्वेश्वर** क्लेश वारी । **त्र्यंबकेश्वर** त्रास सारी

भक्तिप्रिया भीतिहरणा !
संपत्प्रदा सौख्य--करणा !
परशूपिनाकफणिधरणा !

सर्व सुर--वृंद, दिव्य अरविंद, अर्पुनी कुंद, पूजिती मूर्ति नित्य ज्याची २

वद्य अति **वैजनाथ** नित्य । मान्य बहु **नागनाथ** सत्य
**रामेश्वर** सुपूर्ण तत्व । **घृष्णेश्वर** प्रगट वृत्त
नित्यानद नदिवहना !
अजरामराअजितगहना !
दुर्गतीदुरितदु खदहना !
सच्चिदानंद, विभो सुखकद, दास मतिमद, तारिं हा विष्णु चरणिं इच्छि. ३

विष्णु बाळकृष्ण जोशी.

## खोटी खोटी नरममता !

[ चाल—त्रिखड हिंडुनि०

खोटी खोटी नरममता ! नाहीं त्याच्या मनिं समता ध्रु०
जोंवरि मिळतें सौख्य नरा, तोंवरि त्या धृत मार्ग बरा;
कंटक खुपतां तचरणा, करितो अन्यपथकरणा.
पूर्व मार्गफल—कटतर केवल--समजनि तो नर
फेंकी धरुनी निष्ठुरता ! मिळेल ह्मणुनी या सुपथा. १

सदनीं अमुच्या उच वर--चिमण्याचें जें एक घर,
चिमणी अडीं घालि तिथें; चिमणा चिमणी खपलि जिथें;
क्रमें बसोनी, त्यावर दोन्ही, तीं उबवोनी,
पिलें जावळीं दिन भरतां, पोसु लागलीं नच ठरतां. २

पिलें जों न उडण्या शिकलीं; तोंच तयां चिमणी मुकली.
चिमण्यानें मग आणियली--चिमणी दुसरी, जी न भली;
मोह पाडुनी, वेड लावुनी, तिनें शिकवुनी,
सोडियला चिमण पुरता ! ' पिलार्थ कां श्रमतां झुरता ? ' ३

पिलें तयें तीं फेंकियलीं ! पडतांना मीं देखियलीं !
दु:ख जाहलें फार मनीं ! अश्रु पातले या नयनीं ! !
मेलें मी जरि, मम बालक तरि पडेल यापरि !
विचार हा मज आठवतां, रडूं लागलें त्याकरिता. ४

सुमनकांता.

## दिव्य आणि त्याची जाणिव

चाल.– नागिणि चपल खल जिव्हा--

जाणीव मना दिव्याची
सौख्याची, आशेची
छळितसे मला परि साची ॥ ध्रु० ॥

कुसुमांमाजी दिसे दिव्यता
सुखवितसे जी रमणी स्वाता
ती सुमनें मी नच–हें बघता
ये भरति मला शोकाची ! १

निर्मल निर्झर ' झुळझुळ ' गानीं
दावि दिव्यता अपुली हंसुनी
निर्झर नाहीं मी तो बघुनी
मावळे छटा हास्याची ! २

कोकिल तो जइ पंचम लावी
अहा ! दिव्यता मूर्तिमती ही
मज पुढती तैं येउनि राही
हा ! स्मृतिहि छळी मज त्याची ३

काव्यरसाची दिव्य–देवता
विहरे भूवरि तिजला बघतां

रस मी नाहीं येता चित्ता--
नेत्रांत धार अश्रूची ! ४

ज्ञानामृत घट दिव्यचि येथें--
येवासाठीं मन तळमळतें
पडतीं अडवीं सकट--भूतें
होळि होत मम आशेची ! ५

स्वर्गीय सुन्दर प्रणयी--युगुलां
पाहुनि कळलें हतभाग्याला
अशी दिव्यता नाहीं तुजला
राख होय आनंदाची ! ६

जीवित माझें नीरस ठरलें
दिव्याविण हें देउळ झालें
सांग दयाघन ! भाळीं लिहिलें ?
पूर्तता करीं कळसाची ! ७

दिव्य--देवते ! अतीं तरि तें
मंगलमय प्रभु -पद--कमलातें
शाश्वत सेविन--ने दीनातें
दे जोड मला भाग्याची ! ८

गोविन्दानुज.

---

## परमेश्वरप्रार्थना.

### श्लोक.

दयासागरा ! वंदितों मीं पदातें
सदा वारणें सर्वही आपदातें

भवीं पोळलों, माधवा ! तूचि धांवें
अहा ! गांजिती षड्रिपू हे बधानें १

वनीं सन्मुनी साहुनी आतपाळा
तुझ्याकारणें आचरीती तपाला
मला तो नसे ठाउका नेमधर्म
न जाणें कधीं स्नानसंध्यादि कर्म २

मनीं येतसे वीट या संसृतीचा
असे माजला कीट माझ्या कृतीचा
ह्मणोनी विभो ! धीटसा नीट आलों
पदां वंदिता सर्वभावें निवालों ३

मनीं वाटला थोर संतोष देवा
करानें घडावी अशी नित्य सेवा
परी हे रिपू कामलोभादि साही
सदां धावसी पाठिशीं, तूच पाहीं ४

कृपादृष्टिनें बालका या विलोकीं
दया येवढी त्वा करावीच तोकीं
नको व्याप हा संसृती—कर्दमाचा
पुढें फांस लागेल कंठीं यमाचा ५

तुझें नाम गाऊन सेवीन पाय
तराया भवा अन्य नाहीं उपाय
दयाळा ! असे लेंकरू हीन दीन--
सदा तार; मी मीन तू ही नदीन ६

वसंतीं नवी पालवी ये तरूना
कधी घालिशी गुप्त वारी, कळे ना

खगातें मृगातें सदा पाळितोसी
दरिद्री तरी राहिना तो उपाशी ७

मिळे खावया रोज ताजें पशूतें
बिचारा कधीं नेणतो संग्रहातें
नसे काळजी त्यास केव्हां 'उद्याची'
नरासारखा तो न कोणास याची ८

विहंगें कधीं काय कोठार केलें ?
कधीं वेंचुनी धान्य कीं साठवीलें ?
परी तो सुखें नित्य राहे चरून
तया पाळिसी तूंच प्रेमेंकरून ९

यदा घोर दुष्काळ पीडी जनातें
तयीं पाळितो कोण खाया पशूतें
तुझ्यावीण बा ! पाळणारा दिसे ना
अशा पामराना परी हें कळे ना १०

असे मानवा काळजी संसृतीची
खगांना मृगांना नसे भीति तीची
मतिश्रेष्ठ हा व्यर्थ तोरा नरांचा--
वनींचा बरा संघ तो वानरांचा ११

सदा ईश्वरीं भार त्याचा असावा
अशा पामरांचा तसा कां नसावा ?
करावे सदा उद्यमा; लाभ अंतीं--
घडो ना घडो; हर्ष ना दुःख खंती १२

सदा वाङ्मयीं त्यां विहारा करावें
जना अंतरीं सद्विचारा भरावें

असें मानसीं आणुनी लेखणीतें--
करीं घेतसे; साह्य दे सत्कृतीतें १३
मनोभृंग हो दंग नामीं दयाळा !
नसो व्यंग यो रंग काव्यीं कृपाळा !
' मुकुंदा ! ' यशोगान गावो ' विहंग '
कृती चालवी सर्वदा तू अभंग १४

विहंग.

## विलक्षण कैदी.

अभंग.

विश्वकारागारीं । देहाचे पंजरीं
पाखरूं निर्धारीं । बंदी एक. १
पंजर सुदृढ । चर्मे मढवीला,
अस्थींच्या आर्गळा । अवजड. २
नाड्या मज्जातंतू । ऐशा शृंखळांनीं,
पंजर बांधोनी । दृढ केला. ३
ऐसा बंदोबस्त । केला आटोकाट,
तरी अवचट । सुटे कैदी. ४
कैसें कुठोनियां । निघोनि बाहेरी,
नेणो बा भरारी । मारी कोठें. ५
निर्भय चित्तानें । प्राज्यीं अविभाज्यीं,
स्वानंदसाम्राज्यीं । बैसोनिया. ६
दावोनि धाकोल्या । धाकीं ब्रह्मांडासी,
बडी तें काळासी । सामर्थ्यानें । ७
डे विश्व थिटे । खेळतां ठिंगोऱ्या,

कालाच्या भिंगोऱ्या । करोनिया ८
देह शृंगारोनी । समाजबघणें
राजांचीं शासनें । घाली पायीं. ९
मानीना तें कोणा । विलक्षण ऐसें,
जोविलें वारसें । देवचिंही. १०
देवांचा तें देव । राजांचाही राजा
लावी सर्वां वाजा । करायासी ११
सर्वां धिक्कारोनी । बोले तें हांसत,
या हो भालाईत । राऊतांनो ! १२
विश्वीच्या राजांनो । राजसेवकांनो,
कर्णचावकांनो । या या वेगें. १३
कोण मायपूत । आडवील मातें ?
पाहू द्या तयातें । एकवार. १४
अहं जातां मशीं । काय लागे हातीं,
पजराची माती । घ्यावी सुखें. १५
मोडक्या तोडक्या । देहाच्या कोठड्या,
हाडें काड्या मोड्या । पंजराच्या. १६
बोलोनियां ऐसें । लेवें दांत चावी,
वाकोल्या दाखवी । तिरस्कारें. १७
काय त्याची कांति । काय त्याचें रूप,
काय त्याचा छूप । अपूर्वची ! १८
काय त्याची कळा । काय त्याची लीळा,
जाणे तो सावळा । परब्रह्म. १९
याची रूपरेखा । केली नारायणें,
सहाव्या शद्वानें । गीतेमाजीं. २०

जनाच्या मोचना । त्याच्या वा बंधना,
हाच कैदी जाणा । हेतु एक. २१
निरोधू जाणे जो । ऐसा बंदिवाना,
धन्य तोचि राणा । योगियांचा. २२
माझीं त्या वदनें । कायावाचामनें,
अनंताचा ह्मणे । तनय हा. २३

अनंततनय.

---

## प्रभात गीत.

पद. [ चाल:— उद्या बघ जातें. ]

वदे रजनीला ॥ सुप्रभात शांत समयाला ॥ ध्रु. ॥

छाया सारीं तव भेसूर,
द्रुतगति जाइल हा अंधार,
उदया येइल दिव्य दिवाकर
आनंदांत ॥ होशील मग्न तू खचित. १

कष्टदशेची रात्र भयाण,
लांबण तीची सरे न अजुन,
भाग्य भानुचें शीतल किरण,
कधीं फुलवील ॥ हृदयाची सुकली वेल. २

गिरिचें शृंगीं आनंदून,
उषा होतसे विराजमान,
होता तीचें पवित्र दर्शन,
ध्वांत पळालें ॥ आशेचें सुम कीं फुललें ३

तमोगुणांची सपे रात,
सत्व शांतिची होय प्रभात,

उजेड पडला हृदय--नभांत

गातां गाणीं ॥ लीन होय भगवच्चरणीं. ४

मंजुबाळ.

---

## छायागीत.

( झिंझोटी--धुमाळी. )

गुंगे विपिनीं कासारीं

मधुकरी गीत गाणारी ॥ ध्रु० ॥

" लोचनांहीं दिसत नाहीं

त्यास छाया एक राही

मूढ हृदया मोहणारी "--ग,

मधुकरी गीत गाणारी । गुंगे० १

" इंद्रचापीं जे निराळीं

रंग दावी असुनि काळी

सूक्ष्म पाशा सोडणारी "--ग,

मधुकरी गीत गाणारी । गुंगे० २

" प्रभुपदाब्जीं लीन दासी

दीन नमवी निज पदासी

हंसुनि गालीं चुंबणारी "--ग,

मधुकरी गीत गाणारी । गुंगे० ३

" आदि नाहीं अंत नाहीं

चक्र फिरतें जें सदाही

त्यांत रंगें वसविणारी "--ग,

मधुकरी गीत गाणारी । गुंगे० ४

" झांकुनीया दृश्य कारिते
फिरुनि हातीं दृष्टचि धरिते
खेळ ऐसे खेळणारी "—ग,
मधुकरी गीत गाणारी । गुगे० ५

" मळुनि रमता दृष्टि तेजीं
पृष्ठभागीं लोपते जी
प्रेम खोटें निर्मिणारी "—ग,
मधुकरी गीत गाणारी । गुगे० ६

सुमित.

---

## सुभाषित.

### आर्या.

विद्यालंकृत खल नर तरी तयाचाहि संग तोडावा
मणिभूषित--असित--भुजग भयद असे भारि न काय तो डावा १
वस्तू अमित गुण जरी एक्या दोषेंचि निंद्य लोकांत
आहे रसायनपती उग्रें गंधेंचि लशुन तो ख्यात २
मृद्वीका मधुरा मधु मधुरहि ती खड शर्करा भारी
त्याहूनि अत्यर्थ मधुर मधुराधिपनाम जें भवेंभारी ३
जैसें संत कलियुगीं नक्षत्रें तेविं दीसती विरळ
मुनिजनमानससम हें झालें आकाश सर्वही विमळ ४
जैसा सज्जनचित्तापासुनि जन पिशुन फार दूर सरे
केलें पलायन तसें अरुणोदयिं भेकुरें तम प्रसरें ५

धुंडी.

# भिषग्विलास.

## आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी

## प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन ११ वर्षें पुरी झालीं. ह्यांत यथा-प्रकाश, शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग, त्यांचें निदान व चिकित्सा, औषधी व त्यांचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयावर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते. या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारासच न होतां इतर सर्व सुशिक्षित व कुटुंबी माणसांना व्हावा, ह्मणून ह्यांतील माहिती सुलभ भाषेंत दिली जाते. वार्षिक वर्गणी आगाऊ. टपाल ह. सह अवघी १॥ रु.

व्यवस्थापक 'भिषग्विलास'—सोलापुर

---

# श्वासरिपु.

यापासून दमा, खोकला, कफ व त्यापासून ज्वर, अरुचि, निद्रानाश, मलावरोध, अपचनें वगैरे विकार होतात त्यावर तत्काळ गुण येतो. १ बा. ⁄१२ आ. ट. ४ आ.

एजंट—गोगटे आणि कंपनी मुंबई.

पत्ता—जी. डी. भावे वैद्य, पुणें.

---

# श्रीहरिभजनामृत.

ज्ञानांजनाचे संपादक व महाराष्ट्र कवि चरित्रकर्ते रा. भांजगावकर यांनीं निवडलेल्या बहुतेक सर्व जुन्या कवींच्या सर्वोत्कृष्ट व अत्यंत प्रेमळ पदांचा हा संग्रह सर्व सगुणोपासकांच्या डोळ्यांतून खात्रीनें प्रेमाश्रुवर्षाव करवील. किं. ट. व्ही. पी. सह १० आणे.

पत्ता—मॅनेजर ज्ञानांजन, भांगवाडी, मुंबई २.

# अनुक्रमणिका.

## आक्टोबर १९१६


| पद्यसंख्या | | पृष्ठें |
|---|---|---|
| ५९ | वीर-दुहिता. | २१७ |
| १८ | वेदांती [illegible] | २२७ |
| १० | सं[illegible]न. | २३३ |
| ५ | उद्यानातली प्रभात | २३८ |
| १२ | स्वप्नातलें फुल पाखरूं | २३९ |

१०४


---


येत्या दीपवाळीपासून या मासिकास तिसरें वर्ष लागणार !

आकार डेमी अष्टपत्री दरमहा २४ पृष्ठें

# दैवज्ञ-प्रबोधिनी मासिक.

वार्षिक वर्गणी साधारण प्रत रु १। व सुबक प्रत रु २ फक्त

सदरहु मासिकात ज्ञातिविषयक व सार्वजनिक चर्चा येत असते. तसेंच विद्वानांचे सामाजिक, नैतिक, औद्योगिक वगैरे विषयावर उपयुक्त लेख येत असून गोड कविता, मनोरंजक व बोधप्रद गोष्टी व ज्ञातीचें व इतर उपयुक्त वर्तमान टीकात्मक येत असतें. शिवाय पूर्णानंद हें सामाजिक नाटक क्रमशः दिलें जातें व प्रसंगानुसार चित्रेंहि येतात.

व्यवस्थापक, दै. प्रबोधिनी, ठाकुरद्वार, मुंबई नं० २.

# काव्यरत्नावली.

अंक १० वा.

## वीर-दुहिता*.

### सर्ग ३ रा.

कालमहात्म्य-धनहीन पुरुषाची त्याच्या मित्र ह्मणविणाऱ्याकडून अवहेलना-भिल्लवशीकरण-राजाची पुत्राकरिता तळमळ व इतर बालकांविषयीं त्याचें खरें प्रेम.

श्लोक.

काला! तुझें पाहुनि चंड कृत्य,
होतों पहा मी मतिहीन नित्य;
अधन्य वा धन्य तुला ह्मणावें,
मूढास या सांग कसें कळावें. १

ना पाहसी रंक नृपाळ कोणी,
दरिद्रता वैभव तू न मानी,
पाषाणतुल्यांतर तूं बनून
करूं सदा पाहसि धूळधाण! २

खड्गें करीं घेउनि धीर वीर--
रणीं निजारी करिती अधीर;
चित्तीं तुझा ते दर बाळगीती,
तूतें परी नित्य विनम्र होती. ३

---

* ह्या काव्याचा दुसरा सर्ग अंक ४ था ह्यांत आलेला आहे.

## अनुक्रमणिका


| पद्यसंख्या | आक्टोबर १९१६ | पृष्ठें |
|---|---|---|
| ५९ | वीर–दुहिता. | २१७ |
| १८ | वेदांतील काव्य | २२७ |
| १० | समेलन | २११ |
| ५ | उद्यानातली प्रभात | २३८ |
| १२ | स्वप्नातलें फुल पाखरू | २३९ |
| १०४ | | |



ऐत्या दीपवाळीपासून या मासिकास तिसरें वर्ष लागणार !

आकार डेमी अष्टपत्री दरमहा २४ पृष्ठें

# दैवज्ञ–प्रबोधिनी मासिक.

वार्षिक वर्गणी साधारण प्रत रु. १। व सुबक प्रत रु. २ फक्त

सदरहु मासिकांत ज्ञातिविषयक व सार्वजनिक चर्चा येत असते. तसेंच विद्वानांचे सामाजिक, नैतिक, औद्योगिक वगैरे विषयावर उपयुक्त लेख येत असून गोड कविता, मनोरंजक व बोधप्रद गोष्टि व ज्ञातीचें व इतर उपयुक्त वर्तमान टीकात्मक येत असतें. शिवाय पूर्णानंद हें सामाजिक नाटक क्रमशः दिलें जातें व प्रसंगानुसार चित्रेंहि येतात.

व्यवस्थापक, दै. प्रबोधिनी, ठाकुरद्वार, मुंबई नं० २.

# काव्यरत्नावली.

## अंक १० वा.

## वीर-दुहिता*.

### सर्ग ३ रा.

कालमहात्म्य—धनहीन पुरुषाची त्याच्या मित्र ह्मणविणाऱ्याकडून अवहेलना—भिल्लवशीकरण-राजाची पुत्राकारिता तळमळ व इतर बालकांविषयीं त्याचें खरें प्रेम.

श्लोक.

काला ! तुझे पाहुनि चंड कृत्य,
होतों पहा मी मतिहीन नित्य;
अधन्य वा धन्य तुला ह्मणावें
मूढास या सांग कसें कळावें. १

ना पाहसी रंक नृपाल कोणी,
दरिद्रता वैभव तू न मानी,
पाषाणतुल्यांतर तूं बनून
करू सदा पाहसि धूळधाण ! २

खड्गें करीं घेउनि धीर वीर--
रणीं निजारी करिती अधीर;
चित्तीं तुझा ते दर बाळगीती,
तूतें परी नित्य विनम्र होती. ३

* ह्या काव्याचा दुसरा सर्ग अंक ४ था ह्यांत आलेला आहे.

धरातलीं तूं किति शक्तिमान,
तुझ्यापुढें सांग टिकेल कोण ?
नदी पुढें जाइ वहात दूर,
तरू शके काय विरुद्ध शूर ?

राष्ट्रें पहा उद्भवती अनेक,
तुझ्या मुखीं तीं पडती कितीक !
तुझ्या कृपेनें बसती नृपाल--
राज्यासनीं, भोगिते अन्य हाल—

कोणास रे ! त्वत्कृति हांसवीते,
कोणास ती तापद मात्र होते,
मोहीं कुणां पाडुनि नागवीते,
भिन्नाकृती तूं दिससी जनांतें !

मिळे जयाला जगतांत मान,
त्या दंडिसी तू अपराधि जो न;
दुष्टांस केव्हां करिसी क्षमा रे !
विचित्र ही त्वत्करणी असे रे !

आम्रा कुणी प्रस्तर मारिताल,
कोणी जला सिंचुनि, पोषिताल;
द्वैतांश तो आम्र मतींत ठेवी,
छाया फलांतें उभयास देई.

नीचाकृती या जगतीं प्रभूत,
सुधी न ते मात्र विशेष येथ;
सर्वांस अर्पी रवि तो प्रकाश;
तदीय चित्तीं न कु-वासनाश.

असे असोनी विपरीत भाव,
धरूनि तू हे करितोस काय ?
विवेक थोडा करि शांत चित्तें—
होई क्षणीं सौख्य—द मानवातें ! १०

धर्माभिमानी, नयनीतिशास्ता,
प्रजाहिताकांक्षि नृपाल होता;
ऐशा नरा तूं प्रतिकूल होशी,
स्वाभात माती वध काळवीशी ११

पीयूष पाजूनि सदा जनातें,
देणें न त्या इष्ट हलाहलातें;
परी सदा हें तुज गोड वाटें,
घेशी जगीं दूषण आपणातें ! १२

सर्वत्र सत्ता प्रबला त्वदीय,
तिच्यापुढें मानवशक्ति काय ?
त्वां सर्व हें अंकित विश्व केलें!
रे ! सांग तू कौतुक काय केलें ! १३

काळा ! तुला रे नच आदि अंत,
कृती तुझ्या या जगती अनंत;
ब्रह्मस्वरूपा ! तुज हा प्रणाम
घे, घे, सदा हो जनसौख्यधाम ! १४

अस्ता यदा वैभवसूर्य जाई,
तदा नरा कुस्थितिरात्र येई;
चिंतातमोव्याप्त सदैव होतो
नको असा जन्म तयास हो तो ! १५

क्षणोक्षणीं तद्रन—मान--हानी—
होते, पुसे त्या मग नान्य कोणी !
मित्रासही सोडुनि दूर जाती,
केव्हां पुढें त्या नच भेट देती ! १६

हेमांगनावास जिथें सदैव,
येतात मित्रास सहर्ष सर्व;
पाहोनियां तो गुडखंड येती,
पिपीलिका जेविं समोद चित्तीं. १७

द्रव्यार्थ ते वानिति फार त्याला,
त्याच्यापुढें तुच्छिति ईश्वराला !
त्या स्वादु शब्दें करिती प्रसन्न
वाटे जणू श्वानचि पुच्छहीन ! १८

न बोलती ते कटु शब्द त्याला,
त्याच्या सदा ते जपती जिवाला,
तयास जीवाधिक ते गणून,
होती सदा तच्चरणीं विलीन. १९

कोपें जरी तो बदला तयानां,
डोलाविती ते पारिसूनि मानां;
घेती स्वताला समजून धन्य,
स्तुतीविणें ते करितात नान्य. २०

द्रव्यार्थ मित्रस्तुति ऐकुनी ती,
वाटे खरें त्यास समस्त चित्तीं;
श्वानाहुनी ते परि फार नीच,
कळे न त्या मात्र कधींहि हेंच ! २१

पाहोनियां तो नरभाव भोळा,
त्याच्यावरी ते करितात हल्ला;
त्याचा धनी ते बनतात लोकीं,
करूनि त्या बाहुलि. नाचवीती ! २२

' हितैषि आह्मी तुमचे जगात '
ऐसें तथा ते वदतात नित्य,
वाणी किती मंजुळ बोलतासी;
परंतु राहे विष मात्र चित्तीं ! २३

पाजोनि सर्पा पय पीन केलें,
चालोनि नाथावरि जाइ कालें !
तशी असे मित्र--कृती जगांत,
द्रव्यार्थ ते मात्र खरे समस्त. २४

विनष्ट होता धन--संघ सारां
मित्रास त्यातें त्यजिती भरारा;
प्रसंग येता नच साह्य देती,
निंदा करायास तयार होती ! २५

कृतघ्न ऐसे नृप—संगतींत,
अनेक रात्रंदिन राहतात,
प्रसंग येतां मग दूर जाती,
सानंद तद्दुःख बघून होती ! २६

गावूनियां तत्स्तुति, आळवीती,
विशेषणें व्यर्थ अनेक देती,
असत्पथा लाविति दुष्ट त्यातें,
कुतींत या दुःख न त्यास वाटे. २७

यदीय हस्तीं धन तो कुलीन,
सुधी सुवक्ता नच त्यासमान,
पवित्र त्याचा सहवास नित्य,
वित्ताश्रयीं सद्गुण सर्व सत्य. २८

प्रफुल्ल होता सुमभृंग येई,
विलुप्त होतां मधु, दूर जाई
सरीं असें जों जळ हंस खेळे,
सोडी यदा तें सर सर्व वाळे. २९

जळून जाई गृह सर्व जेव्हां
सोडोनि जाती जन त्यास तेव्हां;
भूपाल तो भ्रष्ट बने कुदैवें
ते सोडिती आश्रित त्या कुभावें. ३०

ऐश्वर्यछाया जग सर्व आहे,
मित्रत्वही कोकजळा परी हे;
पाडी प्रसंगीं व्यसनीं जनाला,
मित्रास सारे जगतीं धनाला ! ३१

आपत्काल बघोनि त्या नृपतिचा[1] धिक्कारुनी चालले.
येथोनी यवनाधिपाश्रितजनीं सानंद ते राहिले !
सन्मित्राविण कोणि ना अनुसरे दुर्दैवि भूपाप्रती,
आहे कोण खरा सुमित्र, कळतें लोकीं नरा संकटीं. ३२

मंत्री यदा देउनि धीर गेले,
तेव्हां नृपाचें मन शांत झालें;

१ शिवरत्न.चा.

पुढील उद्योग करावयाला,
उत्साह येई मग फार त्याला. ३३

'मारूनि केव्हा रिपु राज्य हातीं—
घेईन' ऐसें शिवरत्न चिंती;
विचार इत्येतर तो करी न,
होई उपायीं बहु त्या विलीन. ३४

भिल्लांस घेवोनि वनीं शिकार—
करावया जात नृपाल वीर;
दावूनियां प्रेम सदा तयातें,
घेई करोनी वश तत्कुलातें. ३५

गिरीवरी आणिक पायथ्याशीं,
होते खरे भिल्ल सदा निवासी;
झाले नृपा तेच सहायकारी,
शनैः शनै होउनि शस्त्रधारी. ३६

शक्ती करी वास अपार देहीं,
भीती तया दूर पळूनि जाई;
धिप्पाडसे देह बघून त्यांचे,
वाटे जणूं दिग्गज ते स्थलाचे. ३७

नसे तया ज्ञान गिरीशिवाय,
असे जगत् पर्वत तो तदीय;
समस्त होते व्यवहारशून्य,
वसे मुखीं क्रौर्य, हृदीं इमान. ३८

मांसाविना अन्य न अन्न खाती
रानीं सदा वस्त्रविहीन येती;

रहावया झोंपडि ती तृणाची,
पात्रें कशाचीं[१] तर मृत्तिकेचीं. ३९

कसें असें राज्य न त्यास ठावें,
न जाणती धर्म कुणा ह्मणावें;
स्वतंत्रतेनें करणे विहार,
रुचे तया नित्य वनीं शिकार. ४०

ऐशा नरानां शिवरत्न होई,
धनी तया वस्त्र धनान्न देई;
झाली जयें यद्वदनें सतेज,
रविप्रभेने फुलते सरोज. ४१

धनी तया तो शिवरत्न झाला,
ते लागले नित्य जपूं तयाला;
प्राणाहुनी प्यार नृपा गणून,
देती तदाज्ञेस सदैव मान. ४२

युद्धात शस्त्रें स्वकरीं धरावीं -
कशीं, हळू तो नृप त्यास दावी,
झाले पुढें ते तरबेज त्यात,
कळेल त्याचा समरांत थाट. ४३

सेवा सदा ते करिती नृपाची,
संपादिती नित्य कृपा तयाची.
नृपास कैसा उपयोग झाला,
कळेल तेही पुढती तुह्माला. ४४

अद्यापि होता नृप पुत्र--हीन.
गणी स्वताला ह्मणुनीच हीन;

" पुत्राविणें हा नर जन्म व्यर्थ !
स्वर्गीं मिळे सद्गति त्या न सत्य. ४५
मेल्यावरी देइल वारिदान
सुताविणें या मज अन्य कोण ? "
चिंता करी तो नृप नित्य ऐशी,
तों हीन आली स्थिति त्या नृपासी ! ४६
पुत्रार्थ त्यानें बहु यत्न केले,
देवादि सारे किति आळवीले.
पाहूनि, सिद्धी लव येत नाहीं,
ठेवूनि दैवावर भार राही. ४७
होती नृपातें प्रिय फार बाळें,
त्याच्यासवें तो बहुवार खेळे;
मुलासवें बोलुनि बोल गोड.
पुरे करी सर्व तदीय कोड. ४८
अस्पष्ट वाणी, नव बाललीला,
पाहूनि हो मोद किती नृप ला,
प्रेमप्रकर्षें उचलून त्यास,
सेवी तयाच्या अधरामृतास. ४९
" ऐसें न मातें सुत रत्न एक, "
घेता मुलां त्या बहु होय दुःख;
नेत्रांस येई जलपूर फार,
ठेवी परी दुःख मनात वीर ! ५०
' गर्भान्विता पाहिन मी सतीला--
' केव्हां-- ' असें नित्य गमे तयाला,

'कधीं तिचें मी पुरवीन कोड ?
'येईल का तो मज काल गोड'? ५१

'चन्द्रापरी पुत्र सतीस झाला,
'करीतसे तो किति बाललीला;
'राजन्! चला त्यास पहावयातें,
'असें कुणी काय ह्मणेल मातें? ५२

"रोगी कराया बरा जगात--
पीयूष आलें जणु मूर्तिमंत"
'ऐकूनि ते बोल असें ह्मणेल,
'स्वतास मी धन्य तदा गणीन. ५३

'अत पुरीं सुदारिच्या शिरेन,
'सलज्ज होईल मला बघून;
'देईल उत्थापन; सुंदरी ते,
'पाहोनिया होइल सौख्य मातें ५४

'आणील दासी मम नंदनास,
'प्रेमोद्गमें घेइन मी तयास;
सानंद मी चुंबिन तन्मुखाला
'जेणें रडू येइल फार त्याला. ५५

'पाहोनि हें मत्सखि घाबरोनी,
'जाईल, घेईल सुता उठोनी;
'चुंबूनि त्या, कोपमिषें ह्मणेल.
'भाजी नसे, कोमल फूल बाळ!' ५६

'ऐकूनि तद्भाषण तें सरोष,
हलू विनोदांत ह्मणेन तीस;

' सर्व स्त्रिया मात्र दयाळु लोकीं—
' नरांतरीं निर्दयता वसे कीं ? ५७

' गालीं जरा या वरती हसेल,
' गंभीरता नंतर ती धरील,
' होईल तें देखुनि सौख्य मातें
' आलिंगुनी चुंबिन मी तियेतें ! " ५८

तो कल्पनावस्त्र सलोभ--चित्त--
भावी सुखें पूर्ण करी सचित्र;
करी तमोयुक्त कुदैव--वारि,
झालें तदा दुःख नृपास भारी ! ५९

आनंदी—रमण.

## वेदांतील काव्य.

( ऋक्संहिता, अष्टक १ अध्याय ६ सूक्त ९२ वें. )

ऋचा १ ली.

एता उ त्या उषसः केतुमक्रत पूर्वे अर्धे रजसो भानुमञ्जते
निष्कृण्वाना आयुधानीव धृष्णवः प्रति गावोऽरुषीर्यन्ति मातरः

पूर्वार्धीं गगनांगणीं उभवुनी केतू, उषा माउली—
तेजातें पसरीत येति जगतीं कैशी प्रभा फांकली !
शस्त्रास्त्रें परजीत ये भट जणों वत्सार्थ वा धेनुका
ह्या येताति तशा उजेड जगतीं पाडीत माता न का ? १

ऋचा २ री.

उदपप्तन्नरुणा भानवो वृथा स्वायुजो अरुषी र्गा अयुक्षत
अक्रन्नुषासो वयुनानि पूर्वथा रुशन्तं भानुमरुषीरशिश्रयु॑

ज्याचे लाल सुरेखसे किरण हे कैसे उड्या मारिती !
तेजस्वी, अवढाळ ज्या न, असल्या गाई रथा शोभती !
पाडावा जगतीं उजेड अपुला हा नेम सारावया
तेजाच्या चमका लकाकविति ह्या, लोकां सुखा द्यावया २

ऋचा ३ री

अर्चन्ति नारीरपसो न विष्टिभिः समानेन योजनेना परावतः
इषं वहन्तीः सुकृते सुदानवे विश्वेदह यजमानाय सुन्वते

सदा यज्ञीं ठेवी कुटुनि पिळुनी सोम बरवा
सदाचारी जो कीं विमल हवि अर्पी विपुल वा
अशा भक्तासाठीं विभव भरुनी येति दुरुनी
रथातूनी वेगें युवति, जणु दर्पा प्रकटुनी ! ३

ऋचा ४ थी.

अधि पेशांसि वपते नृतूरिवापोर्णुते वक्ष उस्रेव बर्जहम्
ज्योतिर्विश्वस्मै भुवनाय कृण्वती गावो न व्रजं व्यु षा आवर्तमः.

वाटे ही नटवी, उषा ह्मणु कशी जी रंगढंगा करी
दावी जी उघडोनि वक्ष, पदरा टाकोनि, धेनूपरी

गाई जाति चरावया करुनिया गोठा रिकामा तशी
द्याया ही जगता उजेड, उघडें टाकी तमातें कशी ! ४

ऋचा ५ वी.

प्रत्यर्ची रुशदस्या अदर्शि वि तिष्ठते बाधते कृष्णमभ्वम्
स्वरुं न पेशो विदथेष्वञ्जञ्चित्रं दिवो दुहिता भानुमश्रेत्

हिची उजळिली प्रभा ! वितळला तमाचा गिरी !
अलंकृत शरीर ही करित यज्ञयूपापरी !
द्युलोकतनया अहा ! कितिक चोज कीं दाखवी !
प्रकाश अपुला पहा चमकवी ! जगा पोंचवी ! ५

ऋचा ६ वी.

अतारिष्म तमसस्पारमस्योषा उच्छन्ती वयुना कृणोति
श्रिये छन्दो न स्मयते विभाती सुप्रतीका सौमनसायाजीग:

बरे अंधाराच्या मगरमिठितूनी निसटलों !
भलें झालें ! दीप्ती पसरित उषा ये; हरिखलों !
बऱ्या काव्या ऐशी धरि विमल सौंदर्यपदवी
प्रसादासाठीं ही कराणि, हसरें तोंड सुचवी ! ६

ऋचा ७ वी

भास्वती नेत्री सूनृतानां दिवस्तवे दुहिता गोतमेभि
प्रजावतो नृवतो अश्वबुध्यानुषो गो अग्राँ उपमासि वाजान्

वाङ्माधुर्य तसेंच सत्य हृदयीं जीच्या कृपेनें स्फुरे
जीचें स्तोत्र करीति गोतम मुनी सर्वार्थ ज्यांचा पुरे
ती तू देसि सदा द्युलोकदुहिते! सामर्थ्य आह्मांप्रती
जेणें संतति, धेनु, अश्व, नर ते कीं शूरसे लाभसी ७

ऋचा ८ वी.

उषस्तमश्या यशस सुवीर दासप्रवर्गं रयिमश्वबुध्यम्
सुदससा श्रवसा या विभासि वाजप्रसूता सुभगे बृहन्तम्

सामर्थ्यांतुनि जन्मसी! बल तशी कीर्तीहि लोकोत्तर
तैसें उज्ज्वल तेजही तळपतें! तें कोंवळें अंतर
घोडे, सेवक, वीर, पाहुनि उषे! तूझ्या कृपेचे जना
'याचें वैभव केवढें!' निजमनीं होते अशी भावना ८

ऋचा ९ वी.

विश्वानि देवी भुवनभिचक्ष्या प्रतीची चक्षुरर्विया वि भाति
विश्वं जीवं चरसे बोधयन्ती विश्वस्य वाचमविदन्मनायोः

जगावरति एकदा नजर फेंकुनी मागुती
उषा भगवती पहा फिरविते पुन्हा तीप्रती
उजेड, निजल्या जिवा करुनि कामकाजास्तव
कवित्व मतिन्यासवें उठवि, घे करोनी स्तव! ९

ऋचा १० वी.

पुनः पुनर्जायमाना पुराणी समान वर्णमभिशुभमाना

श्वघ्नीव कृत्नुर्विज आमिनाना मर्तस्य देवी जरयन्त्यायुः

वारंवारचि जन्मते परि जिला प्राचीन हें बोलती
ते ते रंग जयां अशीं धरितसे भूषावरें तींच तीं
जैसा हिंसक धावता भिवविता शस्त्रास चमकाविता
श्वानायुष्य हरी जनायु हरण्या तैशी उषा ये स्वता १०

ऋचा ११ वी.

व्यूर्ण्वती दिवो अन्ताँ अबोध्यप स्वसारं सनुतर्युयोति
प्रमिनती मनुष्या युगानि योषा जारस्य चक्षसा वि भाति

उषा जागी झाली धवळवित आकाशकुहरा
निशारूपी धाडी निज भगिनि कीं दूर नगरा
मनुष्यायुष्याचा अवधि वध आखूड करिते
प्रियाच्या कातीनें थटुनि रमणीशी चमकते ११

ऋचा १२ वी.

पशून्न चित्रा सुभगा प्रथाना सिन्धुर्न क्षोद उर्विया व्यश्वैत्
अमिनती दैव्यानि व्रतानि सूर्यस्य चेति रश्मिभिर्दृशाना

अब्धी, जेंवि तरंग फेंस असले नाना चमत्कार हा–
दावी, तेंवि उषा पशूस उघड्या रानात ओढी पहा
वा! वा! ही किति फार दूर चमके! आश्चर्य दावीतसे
ईशाज्ञा करण्यास ही रविकरीं तेजावरीसें दिसे! १२

ऋचा १३ वी.

उषस्तच्चित्रमाभरास्मभ्य वाजिनीवति येन तोकंच तनयंच धामहे

आर्या.

बलवति उषे ! अह्मां दे-जेणें मुलगे तशींच नातुंडें
देखों, असलें दुर्मिळ भाग्य; न व्हावींत वांकुडीं तुडें १३

ऋचा १४ वी.

उषो अद्येह गोमत्यश्वावति विभावरि रेवदस्मे व्युच्छ सूनृतावति

माधुर्यसत्यमिश्रितवचने ! तू पूर्ण कीं गवाश्वानीं
यास्तव भाग्यार्थ अह्मा झाकावें मंगल प्रकाशानीं १४

ऋचा १५ वी.

युक्ष्वाहि वाजिनीवत्यश्वाँ अद्यारुणाँ अप. अथानो विश्वासौ भगान्यावह

भगवति उषे ! अससि तू अनुपम सामर्थ्ये भाग्यसंपन्न !
जोडुनि लाल, रथाला घोडे सुख आमुच्याकडे आण १५

ऋचा १६ वी.

अश्विनावर्तिरस्मदा गोमद्दस्रा हिरण्यवत् अर्वाग्रथंसमनसानियच्छतम्

श्लोक.

अहो ! अश्विनीदेव ! शत्रूस थारा नसे, त्वद्भयें कांपती ते थरारा !
पशू आणि सोनें घरीं साठवाया रथा ऐक्यभावें इथें घेउनी या १६

ऋचा १७ वी.

याविल्था श्लोकमादिवो ज्योतिर्जनाय चक्रथुः आन ऊर्जं वहतमश्विनायुवम्

आर्या.

हे अश्विनीसुरानो ! घेउनि सामर्थ्य या अह्मांकारिता

स्वर्लोकांतुनि अणिलें तेज तुह्मीं साधण्यास लोकहिता १७

ऋचा १८ वी.

एहदेवामयोभुवा दस्राहिरण्यवर्तनी उषर्बुधो वहन्तु सोमपीतचे

श्लोक.

स्वशत्रू मारूनी जनसुखसमाधान करिती

सुवर्णाच्या मार्गीं रमत रमता जे विचरती

सकाळीं जे जागे सुरवर तयां घेउनि घरीं

पिण्याला सोमा हे उभय सुर यावे झडकरी १८

—— दत्तात्रेय तुकाराम पणशीकर.

## संमेलन.

( चाल—आनंदी आनंद गडे ! )

संमेलन हें विश्वाचें !

प्रेमाचें आनंदाचें ! ध्रु०

विश्वांतरिं हें हृदय झुलें

प्रेमवृत्तिंना करुनि खुलें

एकतानता पावोनी

विश्वीं मन गेलें विरुनी

स्वार्थवृत्ति ती मावळली

प्रेमसुमें हृदयीं फुलली

चराचरीं विश्वावरती
फेरा धरु या चल हातीं
आनंदानें—निर्मलतेनें—गातां गाणें
समेलन हो वृत्तींचें
प्रेमाचें आनदाचें ! १

धुवुनि तुंग गिरि--शिखराला
रजनिपती ये उदयाला
मृदु स्पर्शुनी कुमुदिनिला
हळूच हंसवी संध्येला
रजनि--वदन होतें लाल
अनुरागें केलें विमल
प्रेमालिंगन मग झालें !
मी--तू—पण तें मावळलें !
कौमुदि निर्मल- स्रवली उज्ज्वल—दिव्य प्रेमल
समेलन एकत्वाचें
प्रेमाचें आनदाचें ! २

वसंत विश्वावरि फुलला
हांसवुनी या जगताला
वितरुनि विमल प्रेमाला
उपवनिं करुनी नव लीला
वनदेवी सुमहार करी
तयास प्रेमानें वितरी

हृदयालिंगन--मधुकालीं
        एकचि हृदयें तीं झालीं
पुष्प गळालें--अश्रू बनले--स्वार्थ निमालें
    ' प्रेमैक्य ' हि तें अश्रूंचें
        प्रेमाचें आनदाचें ! ३

निर्झर मजुल गान करी
        तुग विटपयुत--कड्यावरी
मदानिल हळु येवोनी
        फुलवी कलिका हंसवोनी
चकोर नाचे रव करुनी
        स्रवे कौमुदी ती भुवनी
प्रेमाचा मधु आलाप
        होइ कुठें तों आपाप
त्या गानाचे--त्या हसिताचें--मधुर रवांचें
    समेलन आलापाचें
        प्रेमाचें आनदाचें ! ४

प्रेमांकित स्वर्गगेळा
        ऊत येइ मृदु हृदयाला
प्रेमाचा ऐकुनि सूर
        धरि ती विश्वाचा फेर
होउनिया मग बेहोष
        विसरि सहज आत्मभास

"एक नाद" विश्वीं उरला
भरुनी हृदयीं पाझरला
अश्रु गळाले--तारे झाले--अंबर खुललें!
संमेलन मणि--मालांचें
प्रेमाचें आनंदाचें! ५

सरिता धांवे नगातुनी
करि आघात किती विपिनीं!
'घो! घो!' निस्वन करुनि पुढें
तल्लिन होउनि कोणिकडे
विहरत जाई दूरवरी
नाथाच्या शोधात परी
रत्नाकर मग तिज दिसला
प्रेमोदधि तो तिज गमला
तत्प्रेमातरिं--ओती लहरि--विलीन सागरिं--
मीलन होई सरितेचें
प्रेमाचें आनंदाचें! ६

करैक ठेवुनिया गालीं
प्राणेश्वरि विरहें बसली
प्रियकर जाउनि मागोनी
नयन झाकि मृदु हस्तानीं
कर सोडवुनी विलोकिता
नेत्रांचें मीलन होता

प्रेमालिंगन मग झालें
हृदयीं हृदय विरुनि गेलें !
पुष्पें गळलीं--हृदयें फुललीं--वाचा हरली
संमेलन तें कुसुमाचें
प्रेमाचें आनंदाचें ! ७

प्रेमळ निर्मल हृदयाचें
मित्र विलग होती साचें
प्रेमांकित हृदयावरती
मूर्ती उमटे परि ती ती
चिंतन करितां करितांना
घेता प्रेमाच्या ताना
विरत हृदांतरिं मन झालें
स्वय नेत्र रमले, मिटले
मीलित नयनीं--अश्रु ढाळुनी मूर्ति ये क्षणीं
संमेलन हो हृदयांचें
प्रेमाचें आनंदाचें ! ८

अगणिं पाहुनि शिशु--लीला
माता हृदयीं बहर आला
बोल मधुर तो बोलोनी
रंजवि सकला खेळोनी
जननी मागुति पाहूनी
खेळ तिथें टाकोनि क्षणीं

कवळी स्वकरीं मातेला
प्रेमाचा करुनी झेला
चुंबन घेउनि--हृदयीं धरुनी--हंसली जननी
समेलन वात्सल्याचें
प्रेमाचें आनंदाचें !

प्रेमल परमेशा बघुनी
भक्तांतर जाई फुलुनी
कवि विश्वावर बहु भ्रमुनी
विहार वेड्यापरि करुनी
' वेडें गाणें ' धरुनि मनीं
फिरे जनीं वा कधिं विपिनीं
' काव्य देवि ' बघता नयनीं
नाद हृदीं हो प्रतिश्वसनीं
त्या काव्यांचें—त्या हृदयांचें—त्या नादांचें
संमेलन हो विश्वाचें
प्रेमाचें आनंदाचें ! १०

गिरीश.

---

## उद्यानांतली प्रभात.

श्लोक.

उपवनीं अजि या नटल्या लता
हसुनि दाविति आत्मिक चारुता
मधुर गंधित ती सुमनें जना
करिति दान कुळव्रतमंडणा १

नवफलांकित पादप शोभती
द्विजहि आश्रय घेउनि राहती
निज रवा पवनीं मिळवोनिया
सहज लाजविती सुखिं योगिया २

तृण न अथरिला नव गालिचा
हरित चित्रित कीं हरिगेहिंचा
न जलयंत्र अहा सुरबालिका
बसुनिया फिरवी मणिमालिका ३

न कमळें कुणि या कमलानना
जल -विहार जसा रुचला मना
मिळवुनी सखिया जळिं खेळती
हसुनिया नयनीं गुज बोलती ४

रविस तें कळलें गुज अबरीं
ह्मणुनिया सुषमा रुचिरा धरी
मधुर–गायन–लपट भ्रमर
द्रुत–विलंबित--वृत्त मनोहर. ५

वसंत--विहार.

---

## स्वप्नांतलें फुल पांखरूं.

पद.

" थांबे पळ फुल पाखरा ! पळशी काय ह्मणून ?
बाळपणींचा स्नेह कीं जाशी रे विसरून ? १

कोठें इतुका काळ हा बालविलास रमून ?
मी तर कंठीं काळ ह्या जीवा कंटाळून ! २

ते दिन--येती काय रे बाल्याचे परतून ?
तुजसह गेले धावता खिदळत बागेंतून ! ३

ते दिन येती काय रे खेळाचे परतून ?
तुजसह गेले क्रीडता आनंदांत बुडून ! ४

ते दिन येती काय रे पुष्पांचे परतून ?
हे दिन कंटक--हाय रे ! निघती का उपटून ? ५

ते दिन—परि मी काय रे नाहीं हें जाणून ?
सुटला शर ना ये कधीं धन्वाला परतून ! ६

गेला निर्झर का कधीं परते सिंधूतून ?
गेला दिन ना ये कधीं परत अनंतातून !-- ७

तूं तर मुक्तचि ! काळ ही राहे तुज वचकून !
निर्मलचरिता ! राहशी बाल सदा होऊन ! ८

तू रे मुक्तचि ! दुःख ही राहे तुज वचकून !
निष्कामत्वें हिंडशी सुखमय पुष्पांतून ! ९

मी परि बद्धचि ! हाय रे ! जाशी काय उडून ?
बालपणींचा स्नेह कीं टाकिशि तो तोडून ? १०

मी संसृतिनें बाटलों, पळशी काय ह्मणून ?
बाल्याचा परि काळ मी जाई का विसरून !" ११

स्वप्नातुनि ह्या जागा होतां जीवा कंटाळुनि न गेलों !
परि मद्बालें, मूर्त बाल्य, त्या--सह क्रीडत ठेलों ! १२

भालचा.

---

# भिषग्विलास.

## आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी

## प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन ११ वर्षें पुरीं झालीं. ह्यात यथा-प्रकाश, शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग, त्याचें निदान व चिकित्सा, औषधी व त्यांचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयावर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते. या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारांनाच न होता इतर सर्व सुशिक्षित व कुटुंबी माणसांना व्हावा, म्हणून ह्यांतील माहिती सुलभ भाषेंत दिली जाते. वार्षिक वर्गणी आगाऊ टपालहशील सह अवघी १॥ रु.

**व्यवस्थापक 'भिषग्विलास'—सोलापुर**

---

# श्वासरिपु.

यापासून दमा, खोकला, कफ व त्यापासून ज्वर, अरुचि, निद्रानाश, मलावरोध, अरुचनें वगैरे विकार होतात त्यावर तत्काळ गुण येतो. १ ला ८।१२ आ. ट. ४ आ.

एजंट—गोगटे आणि कंपनी मुंबई.

पत्ता—जी. डी. भावे वैद्य, पुणें.

---

# श्रीहरिभजनामृत.

ज्ञानांजनाचे संपादक व महाराष्ट्र कवि चरित्रकर्ते रा. भांजगांवकर यांनी निवडलेल्या बहुतेक सर्व जुन्या कवींच्या सर्वोत्कृष्ट व अत्यंत प्रेमळ पदांचा हा संग्रह सर्व सगुणोपासकांच्या डोळ्यांतून खात्रीनें प्रेमाश्रुवर्षाव करवील. कि. ८ व्ही. पी. सह १० आणे.

**पत्ता—मॅनेजर ज्ञानांजन, भांगवाडी, मुंबई २.**

# काव्यरत्नावलीची किंमत किती कमी आहे ?

एकाच नांवावर एका प्रतीस टपाल व्हीपीसह किंमत १। रु. दोन प्रतीस १॥ रु. तीन प्रतीस १॥। रु. चार प्रतीस २ रु

रत्नावलीची मागील बाईंड केलेली पुस्तकें रद्दीच्या भावानें विकण्याचा प्रसंग आला आहे. हीं सर्व अनुक्रमानें घेतल्यास प्रत्येक पुस्तकास आठ आणे फुटकळ पुस्तकास दहा आणे टपाल व्हीपी खर्च मुळींच नाहीं ज्यास ही पुस्तकें एकदम घेण्यास सवड नसेल, त्यास प्रत्येक महिन्यास एक एक पुस्तक पाठविण्यांत येईल.

संपादक काव्यरत्नावली जळगाव.

---

## नवीन काव्य ! अगदीच नवीन प्रकारचें काव्य !

# प्रवासी.

इंग्रजी वाङ्मयास ललामभूत असणारीं जीं कित्येक सुंदर व अमूल्य रत्नें आहेत त्यामध्यें आंग्लकवि गोल्डस्मिथचें 'ट्रॅव्हलर' काव्य बरेंच प्रसिद्ध आहे. त्याची ख्याति आज सर्वत्र होत आहे. अशा सर्वांग सुंदर काव्याचें आम्ही मुद्दाम मराठी आर्याबद्ध भाषांतर करविलें आहे या काव्यावरून १८ व्या शतकांतील यूरोपीय समाजस्थितीचें साद्यंत चित्र डोळ्यापुढें उभें राहतें. पुस्तकास आम्हीं कवीचें चरित्र देऊन काव्याचें चिकित्सक विवेचन केलें आहे; व प्रत्येक सर्गाचें प्रारंभीं विस्तृत विषय प्रवेश दिला आहे त्यामुळें काव्य समजण्यास फारच सुलभ जातें. पुस्तकाची किंमत ८॥ व्ही पी नें ८६

सेक्रेटरी

**मनोरंजक पुस्तकमाला भोर.**

॥ श्रीः ॥

# काव्यरत्नावली

आलीकडील कविमंडळीनें चालविलेलें

**कवितेचें मासिकपुस्तक.**

श्लोक.

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती। त्या त्याच अर्थाप्रति दाविताती
कौशल्य मोठें रचनेंत आहे, । सत्काव्य तेणें नव वाटताहे.

वर्ष २७ वें ) नोवेंबर सन १९१६ ( अंक ११ वा.

हें मासिक पुस्तक नारायण नरसिंह फडनीस यांणीं जळगांव जिल्हा पूर्वखानदेश येथें नवीन पेठ म्युन्सिपल घर नंबर २४ मध्यें आपल्या बाबजी प्रिंटिंग छापखान्यात छापून जळगांव येथें प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १। रुपया.

बाबजी प्रिंटिंग प्रेस जळगांव

## अनुक्रमणिका.


| पद्यसंख्या | नोव्हेंबर १९१६ | पृष्ठें |
|---|---|---|
| ५२ | गीतांजलि | २४१ |
| १५ | राजा मुचकुंदकृत श्रीकृष्णस्तुति | २४७ |
| १४ | कवीचा अर्ज | २५० |
| २० | कुसुमांजलि | २५२ |
| १० | कन्येस उद्देशून | २५६ |
| १६ | हेमंतवर्णन | २५७ |
| १२ | विहगविज्ञापना | २६० |
| ११ | सुखदुःख | २६१ |
| १ | सुभाषित | २६४ |
| १७१ | | |



येत्या दीपवाळीपासून या मासिकास तिसरें वर्ष लागणार !

आकार डेमी अष्टपत्री दरमहा २४ पृष्ठें

# दैवज्ञ-प्रबोधिनी मासिक.

वार्षिक वर्गणी साधारण प्रत रु १। व सुबक प्रत रु २ फक्त

सदरहू मासिकांत ज्ञातिविषयक व सार्वजनिक चर्चा येत असते. तसेंच विद्वानांचे सामाजिक, नैतिक, औद्योगिक वगैरे विषयावर उपयुक्त लेख येत असून गोड कविता, मनोरंजक व बोधप्रद गोष्टी व ज्ञातीचें व इतर उपयुक्त वर्तमान टीकात्मक येत असतें. शिवाय पूर्णानंद हें सामाजिक नाटक क्रमशः दिलें जातें व प्रसंगानुसार चित्रेंहि येतात.

व्यवस्थापक, दै. प्रबोधिनी, ठाकुरद्वार, मुंबई नं० २.

# काव्यरत्नावली.

रत्नावलीच्या कायम वर्गणीदारास ही सूचना नाहीं

## ही सूचना चार अंकांतून येईल.

सन १९१७ सालची वर्गणी वसूल करण्याकरिता जानेवारीचा अंक व्हीपीनें पाठविणार आहों करिता ज्यास सदर सालात वर्गणीदार रहावयाचें नसेल त्यानीं ही सूचना वाचताच कार्डानें कळवावें ह्मणजे त्याजकडे व्हीपी न पाठवितां त्याचें नाव कमी करण्यात येईल ज्याकडून अशी खबरदारी घेतली जाणार नाहीं ते अर्थात् वर्गणीदार आहेत असें समजून त्याजकडे व्हीपी रवाना होईल तें त्याणीं कृपा करून घ्यावें.

संपादक, काव्यरत्नावली जळगांव.

तत्पादध्वनि आयकूनि नच मी जागा जहालों तरी—
तूह्मी मात्र मला न जागृत करा हो ही दया यावरी.
प्रात कालिक वायुनें खगरुतें वा अन्य ऐशा मिषें—
निद्रेचा मम भंग मित्रजन हो! होवो न वाछीं असें. २११

माझीं नेत्रें उघडतिल तद्धास्ययुक्तास्यतेजें,
गाढ स्वापीं मधुर पडतें ज्यापरी स्वप्न ज्योजें;

* हें काव्य बरेंच मोठें असल्यामुळें ह्याचे दोन भाग करण्यात आले आहेत. पहिला भाग गेल्या वर्षाच्या बाराव्या अंकात समाप्त झालेला आहे. दुसऱ्या भागाचा आरंभ ह्या अंकातून होत आहे.

त्या रीतीनें मज पुढति तो राहिलेला उभा मी--
मोहोद्रेकें निरखिन अहा ! गाढनिद्राविरामीं. २१२

जो आदितेज सकलींहि मह:प्रसारीं;
रूपें यदीय दिसतात जगांत सारीं;
तो सन्मुख त्रिभुवनेश उभा दिसावा;
सद्भाव हाचि मनिं रात्रदिनीं वसावा. २१३

जीवात्म्यास मदीय जागतिमधें होणार जी स्फूर्ति ती--
हर्षाची प्रथमा अपांगचलनें होवो तुझ्या श्रीपती !
होणारा लय नामकीन भगवन् ! माझ्याच ठायीं खरा;
ठाको लीन करोनि रूपिं तव तो मातें क्षणीं ईश्वरा ! २१४

४९

## सायं.

प्रभातकालिक शांतिसमुद्रीं खगकुलगीतें लाटा--
मदमधुरगति उसळोनीयां तो हेलावत असतां-- २१५
मार्गपार्श्वगततरुप्रसूनें मुदित हसितमुख दिसली--
गगनतलस्थित विच्छिन्नाबुदिं सौवर्णश्री भरली २१६
निघनि जाता ऐशा समयीं स्वोद्योगाचे ठायीं,
नैसर्गिक त्या श्रीवरि अमुचें लक्षांचें गेलें नाहीं. २१७
आह्मीं गाणीं न गाइलीं तीं आनंदानें कांहीं;
न खेळलों वा गमलों हसलों अक्षर वदलों नाहीं. २१८
जों जों वेळा जात चालली तों तों वेगें आह्मी--
अपुलें पाउल टाकूं लागलों जाया अपुल्या धामीं. २१९
दिनमध्यावरि जगत्प्रकाशक आला तीं खद्योत;
पारावत खग घुमूं लागले ठायिं ठायिं छायेंत. २२०

विशुष्क पर्णें नाचत सुटलीं गरगर समुष्ण पवनीं;
वटद्रुमाच्या छायेमाजी निजला धनगरहि वनीं. २२१
श्रांत जहालों चालुनि ह्मणुनी विश्रम घेण्यासाठीं—
तृणशय्येवरि मीहि पहुडलों सुस्थ जलाचे कांठीं. २२२
मजला पाहुनि मन्मित्रांना हांसें भारी आलें;
डौलानें वरि माना करुनी सर्व चालते झाले. २२३
नुसतें मागें वळुनि देखिल नाहिं पाहिलें त्यांनीं;
अदृश्य झाले बघतां बघतां दूरवरी जावोनी. २२४
मैदानें गिरि माळ उतरुनी प्रवास सतत केला,—
दूरदूरच्या प्रदेशिं त्यांना विश्राम नच मिळाला. २२५
' सततपथिक हो ! अहो ! वीर हो ! तुह्मी धन्य आहांत.
साधु ! साधु ! ' हें ह्मणत तयांना असलों त्या जागेंत. २२६
जननिंदेची क्षति नच धरितां, छल त्रास साहोनी,
नाहीं हललों परंतु मी त्या अपुल्या स्थानावरुनी. २२७
बहुत रंजलों आणि गांजलों दैन्यनिपीडित झालों;
संतोषानें तरिहि राहिलों स्वत्वा विसरुनि गेलों. २२८
पडुनि कवडसा अङ्स्कराचा वृक्षांच्या छायेंत,
वेलबुटी जी दिसे बघुनि ती झालों प्रमुदित शांत. २२९
ज्या हेतूनें करीत होतों प्रवास मी तो गेलों—
विसरुनि त्या घन छायेमध्यें गानीं गुंग जहालों. २३०
निद्रावश मी असतां मूर्ती सुहास्यवदना ! तूझी--
जशी पाहिली तशीच दिसली तंद्री जातां माझी. २३१
प्राप्ति तुझी करुनि घ्यावयास प्रयास पडतिल भारी;
वाटत होती भीती ही परि दूर जहाली सारी. २३२

५०

श्लोक.

होतों करीत भजना तव कोपऱ्यांत;
येतांचि तत्स्वर विभो ! तुझिया श्रुतींत,--
सिंहासनावरुनि येउनि शीघ्र खालीं,
तू पातलास उटजात मदीय दारीं. २३३

देवा ! सुंदर मंदिरात तुझिया एकत्र भक्ताग्रणी--
होवोनी भजनात रंगुनि बहू जातात रात्रंदिनीं
आहे भक्त नवीन मी तव, परी या वाकड्या बोबड्या--
मद्गीता परिसोनि येइ भरतें प्रेमोदधीतें तुझ्या. २३४

भवद्भजननिस्वन त्रिभुवनात जो राहिला--
सदा दुमदुमोनि, त्यामधिं विमिश्रणा पावला--
मदीय करुणध्वनी, परि मदर्पितें तू सुमें--
विभो ! मुदित होउनी उतरलासि खालीं गमे. २३५

५१

गेलों ग्रामपथातुनी गृहिं गृहीं भिक्षा यदा मागत,
आला दृष्टिपथीं सुवर्णमय तें स्वप्नापरी त्वद्रथ.
आश्चर्यें बहु होउनी चकित मी उद्गारलों तत्क्षणीं--
'कीं वाटे मज हा समस्तनृपतिस्वामी असावा कुणी.' २३६

गेल्या वाढत वासना, मज पुढें येणेंपरी वाटलें--
माझे दुर्दिन संपुनी दिवस हे आलेच कीं चांगले;
यांचेवीण मिळेल भीक मजला संपत्ति ही फारशी;
ऐसें योजुनि वाट पाहत उभा मी राहिलों त्या दिशीं. २३७

होतों ज्या स्थळिं मी उभा रथ तुझा त्याच स्थळीं थांबला;
दृष्टी फेकुनि माझियावरि रथाखालीं तुझी पातला--
देवा ! हास्य करीत मंजुळ; तदा चित्तीं असें भावलें--
कीं, साहाय्य निजें करें नियतिनें ऐसीं मला दीधलें. २३८

पुढतिं तूं सहसा उजवा निज--
कर करोनि मसी वदसी अज.
जवळि काय असे तव वस्तु जे,--
वितरणार्ह तुवा मज देइजे. २३९

जो अत्यंत दरिद्र त्या मजपुढें त्वां राजराजेश्वरें--
मागायास्तव भीक हस्त अपुला कैसा करावा बरें ?
नाथा ! राजविनोद पाहुनि तुझा साश्चर्य मी जाहलों;
गेलों गोंधळुनी, अनिश्चितमती झालों, उभा राहिलों ! २४०

मीं आपुल्या काढुनि झोळितून--
बाहेर तें एकचि फार सान--
दाणा, तुझ्या पाणितलामधें त्या--
तो टाकिला कीं मग सर्वदात्या ! २४१

सायंकाळीं जेधवां आपुली मीं--
झोळी केली भूमिपृष्ठीं रिकामी;
तों धान्याच्या राशिमध्यें 'भिकारी !
'आश्चर्याची गोष्ट ही देखियेली' ! ! २४२

दाणा एक लहानसा तुजसि जो होता करें अर्पिला,
सोन्याचा कण तेवढाच दिसला त्या राशिमाजी मला !
हेरोनी रडलों तदा ढळढळां, चित्तीं मला वाटलें,--
मी दुर्भाग्य किती तरी ! तुज न का सर्वस्व म्यां वाहिलें ? २४३

## ५२

### साक्या.

अधिकाधिक तो पडूं लागला रात्रीचा अंधार
दैनिक कृत्यें सर्व आमुचीं झालीं होती पार २४४
शेवटिं येइल जो प्राघूर्णक रात्रीचा मुक्काम
करुनी राहिल असे वाटलें आह्माप्रति तो ठाम २४५
सर्व गावच्या बंद जाहल्या वेशी वदले कांहीं--
लोक, भूपती येइल, हासुनि आह्मी ह्मटलें नाहीं. २४६
इतुक्यामध्ये दारावरती थापेचा आभास--
झाला, आह्मीं वदलों कीं हा वारा आहे खास. २४७
दिवे मालवुनी घ्यावी निद्रा ह्मणुनी आह्मी शयनीं
पडलों कांहीं लोक ह्मणाले वाचि कहर हा कोणी २४८
हासत हासत आह्मी ह्मटलें आहे वारा साच
निशीथ कालीं अह्मी ऐकिला निस्वन एक तसाच २४९
अर्ध्या मुर्ध्या झोपेमध्यें आह्मा गमलें ऐसें
हादरली भू डोलु लागल्या भिंतीही आपैसें २५०
झोपेमध्यें बहु जहाला त्रास त्यामुळें आह्मां
कांहीं जण ते वदले आहे रथचक्राचा ध्वनि हा २५१
अर्धावस्थित निद्रेमध्यें पुटपुटलों हा साचा
गडगडाट नभिं होतो आहे आलेल्या मेघाचा २५२
होती शिल्लक रात्र बरीशी तुतारिचा इतुक्यात
शब्द ऐकिला आणी आले शब्द असे कानात २५३
उठा झडकरी उशीर लावूं नका आमुच्या चित्तीं
धडकी भरुनी उडूं लागे हृदय वाटली भीति २५४

राजाचें हें निशाण देखा दिसू लागलें, आह्मी--
सहसा उठुनी उभे राहिलों बदलों मग भाषा ही २५५
स्वारी आली राजाची पण न प्रकाश दीपाचा
सिंहासन नच केलें, नाहीं पत्ता हारतुऱ्याचा २५६
लाजिरवाणी किती गोष्ट ही शृंगारितही नाहे
मंदिर केलें एक ह्मणाला वृथा बोलणें आहे २५७
रिक्त करानें नृपास भेटा नाहीं अगदीं जींत
शृंगाराचें साधन न्या हो ' त्याला त्या खोलींत २५८
दारें उघडा शखहि आस्फुत स्वारी निशीथकालीं
राजाची या भयाण सदनीं उदासवाण्या आली २५९
आकाशामधि जलद गर्जती चपला गाढ ध्वाती
चमकति फाटकि चटई पसरा अंगणात तुमची ती २६०
उग्र रात्रिचा स्वामी राजा रुद्र बोलती ज्याला
संगें घेउनि वादळ अपुल्या एकाएकीं आला २६१

पुढें चालू.

---

धूर्जटी.

## राजा मुचकुंदकृत श्रीकृष्णस्तुति.

श्लोक.

हृदादतमुदा, तदा, नमुनि इंदिराचंदिरा
नृपेंद्र, मुचकुंद, तो दमित दानवा सुंदरा
असें सजलवारिदद्युतिस त्या जगन्मातृका
वदे, मधुर या, गिरा, जनसिताब्जजैवातृका, १
अगम्य तव मायया अजित मोहिले, हे, जन,
विवंचित, परस्परीं, करिति या भवीं मज्जन

सुखास्तव असर्थ कीं असुखदीं अगारादिकीं
स्त्रिया पुरुष सर्वही भजति नाथ ! तूतें न कीं २
सुरा नृतनु लाहुनी असुलभाहि अव्यग ती
प्रयत्न करिता न जीविषयिं लोक हे रंगती
उपासिति पदांबुजा न तव अंधकूपामधें
पडे तृणविलुब्ध तो पशु जसा कुपापानिधें ३

अगा प्रणतसन्नगा धरुनि मींहि देहात्मता
प्रमत्त नृपतामदें बहुत होउनी सात्वता
वधूतनयकोशभूविषयिं रानलों श्रीहरे !
मुधा दवडिला पहा सकल काल चितातुरें ४

मनोरथपरंपरासततचिंतनें भागला
अशा विषयलालसा परमलोभिं जो गुंगला
असावधजना जसा बघुनि राहुनी सावध
क्षुधार्त अहि आखुचा करिशि तू तयाचा वध ५

शरीरिं नृपतित्व हें धरुनि कुंभकुड्यासमीं
चतुर्विधदलासवें जिणुनि सर्व गोत्रेस मीं
प्रभो ! तुज अव्हेरिलें सकल काल हा श्रीमदा
वरूनि बहुमूल्य गा खपविला नमत्कामदा ६

पुरा बसुनि हिंडलें कुतालिं कानकीं स्यंदनीं
मतंगजिंहि लाभलें नृपति नाम ज्यातें, जनीं
शरीर मम गाजितां अदय कालरूपें तुवां
पुरीष, कृमि, पावतें प्रथित, नाव तें, भस्म वा ७

निवृत्त जरि जाहला नृपति सगरापासुनी
समुद्रवलयांकिता त्रिकल भूमि जोपासुनी

तरी तरुणकामिनीजननिकेतिं खेलामृगा
समान परतन्त्र तो चहुंकडे भ्रमे बाउगा ८
मिळेल मज निश्चयें सुरपतित्व, साम्राज्य, वा
ह्मणोनि तप आचरी विहित सर्व कर्मीं सवां
समस्त विषया निरासुनि इयांत जन्मांतरीं
तथापि न मिळे तया लवहि सौख्य ही खातरी ९
अनुग्रह, तुझा घडे भवनिमग्न मर्त्यां जधीं
समागम सुसाधुचा जडुनि सद्गुरो ! त्या तधीं
तदीय मति रगते तव पदाब्जि भृगापरी
उपासनबळें तया मग मिळे विमुक्ती हरी ! १०
मदीयहि यदृच्छया विभव पावला बा ! लया
अनुग्रहचि मानितों तव महान् प्रमोदालया !
यदर्थ वनिं राहुनी तप चरावया वांछिती
सुसाधु भवभजना तुजसि ज्या, सदा याचिती ११
अगाधकरुणानदा ! तव पदांबुजोपासन
पथाविण दुज्या विभो ! मज वराचि, गा, आस, न,
करूनि अपवर्गदा तव, सदा, समाराधन
वरील वर कोण जो, पुरुष आत्मया बंधन १२
ह्मणोनि विभवप्रदा ! त्रिगुणबंधना ! त्वद्धरा
विसंडुनि निरंजना, परम पुरुषा, मावरा
अनूह्यविभवा ! परात्पर गुरो ! प्रभो ! निर्गुणा
प्रपंचदवनीरदा ! शरण तूंसि सच्चिद्घना ! १३
पापीं मी बहु तप्त म्या, न, जिणिले कामादि वैरी बळी
मातें दैववशें कशी तरि अता शान्ती पुरी लाभली

आलों पादसरोरुहीं शरण मी तूझ्या परात्मन् मला
रक्षीं शोक हरी, हरी ! अभय दे आपत्तिहन् निर्मला १४
श्रीमत्भागवतीं नृपेंद्रकृत हा व्यासोक्तिनीं वर्णिला
श्रीकृष्णस्तव जो शुकें कथियला भूपें समाकर्णिला
साधूनी बहु वानिला जडवरें म्या प्राकृतीं आणिला
याची थोर पवित्रता ह्मणुनिया मत्पापिणी वाणिला १५

धूर्जटी.

---

## कवीचा अर्ज.

### श्लोक.

श्रीरुक्मिणीरमण तूं मुनिमानसाचा—
हंस; प्रभो ! असशि चालक जीवनाचा
जीवेश्वरैक विमल स्थल मंगलाचें
हें ध्यान नित्य जनरंजनशील साचें १

विश्वंभरा सकल वेदविशारदा तूं
आनंदसागरचि भक्त जना, न किंतु
निष्कामभक्तिबल संतजनीं वसे, ते
होती समर्थ, विमला, तुज जाणण्यातें २

तेथें, मति, प्रभुवरा, मग मादृशाची
होणार कुंठित, कळे, परि मानसाची
धाव, प्रभो, प्रबळ, हा जन हाय ! मूढ
ठावें न ज्या अहह ! अल्पहि भक्तिगूढ ३

धिग्धिक् कवित्व मम हें त्रिजगन्निवासा—
झालें ! अहा ! विसरलों तुजलागि कैसा ?

हा हा ! वृथा फुगुनि गर्वभरेंचि नाचे
मी; ज्ञानलेश न मला, तव रंजनाचें ४
जेथें तुझें हृदयरंजन किन्नरांनीं--
केलें; तसेंचि मुनिनारदतुंबरांनीं
लोकीं तुझ्या, पसरिलें विमला यशातें
वीणारवें; विसरलों जनिं मीपणातें. ५
तूतें प्रभो ! वळविती बहु साधु संत
प्रेमोद्गमें करिशि खेळ अहा ! अनंत
ही देवभक्तजनसात्विक भक्तिलीला
साधेल केंवि वद या मतिमंद बाला ६
गाया यशःप्रद विभो, तव मंजुगीतें
वाणी, प्रसन्न झणि होय न या जडातें
गेलें कवित्व अवघें मम हें लयाला
जेव्हां अहा ! विसरलों तुझिया पदांला ७
व्यंग्यार्थ शून्य, अति कर्कश गीत वाचे
बोलावया अहह ! हें मम चित्त कांचें
त्रैलोक्यरंजनपरा नव रंजनातें
वाणी न, तों अहह ! धिग् मम जीवनातें ८
गाणीं, जिला, तव यशःप्रद तीं कराया
येती न, ती मग, मला जगदेकराया
वाणी कशास ? मज मौनचि आवडे हो !
रामस्तवाविण वृथाचि कवित्व लाहो ९
केलीं अनंत कथनें रडलों वृथा मी
नाहीं परंतु रतलों तव नामनामीं

शिक्षा जरी करिन तू ह्मणशील मातें
बंधा; असे परि दयाचि दयाघनातें १०

जेथें सुरासुर तुझे गुण गाउनीया
गेले थकोनि, मग त्या स्थलिं पामरा या
योजी; असें ह्मणतसे मतिमंद हा मी
क्षुद्र, प्रभो अहह ! दे रुचि गोड नामीं ११

आलों तुला शरण मी सुजनाभिरामा !
नामाविना क्षण नये मज अन्य कामा
वाणी, तुझें भजन सतत ती करोनी
होवोचि धन्य; पुरवी मम ही शिराणी १२

तू देव, दास तव मी तवदर्शनाची--
आशा वसे, ह्मणुनि मी तुज आजि याची
तूं भेटि देउनि कधीं, मम, वासुदेवा
घेशील सांग विमला पदपद्मसेवा १३

केव्हा प्रभो ! हृदयमंदिरिं बोधसूर्य--
पावोनिया उदय होइल आत्मकार्य
तूतें मनीं स्मरुनिया सुमनोभिरामा !
मी वांछितों सतत सुंदर रामनामा १४

विठ्ठल भगवंत लेंभे.

---

## कुसुमांजलि.

[ एका सुंदर उद्यानांत चांदण्या रात्रीं स्वैर विहार करीत असतां, बरोबर नेलेला एक सुंदर बालक, तेथील फुलें आपल्या चिमुकल्या हातानीं तोडून, शेजारच्या कारंजात फेकून खेळू लागला; खेळतां खेळता त्यानें बऱ्याच ओंजळी पाण्यांत फेकल्या व शेवटीं त्याकडे पहात स्तब्ध उभा राहिला.

पद.

( चाल:-- 'उघाड नयन रम्य उषा'-- )

उघळिं [1] उघळिं मृदुकरिं जाळें कुसुमाञ्जलि, बाला !
सुखवित ही मम हृदया प्रेमळ तव लील ॥ ध्रु० ॥

विहरसि सुंदर उपवनिं
कुसुमगंधमधु सेवुनि
मंद पवनलहरिमधनिं
करुनि नर्तनाला १

खुडुनि करीं कुसुमांजलि
हृदयाशीं मग धरिली
दृष्टिभरें पाहियली
करूनिया स्मिताला २

पाहुनि ती कुसुमांजलि
प्रेमवृत्ति तव फुलली
कारंजाजवळिल जळिं
उधळिलि सुममाला ३

कारंजातिल फवार
लहरि करिति सलिलावर
सुमनावलिवर सुखकर
करित नर्तनाला ४

जलबिंदूसह निघालि
कारंजीं कीं सुमालि [2]
नव कलिकेपरि खुलली
हसवुनि जगताला ५

कुसुमें जलिं नृत्य करिति
मोद-लहरि तोंच उठति
तव हृदया अचल करिति
सेवि लीनतेला ६

एकान्ता रम्य कालिं
प्रेमळ ही करित केलि
प्रेमवृत्ति लीन झालि
रम्य बाल--लीला ! ७

जलाकाशगत--सुमगण -
पाहुनि, नभिं तारांगण--
लज्जित हो तेजोहिन
दीन चंद्र झाला ८

' नभिची ती तारकालि '
पाहुनि ' भूवरि आली, '
तारापति अंबरतलिं
स्तब्ध काय झाला ! ९

जगताचें भान तुला
नुरवि सुमावलि अतुला
प्रीति झरे दिव्याला
संगम मधु झाला १०

प्रेमाची एकतान
निनदुनि करि हृदयिं गान
हरुनि सकल हृदय-भान
वितरि हर्ष तूला ११

प्रीतीची संगमता
पाहुनि तव हृदिं आता
कविनयनीं तव सरिता
निर्मि अश्रु--माला १२

उद्यानीं सकल फुलें
त्यांत मधुर--गंध फुलें
मम हृद, तूं, हींहि फुलें
विश्वचि फुलझेला १३

जळिं नाचति सुमनावलि
स्वच्छंदें सेवि लहरि
जीव तसे स्वैर--केलि
सेवु चिरसुखाला ! १४

जीवात्मा एकभाव
एकरूप विमल होय
मी--तूं--पण एक--जीव
होय या क्षणांला १५

सुमनांजलिसह तुजला
कवळू कीं हृदयाला
सिंचुं अश्रु--सुमनाला
सेवु दिव्यतेला १६

सुमनें तीं मग सारीं
हृदयाच्या कासारीं
प्रेमाच्या सलिलांवारि
करितिल नृत्याला १७

जागृत तो स्फूर्ति होइ
गाणीं अगाइ गाइ
हृदय निनादुनि सेची-
एकतानतेला १८

प्रेमाचें दिव्य गान
नादित करि विश्वरान
सोडिल मग हृदयभान
करुनि गायनाला १९

तरि घे करिं कुसुमांजलि
उधळिं धवल सुंदर जलिं
गाइन मग 'गीतांजलि'
हृदयिं धरुनि तूला २०

गिरीश.

---

## कन्येस उद्देशून.

साक्या.

आतेच्या तू गृहासि जासी स्वजनी मज जरि येथें
कुशलहि तव मज वारंवारि कळतें परि मन माझें तेथें १
मधुरवचांहीं अपुल्या जरि तू रिझविशि सकलां तेथें
परि तव शद्बध्वनि मम कर्णीं घुमतो जणु गे! येथें २
क्रीडा तव त्या अनेकपरिच्या स्मरती मजला बाळे!
तुझ्याविणें तव भगिनी आता आनंदें नच खेळे ३
संसारामधि त्या त्या कृति मी करितां, मातें बघसी

---

१ एक गोडसें सुंदर काव्य.

न कळत अपुल्या खेळामधिं तू कित्ता जणुं गिरवीसी ४
कोमल कर ते पसरुनि अपुले घे, घे, मज ह्मणतांना
दंतपंक्ति तव पाहिन केव्हां मधुर हास्य करितांना ५
क्षणभरि लटकें मजवरि रुसुनी मजशि अबोला धरितां
पाहिन केव्हां तुज बाळे ! मी भ्रूभंगातें करितां ६
' सत्वर येतें ' वदुनी ऐसें टाकुनि जातां तूंतें
धांउनि वेगें, मृदुल कराहीं धरिलें तूं तैं मातें ७
बंधन तव तें मृदुल करांचें अपुरें ही मज झालें
प्रेमरज्जु अति कठिण तयांनीं जखडुनि मी गे ! गेलें ८
गात्रें सर्वहि शिथिल होउनी नयनीं अश्रू येती
दिसे न काहीं कोठें आहे, मी झालें मूढ--मती ९
क्षणभर तुजला सोडुनि जातां माझी स्थिति ही ऐशी
श्वशुर--गृहा जाता तव साहिन दीर्घ वियोगा कैशी ? १०

———— सौ. शांताबाई रुणसे.

## हेमंतवर्णन.

( रामायणावरून. )

साक्या.

राहत असता सुखें रघूद्वह शारद होय समाप्त
सर्वजनप्रिय नंतर झाला हेमतर्तु प्राप्त १
प्रभातकालीं एके दिवशीं रघुनंदन हेमतीं
स्नानासाठीं प्राप्त जहाला गोदातीरप्रांतीं २
कलशहस्त तो विनयी लक्ष्मण वीर मागुनी, चाले
विदेहतनयेसह तो ऐसे रघुवीराते बोले ३
प्रियवदा तुज रामा प्रियकर काल प्राप्त जहाला

जेणें संवत्सर हा शुभकर गमे अलंकृत केला ४
शीतरूक्ष तनु लोक जहाले शस्यालंकृत अवनी
अनुप भोग्य तीं जलें जहालीं सेव्य वाटतो अग्नी ५
नव धान्यांहीं देवा पितरां सज्जन पुजिते झाले
नव्या पूर्णिमे दिवशीं त्याचें पाप लयाला गेलें ६
जनपद गोरससमृध्द, झाले, धान्यांहीं संपन्न
स्वारी करण्या जिगीषु भूपति फिरती गृह सोडून ७
पितृ दिशेच्या अग्राशीं या काळीं उगवे सविता
तिलकविहीन स्त्रीसम दिसते उत्तरदिक् रघुनाथा ! ८
हिम कोशाचें विशाळ आलय निसर्गतां जो आहे
दूर सूर्य, गिरि हिमवान् झाला अन्वर्थक अजि पाहें ९
मध्यान्हींही सुंदर रविकर सौख्य, स्पर्शें देती
यात्रा सुखकर जल, छाया हीं जना नकोशीं होतीं १०
अतिशय शीतें सर्व तरूचीं पर्णें गळुनी जातीं
ह्मणुनी दिसतीं शून्य अरण्यें मंद होय रविदीप्ती ११
रात्रि, आजला झाल्या मोठ्या तुहिनधूसरित होती
उष्णांतर्गृह सोडुनि कोणि, न बहिप्रदेशीं निजती १२
ग्रीष्मकालिं जो सुंदर चंद्रिर जना सुखावह होतो
तुषार--धूसर--मंडळ असुखद तेजोविहीन दिसतो १३
तत्सौभाग्य, प्रविष्ट झालें सूर्यामाजी ह्मणुनी
नि:श्वासांधुक आदर्शासम दिसे मलीमस गगनीं १४
शोभे जेंवि, न, आतपयोगें पडली सीता काळी
पूर्ण चंद्रिका तेविं धुक्यानें मलिन दिसे या काळीं १५
स्वभावतां जो स्पर्शें शीतल हिमकणसंयोगानें
द्विगुणित शीतल होउनि वायू वाहे वरुणदिशेनें १६

गोधूमांचीं आणि यवांचीं क्षेत्रें प्रशस्त असतीं
ज्यामधि सारस पक्षी क्रौंचहि मंजुल मंजुल गाती १७
बाष्पाच्छादित अशीं अरण्यें उदयगिरीवरि चढता
दिनमणि, शोभायमान दिसती कितीतरी रघुनाथा १८
खर्जूराच्या फुलाप्रमाणें ज्यांच्या आकृति असती
पूर्णत्वानें ज्यामधि तंदुल भरलेलसे दिसती १९
अशा तऱ्हेच्या तवऱ्यानीं ज्या किंचिन्नम्रा शाली
राजति रानोरानीं स्वर्णद्युती बहुत या वेळीं २०
हिमकणसंवृत त्रिसर्पिकिरणीं गगनीं वर आलेला
उष्ण किरण हा शशीप्रमाणें दिसतो सकल जनांला २१
प्रातस्तन, हा, सुखकर, आतप, अल्पकाल मध्यान्हीं
तुषारसंवृत ईषत्पांडुर क्षितिवरि शोभे पाहीं २२
दहिंवर पडुनी जिचीं ओलसर सकल शाद्वलें झालीं
कोमल आतप पडुनि त्यावरी क्षितितें शोभा आली २३
बहु तृष्णाकुल अरण्यहस्ती अतिशय शिशिर जलाला
स्पर्शुनि केवल लोंच घेई मागें नैजकराला २४
जलसंचारी विहग बैसले सलिलसन्निधीं जरि हे
रिघती न जलीं समरीं जैसे भीरु पुरुष वा ! पाहें २५
हिम वर्षावें, किंच, तमानें, व्याप्त होउनी रातीं
प्रभातसमयीं दाट धुक्यानें पुष्पें जळतीं गळतीं २६
ज्यांच्यामधल्या वृक्षलताचीं ऐशा अरण्यपंक्ती
गाढ स्वापीं मग्न जाहल्या जणूं वाटतें चित्तीं २७
हिमवृष्टीनें कमलदलेंही समस्त झालीं जीर्ण
अखिल केसरें झडलीं झाल्या सर्व कर्णिका शीर्ण २८
ऐशा रीती हेमंतानें केलें विध्वस्त

नालशेष हे केवल कमलाकर निष्प्रभ दिसतात २९
दाट धुक्यानें ज्याचीं सलिलें सकल शाकुनी जाती
ह्मणुनि त्यातले सारस पक्षी दृष्टिपथीं नच येती ३०
ज्ञात होति ते निज विरुतानीं ज्याच्यामधली सिकता
हिमार्द्र होते निजतीरानीं शोभति भारी सरिता ३१
तुषारपतनें प्रभाकराच्या मंदत्वानें आणी
शैत्यें लागे गिर्यग्रस्थित मधुरचि बहुधा आणी ३२

श्लोक.

हेमंताची वर्णना यापरीनें
केली काव्यीं सस्कृतीं वाल्मिकीनें ३३
आणीना ती प्राकृता मंदधी मी
श्रीरामाच्या अर्पितों पादपद्मीं ३४
सृष्टीच्या ज्या व्यापृती सर्व होती
सर्वेशाची होय लीला अहो ! ती ३५
शांतें चित्तें सर्वदा गात जावी
ऐशी लोका बुद्धि तेणेंचि द्यावी ३६

धूर्जटी.

---

## विहगविज्ञापना.

पद.

करुं नको घाई । करुं नको घाई
बा विहगा ! क्षणभर राहीं ॥ ध्रु०

सुखस्वप्नसें वसत ऋतुचें
तव गान करी मोहित माचें
यास्तव कौतुक तव गा[illegible] चें

पुरें नच होई । पुरें नच होई
　　बा विहगा ! क्षणभर राहीं १

क्षण थांबावें क्षणभर गावें
क्षणभर आम्रफलादिक खावे
परि येथुनि क्षणही नवजावें
अन्य कोठेंहि । अन्य कोठें ही
　　बा विहगा ! क्षणभरि राहीं २

वर्षासमयीं चिंब भिजोनी
जाइन येथें व्यर्थ ह्मणोनी
अशापरीची चिंता स्वमनीं
नको तुज कांहीं । नको तुज कांहीं
　　बा विहगा ! क्षणभरि राहीं ३

घरात माझ्या रुचेल तेथें
रहा सख्या ! तूं निर्भय चित्तें
नाहीं तरि माळ्यावरि घरटें
करुनिया राहीं । करुनिया राहीं
　　बा विहगा ! क्षणभरि राहीं ४

माझी मुलगी गोजिरवाणी
प्रेमें तुजला दाणापाणी
घालिन ह्मणत्ये मी नेमानीं
तिची विनती ही । तिची विनती ही
　　बा विहगा ! क्षणभरि राहीं ५

मुलांमुलींना भार्येलाही
सवय लागली बहु तव पाहीं

गानप्रिय तैसें सुखदाई
तुझें सकळां ही। तुझें सकळां ही
बा विहगा! क्षणभरि राहीं ६

मांत्रिक अससी तूं बा! खास
नातरि अतरिंचा या त्रास
कैसा जाय वदे विलयास
मधुर गानाहिं। मधुर गानाहीं
बा विहगा!० ७

सन्निधान तव सदैव शमवी
हटक चटक घटकाभरि रमवी
गानधना! कर तुजला विनवीं
जोडुनी दोही। जोडुनी दोही
बा विहगा!० ८

गानरसाच्या एका घोटें
समाधान जें हृदयां होतें
त्यापुढतीं अमृताचें खोटें
सौख्य बा! पाहीं। सौख्य बा! पाहीं
बा विहगा!० ९

सघन गगन जें विशाल भारी
तेथें मारिसि सदा भरारी
पयोद सहचर तव उपकारी
तसा तूं होईं। तसा तूं होईं
बा विहगा!० १०

तुझ्याभोंवतीं घिरट्या घेतें
जिकडे जासी तिकडे जातें
मन माझें तुजविण यापरतें
घरीं नच राहीं । घरीं नच राहीं
बा विहगा !० ११

माधव पखावीणें पाखरुं
वय जारि मोठें तरी लेकरुं
आळ घेउनी बसलें न करुं
शके त्व काहीं । शके त्व काहीं
बा विहगा !० १२

माधव गोविंद भिडे.

## सुखःदुख.

अजनी गीत.

सुखदु खाचें चक्रचि फिरतें, कधीं मानवा सुसौख्य देतें;
कधीं तयाला दु खि लोटितें, खेळ असे त्याचे. १
एक वस्तुची उभयहि अंगें, सुखदु खें ही तैशी संगें;
कधिंहि न त्यांची जोडी भंगे, अभिन्न ते दोघे. २
दिवसामागुनी रजनी येते, लाभामागुनी हानी होते;
सौख्यामागुनि दु.ख असें तें न टळे कोणाला. ३
जरिही प्राणी जन्म पावला, निश्चित आहे मृत्यु तयाला !
लय आहे कीं उत्पत्तीला, दृष्य सर्व लोपे. ४
मग कां मनुजें दु.ख करावें, सुखदु खें हीं येति स्वभावें
स्वीकाराया सिद्ध असावें, सदैव हो ! त्यातें. ५
तमें दाविलें कीं तेजाला, श्रमाकारणें विश्रांतीला;

तैसें दु खास्तव सौख्याला, महत्व तें आलें. ६
सुख येतां त्या उपभोगावें, परि जाता तें दु खि न व्हावें;
येतें जातें निज स्वभावें, मग का शोक उगा. ७
सुखदु:खाविण रहित असें तें, पाहों जातां स्थल नच दिसतें,
परी महात्मे जन जे त्यातें, तेंही स्थल गवसें ८
सुखदु:खादिक जेथें नाहीं, भेदाभेदहि नुमगे कांहीं;
ऐसें स्थळ ज्या व्हावें त्याहीं, ज्ञानीं विहरावें ९
ज्ञानिं रमलें चित्त जयाचें, सुखदु:खादिक त्याला कैचें;
तोडुनि बंधन अहंपणाचें, सर्वरूप बनला. १०
अहंभाव हा जेथें नाहीं, सुखदु:खाचें न चलें कांहीं;
धनी तयाचा होउनि राही, गुलाम ते त्याचे. ११
उदया येतां जेवीं सविता, दीपतेज वा तमहि त्वरिता;
नाश पावतें क्षण न लागता, ज्ञानरवी तैसा; १२
ह्यास्तव मनुजें ज्ञानिं रमावें, सुखदु:खातुनि मुक्त चि व्हावें;
ना तरि तेणें सिद्ध असावें, प्राक्तन भोगाया. १३

अनंतसुत.

## सुभाषित

श्लोक.

विद्या फक्त वितंड वाद करण्या; मोठा ह्मणाया धन;
लोकां व्यर्थ छळावया बल; सदा इच्छीति कीं दुर्जन;
विद्या संशयनाश फक्त करण्या; लोकोपयोगीं धन,
दीनाच्या परिपालनीं बल, सदा इच्छीति कीं सज्जन, १

विश्वनाथ नारायण रेंड.

# भिषग्विलास.

## आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी

## प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन ११ वर्षें पुरी झालीं. ह्यांत यथाप्रकाश, शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग, त्यांचें निदान व चिकित्सा, औषधी व त्यांचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयांवर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते. या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारांसच न होतां इतर सुशिक्षित कुटुंबी माणसांना व्हावा, म्हणून ह्यांतील माहिती सुलभ भाषेंत दिली जाते. वार्षिक वर्गणी आगाऊ टपालहसह अवघी १॥ रु.

**व्यवस्थापक 'भिषग्विलास'—सोलापुर.**

---

# श्वासरिपु.

यापासून दमा, खोकला, कफ व त्यापासून ज्वर, अरुचि, निद्रानाश, मलावरोध, अपचनें वगैरे विकार होतात त्यावर तत्काळ गुण येतो. १ बा. ६१२ आ. ट. ४ आ.

एजंट—गोगटे आणि कंपनी मुंबई.

पत्ता—जी. डी. भावे वैद्य, पुणें.

---

# श्रीहरिभजनामृत.

ज्ञानांजनाचे संपादक व महाराष्ट्र कवि चरित्रकर्ते रा. भाजगावकर यांनीं निवडलेल्या बहुतेक सर्व जुन्या कवींच्या सर्वोत्कृष्ट व अत्यंत प्रेमळ पदांचा हा संग्रह सर्व सगुणोपासकांच्या डोळ्यांतून खचित्रीनें प्रेमाश्रुवर्षाव करवील. किं. ट. व्ही. पी. सह १० आणे.

**पत्ता—मॅनेजर ज्ञानांजन, भांगवाडी, मुंबई २.**

# अनुक्रमणिका.

अनुक्रमसंख्या — दिसेंबर १९१९ — पृष्ठें


| | | |
|---|---|---|
| २५ | एक सामाजिक चित्र ! | २६५ |
| १७ | भग्नमनोरथ | २७१ |
| ३ | कविवर्य | २७५ |
| ४ | मुरली | २७६ |
| १ | हितोपदेश | २७८ |
| २ | मृत्यूमत | २८० |
| ८ | कारुण्य | २८१ |
| २० | ईश्वरप्राप्ति | २८२ |
| ११ | माझें गाणें | २८४ |
| ५ | पक्षीकडे ! | २८५ |
| ६ | मेघाल | २८७ |
| ७ | इच्छेविरु ! | २८८ |
| ११२ | | |


---


येत्या दीपवाळीपासून या मासिकास तिसरें वर्ष लागणार !

आकार डेमी अष्टपत्री दरमहा २४ पृष्ठें.

## दैवज्ञ-प्रबोधिनी मासिक.

वार्षिक वर्गणी साधारण प्रत रु. १ व सुबक प्रत रु. २ फक्त

सदरहु मासिकांत ज्ञातिविषयक व सार्वजनिक चर्चा येत असते तसेंच विद्वानांचे सामाजिक, नैतिक, औद्योगिक वगैरे विषयावर उपयुक्त लेख येत असून गोड कविता, मनोरंजक व बोधप्रद गोष्टी व ज्ञातीचे व इतर उपयुक्त वर्तमान टीकात्मक येत असतें. शिवाय पूर्णवद हें सामाजिक नाटक क्रमशः दिलें जातें व प्रसंगानुसार चित्रेंहि येतात.

व्यवस्थापक, दै. प्रबोधिनी, ठाकुरद्वार, मुंबई नं० २

# ही सूचना अवश्य वाचावी.

सन १९१६ चा अंक बारावा पाठविला आहे. प्लेगमुळें अंक मागसले गेले याबद्दल वाचक क्षमा करतील. सन १९१७ चे मागसलेले अंक छापण्याचे काम चालू आहे. जानेवारीचा अंक व्हीपीनें येईल. त्याचा स्वीकार व्हावा. व्हीपी परत करून विनाकारण आह्मास खर्चांत टाकूं नये अशी विनति आहे. कळावें ता० २०।५।१७

**संपादक काव्यरत्नावली.**

यांत शंका नाहीं. वर्णनशैली त्याचा हातोटी गंभीर व सरस आहे. भाषा ओज असून तीचा प्रवाह अस्खलित आहे. कवीनें छंदोभंग किंवा शब्दविकृति बहुश: कोठेंही होऊं दिली नाहीं हें त्यास भूषणावह आहे." ही प्रस्तावना बरीच मोठी आहे. तींतून वरील अवतरण घेतलें आहे. ही सर्व प्रस्तावना पुढें एखादे वेळीं देण्याचा आमचा विचार आहे. दुसरी मोठी कविता अतर्विदकालिका ही होय. ही कविता अगदीं नवीन तऱ्हेची व विचाराची आहे. तीची आवडनावड वाचक वर्गावरच सर्वस्वीं अवलंबून आहे. विविधज्ञानविस्तारांत ह्या कवितेवर विरुद्ध असा अभिप्राय आलेला आहे त्यावरून ह्या कवितेचा उद्देश व्यक्त होतो. तिसरी मोठी ऐतिहासिक कविता वीरदुहिता ही होय. तीही आपल्या गुणाची साक्ष देत आहे.

मागील वर्षांतील मोठ्या तीन काव्यांपैकीं गीतांजळी ह्या काव्याचा पहिला भाग गेल्या वर्षांत समाप्त झाला आहे. हें काव्य बरेंच मोठें असल्यामुळें ह्या काव्याचे दोन भाग करण्यांत आले आहेत. दुसऱ्या भागास ह्या वर्षी आरंभ झाला असून पुढील वर्षी तें पुरें होईल. दुसरे मोठें काव्य

ह्मणजे रा. रा. रेंदाळकरांची सरजा ही होय. हें काव्य पुरें करण्याबद्दल कवीस आह्मी विनंति केली आहे. ह्या काव्यास स्वतंत्र आंकडे न घालतां थोडा थोडा भाग क्रमसूलानें दिला असता तर बरें होतें. ह्मणजे वाचकांची निराशा झाली नसती, असें एक वाक्च आह्मास कळवितो. ही गोष्ट आमचे कविमित्र ध्यानांत ठेवतील तर बरें होईल. तिसरें अपूर्ण प्रकरण हनुमच्चरित हेंही ह्या वर्षी कविकडून पुरें होईल अशी आह्मी आशा करितों.

स्थलसंकोचास्तव बाकीच्या लहान मोठ्या कवितेचा गुणानुवाद येथें करितां येत नाहीं. तरीं तीं तीं प्रकरणें आपआपल्या गुणांची साक्ष देत आहे. पुढील वर्षी प्रसिद्ध कै० केशवसुताची सर्व कविता रत्नावली प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. मागें रत्नावलींत कै० केशवसुताची कविता बरीच प्रसिद्ध झाली आहे परंतु त्याची सर्व कविता एकत्र वाचण्यास मिळावी ह्मणून आमच्या एका मित्रानें मुद्दाम हा प्रयत्न केला आहे. पुढील वर्षाच्या जानेवारी व फेब्रुवारी ह्या दोन अंकांतून ही सर्व कविता बाहेर पडेल.

आतां रत्नावलीच्या अनियमितपणाचें नित्याचें गाऱ्हाणें सांगून वाचकांची रजा घेतों. हा डिसेंबरचा अंक त्याच वेळीं वाचकांस मिळावयाचा परंतु प्लेगमुळें पुनः अनियमितपणा आमच्या मागें लागला आहे! उपाय नाहीं. वाचकांनीं रागाऊं नये. रत्नावलीवर पूर्वीप्रमाणें लोभ ठेवावा. ही प्रार्थना आहे.

# अनुक्रमणिका.


| कवि, विषय व पद्यसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|
| १ केशव नारायण वैद्य. ( कविता ३२१ ) | |
| ३३ तापी नदी प्रसंग १ ला. | ९७ |
| ३३ ' ' ' २ रा. | १२१ |
| ६६ ' ' ' ३ रा. | १२७ |
| १०१ ' ' ४ था. | १४५ |
| ८८ ' ' ' ५ वा. | १६९ |
| २ अनंततनय. ( कविता २२३ ) | |
| २०० अंतर्विद्धकोलिका | १ |
| २३ विलक्षण कैदी | २१२ |
| ३ आनंदीरमण ( कविता १६५ ) | |
| ५० वीरदुहिता सर्ग १ ला. | ४९ |
| ५६ ' सर्ग २ रा. | ७३ |
| ५९ ' सर्ग ३ रा. | २१८ |
| ४ धूर्जटी ( कविता १५३ ) | |
| २० विरहदुःख | ४० |
| २१ गोपीची भक्ति | ८३ |
| ४ वेदादेश | १४२ |
| ५ सुभाषित | २१६ |
| '५२' गीतांजलि | २४१ |
| १५ राजामुचकुंदकृत श्रीकृष्णस्तुति | २४७ |
| ३६ हेमंतवर्णन | २५७ |

५ मनोधन ( कविता १११ )

  १११ श्रीहनुमच्चरित ९ वें शतक — १०३

६ अनंत विठ्ठल चिन्ने ( कविता १०३ )

  ५० शतश्लोकी — ५४

  ५३ " — १९७

७ दत्तात्रेय तुकाराम पणशीकर ( कविता ९५ )

  ६४ करुणातरंग — २५

  १३ वेदांतीक काव्य — [illegible]

  १८ " " — [illegible]

८ शाळकर ( कविता ८० )

  १० मानवजीवित — [illegible]

  ५ माझा संवगडी — [illegible]

  ४९ हिरकणी — १९४

  १२ स्वप्नांतलें फुकपाखरूं — २६९

  ४ मृत्यूमल — २८०

९ गिरीश ( कविता ७३ )

  १३ क्षणिकता व कर्तव्य — ६४

  ४० संमेलन — २३३

  २० कुसुमांजलि — २५२

१० विठ्ठल भगवंत लेंभे ( कविता ५० )

  १९ कल्हान्तरिता — ३६

  १४ कवीचा अर्ज — २५०

  १७ मग्नमनोरथ — २७२

११ ग. स. जोशी ( कविता ४९ )

  ४९ वात आणि तैलबिंदु — ८६

मराठी ग्रंथ संग्रहालय
ता 22/5/...

# काव्यरत्नावली

## अंक १२ वा.

### एक सामाजिक चित्र !

साकी.

वृद्ध वयानें कोणी असती अनुभव-वृद्धहि कोणी
ज्ञानानें कुणि वृद्धहि होती वयें जरी तारुण्यीं
कोणी असती वृद्ध धनानें पराक्रमानें कांहीं
तदीतरांतें सोडुनि देता जो तो वृद्धच होई
'पोक्त' परी ह्या वृद्ध--जनातरि ऐका जन हो ऐका !
अनन्य केवळ एक चमकती अमुचे बड्डू काका १

कृपाळु प्रभुची निज उदराची कुटुंबाचिही त्यांनी--
अछिन्न तपांवर सेवा केली अविरत, करिती अजुनी.
सेवा करितां करितां त्यांनीं अमूल्य अनुभव--ठेवा
मेळविला तो देती. घेती 'पोक्त-वृद्धपण' मेवा
अशा रीतिनें बाल जनाचे वृद्धाचेही काका
अनन्य केवळ एक चमकती अमुचे बड्डू काका २

अनुभूतींचे तुडुंब भरलें गाठोडें, परि त्यात--
लग्नानुभव अति सुखद मनोहर नव्हता गाठोड्यात
बाल--वयातच लग्न जाहलें तेव्हां अनुभव त्याचा
विस्मृतिखातीं खर्ची पडला, शून्य अंक शिल्लकेचा

लग्नाचा तो अनुभव बघतां दिवाळखोरच काका
अनन्य केवळ वृद्ध--वीर--वर तरीहि बंडू काका ३

बहुत पाहिलीं बहुत ऐकिलीं लग्नेंही सार्थंत
'स्वानुभवाविण व्यर्थ सर्व !' परि बोलति सार्थ समर्थ
अशा प्रसगीं काय करावें ? पडली त्याना चिंता
दुर्दैवानें संधि पाहिली डाव साधिला पुरता
सेव्य—त्रयातिल कुटुंब हरलें, उघडे पडले काका
अनन्य केवळ तरी चमकती अमुचे बंडू काका ४

प्रोक्त अनुभवी सुवृद्ध काका प्रोक्त पणानें आतां
विचार करिती 'कैंवि सहावी आह्मी विधुरावस्था ?'
प्रमाण -माला साधक- बाधक फार लांबली मोठी
शेवट हातीं लागे ना ! मग काका लढविति युक्ती
विविध[1] जातिच्या वृद्ध--जनांची सभा मिळविती काका
अनन्य केवळ त्यात चमकती अमुचे बंडू काका ५

दशेंद्रियानां अशा सभेची वार्ता जेव्हा कळली
मनबुद्धीच्या सगें त्यानीं आधिं सभा भरवीली
धवलविलसी केसकरानीं ठराव आणिला ऐका ?
ऐकुनि तो परि लाल जाहले अमुचे बंडू काका
अध्यक्षाचा, एकमतानें मानाजी[2] रावाना
मान मिळाला वास तयाचा कुठे ठाउका कोणा ? ६

---

१ वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध वगैरे. २ मन.

लटलट कांपत चटपट बोलत अनुमोदन दे मान
ठराव नाहीं जरी ऐकिला अनुमोदिति त्या कान
दत्ताजीनीं पडता पडता टेंकू दिधला त्याला
पाद--युगानें बसूनीच मग नेटावा लावियला
ठराव केला ‘ पास ’ करानीं[1] ‘ वृद्ध जाहले काका ’
ऐकुनि तो परि लाल जाहले अमुचे बंडू काका ७

वृद्ध जनांची सभा थाटली अध्यक्षाचा मान
घेती प्रमदानंद यतीवर वेद-शास्त्र-संपन्न
केशाकेशी दंडादडी करित करित मनसोक्त
निकाल करिती ह्या प्रश्नाचा वृद्ध-वीर--वर पोक्त
काका ह्मणती निकाल झटपट करा वाद हा टाका
अनन्य केवळ पहा चमकती अमुचे बंडू-काका ८

“ नेति चाळिशी लाउनि मग ह्या अमच्या गुंडोबानीं
“ चतूर्थ भार्या पसंत केली गुणावगुण निरखोनी ”
“ पन्नाशीची झुळुक लागता पडता पडतां केला
“ शंखोबानें विवाह, भार्या होति ह्मणुन सांवरला ”
‘ सुखोपभोगीं रत ते वास्तव ! ’ हांसत वदले लोकां,
अनन्य केवळ वृद्ध-वीर-वर अमुचे बंडू काका ९

‘ साठीच्या मीं वरात शिरलों नूतन भार्ये--सहित
वृद्धबालिकाविवाह केवळ सुखद मात्र जगीं होत ! ’

---

१ हातानीं.

भग्न दंतमुख विकसित करुनी वाक्य वदति जैं पंत
' खरें ! ' ' बरोबर ! ' धन्य ! ' निनादें अंबर झालें व्याप्त
हास्य मधुर किति मुखीं झळकलें काकाच्या अवलोका
अनन्य केवळ वृद्ध-वीर-वर खरेंच बंडू काका १०

" मये चालता ! हातिं धराया कोणि न दे कधिं काठी
" यास्तव नरसोबानीं केली भार्या तरणी ताठी "
" रडावयाला कोणि न मागें यास्तव खंडो अप्पा
" विवाह करुनी स्वर्गीं गेले एकत सुग्धाऽलापां "
हर्ष-विवश तैं होउनि हसले ! खुलले ! भुलले ! काका
अनन्य केवळ वृद्ध-वीर-वर खरेंच बंडू काका ! ११

" पन्नाशीची झुळुक लागली, सोसाट्याचा वारा
सुटेल आतां प्रदेश मग तो भरिल धुळीनें सारा
' शुभस्य शीघ्र ' ह्या न्यायानें यास्तव बंडोबानीं
लग्न करावें सत्वर पाहुनि सुलक्षणीशी तरुणी "
निकाल केला वृद्ध-जनानीं विचार-पूर्वक ऐका
मोडतील मग कसा बरें तो विनयी बंडू काका ? १२

मानवला हा बंडोबाना निकाल तरिही त्यानीं
स्वतंत्रतेनें विचार केला अनुभव घेउनि ध्यानीं
' महाजनो येन गत स पथः ' भगवंताचें वाक्य
अवमानुनि सुख होइल कोणा ? कुणासही ना शक्य !
विचार-लहरी पुढें धांवती पहा त्याहि ( वा ऐका )
अनन्य केवळ वृद्ध-वीर-वर खरेंच बंडू काका १३

विहित धर्म जगीं असे आपुला निरलस अनन्य सेवा
अर्धांगाविण सांग कसा तो नराकडुनियां व्हावा ?
सर्वांगीं परिपूर्ण अमोलिक अपुला अनुभव-ठेवा !
अननुभवाचें व्यंग अल्प मग मधें कशाला ठेवा ?
शास्त्रें वदती नसे भामिनी-विना मार्ग परलोका !
विचार-माला पुढें गुंफिती अमुचे बंडू काका १४.

ग्रंथ संग्रहालय

चार तपें हें वय न फारसें ! हीच वयोमर्यादा
प्रथम विवाहा उत्तम ! आहे स्पष्ट अशी शास्त्राज्ञा
उपवर कन्या पाहुं कुठें तरि सढळ करुनियां हात
उरकुन घेऊं कार्य एकदा मार्ग-शीर्षवर्षांत
सुख स्वप्निं ह्या मग्न जाहले सकल जगाचे काका
अनन्य केवळ वृद्ध-वीर-वर खरेच बंडू काका १५

बंडू काका भाव ठेविती प्रभुचरणीं दृढमूळ
ईशेच्छेविण पान न हलतें देव असो अनुकूल
पुनर्विवाहा प्रसाद दिधला काकानां देवीनें
( ' भावी—काकूनांच ' सुधारक ह्मणति असें हट्टानें )
वेळ कशाचा ? आप्तेष्टानां पत्रें लिहिती काका
अनन्य केवळ सूज्ञशिरोमणि खरेच बंडू काका ! १६

सुंदर उपवर वय चवदाची बळकट शरीर—यष्टी
अशा युवतिशीं विवाह करणें असें ठरविलें चित्तीं !
यास्तव कोठें जमेल तरि तें पाहुनि कळवा मजला !
योग्य स्थळिं मग आगें मागें पाहू नका पैशाला !

अवधी थोडा विधी फारसे गडबडले किति काका
लटपट झटपट करिती खटपट अमुचे बंडू काका १७

बघति पत्रिका, मोडिति बोटें, विचार कांहीं करिती
' द्वितीय-भार्या-योग दिसतसे खास! ज्योतिषी वदती
' होइल पुनरपि लग्न असें परि ग्रह न निश्चयें ह्मणती '
( काहिं मूढ-धी या वाक्याचा अर्थच विपरीत करिती )
सरळ अर्थ परि घेती देती विपुल दक्षिणा काका
अनन्य केवळ सूज्ञ--शिरोमणि खरेच बंडू काका १८

मुहूर्त असती दोन जवळचे त्यांत कोणता घेऊं
बोवा ह्मणती " मुहूर्त चिंतामणि या आपण पाहूं "
प्रथम मुहूर्ती प्रतिपदेला कन्यादान करावें
चतुर्थीस मग अन्य कन्यका-दान स्वतःला घ्यावें
नूतन पत्नीसह जावाई होइल पाठीराखा!
वचन ऐकुनी लाल जाहले अमुचे बंडू काका १९

" अष्ट-वार्षिका असे-कन्यका बळकट शरीरयष्टी
माता-पितरें विवाह इच्छिति बंधु-वर्ग परि कष्टी! '
" षोडष वर्षा असे कन्यका मुकी पांगुळी थोटी
देऊं ह्मणतो पिता असे परि पैशाची अट मोठी! "
पत्र लिहीती ऐशी चितू नाना दगडू काका
वाचुनि तीं परि लालच होती अमुचे बंडू काका २०

" वय चवदाची असे कन्यका सुंदरही सर्वस्वी
बाप तिचा परि ह्मणतो ' अपुल्या ' कनिष्ट पुत्रा यावी
' सान वयानें, ' ह्मणेल तो जरि ' पसंत मजला नाहीं '
निःसंशय मग मिळेल तुह्मां यत्न करा लवलाहीं '
असें कळविती पत्रद्वारें दीर्घोदर गणु काका
वाचुनि तें परि लालच होती रागें बंडू काका २१

वृद्ध-पतीचा अनुभव मोठा छळ न करी पत्नीचा
छळितिल किंवा करितिल ममता नेम न या तरुणांचा
व्यसनी निघतिल पुढें कदाचित काय भरवसा याचा ?
वृद्धाचा सुस्वभाव केव्हां नाहीं बदलायाचा
विचार पुढनीं करिती काका तरुणानों तो ऐका
पोक्त अनुभवी वृद्ध-वीर-वर अमुचे बंडू काका २२

बालिकेस जगीं मिळे फुकाचा अनुभव वृद्ध-पतीचा
युव युवतींचा अनुभव सौदा खचित फार मोलाचा
असें असुनिही कोणि न दई कन्या जगिं वृद्धाला
तरुणानां परि ' घ्या ' ' घ्या ' ह्मणती काळच उलटा फिरला!
वृद्ध जनाचा सदुपदेश हा रुचे न का या लोकां ?
विचार करिती विषण्ण-चित्तें अमुचे बंडू काका २३

असो कसेहा! जग मूर्खाचे! परीक्षा न मुळिं त्यास
( पोरें ह्मणती त्यानें केलें काकानां नापास! )
नितांत मूर्खत्वाचा जेथें भरलासे बाजार
पोक्त अनुभवी अशा नराला कोण तिथें पुसणार ?

मूर्खत्वाची फळें आपुल्या आता जन हो ! चाखा
शाप द्यावया सज्ज जाहले अमुचे बंडु काका २४

काका वदती शरीर कांपत असतां सारें रागें
( कोणी ह्मणती वृद्धत्वानें ! मूढच परि ते अवघे )
" अपमानास्तव शासन साऱ्या करावया जगताला
लग्न न आता करावयाचें ! हा निश्चय मी केला. "
घोर प्रतिज्ञा ऐकुनि भ्याला रवि गेला अहि-लोका
भीष्म-प्रतिज्ञा अजुनि पाळिती अमुचे बंडु काका २५

सीता-कान्त.

## भग्नमनोरथ

शुकाच्या तीव्र इंद्रियसंयमापुढें पराभूत झालेली रंभा आपल्या सखीस आपल्या दुर्दैवाची कहाणी सांगत आहे.

श्लोक.

सांगूं काय सये ! तुला प्रियजनप्रेमप्रसादोन्मुखी
झालें आतुर मी, रमे करिल तो शृंगारमार्गें सुखी
माझे सर्व मनोरथ क्षण जरी देते सुखा जाहले
अंतीं शून्य अशा उदास हृदया चिंतानलें जाळिलें १

लावण्यें, श्रुतिमंजु रंजनपरा वाक्चातुरी दाउनी
स्नेहें जिंकिन त्या विलासचतुरा हे चिंतिलें मी मनीं
त्याची सोज्ज्वळ कांति, कोमल तनु, प्रेमांकुर श्रेयदा
यांहीं जिंकियलें मलाचि उलटें, तारुण्यलीलामुदा २

प्रेमोद्यान असे तयात गवसे, उत्फुल्ल पुष्प, प्रिये
ज्याचा गोड मरंद सर्वहि जना आनंद दे निश्चयें

ऐशा त्या तनुजेश्वभवास बघता गेलें भुलोनी अहा !
झाली स्तंभित दृष्टि, कंप तनु घे, चित्त भ्रमे तें पहा ३

मोठे धीर समर्थ वीर, तरुण, प्रेमोद्गमें प्रार्थुनी
गेले व्यर्थ शिणोनि त्यासि परि म्यां नाकारिलें साजणी
आतां मीच, तया प्रिया जिवलगा, आनंददा प्रार्थिलें,
माझें दैव परंतु तेथ अडवें आलेंचि गे ! वत्सले ! ४

डोळे त्या अति रम्य नेत्रयुगुला देखोनि आनंदले
तैसे रक्त सुरम्य ओष्ठ धवला दंतासवें शोभले
दोर्दंडाङ्कित कोमला भुजलता तारुण्यमोदप्रदा
वाणी मञ्जुगभीर कर्णमधुरा ती रंजयित्री सदा ५

मी तारुण्य--झरी सुरम्य लहरी, तो थोर रत्नाकर.
गुंजद्‌भृंग- सखी लता--कुसुमिता मी, तो रसालेश्वर.
मी रम्या नलिनी सुहास्य वदना, दिव्यार्क तो सुंदर.
मी वाणी कविची मरंद मधुरा, तो ज्ञान वृक्षाङ्कुर. ६

झालें व्याकुळ मी त्यजोनि विनया जातां तयाच्या पुढें
गेलें भान, उडे वसंतपवनें वस्त्र प्रिये ! बापुडें
केल्या नर्तन--गानयुक्त विविधा शृंगारचेष्टा स्वयें
झाला बाइ जणो विरक्त पुतळा माझी दया त्या न ये ७

बोले मी " प्रिय जीवितेश बघणें उद्यान रम्य स्वयें
जेथें पुष्पयुता लता प्रियजना आलिंगिती निर्भयें
कारंजें उडतें तुषारनिकरें, आनंद या मंदिरीं
नांदे, प्रेमतरंग रंजनपरा दे साह्य ही सुंदरी ८

शय्या पुष्पमयी, निकुंजसुषमा, चित्रप्रसूनोद्गम
वायूच्या मदगंधि मंदलहरी, एकांत, मध्वागम,

तारुण्य, प्रणयप्रभाव, ललनासान्निध्ययोगीश्वरा
द्याया मोद समर्थ, सत्य भरला, आनंद येथें खरा ९

स्त्रीच्या केवळ दर्शनेंचि लहरी चित्तार्णवाच्यावरी
येती; स्पर्शसुखप्रद प्रणयजा शृंगारलीलांतरीं
झाला विद्ध न, त्या युवास मदनें द्यावें कसें शिक्षण ?
सांगों काय, तुला कळोत रसिका कामी जनाच्या खुणा १०

विश्वाचा जणु रत्नदीप गगनीं स्नेहें जनाकारणें
पाडी सोज्ज्वळसा प्रकाश, तनुला शोभाहि ये कांचनें
पक्वान्नें रसना सुखार्थ, कुसुमें सौगंध्यशाली, जनां
द्याया सौख्यचि, ही तशी सुललना रे ! त्वत्सुखा सज्जना ११

रत्नाला अति रम्य कांति तुझिया देहामुळें येतसे
ऐशी या तनुवैभवेंचि नयना आनंदही देतसे
ज्याचें त्यासचि सौख्य दे न, जरि तें लावण्य मोठें भलें
अन्योन्यप्रियसंगमाविण जनीं धिग्देह हे आपुले १२

प्रेमाचें गुरु जाल आजि पडलें चांचल्य ये त्यामुळें
कामाचे शर फार कोमळ कसे ? मातें न हो हें कळे
हे ! माझ्या मदना ! तुझी तनुलता देखोनिया घाबरी-
झाली ही रमणी, सख्या ! शर तुझे आतां तरी आवरीं १३

ऐसा ताप असह्य हा रविकरस्पर्शें न बाधे पहा
हा ! हा ! प्रेमळ संगमाविण सख्या ! येतेचि मूर्च्छा महा
कार्याकार्यविचार काय करिजे सततकामीजनें
जाळीं तूं तनु ही अनंगदहनीं, या आपुली ही म्हणे १४

ऐसे रक्त कपोल हे रविकरस्पर्शें तुझे जाहले
झांकाया तुजला स्वयाचे पदरें आयो ! उभी राहिले

सूर्यांचे कर दूर ते, नच मला तापासि देतील ते
जैसा दे तव दर्शनें मदन हा संताप, माझ्या मतें १५

उत्कंठा हृदयीं धरोनि वदलें मी जीव तोडोनिया
नाहीं अक्षर काढिलें परि तयें, कैंची दया त्या प्रिया
जाणों प्रस्तरजन्यमूर्तिधवला माझ्यापुढें ती उभी--
राहे; होय उदास, हाय ! बसले लावोनि डोळे नभीं १६

मथोरथ वृथा अहा ! सकल जाहले यापरी
उदास हृदय प्रिये, हळहळोनि चिंता करी
सुरी जणु उरीं शिरे अपयशें अहा ! लाजलें
कसें अदय दैव हें मज जयें सये ! गांजिलें १७

विठ्ठल भगवंत लेंभे.

## कविवर्य.

[एका कवि मित्रानें कवीस पाठविलेल्या पत्राच्या पत्त्यावर "कविवर्य" अशी पदवी लिहिली होती ह्या पदवीस हा कवि योग्य नाहीं अशा अर्थाचे विचार पुढील कवितेंत गोविले आहेत. ]

### श्लोक.

नाहीं मी कविवर्य, या जड जना ही कासया थोरवी ?
मानाच्या वचनास मान असतो सीमेंत तें जोंवरी
स्नेहाची तव अर्थशून्य पदवी ही खैर मोठी करी
मी देतों परि लक्ष्य केवळ तिच्या प्रेमीं, न बा ! गौरवीं १

यंत्रें सूक्ष्मनिदर्शकें जन बघे मित्रादिकांच्या गुणां
अन्याचे गुण पाहतां परि घडे तद्दृष्टि आकुंचिता
हा तों केवळ दृष्टिभेद, समता ठेऊनियां पाहतां
एखादा द्विजराज थोर, इतरा तुल्यत्व तारागणा ! २

काहीं रूप—गुणें जगास रुचती कांहीं स्वविद्या--गुणें
कोणी गानगुणें, दुजा सुकवनें विश्वास मोहीतसे
आहे एक विशेष त्याप्रति; परि प्रीतीस हेतू नसे
साधीं अर्थविहीन मुग्ध वचनें बाळास हीं भूषणें ३

कोणी कंठमणी मनोहर कवी श्री--शारदांगावरी
कोणी हार तिचे, कुणी सुवसनें, कोणी शिरोभूषणें
त्यांना कौतुक हें यथार्थ गमतें, बाजूस शोभेविणें
आनंदें असतों तिच्या चिमुकल्या मी **गालबोटापरी** ४

साधुदास.

## मुरली.

[ श्रीकृष्णाच्या दर्शनास निघालेल्या एका बालगोपीनें वाटेंतच मुरली ऐकली. तिला जिकडे तिकडे मुरली ऐकूं येऊं लागली व दिसू लागली. मुरलीश्रवणापासून होणाऱ्या आनंदापेक्षां प्रत्यक्ष दर्शनानंद विशेष आहे म्हणून श्रीकृष्णानें दर्शन द्यावें अशी ती त्यास विनति करीत आहे. परंतु तिच्या प्रेमाचा अंत पाहिल्याशिवाय श्रीकृष्ण तिला दर्शन देत नाहींत. ]

पद. ( चाल.— अजि अक्रूर. )

हे प्राणसख्या । ध्रु० । भेट गोविंदा
सच्चिदानंद सुखकंदा
जधिं ऐकियली मी तव मंजुळ मुरली
मुरलीमय वसुधा झाली
या नेत्रांचा दोष असे कीं काय
मुरलीमय तेजहि होय
मुरलीची आवड मोठी
परि झुरतें भेटीसाठीं

मज भेट देइं जगजेठी !
तव वचनसुधा जीवन मधु मम होई
हा जीव भुकेला पाहीं १
मी विटलें या जगता; उपरति झाली
मुरलींतच वृत्ती मुरली
मम चित्ताचे कर्णां सूर न सात
एकचि जो शब्दातीत
तरुनिर्झर कीं मूल फूल वायूही
तो एक सुरातच गाई
कल मद्र तार सूराचा
हृद्यंगम सगम साचा
जाहला लयहि चित्ताचा
रव मुरलीचा शांतीचा ये श्रवणीं
परि लोभ जडे तव चरणीं २
मम हृदयाच्या कंदा जीवन घाली
ती सेकपात्र तव मुरली
परि पद्माक्षा ! तेज कृपेचें नसतां
तो कुसुमित होइ न नाथा
तें कुसुम नसे गंध कोठुनी येई
मनभृंग भुकेला राही
दे दर्शन जीवननाथा !
किति बघसि अंत गुणवंता !
कासया शिणविसी श्रांता
अजि कवण्या मी शद्वें विनवूं सांगा
का हसलासी श्रीरंगा ! ३

त्या बालेनें केला बहुतचि धांवा
परि तुष्ट कसा तो व्हावा
तो प्राणसखा शोधाया जंव जाई
ती यमुनातीरीं येई
तिज भानचि तें जलस्थलाचें नुरलें
कृष्णानें वेडें केलें
जव जलांत पडली बाला
श्रीहरी धावुनी आला
हृदयाशीं धरिलें तिजला
तिज सांपडला आनंदाचा कंद
प्रेमाला वश गोविंद ४

———— केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर

## हितोपदेश.

पद.

[ चाल:-- अमोल काया जाईल वाया. ]

नरकाया ही नरका न्याया विलंब घडिचा नसे
करावें सार्थक तरि मग कसें
मोडायाला अवसर नच लव, जोडाया किति तरी
पडती आयासचि अंतरीं
घाव टाकिचे सोसायाला तयार व्हाया हवे
फुकाचें देवत्व बरें नव्हे!
दु:स्वार्थ चिरडुनी टाका मनिंचा अधीं
तो द्वेषानल विझवाल समूलहि जधीं,
पालवाल रोपा बंधुत्वाचा, तधीं--

स्वर्वासी सुर हेवा करितिल इहलोकाचा मनीं
उबगतिल स्वर्गसुखाला झणी १
पायाखालीं जळतें नेणुनि सुधारावया दुज्या
पडा नच विफल प्रयत्नांत या
शील सुधारा अधीं आपुलें, पाया नसला जरी
हवेली कोसळेल हो तरी
तुमच्यासाठीं जग अडलेलें नाहीं उमजा मनीं
फुगाल पोकळसें मीपणीं
फल ईशार्पण करुनिया कार्य तें करा
वागवा अतरीं परिस्थितीला जरा
मानसीं आत्मविश्वास असूं द्या पुरा
हसें ना तरी करुनि घ्याल आरंभशूरसे रणीं
जगाच्या, रुजवा वच हें मनीं २
जग हें सारें चढल्याचे कीं, पडता ओढावया--
खालतीं तयार असतें पहा
उच्च श्रेयस्कर कार्याला विघ्नें येती अती
साक्ष इतिहासपुराणेंच ती
इहसौख्यावर सोडुनि पाणी ठेवावा पद पुढें
तरिच यश पूर्ण तयाला घडे
भरवसा परेशावरती ज्याचा पुरा
या रणांगणावर अजित वीर तो खरा
इतरास कशाला थारा यावा जरा
" नीतिपथाचे पाथ सुरक्षित जाती इष्ट स्थला "
धरा ही शब्दमालिका गळां ३

——— महादेव भिमाजी कुलकर्णी.

## मृत्यूप्रत.

श्लोक.

" हो सिद्ध शीघ्र निघण्यास इथूनि आता !"
ऐसें मला वदाशि येउनिया जईं, तो
दूरी असे जवळि कीं दिन शेवटील ?
देशील काय कळुनी मजलागिं मृत्यो ? १

येशील का प्रियजनांतरिं ? कीं न कोणी
राहे जगीं ' मम ' असें ह्मणण्या मशी तों ?
लाभे तदा जननभूमिनिवास का हा ?
देशील काय कळुनी मजलागिं मृत्यो ? २

येशी गृहीं ? परगृहीं ? विजनीं ? जनीं कीं
नेण्या सवें मज अगा इथुनी स्वधामीं ?
देशांतरीं भ्रमत कीं तुज सापडे मी ?
देशील काय कळुनी मजलागिं मृत्यो ? ३

राहेल हें मन तदा प्रभुपादपद्मीं,
तोडूनिया सकल ऐहिकपाश रे तों ?
माया धरील मज कीं परतोनि येण्या ?
देशील काय कळुनी मजलागिं मृत्यो ? ४

भालचंद्र.

---

## कारुण्य.

श्लोक.

कृपासागरा ! मायबापा ! ! दयाळा ! ! !
नमीं हा तुला मी, प्रभो ! विश्वपाळा

विभो ! त्वत्पदीं बुद्धि माझी वळावी
प्रभो ! नित्य सेवा तुझी ती घडावी १
नको नौकरी, राजसेवा नको ती
नको श्रेष्ठता, मान्यताही नको ती
नको काळजी काय होईल भावी
प्रभो ! नित्य सेवा तुझी ती घडावी २
सदा सर्वदा भोंवती व्यर्थ सारा
छळी हा मला नित्य मायापसारा
कधींही मला भ्रांति ती ना पडावी
प्रभो ! नित्य सेवा तुझी ती घडावी ३
असे पातकांचा निधी ! ! मीच बापा -
म्हणूनीच पावें सदा येथ तापा
मती नामसंकीर्तनींही रमावी
प्रभो ! नित्य सेवा तुझी ती घडावी ४
तुझ्यावांचुनी आसरा अन्य नाहीं
म्हणूनी कृपासागरा ! नित्य पाहीं
समर्था ! तुझी वक्रदृष्टी नसावी
प्रभो ! नित्य सेवा तुझी ती घडावी ५
निराकार तूं सत्य आहे दयाळा !
नसे अंत, आदी तुला विश्वपाळा !
तुझ्या चिंतनीं बुद्धि माझी जडावी
प्रभो ! नित्य सेवा तुझी ती घडावी ६
तुझें नाम घेतां हरे दुःख व्याधी
सदा सर्वदा दूर राही उपाधी

तुझ्या दर्शनाची अपेक्षा असावी
प्रभो ! नित्य सेवा तुझी घडावी ७
असे भोवतीं षड्रिपूंचा गराडा
तुझ्यावाचुनी कोण फोडील वेढा
तुझ्या सद्गुणाची स्तुती म्यांच गावी
प्रभो ! नित्य सेवा तुझी ती घडावी ८

——— रामचंद्र बाळाजी वडगांवकर.

## ईश्वरप्राप्ति.

गीति.

मनुजा ! सावध होईं, परमार्थाची मनांत आस धर,
गर्वाला वश होउनि, वागुं नको; योग्य तो विचार कर. १
रात्रंदिन संसारीं मग्न नको होउं, त्यांत सौख्य नसे;
दारा–धन–सुत यांच्यापासुनि तुजला बहूत दुःख असे. २
सत्य सुखासाठीं तूं आत्मोन्नति कर झटून हर्षानें;
सारा असार भव हा; मानु नये यांत किमपि सत्य मनें. ३
विद्युत् चमके स्वर्गीं तेव्हां पडतो प्रकाश अग्नि जसा;
नष्ट घनीं होतां ती पहिल्याहुनि घोर अन्धकार कसा ? ४
संसारासक्तीनें तीच गती होय सर्व मनुजाची;
प्रारंभीं सुख वाटे अन्तीं दुर्धर गतीच दुःखाची ! ५
शिथिलेंद्रिय होतां तूं, ईशप्राप्ती कुठोनि करशील ?
एक क्षणहि न गमवीं, ध्यान करीं; ईश मुक्ति देईल ६
ह्मणशील वृद्ध होतां, हरिची भक्ती करीन नेमानें;
शाश्वति देहाची या नाहीं ह्मणुनीच कथियलें ऋषिनें. ७
शैशविं तारुण्यींही नाहीं घडलें जरी हरी स्मरण !

होईल कसें आतां ? पुत्रांपौत्रांत होशि तूं मग्न ! ८
अन्ध नको रे ! होऊं; दृष्टि तुला ईश्वरें अहा ! दिधली;
तरि मुक्तिबाद तिने शोधुनि काढीं भवांत जी दडली. ९
मन ठेवीं हरिचरणीं, कीर्तनभजनीं, तसें कथाश्रवणीं;
सख्य करीं देवाशीं, धन--दारा पुत्र--मित्र तो जाणीं. १०
कित्येक लोक ठेविति यत्न न करितां, हरीवरी भार;
उचित नसे हें लोकां, प्रयत्न करुनीच ठेविं भारभार; ११
जेणें ईशप्राप्ती घडे असा भाव नित्य मनिं ठेवीं;
मानापमान सारा सोडुनिया, नित्य हरिकथा गावी. १२
अन्तरसबाह्य निर्मल 'विष्णुपदीं' नीररूप हृदय तसें--
परदुःख पाहतांना मन द्रवो बुद्ध धर्मपाल जसे. १३
संसृति निर्झरिणी ही, मोहाचा तीस ये भला पूर;
जलचर विहार करिती, षड्रिपु हे नक्रसे महा क्रूर. १४
भवसरितापरतीरीं जाण्याला मुक्ति एक नाव असे;
नावाडी परमेशावाचुनि कोणी दुजा मुळींच नसे. १५
कस्तूरीमृग धावति वासाचा शोध करित रानिं वनीं;
त्यांच्याच नाभिंत असे वास, परी ये न हे तदीय मनीं. १६
तद्वत मनुजा ! असतो ईश्वर हृदयीं खराच सर्वांच्या;
नाना देश फिरति कां स्पष्ट असोनी चमत्कृती त्याच्या ? १७
त्याला प्रसन्न करण्या गिरिगव्हर वा नको जटाजूट;
तीर नको गंगेचें गृहिं राहुनियां करीं खटाटोप. १८
संकटिं रक्षण करणें प्राण्यांचें हीच समज हरिपूजा;
व्यसनार्ता साह्य करीं शुद्ध मनें पडति दुःखिं ते ज्या ज्या. १९

ईशा प्रसन्न करण्या योग्य अशीं हींच साधनें असती
ठेवीं दृढ निष्ठा तूं संसाराब्धी तरूनि ही नेती. २०

पी. एस्. प्रभुदेसाई.

---

## माझें गाणें.

पद.

चाल — तस्करा रानीं.

तारका गगनीं
गाणीं मंजुल तीं
मधुरशा स्वरें मुदें गाती १
स्वैर ते वात
गुंगत गगनांत
वितरती गोड गीत गात २
वर्षतो गान
वरुनी चंडोल
गान नच, जादूचा कोळ! ३
ओतुंनी कंठ
धरणीवरि मोर
लोटितो टाहोचा पूर! ४
पक्षिगण वृक्षीं
भृंगहि उद्यानीं
जाहले सर्व गुंग गानीं ५
गात मधु गाणीं
निर्मळ निर्झरिणी
धरणिच्या अंकीं खेळोनी ६

गानमय सगळें
सगळें विश्व दिसें
हृदयिं मम गान न केंवि वसे ? ७
बालकवि[1] गाणें
मजभोंती गातो
मजसि ही 'गा गा गा' ह्मणतो ८
गाउं मी कसलें
गाणें मज न कळें
हृदय मम शून्य हाय ! दुबळें ९
हृदयिंची तारा
ज्या दिवशीं तुटली
त्या दिनीं कविता मज विटली १०
जाहलें मूक
मूक जरी गान
हृदय परि पिळतें आंतून ! ११

——— नरहर शंकर रहाळकर बी. ए.

## पलीकडे !

पद.

चाल:-- चल झणिं भाऊ.

देवा ! पाहीं
तुजविणें नको मज कांहीं ॥ धृ० ॥

---

१ प्रसिद्ध कवि कै. दत्तात्रय कोंडो घाटे यांचे चिरंजीव विठ्ठल दत्तात्रय घाटे. या बालकवीची कृति होतकरू आहे.

नको लावणी
नको कांपणी
नको मोद तो
नको खेद तो
नको जागृती
नको सुषुप्ति
नलगे कांहीं
या पलीकडे मज नेईं ! १

फुलणें नलगे
कुजणें नलगे
प्रकाश नलगे
ध्वान्तहि नलगे
आशा नलगे
भीती नलगे
नलगे कांहीं
या पलीकडे मज नेईं ! २

संगम नलगे
वियोग नलगे
नकार नलगे
रुकार नलगे
काया नलगे
माया नलगे

नलगे कांहीं
या पलीकडे मज नेई ! ३

— नरहर शंकर रहाळकर बी. ए.

## मेघास.

श्लोक.

कशाला हा आता विमल जलप्रोत्र करिसी ?
कशाला गंभीर स्तनितिं दशदिक्प्रांत भरिसी ?
कशाला डौलानें विहरसि नभीं तू जलधरा ?
वृथा आतां गेली बुडुनि जलपूरीं जरि धरा ! १

नद्या आनंदाने भरुनि दुथडी धावति जवें,
गिरिप्रांतीं तैसे विहरति किती निर्झर नवे,
मही झाली व्याप्ता हरिततृणसस्यें उगवुनी,
तळीं गेलीं सारीं तव सलिलिं आकंठ भरुनी २

तुझ्या दृक्पातानें कितिक वठलेल्या तरुलता
भरोनी पर्णांनी दिसत अवनी आज ललिता;
अहा ! मेघा ! साधें झुडुपहि तवालोकनवशें
पहा आहे आता दिसत नयना सुंदर कसें ! ३

तुझी कीर्ती मोठी, अतुल तव आहे विभवही,
तुझ्या औदार्यानें करित चिरहास्योत्सव मही !
फडाडे त्वत्कीर्तिध्वज हरित हा वृक्षशिखरीं,
किती भावस्तोत्रें रचित विहगाली तुजवरी ! ४

परी मेघा ! ग्रीष्मीं तव सुयशिं जो डाग पडला
न जायाचा केव्हा खचित सुजनीं तो विसरला !

इथें—याच स्थानीं झुरुनि झुरुनी बाललतिका
मरोनी गेली, तूं परि न दिधलें अल्प उदका ! ५
प्रसंगीं जें कामीं विभव न पडे, निष्फळचि तें !
कशाला तीं हातीं कनकवलयें रत्नखचितें !
असे त्या वेलीचें स्मरण मम चित्तांत जंवरी
झरी उष्णाश्रूंची क्षणभरि न थांबेल तंवरी ! ६

रेंदाळकर.

---

## इच्छाविरह !

स्वातंत्र्याचा बाणा मिरवुनि होतों चालत दुरी,
पातलों सन्निध तुझिया परी !
त्यजुनि वनश्री, गिरिप्रांतही हेटाळुनि नाचला,
झरा तो गंगेला भेटला !
धरुनि जलाच्या भेद मदानें अंबुज आलें वरी
सेवि तें उषाचरण माधुरी !
नगा विदारित गिरिवर चढला आवेशें सत्वरी
सांपडे इंद्रधनुःश्री—करीं !
मी 'धनी' व्हायाचा प्रयत्न केले परी
जाहलों अकस्मात् 'दास' कसा सुंदरी !
वळचणिचें पाणी चढलें उलटें वरी !
'माझा माझा' ह्मणता ह्मणता 'तुझाच' मी जाहलों,
तयाच स्थितींतही रंगलों !
भ्रमला तिमिरीं दडुनि हटानें भ्रमणरता मंदिनी
प्रकाशीं आणि मला ओढुनी !

रेंदाळकर.

१२ के. ल. टेंभुर्णीकर ( कविता २७ )
१२ ऋतुचक्र ५९
११ बाजार २०२
४ मुरली २७६
१३ श्रीधर ( कविता २६ )
१७ माधुकरी ११४
९ चिता १४२
१४ सीताकांत ( कविता २५ )
२५ एक सामाजिक चित्र २६५
१५ नीळकंठ ( कविता २१ )
२१ शेवटचें मातृगीत १८८
१६ पी. एस. प्रभुदेसाई ( कविता २० )
२० ईश्वरप्राप्ति २८२
१७ रेंदाळकर ( कविता १९ )
३ प्रेमप्रतिज्ञा ७१
३ रजनी १३७
६ मेघास २८७
७ इच्छेविरुद्ध २८८
१८ केशव विश्वनाथ फणसे ( कविता १७ )
९ जीवनकलह व कविता ४३
८ प्रभुघटना १३८
१९ विश्वनाथ नारायण ट्रेंडे ( कविता १६ )
२ सुभाषित २४
६ ७२

[library stamp]

१ ' १४४
६ ' १९२
१ ' २६४
२० म. कृ. गोळवलकर ( कविता १६ )
१६ एका विधुराचे उद्गार ४४
२१ गोविंदानुज मुरली [ कविता १५ ]
७ कल्पनेच्या चुका १६५
८ दिव्य आणि त्याची जाणीव २०८
२२ सुमंत [ कविता १४ ]
४ वसंतकाल ६८
४ आहे आणि नाहीं ९५
६ छायागीत २१५
२३ दु. आ. तिवारी [ कविता १४ ]
९ तारापतन ७०
५ विहार २०५
२४ विहंग ( कविता १४ )
१४ परमेश्वरप्रार्थना २०९
२५ नरहर शंकर रहाळकर बी. ए. [ कविता १४ ]
११ माझें गाणें २८४
३ पलीकडे २८५
२६ अनंतसुत ( कविता १३ )
१३ सुखदु:ख २६३
२७ महादेव भीमाजी कुळकरणी [ कविता १२ ]
९ भग्नप्रलाप २२
३ हितोपदेश २७८

२८ एम. जुलिअन ( कविता १२ )
१२ निशिगंधाचीं फुले १६७
२९ माधव गोविंद भिडे ( कविता १२ )
१२ विहगविज्ञापना २६०
३० नारायण केशव बेहरे [ कविता ११ ]
३ सुंदर प्रतिध्वनी ११८
८ कारजाप्रत १४०
३१ ग. म. वैद्य ( कविता १० )
१० फुलें ६१
३२ सौ. शांताबाई फणशे ( कविता १० )
१० कन्येस उद्देशून २५६
३३ सौ. स. भि. [ कविता ९ ]
९ सिंह–गाढव–कोंबडा ९४
३४ त्र्यंबकसुत [ कविता ८ ]
८ ईशस्तव ६७
३५ र. बा. जामनेरकर ( कविता ८ )
८ उमलेल्या फुलांस पाहून ९०
३६ मंजुबाळ [ कविता ८ ]
४ आईचें चित्र ९२
४ प्रभात २१४
३७ रामचंद्र विष्णु किर्णीकर [ कविता ८ ]
८ प्रतिज्ञा १३९
३८ केशव कुमार [ कविता ८ ]
८ संध्याचित्र १९०

३९ रामचंद्र बाळाजी [illegible]गांवकर [ कविता ८ ]

८ कारुण्य — २०८

४० किरात [ कविता ७ ]

७ वीर राम — १६८

४१ विष्णु बाळकृष्ण जोशी [ कविता ६ ]

३ मातृमहती — ४७

३ द्वादश जोतिर्लिंग — २०६

४२ पारुजी नारायण मिसाळ [ कविता ५ ]

२ दिव्यस्थान — ९३

३ सरस्वतीस — २०४

४३ वसंतविहार [ कविता ५ ]

५ उद्यानांतील प्रभात — २३८

४४ रमाकांत ( कविता ४ )

४ मृत्यूचा इशारा — ६३

४५ साधुदास [ कविता ४ ]

४ कविवर्य — २७५

४६ सुमतकांता [ कविता ४ ]

४ खोटी खोटी नरममता — २०७

४७ कालिकिंकर [ कविता ३ ]

३ ईशवंदन — ४८

४८ लक्ष्मण जगन्नाथ अकूत [ कविता ३ ]

३ सुखाचा शोध — १२०

४९ कृष्णानुज कालेकर [ कविता २ ]

२ प्रेमावाचुनि सर्व घटे — १४३

# भिषग्विलास.

## आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस उपयोगी

### प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक

हें मासिक पुस्तक सुरू होऊन ११ वर्षें पुरीं झालीं. ह्यांत यथा-वकाश, शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग, त्याचें निदान व चिकित्सा, औषधी व त्यांचे गुण, आरोग्यरक्षण, इत्यादि उपयुक्त विषयावर सविस्तर माहिती, आपल्या व इंग्रजी वैद्यकानुसार येत असते. या पुस्तकाचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा करणारांसच न होता इतर सर्व सुशिक्षित व कुटुंबी माणसांस व्हावा, म्हणून ह्यांतील माहिती सुलभ भाषेंत दिली जाते. वार्षिक वर्गणी आगाऊ टपालखर्च सह अवघी १॥ रु.

व्यवस्थापक 'भिषग्विलास'—सोलापुर

---

# श्वासरिपु.

धापापासून दमा, खोकला, कफ व त्यापासून ज्वर, अरुचि, निद्रानाश, मलावरोध, अपचन वगैरे विकार होतात त्यावर तत्काळ गुण येतो. १ बा ८।१२ आ. ट. [illegible] आ

एजंट—गोगटे आणि कंपनी मुंबई.

पत्ता—जी. डी. भावे वैद्य, पुणें.

---

# श्रीहरिभजनामृत.

ज्ञानांजनाचे संपादक व महाराष्ट्र कवि चरित्रकर्ते रा. आजगांवकर यांनी निवडलेल्या बहुतेक सर्व जुन्या कवींच्या सर्वोत्कृष्ट व अत्यंत प्रेमळ पदांचा हा संग्रह सर्व सगुणोपासकांच्या डोळ्यांतून खचीतें प्रेमाश्रुवर्षाव करवील. किं. ट. व्ही. पी. सह १० आणे.

पत्ता—मॅनेजर ज्ञानांजन, भांगवाडी, मुंबई २.

राजष्ट्र न. बा. ५२७

## काव्यरत्नावलीची किंमत किती कमी आहे ?

एकाच नांवावर एका प्रतीस टपाल व्हीपीसह किंमत १। रु. दोन प्रतीस १॥ रु. तीन प्रतींस १॥। रु. चार प्रतींस २ रु.

रत्नावलीचीं मागील बाईंड केलेलीं पुस्तकें रद्दीच्या भावानें विकण्याचा प्रसंग आला आहे. हीं सर्व अनुक्रमानें घेतल्यास प्रत्येक पुस्तकास आठ आणे. फुटकळ पुस्तकास दहा आणे टपाल व्हीपी खर्च मुळींच नाहीं ज्यास हीं पुस्तकें एकदम घेण्यास सवड नसेल, त्यास प्रत्येक महिन्यास एक एक पुस्तक पाठविण्यात येईल.

संपादक काव्यरत्नावली जळगाव.

---

## नवीन काव्य ! अगदीच नवीन प्रकारचें काव्य !

# प्रवासी.

इंग्रेजी वाङ्मयास छलामभूत असणारीं जीं कित्येक सुंदर व अमूल्य रत्नें आहेत त्यामध्यें आंग्लकवि गोल्डस्मिथचें 'ट्रॅव्हलर' काव्य श्रेष्ठच प्रसिद्ध आहे. त्याची ख्याति आज सर्वत्र होत आहे. अशा सर्वांग सुंदर काव्याचें आम्ही मुद्दाम मराठी आर्याबद्ध भाषांतर करविलें आहे या काव्यावरून १८ व्या शतकांतील यूरोपीय समाजस्थितीचें साद्यंत चित्र डोळ्यापुढें उभें राहतें. पुस्तकास आरंभीं कवीचें चरित्र देऊन काव्याचें चिकित्सक विवेचन केलें आहे; व प्रत्येक सर्गाचें प्रारंभीं विस्तृत विषय प्रवेश दिला आहे. त्यामुळें काव्य समजण्यास फारच सुलभ जातें. पुस्तकाची किंमत ४) व्ही. पी नें ४६

सेक्रेटरी.

मनोरंजक पुस्तकमाला भोर.